

# अंगारमळा

शरद जोशी

# अंगारमळा

शरद जोशी

जनशक्ती वाचक चळवळ

जनशक्ती
वाचक
चळवळ

अंगारमळा । शरद जोशी
Angarmala by Sharad Joshi

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ
पिनाक, २४४-समर्थनगर,
औरंगाबाद-४३१००१.
दूरभाष : (०२४०) २३४१००४.
Email : janshakti.wachak@gmail.com

© शरद जोशी
ए १००१/१००२,
देवी आर्किड, भाऊ पाटील रोड,
बोपोडी, पुणे-४११०२०.

मुद्रक
रुद्रायणी, औरंगाबाद.

मुखपृष्ठ
सरदार

प्रथमावृत्ती
३ सप्टेंबर २००८

द्वितीयावृत्ती
२४ फेब्रुवारी २०१५
जागतिक मुद्रण दिन

मूल्य रु. १५०/-

माझ्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य
**शेतकरी भावा-बहिणींना**

## दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

'अंगारमळा' या पुस्तकाला अतिशय चांगला प्रतिसाद वाचकांनी, समीक्षकांनी, अभ्यासकांनी आणि अर्थातच शेतकरी संघटनेच्या असंख्य पाईकांनी दिला. महाराष्ट्र शासनाने उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार देऊन गौरवले. दुसरी आवृत्ती ही केवळ पुनर्मुद्रण नसून चार लेखांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. शेतकरी संघटकच्या पूर्वी 'साप्ताहिक वारकरी' आणि नंतर काही काळ 'साप्ताहिक ग्यानबा' यांनी शेतकरी संघटनेच्या इतिहासात महत्त्वाची भूमिका बजावली होती. या नियतकालिकांमधून शरद जोशींनी केलेले लिखाण बाजूला राहून गेले होते. शरद जोशींचे समग्र वाङ्मय प्रकाशित करत असताना ही बाब प्रामुख्याने लक्षात आली. शेती, शेतकरी, आंदोलन या विषयावरील लिखाण इतर पुस्तकांमध्ये समाविष्ट केलेले आहे. नव्याने सापडलेल्या त्यांच्या चार लेखांची प्रकृती अंगारमळ्यातील लेखांशी जुळणारी होती. माजी पंतप्रधान कै. चरणसिंह, शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष अनिल गोटे आणि रामचंद्रबापू पाटील यांच्यावरचे व्यक्तिचित्रात्मक लेख शिवाय साप्ताहिक वारकरीची शरद जोशींनी सांगितलेली जन्मकथा या नवीन मजकुराचा समावेश सदर पुस्तकात आहे.

महाराष्ट्रात सामाजिक क्षेत्रात नेतृत्व करणाऱ्यांनी लिखाण करण्याची एक मोठी परंपरा आहे. केवळ रुक्ष वैचारिक लिखाण न करता लालित्याचे पाझर काही नेत्यांच्या लिखाणात जागोजाग आढळतात. शरद जोशी हे अशा नेत्यांमधील अलीकडचे उदाहरण. विसाव्या शतकात अतिशय महत्त्वाच्या ठरलेल्या शेतकरी चळवळीच्या नेत्याने लालित्यपूर्ण भाषेचा वापर केल्याचा 'अंगारमळा' हे पुस्तक एक मोठा पुरावा होय.

दि. २४ फेब्रुवारी २०१५
औरंगाबाद.

**श्रीकांत उमरीकर**
प्रकाशक

# अनुक्रम


१. अंगारमळा ........................................................ ७
२. माझी ब्राह्मण्याची गाथा ........................................ १६
३. इति एकाध्याय ................................................. २२
४. मुहूर्तम् ज्वलितम् श्रेयम् ........................................ ३६
५. माझी शिक्षणगाथा ............................................ ४६
६. विद्यानामे अविद्येचा शिक्षक ................................... ५७
७. शंकरराव गेले .................................................. ६२
८. अफाट बाबूलाल ................................................ ७०
९. मुशीतील आचेने सिद्ध झालेले कार्यकर्ते ....................... ८३
१०. दोन मनस्वी माणसे ........................................... ८९
११. एका कामगार चळवळीचा अस्त ............................... ९६
१२. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांस पत्र .......................... १०६
१३. शेतकरी आंदोलन आणि साहित्यिक ........................... १११
१४. मी 'साहित्यिक' नाही ........................................ १३१
१५. बस करा हे समाजसेवेचे ढोंग ................................. १४७
१६. शांत व मृदू स्वभावाचे चौधरी ................................ १७७
१७. 'अनिल' जादूच्या दिव्यातील राक्षस .......................... १८०
१८. वारकरीची जन्मकथा .......................................... १८७
१९. बापू नावाचे मोहोळ .......................................... १९३

# अंगारमळा

१९७६ च्या मे महिन्यात पहिल्याच तारखेला आम्ही हिंदुस्थानात परतलो. श्रेया आणि गौरी दोन्ही मुलींना खरं म्हणजे बर्न सोडल्याचं दु:ख होतं. ''तिथेच राहावयाचं ठरवलं आहे, चला परत.'' म्हटलं असतं तर दोघींनीही 'हुप्पी' म्हणून आनंदाच्या आरोळ्या ठोकल्या असत्या, पण पोरी आपल्या बापालां पक्क ओळखत होत्या. आता परत जाणे नाही हे त्यांना उमगले होते. अगदी समजायला लागल्यापासून त्या दोघीही स्वित्झर्लंडमध्येच वाढलेल्या. तसं त्यांचं सगळं विश्व तिथलंच.

मायदेशाबद्दल साहजिकच त्यांचं मत बरं नव्हतं. १९७० मध्ये तीन महिन्यांची रजा घेऊन आम्ही एकदा परत आलो होतो. त्यांचं देशाविषयी चांगलं मत व्हावं याकरिता अगदी दिल्ली, सिमला, आग्रा, पुणे असा कार्यक्रम आखला होता. दिल्ली ते सिमला जायला मुद्दाम 'डिलक्स' बस घेतली होती. वाटेत जाताना बेफाम पाऊस सुरू झाला. त्या आरामगाडीच्या छपरातूनही धो धो पाणी आत येत होते. सगळे भिजून चिंब झालो. थंडीने काकडून गेलो. चंडीगड अगदी फ्रेंच स्थापत्यशास्त्रज्ञ कुर्वीसिऐची कलाकृती म्हणून अभिमानाने दाखवले. बसस्थानकावरील स्वच्छतागृह मुलींनी पाहिले आणि त्यांचा जीव घाबरा झाल्याचे मला जाणवले. शक्य असते, तर त्याच दिवशी विमान पकडून त्या परत बर्नला गेल्या असत्या.

त्यांची शाळा, मित्र-मैत्रिणी, फ्रेंच भाषा, बर्फावरचे खेळ सगळे सगळे मागे टाकून त्या निघाल्या होत्या. आईबापांखेरीज विश्व नसलेल्या त्या अजाण पोरींवर खरं म्हणजे आम्ही केवढा जुलूम चालवला होता. गौरी काहीच बोलत नव्हती. श्रेयाला जाण मोठी. वातावरणात काहीतरी ताण आहे हे तिला कळलं होतं आणि काहीतरी गमतीचं बोलून, निदान बोलतं राहून ती ताण कमी करण्याचा प्रयत्न करू पाहत होती.

लीलाही तशी गप्पच होती. मायदेशी परत येऊन कोरडवाहू शेती करायची या योजनेबद्दल गेली चार वर्षे आम्ही चर्चा करीत होतो. ''शेती करायची, तर भरपूर पाण्याची करावी, शेती आणि गरिबी यांचा संबंध बागायती शेतीच्या प्रयोगातसुद्धा कळू शकेल,'' अशी तिची सूचना होती. आता उडी मारली म्हटल्यावर तिच्याही मनावर दडपण होतेच, पण बर्नला तशी ती कंटाळली होती. एम्.ए.ला पहिली आलेली, गणकयंत्राचे विशेष ज्ञान, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन या भाषांवर प्रभुत्व. पण बर्नला त्याचा काहीच उपयोग होत

नाही अशी तिला खंत वाटे. हिंदुस्थानात आपल्या कर्तृत्वाला वाव मिळेल याची तिला खात्री होती, आणि जरूर पडली, तर एकटीने सगळा संसार सांभाळण्याची तिची हिंमतही होती. निदान तशी हिंमत असल्याचे ती दाखवत होती.

तिच्या मनात खरोखरच काय चाललं होतं कोण जाणे. माझी ही उडी खरे म्हटले, तर तिच्यावरही अन्यायच होता. लग्न चारचौघांसारखं दाखवून झालेलं. माझ्या निरीश्वरवादामुळे विवाह कोणताही धार्मिक विधी न करता नोंदणी पद्धतीने झाला, एवढंच काय ते जगावेगळं लक्षण. आय.ए.एस. पास झालेल्या हुशार, कर्तबगार समजल्या जाणाऱ्या नवऱ्याच्या हाती तिने हात दिला, तो सुखासमाधानाच्या चौकोनी कुटुंबाच्या राज्यात चिरकाल राज्य करण्यासाठी. पुढं हे असं काही घडेल याची काय कल्पना?

आपल्या संसाराचे वेगळेपण तिला लग्नानंतर फार लवकर लक्षात आलं असावं. तिनं स्वत:ला पार बदलवून टाकलं. माझी पहिली शिष्या तीच. बर्नच्या सुखसंपदेतलं माझं असमाधान तिला कळलं होतं. जानकीच्या निष्ठेने ती माझ्या मागोमाग येत होती. त्या वेळी कोणालाच ठाऊक नव्हते, की रामायणाच्या काळानंतर रावणांची संख्या फार माजली आहे आणि सीतेची शोकांतिका आता दंडकारण्यातच होते.

सभा, भाषणांतून कोणी मी केलेल्या त्यागाचा आता उल्लेख केला म्हणजे मला हसू येतं. संघटनेच्या कामात मी काही करुणेच्या प्रेरणेने पडलेलो नाही. कोणा तळागाळातील जनसामान्यांचा उद्धार करण्याची मनिषा ठेवण्याचा उद्धटपणा माझ्याकडे नाही. या कामात मला अपरंपार आनंद मिळतो म्हणून मी हे काम करतो. आजपर्यंत हजारो शेतकरी आंदोलनात तुरुंगात गेले. कित्येकांनी लाठ्या खाल्ल्या. निपाणी भागात गेलो, तर डझनभर शेतकरी लाठ्या-गोळ्यांनी हातपाय गेलेले कुबड्या खाड्खाड् वाजवीत भेटायला येतात. बावीस घरांतली तरुण कर्ती माणसं पोलिसांच्या गोळीबाराला बळी पडली. माझा सगळा संसार आज उजाड झाला आहे. लीला आज नाही. श्रेया, गौरीला लहानपणी कधी कोणत्या हट्टाला नाही म्हणावं लागलं नाही. आता अगदी साध्या गोष्टींकरितासुद्धा त्यांना आता हे आपल्याला परवडण्यासारखं नाही हे सांगायची वेळ येते; पण पोरी हुशार आहेत. बापावर अशी वेळ येऊच देत नाहीत. समजून घेतात. एवढं होऊनसुद्धा या कामात मला आनंद वाटतो. मग त्याग कसला? उलट, माझ्याइतकं भाग्यवान कोण? त्याग काय आजपर्यंत थोड्यांनी केला? अनेकांची बलिदानं व्यर्थ गेली. त्यांच्या नजरेला काहीसुद्धा फळ पडलं नाही. मी शेतकऱ्यांच्या ना जातीचा, ना पातीचा, ना पेशाचा. देशभरातील शेतकऱ्यांनी मला जे प्रेम दिले त्याला तोड नाही.



थोडं नाटकी वाटेल; पण आमचं घर मोडलं तरी श्रेया, गौरी आणि मी आज शेकडो कुटुंबांत घरातल्यासारखे वावरतो.

माझी एक आई आहे. चिकोडी तालुक्यात निपाणी आंदोलन १४ मार्च १९८१ ला चालू झाले. चार- पाच हजार शेतकरी जमतील सत्याग्रहाला अशी अपेक्षा होती. तिथे चाळीस हजारांवर शेतकरी जमले. सात आठ किलोमीटर लांबीचा पुणे-बंगळूर रस्त्याचा भाग आंदोलननगराने व्यापला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी पत्रकारांबरोबर प्रत्येक गावच्या मांडवाला भेट देत निघालो. एक म्हातारीशी बाई धावत माझ्याकडे आली. उंच शिडशिडीत बांधा. जन्मभरचे कष्ट, चेहऱ्यावरच्या रेषारेषांच्या जाळ्यांत खोदलेले. मला म्हणाली, ''साहेब, तुम्ही गावांतल्या माय-बहिणींना सत्याग्रहाला यायला सांगितले म्हणून आलो. नेसूचं धड नव्हतं म्हणून शेजारणी कडून लुगडं घेऊन आलो बघा.'' या माझ्या आईच्या घरी मी नंतर गेलो. आपल्या लेकीच्या घरून दूध आणून तिनं मला प्यायला दिलं. मला दूध पिताना पाहिलं तेव्हाच तिला समाधान वाटलं.

पण 'त्याग' शब्दाची विदारक जाणीव प्रत्यक्ष अनुभवल्याशिवाय कळणं कठीण. दु:खे अगदी छोटी छोटी; पण फार टोचायची. मुलींना फ्रेंच, जर्मन, लॅटिन सोडून आता मराठी, हिंदी, इंग्रजी शिकायचं होतं. बर्नमधून निघण्यापूर्वी श्रेयानं फ्रेंचमध्ये कोपर्निकसवर निबंध लिहिला होता. ती आता 'गमभन' गिरवायला बसली होती. मुलींना शाळेत प्रवेश मिळण्याची मोठी अडचण झाली. ओळखपाळख कुठे वापरायची नाही असा निश्चय केला होता. शिक्षण निदेशालयातल्या सामान्य कर्मचाऱ्यांपुढे रांगेत उभा राहून जात होतो. दरवाज्यापाशी बसत होतो. काही अधिकाऱ्यांची शिरजोरी पाहून वाटायचे, आता यांना आपण कोण आहोत ते सांगावं. जादूची कांडी फिरल्यासारखं काम होऊन जाईल; पण प्रत्येकवेळी मोह आवरला. रेशनदुकान, गॅस वितरक, वकील, मुख्याध्यापक सर्वांपुढे तोंड वेंगाडणे झाले. आम्ही चेहऱ्यावर कोणीच काही दाखवत नव्हतो. लीला मात्र जास्त आक्रमक बनत चालली होती. आमच्या उपक्रमाविषयी कोणी चिंता, शंका व्यक्त केली की ती त्याच्यावर तुटून पडायची. बाहेरून आमच्यातील प्रत्येकजण सगळं काही व्यवस्थित चाललं आहे असं दाखवीत होता. दुसऱ्याचा धीर तुटू नये अशी कोशीश करीत होता.

झोपी जातांना चिंतांची तोटी बंद करून झोपी जायचं ही माझी फार जुनी कला आहे. झोप लागताना सगळ्या चिंतांचा आणि तणावांचा काही त्रास झाला नाही. रात्री अडीचतीन वाजता मात्र झोप खाडकन खुले. पुढे झोपणेच अशक्य होई. कपाळाला हात

लावून मी स्वत:लाच विचारी, "मी पाहतो आहे ते खरं की स्वप्न?" आसपास शांतपणे झोपलेल्या लीला, श्रेया, गौरीकडे पाहून पोटात गलबलून यायचं. यांचं जीवन उद्ध्वस्त करण्याचा मला काय अधिकार होता? त्याग म्हणजे रुपयापैशांचा नसतो. त्याग अशा अनेक दाहक क्षणांनी गुंफलेला असतो.

आंबेठाण येथे शेती तर घेतली. साडेतेवीस एकर कोरडवाहू जमीन. पुण्यातल्या सिंध कॉलनीत घर घेतलं, मुलींच्या शाळेच्या सोयीने. घराचे नाव ठेवले 'मृद्‌गंध'. आंबेठाण या माळरानातल्या रखरखीत शेताचे नाव काय ठेवावे? मराठीतल्या कवितांत नावे शोधायची माझी जुनी सवय. केशवसुतांच्या-

*जेथे ओढे वनराजी। वृत्ती तेथे रमे माझी।*

*कारण काही साक्ष तिथे। मज त्या श्रेयाची पटते।*

यावरून पहिल्यावहिल्या मुलीचे नाव ठेवले. आता कुसुमाग्रजांच्या ओळी आठवल्या-

*पदोपदी पसरून निखारे, आपुल्याच हाती*
*होवूनिया बेहोश धावलो, ध्येयपथावरती*
*कधी न थांबलो विश्रांतीस्तव, पाहिले न मागे*
*बांधू न शकलो प्रीतीचे वा कीर्तीचे धागे*
*एकच तारा समोर आणिक, पायतळी* ***अंगार***

बस शेताचे नाव ठेवले '**अंगारमळा**'. या अंगाराने पुढे वणवा पेटायचा होता.

एक जानेवारी १९७७ ला कामाला सुरुवात केली. तातडीने दोन विहिरींची कामे सुरू केली. रब्बी पिके संपल्यानंतर आमच्या भागात रोजगार नाहीच. अडीचशे तीनशे माणसे कामाला असायची. मलाही काम उरकायची घाई होतीच. खोदणे, सुरुंग लावणे, बांधकाम करणे, खरिपाची तयारी करणे अशी सगळी कामे चार एक महिन्यांत आटोपायची होती. मजुरी किमान वेतन कायद्याप्रमाणे स्त्रियांना आणि पुरुषांना सारखीच, तीन रुपये ठरवली. मला त्या वेळी मजुरी नगण्यच वाटायची; पण गावकऱ्यांत खळबळ माजली. तसे आंबेठाणमध्ये भूमिहीन कोणीच नाही; पण अजिबात दुसरीकडे मजुरीला जातच नाही अशी डझनभरसुद्धा घरे नसतील. त्यातलीच काही मंडळी भेटायला आली. उन्हाळ्याच्या दिवसांत विहिरीच्या कामाचा चालू रोज दीड रुपया होता. मी रोज वाढवला तर बाकीच्यांनी पैसे कुठून द्यावेत आणि कामे कशी करून घ्यावीत? मला त्या वेळी तरी त्यांची खरी अडचण समजली नव्हती. मी म्हटले,



"मी बाहेरचा माणूस. कायद्याने ठरवलेल्यापेक्षा कमी वेतन कसा देऊ?" त्यांना काही पटले असे दिसले नाही; पण पुढे बोलता तरी आले नाही. आज किमान मजुरी बारा रुपये रोज आहे (सप्टेंबर १९८८). प्रत्यक्षात पुरुषांना त्याच्यावर व स्त्रियांना बहुतेक कामांना सातच्या वर रोज आहे. शेजारी महाराष्ट्र उद्योग महामंडळाची उद्योगनगरी उभी राहते आहे. तेथे बांधकामावर मजुरीसाठी वीस वीस रुपये मिळतात. १९७७ मधली गावकऱ्यांची अडचण मला आज समजते आहे. "तीन रुपये तुम्ही देऊ शकता, आनंद आहे. आम्ही द्यावे कोठून?" कारखानेवाले वीस रुपये देऊ शकतात, भले हो त्यांची. मी द्यावे कसे व कोठून? १९७८ पासून मी संकरित ज्वारी किलोला सव्वा रुपयाच्या आसपास विकतो आहे. कांद्याला दरवर्षी साठ रुपये क्विंटल भाव पक्का. पैसे आणावे कोठून?

शेतावर मुक्कामाला अजून आडोसा नव्हता. शेतावर वीज नाही. हे लांब लांब साप निघत. साप निघाला नाही असा दिवसच नाही. नाथा भेगडे फटाफट साप मारायचा. आता माझ्या शेताचा कारभारी तोच आहे; पण साप मारणे त्याने एकाएकी सोडून दिले. सकाळी उठून मी चाळीस किलोमीटर 'चेतक'वरून येई. वेगवेगळ्या ठिकाणी कामे चालत. पाळीपाळीने रांगेत जाऊन दगड पाट्या उचलू लागे. कामावर येणारी अडीचशे तीनशे बायामाणसं पाच-पाच, दहा-दहा किलोमीटर चालत अनवाणी पायांनी येत. भर उन्हाळ्याचे दिवस. प्यायच्या पाण्याची गैरसोयच. परातीत पाणी घेऊन तोंडाला पदर लावून पाणी गाळून प्यायचे. निसर्गाने बुडविलेल्या, चोरांनी लुटलेल्या, सावकारांनी नाडलेल्या, सुलतानांनी पिडलेल्या, धर्मजातींनी गांजलेल्या या मंडळींच्या जवळ जाण्याचा मी प्रयत्न करीत होतो; पण कुणी खुलेपणाने बोलत नव्हते. त्यांच्यात माझ्यात अंतर किती? ते उल्लंघावे कसे? पुढे पुढे मला युक्ती कळली, निबंधवार उत्तरे द्यावी लागतील असे प्रश्न विचारायचेच नाहीत. वस्तुनिष्ठ प्रश्न विचारायचे. उत्तरे आपण सुचवायची. उत्तर कोणत्या तोंडातून दिले जाते, त्यापेक्षा उत्तर देताना चेहऱ्यावरची मुद्रा बारकाईने न्याहाळायची.

मध्ये जेवायची सुटी दोन तास असायची. म्हणजे गावातल्या लोकांना गावात जाऊन भाकरतुकडा खाऊन यायला वेळ मिळे. तरी बरेच लोक शेतावरच सावलीला थांबत. एक दिवस मी सुचविले, "दुपारी सर्वांनी भजन म्हटले तर?" दुसऱ्या दिवशी मृदुंग, झांजा हजर झाल्या. शेतावरच्या कामाला सुरुवात झाल्यापासून मनातली उदासीनता वाढत चालली होती. कुठे जिनेव्हा न्यूयॉर्कमधील अलिशान सभागृहांतील बैठकींमधील चर्चा आणि कुठे या वैराण कातळांवरच्या जीवघेण्या उकाड्यात दगडांचे ढीग टाकणं. कोठे

होतो? कोठे आहे? काय होतो? काय आहे? असा षडाक्षरी मंत्र सारखा जपत होतो. भजनाने तरी काही बरे वाटले तर बघत होतो. खरे म्हणजे गावातले भजन नेहमी 'केशवा माधवा'नेच चालू व्हायचे; पण या निरक्षर अडाण्यांनी मी त्यांच्या चेहऱ्यावर वाचले नव्हते इतके भाव माझ्या चेहऱ्यावर वाचले होते. भजनाची सुरुवात झाली,

*हरिश्चंद्र राजा, तारामती राणी*

*डोंबाघरी भरी पाणी, डोंबाघरी पाणी...*

मृदुंग झांजांचा कल्लोळ आणि गाणाऱ्यांची सामूहिक बेसूरता ओलांडून अर्थ असा भिडला, की गळ्यातला आवंढा गिळेना.

आणीबाणीचा काळ अजून चालू होता. भूमिहीनांना दोनअडीच एकर जमिनीची वाटणी चालली होती. माझ्या जमिनीच्या पश्चिमेला दहाबारा घरांना मिळालेल्या जमिनी पडून राहिल्या होत्या. महाळुंग्याच्या शिवळे पाटलांच्या जमिनी कित्येक आदिवासींना मिळालेल्या, रिकाम्याच पडल्या होत्या. हे प्रकरण मला काही समजेना. खरे म्हणजे जमीन मिळाल्यानंतर नवभूधारकांनी उत्साहाने जमीन कसायला लागले पाहिजे होते. जमिनीचे फेरवाटप झाले, जमीन नसणाऱ्यांना जमिनी मिळाल्या म्हणजे ग्रामीण दारिद्र्याचा प्रश्न सुटतो असे आम्ही कित्येक वर्षे ऐकत, घोकत होतो आणि या जमिनी हाती आलेल्यांना त्याचे काहीच कौतुक नव्हते.

कुणी म्हणाले, जमीन मिळाली तरी औते पाहिजेत, बैल पाहिजेत, बियाणे पाहिजे, खतं पाहिजेत, नुसती जमीन घेऊन काय करता? अकलूजला का कुठे कुणी पुढाऱ्यांनी नवा प्रयोग केला. नवभूधारकांना त्यांच्या जमिनी नांगरून, पेरून द्यायच्या. मी मनात विचार केला, पाचपंचवीस नवभूधारक एकत्र झाले, थोडीफार पैशाची सोय झाली, तर सामूहिक शेती जमणार नाही का? खेडच्या प्रांत अधिकाऱ्यांनी दावडीच्या नवभूधारकांची गाठ घालून दिली. अडचण कोणतीच नव्हती, जुना मालक थोडा कटकट्या होता; पण कायद्याने त्याचे काहीच चालण्यासारखे नव्हते. मामलेदारांनी स्वत: येऊन जमिनीच्या सीमा काढून दिल्या. एकूण अकरा भूमिहीनांना सलग जागी जमीन मिळाली होती. अकरा घरच्यांची बैठक बोलावली. निम्मेअधिक चावडीवर आले. सगळ्यांनी सामूहिक शेती करायची. सगळ्यांची जमीन सामूहिक मानायची. माझा हा तुकडा असे म्हणायचा कोणालाच अधिकार राहणार नाही. नाही तर विहिरीची जागा ज्याच्या जमिनीवर लागेल, तो विहीर खणून झाल्यावर म्हणायला लागायचा- मला नाही तुमच्या सामूहिक शेतीत



सामील व्हायचे. व्हा माझ्या जमिनीच्या बाहेर; म्हणजे मग सगळेच मुसळ केरांत जायचे. शेतीचे नाव ठरले, 'अकरा भूमिपुत्र'.

एक एक गमतीची गोष्ट लक्षात आली. या अकरापैकी तीनच खऱ्या अर्थाने भूमिहीन होते. त्यांच्या घरचे पुण्या-मुंबईला नोकरीत होते. त्यांना शेती नावावर झाली यात आनंद होता. वेगवेगळ्या पुढाऱ्यांना भेटून त्यांनी जमीन मिळावी याकरिता पैसा खर्चही केला होता; पण जमीन कसण्यात त्यांना मनातून काहीही उत्साह नव्हता. माझ्यासमोर, अधिकाऱ्यांसमोर जमीन कसण्याबाबत आपल्या उत्साहाचे प्रदर्शन करण्यात मात्र त्यांची अहमहमिका चाले. बँकेकडून कर्ज मिळवायची व्यवस्था मी खेटे घालून घालून करून आणली. बरोबर अकरापैकी फक्त एकच भूमिपुत्र; बाकीचे सगळे घरच्या कामासाठी गुंतलेले. एकोणीसाव्या शतकातील मिशनऱ्यांच्या धाटणीवर मी स्वत:लाच धीर देत होतो. आपल्यावर विश्वास ठेवण्यासारखे आपण प्रत्यक्षात काय करून दाखवले आहे? त्यांनी निरुत्साह दाखवावा हे साहजिकच नाही, योग्यही आहे. काम उभे राहील तस तसा त्यांचा विश्वास वाढेल.

जमीन डोंगराच्या कपारीत उतरणीवर, बांधबंदिस्तीचे मोठे काम करणे जरूर होते. संबंधित खात्याच्या मंडळींनी काम करून देणे कबूल केले. अट एक-कामाकरिता रोजावर लावायची माणसे जागेवर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आमची. मी आनंदाने कबूल केले. तालुक्याच्या गावाहून दावडीला आलो. दोन चार भूमिपुत्र भेटले. त्यांना निरोप दिला, दोनचार दिवसांत आपण शेतीवर राहायला जायचे. प्रत्येक नवभूधारकाच्या घरातली दोन माणसे तरी राहायला आली पाहिजेत. बांधबंदिस्तीचे काम आपणच केले तर पदरचा खर्च करावयाच्या ऐवजी मजुरी मिळेल. जे गैरहजर राहतील त्यांना वेगळा भार द्यावा लागेल.

ठरलेल्या दिवशी सकाळी उजाडता उजाडता दावडीला गेलो. कोणत्याच घरचे कोणीच सापडेना. तास दोन तासांत चार घरातली नऊ माणसं हाती लागली. त्यांना माझ्या जीपमध्ये घालून त्यांच्या जमिनीवर नेले. जमिनीवर अफाट दगडगोटे गोळा करायला सुरुवात झाली. दगड लावून घेऊन पहिल्यांदा रात्रीकरिता आडोशाच्या भिंती करून घ्यायला सुरुवात झाली. संध्याकाळी कंदिलाच्या प्रकाशात सगळ्यांनी भाकऱ्या खाल्ल्या.

मायदेशी परत आल्यापासून आयुष्याला काही दिशा सापडते आहे असं वाटलं. जेवण झाल्यावर दोन तरुणांनी गावात जाऊन उद्या सकाळी प्रत्येक घरच्या दोघादोघांना गोळा करून आणण्याची हमी देऊन गावाकडे प्रस्थान ठेवले. एक दोन तशीच सटकली. आम्ही सहा जण दगडांच्या रचलेल्या भिंतींच्या आडोशात डोंगरातील वाऱ्याच्या भणभणाटात रात्र काढली. दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत नवीन कोणीच आले नाही. गावातल्या कोणत्या तरी मर्तिकाची बातमी लागली. राहिलेले भूमिपुत्रही लगबगा गावाकडे जाऊ लागले.

अशाच प्रकारची पुनरावृत्ती होऊ लागली. तेव्हा मी सगळ्यांना एकदा विचारले, "तुमची अडचण तरी काय आहे? तुम्हाला शेती करायची आहे की नाही? नसेल करायची तर मला मोकळे करा."

"वा, वा! असं कुठं झालंय? तुम्ही गेला म्हणजे सगळंच कोसळंल बघा. मग तर आम्हाला तोंडात मातीच घालावी लागेल अन् तो मालक आम्हाला आता जगू देईल का? साहेब, असं करू, जर्‍रा बेताबेतानंच घेऊ, मालकाला एकदम चिडवणं बरं नाही..." वगैरे, वगैरे, वगैरे.

माझ्या एकूण प्रकरण लक्षात आलं. एव्हाना हजार दोन हजार मी पदरचे खर्चून बसलो होतो. अकरापैकी एकालाही जमीन कसण्याची आणि कष्ट करण्याची इच्छा नव्हती. बिगर शेती उत्पन्नाचे साधन असतानाही भूमिहीन म्हणून नावे नोंदवून त्यांनी जमीन मिळवली होती. माझ्यासारख्या शहरी माणसापुढे भूमिहीनतेचे करुण नाटक करून दाखवायचे कौशल्य त्यांना जमले होते. गावकऱ्यांपुढे त्यांचे नाटक चालत नव्हते. त्यांना जमीन कसायची नव्हती. पुढेमागे खरीददार सापडला तर विकून दोन पैसे करायचे होते आणि जमले तर हस्तांतरित जमिनी म्हणून त्या कदाचित परतही मिळवायच्या होत्या.

...पण यात त्यांचे कुठेच चुकत नव्हते. चुकत माझेच होते. बँकेच्या कर्जाचे प्रकरण करतानाच माझ्या लक्षात आले होते. विहिरीचा खर्च करून, पाण्याची सोय करून शेती करायची म्हटले तर कोणतेही पीक काढले तरी बँकेच्या कर्जाची परतफेड यावज्जन्म शक्य नव्हती. दरवर्षी चांगले पीक येईल असा हिशेब केला तरी खर्च फिटत नव्हता. ही काय गंमत आहे. याचा उलगडा मला स्वतःला त्या वेळी झाला नव्हता. गावकऱ्यांना ते कळलं होतं. भूमिपुत्रांनाही ते कळलं होतं; पण ते मला सांगत नव्हते. हे सर्व समाजव्यवस्थेचं गुह्यतम गुह्य आणखी उग्र तपस्येने माझे मलाच शोधावे लागणार होते.



"तुमची सगळ्यांची जमिनीवर राहायला जायची तयारी झाली, म्हणजे मला निरोप द्या." असं म्हणून मी भूमिपुत्रांचा निरोप घेतला. एक धडा शिकून. यापुढे लोकांचे भले करण्याचे प्रयत्न बंद. भिकेच्या आणि मदतीच्या प्रकल्पातून गरिबीचा प्रश्न सुटत नाही. वर्षानुवर्षे गावागावातील गरिबी संपण्याबद्दल जो मार्ग मनात शंकासुद्धा न आणता मी मानला होता, त्याबद्दलच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पुन्हा एकदा शून्यावर आलो होतो. स्वित्झर्लंडला परत जाण्याचा मोह मी कसा टाळला कुणास ठाऊक?

(सा. ग्यानबा, १२ सप्टेंबर १९८८)

■■

# माझ्या ब्राह्मण्याची गाथा

मी ब्राह्मण घरात जन्मलो. जोशी आडनावावरून हे स्पष्टच आहे. माझ्या वडिलांचे आई-वडील, ते चार-पाच वर्षांचे व्हायच्या आतच वारले. त्यांचे बघणारे दुसरे कुणीच नसल्यामुळे कोल्हापूरच्या एका मिशन शाळेत त्यांचे शिक्षण झाले. त्यांच्या मनावर ख्रिस्ती शिकवणुकीचा आणि बायबलचा मोठा प्रभाव होता. वृत्तीने धार्मिक असले, तरी ब्राह्मण्याचा अहंकार त्यांच्याकडे नावालाही नव्हता. माझी आई पंढरपूरची. पंढरपूरच्या बडवे मंडळींच्या वर्तनाची लहानपणापासून घृणा असलेली. तसे तिचे शाळेतील शिक्षण काहीच नाही. अगदी लहानपणच्या माझ्या आठवणीतही घरामध्ये स्पृश्यास्पृश्यता पाळली गेलेली मला आठवत नाही. नाशिकच्या शाळेतील गायकवाड नावाचा एक हरिजन वर्गमित्र पाणी प्यायचे झाले, तर फक्त आमच्या घरी येत असे, हेही मला आठवते. आईने केलेल्या स्पृश्यास्पृश्यतेची एकच आठवण अजून स्पष्ट आहे. परदेशांतील माझ्या मित्रांना ती आठवण अनेकदा सांगितली आहे आणि त्यांनाही मोठी गंमत वाटली.

वडील सरकारी नोकरीत आणि काळ दुसऱ्या महायुद्धाचा. सगळ्याच सरकारी कामांचा संबंध कोठे ना कोठे लष्कराशी येई. वडिलांची कचेरी घरातच, एका खोलीत होती. एक दिवस एक अमेरिकन अधिकारी कामाच्या निमित्ताने त्या कचेरीत आला होता. बराच वेळ बसलाही होता. तो गेल्यानंतर आईने केवळ कचेरीची खोलीच नव्हे, तर सारे घर बादल्या बादल्या पाणी ओतून धुऊन घेतले होते.

तरीही मनामध्ये खोल कुठेतरी ब्राह्मण्याची जाणीव त्या काळात असली पाहिजे. या जाणिवेच्या फोलपणाची कल्पना आली त्या दिवशी माझ्या विचाराच्या यात्रेतील एक मोठा टप्पा मी गाठला. त्या वेळी मी फार तर बारातेरा वर्षांचा असेन. एक दिवस बसल्याबसल्या एकाएकी माझ्या मनांत विचार येऊन गेला, आपण केवढे भाग्यवान आहोत! अनेक सूर्यमालिकांच्या आणि ग्रहताऱ्यांच्या विश्वात आपण सर्वांत अनुकूल अशा पृथ्वीवर जन्मलो, पृथ्वीवर सर्वश्रेष्ठ राष्ट्र भारत! त्यात जन्म घेतला. भारतात शिवछत्रपती आणि ज्ञानेश्वरांसारख्या पुरुषश्रेष्ठांच्या महाराष्ट्रात जन्मलो आणि त्यातही सर्वोत्तम हिंदू धर्मात आणि ब्राह्मण कुलात जन्म घेतला. जन्मत:च सर्वांत सर्वोत्तम सगळ्या गोष्टी मिळाल्या, हा मोठा दुर्लभ लाभच म्हटला पाहिजे.

त्या वयात अशी आत्मप्रौढीची भावना अनेकांच्या मनात येते आणि बहुतेकांच्या



मनात ती कायम राहते. मला मात्र एवढ्या दुर्लभ गोष्टींचा एकत्र समुच्चय आपल्या बाबतीत झाला आहे, हे काही पटेना आणि मी जन्माने माझ्या असलेल्या गोष्टी खरोखरच सर्वोत्तम आहेत काय? याचा शोध घेऊ लागलो.

भारत देश सर्वश्रेष्ठ कसा? त्यात काही वीरमणी, नारीरत्ने, साधुसंत झाले हे खरे; पण या सगळ्या जगात जी काही राष्ट्रे गुलाम आहेत, पारतंत्र्यात आहेत; त्यांच्यात भारताची गणना आहे. जगातील अत्यंत गरीब, दुष्काळाने गांजलेल्या देशांत भारत मोडतो. मग असे राष्ट्र सर्वश्रेष्ठ कसे असेल?

महाराष्ट्रात शिवछत्रपती जन्मले असतील, ज्ञानेश्वरांनीही प्रतिभेचा चमत्कार मराठीत करून दाखवला असेल; पण इतर प्रदेशातही अशी माणसं जन्मतात आणि अशा नररत्नांचा अभिमान त्यांच्या त्यांच्या प्रदेशातील लोकांना पिढ्यान्‌पिढ्या असतोच. इतर कोणत्या राज्यात जन्मलो असतो तर त्या राज्याबद्दल अशीच अभिमानाची भावना बाळगली नसती काय?

आणि हिंदू धर्मात सर्वश्रेष्ठ असे काय आहे? माझ्या शाळेतील नकाशांचे पुस्तक दाखवत होते, की जगात जास्तीत जास्त उपासक असलेले धर्म बुद्ध आणि ख्रिस्त यांचे आहेत. इस्लामही अनेक देशांत पसरला आहे. एकाच भूखंडात मर्यादित असलेल्या या धर्माला सर्वोत्तम म्हणणे खोट्या अभिमानाचे लक्षण नाही काय?

आणि ब्राह्मण जाती श्रेष्ठ आहे असे मानणे तर किती मूर्खपणाचे, ब्राह्मण जातीत काय सगळे गोखले, रानडे, टिळकच जन्मले? अपकृत्ये करणारे कुणी झालेच नाहीत? आणि इतर जातींत जन्मून अलौकिक कृत्ये करणाऱ्यांची केवढी तरी देदीप्यमान मालिका समोर असताना ब्राह्मण्याचा अभिमान धरावा कसा?

या उलटतपासणीने मी अगदी हादरून गेलो. जन्माच्या अपघाताने मिळालेल्या गोष्टींचा वृथा अभिमान बाळगण्याची आपल्यात प्रवृत्ती आहे आणि ती मोडून काढली पाहिजे, याची मला मोठ्या प्रकर्षाने जाणीव झाली. त्या दिवसापासून मी एक निश्चय केला. जन्माच्या अपघाताने आपल्याला जे जे मिळाले असेल, ते अती कनिष्ठ आहे, असे समजून विचाराची सुरुवात करायची आणि जेथे सज्जड पुरावा मिळेल, तेथेच आणि त्या पुराव्याने सिद्ध होईल तेवढेच, जन्मसिद्ध गोष्टींचे बरेपण मान्य करायचे. अशी शिस्त मी बाणवून घेतली. मला वाटते, माझे विचार शुद्ध राखण्यात या बाण्याचा प्रचंड उपयोग झाला.

अनेक वर्षे परदेशांत गेल्यामुळे कोण कोणत्या जातीचा आहे, याचा विचारही कधी

माझ्या मनात येत नाही. वर्गवादी विचारसरणी मी कधी मानत नाही; पण लोहियांसारखे विचारवंतही इतिहासाचा किंवा प्रचलित घटनांचा अर्थ लावताना जातीवर आधारलेले विवेचन करतात. सध्याच्या काळात तरी हे विवेचन अगदी गैरलागू आहे, अशी माझी धारणा आहे. अगदी अलीकडे अलीकडे दिल्लीतील एका लोहियावादी विद्वानाने शेतकरी संघटनेच्या प्रमुख नेत्यांत कोणकोणत्या जातीचे लोक आहेत असा प्रश्न विचारला होता, तेव्हा मी गडबडून गेलो. माझे निकटचे सहकारी कोणत्या जातीचे आहेत, हे जाणून घेण्याची माझ्या मनात कधी इच्छाच झाली नाही; पण माझ्याबरोबर असलेल्या सहकाऱ्याने माझी अडचणीतून सुटका केली आणि उच्चाधिकार समितीत तीन मराठा, एक माळी, एक धनगर, एक मारवाडी, एक भटक्या जमातीचा... अशी आकडेवारी देऊन माझी सुटका केली.

निपाणीच्या आंदोलनाच्या शेवटी गोळीबार झाला. तेरा शेतकरी मारले गेले, २०-२५ शेतकऱ्यांचे हातपाय मोडले. सगळ्या कार्यकर्त्यांना अटक झाली, त्या वेळी पुण्याचे काही विषमता निर्मूलनवादी तेथे भेटीसाठी गेले आणि मेलेल्यांत आणि जखमी झालेल्यांत किती कोणत्या जातीचे होते याची आकडेवारी गोळा करण्यातच त्यांनी सगळ्यात जास्त रस घेतला. त्या वेळी, इतक्या गंभीर परिस्थितीतही, मला हसू आल्याशिवाय राहिले नाही.

प्रत्येकाच्या मनात जातीचा विचार खूप खोलवर रुजलेला अजूनही आढळतो. या जातीचा विचारही मनात न आणता, महाराष्ट्रातील असंख्य शेतकऱ्यांनी मला आपले मानले हा खरोखरच एक चमत्कार आहे; पण या चमत्काराला गालबोट लावणारे मंबाजी काही थोडे थोडके निघाले नाहीत. या खेरीज कोणत्या ना कोणत्या निमित्ताने मधूनमधून माझ्या ब्राह्मण्याचा प्रश्न निघत असतोच.

१९८० मध्ये भामनेरच्या रस्त्याचा मोर्चा निघाला त्या वेळी, "या बामणाच्या मागे १० शेतकरी आले तरी.." आपले पद सोडून देण्याची फुशारकी त्यावेळच्या पंचायत समितीच्या सभापतीने मारलीच होती. १० च्या ऐवजी १०,००० शेतकरी आले, तरी त्याने राजीनामा दिला नाही ही गोष्ट वेगळी.

अगदी संघटनेबद्दल सहानुभूती असणाऱ्यांच्या मनातसुद्धा अशी भावना कधी कधी दिसून येई. कांदा आंदोलन यशस्वी झाले त्या वेळी आसपासच्या गावांपैकी अनेकांनी माझा आणि माझ्या सहकाऱ्यांचा सत्कार घडवून आणला. सत्काराच्या वेळी माझ्या सहकाऱ्यांना सरसकट फेटे बांधले जात आणि मला मात्र शाल देण्यात येई. यातील श्लेष



समजायलासुद्धा मला बराच वेळ लागला.

८० सालच्या उसाच्या आंदोलनाची बांधणी होत असताना राजकीय पक्षातील एका मोठ्या महिला नेत्याने "या ब्राह्मणाची कॉलर पकडून त्याला शेतीतले काय समजते ते विचारा," असे उद्गार नगर जिल्ह्यात काढले होते. त्यानंतर नागपूर येथील त्यांच्या सभेत शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे जाब विचारला आणि सभा उधळली गेली. या प्रसंगाने शेतकरी संघटनेचा महाप्रचंड फायदा झाला. बहुतेक सगळ्या वर्तमानपत्रांनी अग्रलेख लिहून जातीयवादी टीकेचा निषेध केला. शेतकरी संघटना गावोगाव गाजू लागली. माधवराव खंडेराव मोऱ्यांनी म्हटले, "आंदोलन झाल्यावर या बाईंना लुगडे-चोळी नेऊन द्यायला पाहिजेत इतके संघटनेवर त्यांचे उपकार आहेत."

सगळेच आहेर काही बाहेरचे होते असे नाही. गावोगावी आलेल्या पाहुण्यांना ओवाळण्याची पद्धत आहे. पाहुण्यांच्या हाती शुभेच्छा दर्शक नारळ ठेवण्याचीही पद्धत आहे. त्या काळात हे नारळ आम्ही वाटून टाकायचो. फार तर वाटेत फारच भूक लागली तर एखाद दुसरा नारळ फोडून त्यातील पाण्याखोबऱ्यावर तहानभूक भागवायचो; पण मी घरी नारळ कधी जाऊ देत नसे. एकदा काही नारळ गाडीत राहिले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी गाडी साफ करणाऱ्या मुलाने नारळ घरात नेऊन ठेवले. ते नारळ पाहून माझी बायकोच मला म्हणाली, "तुमचा धंदा तसा पिढीजातच चालू आहे. कीर्तनाची कथा बदलली आहे एवढेच."

ऊस आंदोलनाच्या ऐन भरात एक मोठी विचित्र घटना घडली. सैन्यातील एक उच्च अधिकारी मला भेटायला आले. त्यांचे वडीलही सैन्यातून निवृत्त झालेले. पुण्याच्या आसपास उसशेती करत. शेतकरी संघटनेने ३०० रु. टनाची मागणी केली तेव्हा या सज्जन गृहस्थाने उसाचा उत्पादनखर्च १८० रु. प्रतिटनापेक्षा जास्त नाही, असा लेख लिहिला होता. आंदोलन सुरू झाले, तेव्हा मेजर साहेबांच्या गावकऱ्यांनी त्यांचा निषेध करण्यासाठी त्यांची प्रेतयात्रा काढली. आपल्याच गावकऱ्यांनी आपल्याविरुद्ध उठावे याचा म्हातारबुवांना धक्काच बसला. त्यांचे चिरंजीव मला विनंती करायला आले होते, की मी त्यांच्या गावी जाऊन गावकऱ्यांची समजूत काढावी. मेजर साहेबांची समजावणी करता करता माझी पुरेवाट झाली. मी त्यांना सांगितले, की प्रेतयात्रा काढणे ही गोष्ट फार शिष्टाचाराची नाही हे खरे; पण काळ धामधुमीचा आहे. ३०० रु.च्या मागणीसाठी ३ शेतकऱ्यांचे जीव गेले आहेत, अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या हातून मर्यादेचे उल्लंघन होणे समजण्यासारखे आहे. फारच आग्रहावरून मी मेजरसाहेबांशी फोनवर बोलण्याचे

कबूल केले. फोनवर मला ते म्हणाले, ''शरदराव, मी ब्राह्मण जातीचा आहे, म्हणून माझी अशी प्रेतयात्रा निघाली.'' मी त्यांना ताबडतोब उत्तर दिले, ''मेजर साहेब, तुमच्यात आणि माझ्यात पुष्कळ मतभेद आहेत. त्यांतील पुष्कळ मिटतील, काही मिटणार नाहीत; पण या बाबतीत तुम्ही सपशेल चूक आहात हे मी ठामपणे सांगू शकतो. ज्या ब्राह्मणाच्या मनात ब्राह्मणगिरीचा अहंकार नाही, त्याला दुजाभावाने वागवले जाईल हे मला पटणेच शक्य नाही. कारण माझा अनुभव अगदी वेगळा आहे.''

ब्राह्मण्याचा उल्लेख काही वेळा विनोदापोटीही होतो. एकदा कुणी एक सहकारी ठरल्या वेळेपेक्षा खूप उशिरा आला. जवळच्या नातेवाइकाच्या बाराव्याला जावे लागल्यामुळे त्याला उशीर झाला. तो सांगू लागला की , ''काय करावे? काही झाले तरी कावळा पिंडाला शिवेचना.'' मग आसपासची सगळी मंडळी या विषयांवरील त्यांचे त्यांचे अनुभव सांगू लागली. कोणाकोणाची काय इच्छा राहिली होती, ती इच्छा पूर्ण करण्याचे वचन दिल्यावरच कावळा पिंडाला कसा शिवला, याचा व्यक्तिगत अनुभव सांगण्याची एकच गर्दी उसळली. मला मोठे आश्चर्य आणि कौतुक वाटले आणि मी म्हटले, ''माझे पूर्वज खरेच भारी असले पाहिजेत. त्यांनी तुमच्या पूर्वजांना कावळ्याच्या शरीरात मृतांचा आत्मा जातो आणि मृताची इच्छा अपुरी राहिली असल्यास कावळा पिंडाला शिवत नाही असली बातारामी कथा सांगितली आणि तुमच्या पूर्वजांना ती पूर्णपणे पटली आणि मी एवढा कळवळून पुराव्याने, शास्त्रीय आधाराने शेतीमालाच्या भावाचे महत्त्व सांगतो आहे ते तुम्हाला पटायला किती त्रास पडतो आहे.'' गंमत अशी अजूनही ही गोष्ट कधी सांगितली तर आसपासच्या कार्यकर्त्यांपैकी सर्व, विज्ञानवाद मानला तरी कावळ्याच्या पिंडाला शिवण्यातील सत्याचा पुरस्कार करणारे निघतातच.

संघटनेच्या प्रचारात आम्ही एक शिस्त पाळायचो. ''शरद जोशी ब्राह्मण आहेत म्हणून आम्ही त्यांचे ऐकू नये असे तुम्ही म्हणता, मग पुढाऱ्यांहो! तुम्ही तर आमच्या जातीचे , रक्ताचे ना! मग शरद जोशींनी जे सत्य दोन वाक्यांत सांगितले, ते सांगायला तुमची थोबाडं काय उचकाटली होती?'' हा खास आहेर माधवराव खंडेराव मोऱ्यांच्याच तोंडून यायचा. धर्मातील सर्व सणांची बांधणी आणि ब्राह्मणवर्गाने शेतकऱ्यांकडून धन उकळण्याकरिता केलेल्या योजनांचे वर्णन करण्याची जबाबदारी माझ्याकडे असायची. जोतिबा फुल्यांच्या 'शेतकऱ्यांचा असूडा'वर मी 'शतकाचा मुजरा' ही पुस्तिका लिहिली. त्यातील ब्राह्मणजातीवरील टीका वाचून अनेक ब्राह्मण माझ्यावर फार नाराज झाले.

ते असे सारखे चालूच असते. मराठवाड्यातला कुणी पुढारी मला गोडशांची अवलाद



म्हणतो, कुणी मला फक्त पिढीजात भिक्षुकीचाच व्यवसाय चालू ठेवण्याचा सल्ला देतो. याउलट, काही ब्राह्मण व्यक्ती, संस्था आणि पक्ष यांना मनातून माझ्याविषयी विनाकारण आपुलकी वाटत असते. मी त्यांच्यापासून किती योजने दूर आहे याची कल्पना करण्याची कुवत त्या बापड्यांत नसते.

पण गावोगाव फिरून शेतकऱ्यांच्या एकीची माधुकरीच मी आजही मागतो आहे, ही गोष्ट खरी आहे. केवळ शेतकऱ्यांच्याच नव्हे, तर राष्ट्राच्या मागे लागलेल्या पापग्रहांची कुंडलीच मी मांडली आहे. या ग्रहांची शांती करण्याचा महायज्ञही लक्षावधी शेतकऱ्यांच्या यजमानपणाखाली मांडला आहे.

चोखामेळ्याला मंदिरात प्रवेश करायला ब्राह्मणांनी बंदी केली. शेतकरी कामाच्या मंदिरात प्रवेश करायला नवे ब्राह्मण नव्या चोखा मेळ्याला अडथळा आणताहेत अशी ही 'नाथाच्या घरची उलटी खूण' आहे.

(सा. ग्यानबा, २६ सप्टेंबर १९८८)

■■

# इति एकाध्याय

रात्रभर जागरण करून गाडी चालवणाऱ्याला पहाटे पहाटे, क्षणार्धाची का होईना, गुंगी लागून जाते, तशाच उडत उडत गुंगीतून खटकन जागा होऊन मी समोर पाहिले. माईचा श्वासोच्छ्वासाचा आणि त्यात कण्हणे मिसळल्याचा आवाज थांबला होता. शेवटी एकदाची शांत, गाढ झोप लागली हे पाहून खूप बरे वाटले. गेल्या पंधरा सोळा तासांत मोठमोठ्या आवाजाने श्वास चालला होता. डॉक्टरांनी नाकातून अन्न देण्यासाठी नळी खुपसलेली असल्यामुळे श्वासाचा आवाज आणखीनच विचित्र यायचा. श्वासानेच माई थकून जात आहे, असे वाटे.

डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे माईची प्रकृती सुधारत आहे याची नोंद घेतली आणि पुन्हा एक क्षणभराची गुंगी आली. पापण्या मिटतात न मिटतात तोच तोंडावर बर्फगार पाण्याचा हबका बसावा तशी खडबडून जाणीव झाली. माईला इतकी शांत झोप लागेलच कशी? चटकन उठून तिचा हात हलवून बघितला, चेहऱ्यावरून हात फिरवला. तसे काही वेगळे वाटत नव्हते; पण नाकाशी बोट धरूनही श्वास जाणवेना, तेव्हा धावत धावत जाऊन खोलीतल्याच दुसऱ्या खाटेवर दोनतीन दिवसांच्या सतत जागरणानंतर पंधरावीस मिनिटांपूर्वीच थोडे डोळे लागलेल्या सिंधूताईंना हलवून उठवले. सगळ्यात मोठी नमाताईही आवाजाने उठली.

''माईचा श्वास थांबल्यासारखा वाटतोय गं.'' एवढेच मी बोललो. मग फटाफट विजेरी घंटा वाजल्या, नर्स आल्या, डॉक्टरीणबाई आल्या, त्यांनी आम्हा तिघा भावंडांना खोलीच्या बाहेर काढले. त्या वेळी पहाटेचे बरोबर पाच वाजले होते. माईचा श्वास थांबल्याचे माझ्या लक्षात येऊन पाच मिनिटे झाली. शेवटच्या क्षणी जी काही धडपड, धावपळ करायची ती चालत राहिली. आम्ही तिघे भावंडे एका कोंडाळ्यात उभे राहिलो. मला समजले होते, माई गेली आहे. मला वाटते, माझ्या बहिणींनाही ते समजले होते; पण उमजले नव्हतं. ५-२० ला डॉक्टरबाईंनी बाहेर येऊन आम्हाला सांगितले, "She has Expired."

नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून सर्व तऱ्हेने काळ माझी परीक्षाच घेत होता. १८ नोव्हेंबरला धाकटी मुलगी गौरी, फ्रान्समध्ये डॉक्टरीचा अभ्यास करते, ती तीन महिन्यांकरिता म्हणून हिंदुस्थानात आली. आल्यावर दोन दिवस तिचं हालहवाल विचारणे, फार दिवसांनी भेटलेल्या, थोड्या गप्पा असे झाले आणि ती अहमदाबादला



नेत्ररोगतज्ज्ञांच्या एका परिषदेकरिता निघून गेली. अहमदाबादची परिषद संपवून गौरी आंबेठाणला परत आली, ते तिच्या फ्रान्सच्या डॉक्टर प्रोफेसरांच्या बरोबर. माणूस मोठा अफलातून. व्यवसायाने म्हटले तर डोळ्यातील कठिणातील कठीण शस्त्रक्रिया करणारा शल्यविशारद; पण भारताचा इतिहास, तत्त्वज्ञान, योगसाधना यांचा जबरदस्त व्यासंग. शेतकरी संघटना, तिची महिला आघाडी आणि, विशेषत:, लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम यांच्याविषयी बोलताना किती ऐकू आणि किती विचारू असे त्याला होऊन गेले. मी थोडा नेट लावला असता तर गृहस्थ सगळा व्यवसाय सोडून संघटनेच्याच कामाला अगदी बिल्ला लावून तयार झाला असता! दोन-तीन दिवस मोठे छान गेले. मग प्रोफेसरसाहेबही फ्रान्सला परत गेले आणि गौरीही दिल्लीच्या स्नेह्यानातेवाइकांना भेटण्यासाठी ३० नोव्हेंबरला रवाना झाली.

त्याच वेळी अमेरिकेत स्थायिक झालेला माझा सगळ्यांत धाकटा भाऊ बायकोसह दिल्लीला आला. या माझ्या धाकट्या भावाची जीवनकथाही मोठी अद्भूत आहे. १९७६ साली त्याची दोन्ही मूत्रपिंडे निकामी झाली. दहाबारा वर्षे तो डायलिसीसवर राहिला. डायलिसीस हा मोठा किचकट आणि कटकटीचा प्रकार. डायलिसीस सुरू झाल्यानंतर इतकी वर्षे जगल्याचे उदाहरण दुर्मिळच. त्यानंतर त्याला जुळणारे एक मूत्रपिंड, अपघाती मृत्यूच्या प्रकरणी मिळाले. शस्त्रक्रिया करून डॉक्टरांनी आरोपणही केले. त्यालाही आता पाचसहा वर्षे झाली. एवढ्या दिव्यातून पार पडलेला माझा भाऊ आणि वहिनी दोघेही मोठ्या उमेदीने, अगदी हसतखेळत सगळ्या परिस्थितीचा सामना करतात. संसारातल्या एकसंधपणाला जराही कुठे तडा नाही. दोन मुले. सुदैवाची गोष्ट अशी, की दोघेही असाधारण बुद्धिमत्तेची. या धाकट्या भावाची आणि गौरीची गाठभेट दिल्लीला झाली. त्यानंतर तो पुण्याला आला. आंबेठाणच्या शेतावर आला. १३ डिसेंबरपर्यंत तो पुण्याला राहिला. आम्ही सगळी बहिणभावंडं त्या निमित्ताने एकत्र झालो. १९ डिसेंबर रोजी माझा धाकटा भाऊ बायकोबरोबर अमेरिकेस परत गेला.

मध्यंतरीच्या काळात जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुका जाहीर झाल्या होत्या आणि ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे १४ डिसेंबरपासून मी जिल्हावार महिला अधिवेशने आणि माजघर शेतीच्या प्रदर्शनांच्या कामाला लागलो. २० डिसेंबरपासून सातआठ दिवस दिल्लीला राहावे लागले. याच काळात अर्थमंत्र्यांशी अंदाजपत्रकासंबंधी चर्चा झाली आणि किसान समन्वय समितीने ८ फेब्रुवारीच्या आंदोलनाचाही निर्णय जाहीर केला.

या वेळेपर्यंत गौरी एक महिनाभर आणंद येथील एका इस्पितळात काम करून आणखी अनुभवाकरिता औरंगाबद येथे आली होती. दिल्लीहून परतताना मी औरंगाबादला आलो. बापलेकींची भेट एक-दोन दिवस कशीबशी तिथे झाली. २४ जानेवारीला नाशिक आणि २५ जानेवारीला धुळे, जळगाव येथील महिला अधिवेशनांचे कार्यक्रम झाले. २५ तारखेला रात्री जळगाव येथे कार्यकारिणीची बैठक झाली. ८ फेब्रुवारीच्या रास्ता रोकोच्या कार्यक्रमाला कार्यकारिणीने मंजुरी दिली आणि त्याचबरोबर जिल्हा परिषदा, पंचायत समित्या यांच्या निवडणुकांकरिता महिला आघाडीचे स्त्रीउमेदवार आणि 'पाठीराखे' भाऊ उमेदवार असे मिळून ४००-५०० उमेदवार निवडणुकीत उतरवायचे ठरवले. २६ तारखेला औरंगाबाद येथे गौरी भेटली. इतक्या वर्षांतून कधी नव्हे ती लेक मायदेशी आलेली. पण कामाचा व्याप असा झाला की दोघांना फुरसतीने एकमेकांशी बोलायलासुद्धा सवड मिळाली नाही. २७ जानेवारी रोजी गौरी पुण्याला जाऊन तिथून पुन्हा दिल्ली येथे भरणाऱ्या एका परिषदेकरिता जायला रवाना झाली आणि मी बीड, लातूर, नांदेड, परभणी, बुलडाणा, अकोला असा एक दिवस एक जिल्हा अधिवेशन असा कार्यक्रम घेत पुढे चाललो. गौरीचा फ्रान्सला परत जाण्याचा दिवस पक्का ठरला होता; ७ जानेवारीला. त्याआधी तिने अमरावतीला येऊन भेटून जावे हेही संभव राहिले नाही आणि माझे दिल्लीला जाणे तर असंभाव्यच झाले. गौरी दिल्लीला खासदार भूपेंद्रसिंग मान आणि त्यांच्या पत्नी यांच्याकडे उतरली होती. अकोला जिल्ह्यातला लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम ३ जानेवारी रोजी रात्री साडेअकरा बाराला संपला. त्यानंतर गौरीशी निदान फोनवर बोलणे व्हावे म्हणून फोन लावला. फोन लागल्या लागल्या गौरीने बातमी दिली- पुण्याहून तिला फोन आला होता, माझ्या मोठ्या मुलीने- श्रेयाने निरोप दिला होता, की सकाळीच स्वयंपाक करता करता पदर पेटून माझी आई- माई- खूप भाजली आहे; तिला हॉस्पिटलमध्ये नेले आहे, मुंबईची माझी बहिण पुण्याला येऊन पोचली आहे. तितक्या उशिराही लगेच पुण्याला फोन लावला. सिंधूताईशी बोलणे झाले.

''माई २० % भाजली आहे, पण प्राणावरचे संकट निभावले आहे. दोन तीन आठवडे इस्पितळात राहावे लागेल असा डॉक्टरांचा अंदाज आहे.''

''ठरलेला कार्यक्रम रद्द करून पुण्याला लगेच यायचे का?''

''तशी काही आवश्यकता नाही,'' सिंधुताईंनी स्पष्ट केले. लगेच पुण्याला निघून ये म्हणून ती म्हणाली असती, तर मी काय केले असते कुणास ठाऊक?

२३ फेब्रुवारीपर्यंत सर्व सभांचा कार्यक्रम जळगावच्या कार्यकारिणीच्या बैठकीत



अगदी कसोशीने ठरला होता. जिल्ह्याजिल्ह्यातील प्रतिनिधींनी हमरीतुमरीवर येऊन एक एक दिवस एक एक सभा मिळवली होती. त्यात बदल करायचा म्हणजे मोठाच गोंधळ झाला असता. सभा तर चालू राहिल्या आणि मीही मनाशी मोठा खंत खात राहिलो. एका बाजूला धाकटी मुलगी परदेशी जाणार आहे, तिला निरोप द्यायला जाण्याचीसुद्धा शक्यता नाही आणि दुसऱ्या बाजूला पुण्याला जन्मदात्री आई गंभीर होऊन इस्पितळात आहे, तिला भेटायला जाणेसुद्धा दुरापास्त.

७ जानेवारीला गौरी फ्रान्सला परत गेली. दररोज कार्यक्रम संपल्यानंतर कितीही वाजोत, पुण्याला फोन करून खबरबात घ्यायची आणि एक एक दिवसाचा कार्यक्रम पुढे रेटायचा असे चालले होते. ११ जानेवारीला नागपूर जिल्ह्यातला कार्यक्रम संपवून शरद बोबड्यांच्या घरी पोचायला रात्रीचे दोन वाजले. पहारेकऱ्याच्या हातीच कामिनी वहिनींनी चिठ्ठी ठेवली होती. 'पुण्याहून निरोप आला आहे. कोणत्याही परिस्थितीत श्रेयास टेलिफोन करावा, रात्री कितीही उशीर झाला असला तरी.' श्रेयाला लगेच फोन केला. ती म्हणाली, ''माईच्या जखमा भरून येताहेत; पण तिची जगण्याची इच्छाच राहिली नाही. सगळे भाऊ, बहिणी पुण्यात जमले आहेत, तर मीही कोणत्याही परिस्थितीत पुण्याला येऊन जावे.'' फोन ठेवला. झोपायच्या खोलीत आलो. झोपणे कठीणच होते. चुकामुकीनेसुद्धा गोंधळ होऊ नये, म्हणून वहिनींनी माझ्या उशीवरही दुसरी चिठ्ठी ठेवली होती.

नागपूर आणि पुणे दोन्हीही महाराष्ट्रातच; पण पुण्याला जाउन यायचे म्हटले म्हणजे किमान तीन दिवसांचा तब्बल प्रवास. एवढे करून आईची भेट घेण्यासाठी फार तर दोन तासांची सवड सापडायची. तीन दिवसांचे कार्यक्रम रद्द कसे करायचे? चंद्रपूर जिल्ह्यातला १२ तारखेचा कार्यकम रद्द करायचे ठरले. ११ तारखेचा तेथला कार्यक्रम अर्धवट सोडून नागपूरला परतलो. तेथे विमान पकडून मुंबईला गेलो. रात्रभर बसमध्ये बसून पहाटे चार-साडेचारला पुण्याला श्रेयाच्या घरी गेलो. तास-दीडतास झोप काढून सकाळी आठ वाजता इस्पितळात गेलो.

एरवी माईला कधीही भेटायला गेलो, तर ती कामात असायची. तिचे वय आता ८० च्या वर गेले होते. लहानपणापासून डोळे अधू. त्यातील एकाने तिला काहीच दिसत नसे. एका डोळ्याने थोडेफार पुसट पुसट दिसत असावे. त्या डोळ्यावर शस्त्रक्रिया करून अधिक चांगले दिसावे यासाठी प्रयत्न करावे असे आम्ही मुलांनी अनेकदा सुचवून पाहिले; पण त्या डोळ्यानेही दिसेनासे झाले तर आपण पुरे आंधळे होऊ याची माईला फार धास्ती होती. शस्त्रक्रिया करायचीच असेल, तर अगदी बाद झालेल्या डोळ्यावर

करा असा युक्तिवाद करत करत तिने शस्त्रक्रिया पुढे ढकलत ठेवली.

गेल्या वर्षा-दोन वर्षांत डॉक्टरांनीही आपले मत बदलले आणि एवढ्या मोठ्या वयात शस्त्रक्रियेचा धोका नकोच असे सागायला सुरुवात केली. ऑपरेशन रद्द झाले; पण डोळ्यांनी जवळ जवळ काहीच दिसेनासे झाले होते.

तरीही कोणत्या ना कोणत्या कामात ती गढलेली असे. बागेतील पालापाचोळा गोळा करण्यापासून ते नारळ, आंबे, पेरू गोळा करणे, त्यांची वासलात लावणे, घरामधल्या वेगवेगळ्या दुरुस्त्यांची कामे करणे किंवा करवून घेणे, वायरमन, गवंडी, सुतार, प्लंबर यांच्या मागे लागून घराची डागडुजी चालवणे आणि, याशिवाय, घरातली दररोजची केरवारा, साफसफाई, धुणे, भांडी, स्वयंपाक ही सगळी कामे ती स्वत:च्या स्वत: करी. कधीमधी एखादद्दुसऱ्या कामाला कामवाली बाई मिळायची; पण माईच्या शिस्तीच्या रेट्यात टिकणे फार कठीण. तिच्याकडे कामाला राहिलेल्याबाया, मोलकरणी यांच्याच कथा लिहायच्या म्हटल्या तरी एक वाचनीय ग्रंथ होऊन जाईल. डोळे जवळ जवळ नसताना अगदी शेवटपर्यंत ती आग्रहाने वर्तमानपत्राचे मथळेतरी नजरेखाली घाली. कोणत्याही मोडक्या तोडक्या भंगार वस्तूतून विजेचे दिवे तयार करणे हा तिचा आवडता छंद होता. माझ्या चष्म्याचा नंबर दीडदोनच आहे, पण तरी चष्मा घातल्याखेरीज मला डोळ्यांसमोर वर्तमानपत्रसुद्धा धरवत नाही. लहानसहान दुरुस्तीची कामे तर चष्म्याशिवाय जमतच नाहीत आणि माईला ते जमे, कसे कुणास ठाऊक!

माईचा आणखी एक छंद होता, तो कविता करण्याचा. तिने बऱ्याच कविता केल्या आहेत. काही कुठे कुठे छापूनही आल्या आहेत. आपल्या कवितांचे लहानसे का होईना एकतरी पुस्तक छापून प्रकाशित करावे असा लकडा तिने म्हात्र्यांच्या मागे लावला होता. अगदी इस्पितळात असतानासुद्धा तिनें याची आठवण करून दिली होती.

प्रत्येक काम करण्याची तिची एक स्वत:ची पद्धत असे आणि ती पद्धत सर्वांत चांगली, एवढेच नव्हे तर शास्त्रशुद्ध आणि त्यापलीकडे जाऊन ती समाजाच्या आणि विश्वाच्या कल्याणाची आहे याबद्दल खात्री असे आणि लोकांना हे सत्य पटवून देण्याचा तिचा मोठा आग्रह असे. तिचे खाणे एकूणच कमी. दिवसातनं एकदा कुकर लावून डाळ, भात, भाजी उकडून घ्यायची; पण उकडण्याच्या कामाकरिता साधा वाफेचाच कूकर पाहिजे, प्रेशर कूकर घरात असून ती वापरायची नाही. कुकरचे भांडे पितळेचेच पाहिजे आणि यासंबंधी तिचा मोठा आग्रह असे. आम्ही कोणीही कधी घरी गेलो तर तिचे स्वागताचे वाक्य, " बरे झाले, तू आज आलास. मी अमुक अमुक पदार्थ केला आहे



आणि मला तुझी आठवणच येत होती." तिच्या पदार्थात ती जवळजवळ कोणतेच मसाले घालायची नाही. थोडेफार खोबरे, जिऱ्याचा एखादा दाणा; पण तिच्या पदार्थाला चव मोठी चांगली असे. म. गांधींनी शरीर राबविण्याकरितां एक मोठी कर्मठ दिनचर्या ठरवली होती. क्षणाक्षणाचा वापर होण्याबद्दल महात्माजींचा मोठा आग्रह असे; पण त्याकरिता त्यांना सूतकताईसारखे , फावल्या वेळेची भरपाई करण्याचे काम घ्यावे लागे. अशा हुकमी कामाची माईला कधी गरज वाटली नाही. दररोजची कामे आणि नित्य नवी कामे यात ती मोकळी अशी कधी दिसली नाही. चालू असलेल्या कामात जो येईल त्याला जुंपण्याची तिची धडपड असे. माझ्याबरोबर बबन आणि म्हात्रे यांचीसुद्धा कोणत्या ना कोणत्या कामात जुंपणूक व्हायची.

बारा फेब्रुवारीला इस्पितळात माईच्या खोलीत सकाळी साडेआठला गेलो, तेव्हा स्वस्थपणे पडलेली अशी तिला मी पहिल्यांदा पाहिली. माझे मलाच मोठे आश्चर्य वाटले. हे इस्पितळ, इस्पितळातील खोली, टांगत्या बाटल्या, परिचारिकांच्या येरझारा हे सगळे खोटे; कोणत्याही क्षणी माई उठेल आणि कामाला लागेल असे सारखे वाटत राहिले.

खोलीत, खोलीच्या बाहेर सगळेच भाऊ, बहिणी, मेव्हणे, वहिन्या जमा झालेल्या होत्या. दोनतीन दिवस माई माझी सारखी आठवण काढायची म्हणून मला आल्या आल्या खाटेपाशी नेण्यात आले. "शरद आला गं." असे मोठ्या बहिणीने सांगितले; मात्र मी जवळ गेलो आणि जणू प्रकृतीला काही झालेलेच नाही अशा आवाजात माई मला सांगू लागली.

"तू आलास बरे झाले. हे बाकीचे कुणी माझे ऐकत नाहीत. तू डॉक्टरांना समजावून सांग. आता हे उपचार बंद करा आणि मला एखादे इंजेक्शन किंवा गोळी देऊन शांतपणे मरू द्या. या वाचवण्याच्या प्रयत्नाला काही अर्थ नाही."

याच तऱ्हेचे बोलणे तिने यापूर्वीही सगळ्यांशी केलेलेच होते. तरीसुद्धा प्रत्येक वेळी हा सूर ऐकला म्हणजे सगळेजण गंभीर होत.वातावरणातला ताण काढून टाकण्याकरिता मी हसण्याचा आव आणून माईला म्हटले,

"असे कसे चालेल? ज्योतिष्याने तुझ्या आधी मी मरणार आहे असे सांगितलेय. तेव्हा तुला मरू देऊन मला कसे परवडेल?" तरी तिचा हट्ट चालूच राहिला. आपला शेवट कसा व्हावा याबद्दल तिच्या काही स्पष्ट कल्पना होत्या. माझे वडील तेवीस वर्षांपूर्वी वारले त्या वेळी मी स्वित्झर्लंडहून समाचारासाठी आलो होतो. माईचे वय त्या वेळी आज माझे जेवढे वय आहे त्याच्या आसपास असणार. मुले, मुली सगळ्या मोठ्या

झालेल्या. आयुष्याचा जोडीदार निघून गेलेला. स्वित्झर्लंडला परत गेल्यानंतर मी माईला एक पत्र लिहिले होते. मी तिला असे लिहिण्याची गरज होती असे काही नाही. मी न लिहिताही तिचा निर्णय असाच झाला असता. ''काका गेले म्हणजे आता उरलेले आयुष्य कसेबसे काढून संपवायचे आहे असा विचारही मनात आणू नकोस. आपल्या प्रतिमेला आणि कर्तबगारीला आजपर्यंत परिस्थितीने वाव दिला नाही. आज परिस्थिति अनुकूल झाली, तर जोडीदार निघून गेला. अशातही जिद्दीने उभे राहून आयुष्याला एक नवा अर्थ दिला पाहिजे.'' असे काहीतरी मी माझ्या त्या वेळच्या बुद्धीप्रमाणे आणि थोडे आगाऊपणे लिहिले असावे. त्या पत्राचा माई वारंवार उल्लेख करी. तिच्या आयुष्याची घडी तर तिने बसवलीच; पण एकट्याने एवढी वीसपंचवीस वर्षे राहण्याची वेळ येईल अशी तिची अपेक्षा नव्हती. कधीमधी सर्दीपडशाची, पोटाची किरकोळ दुखणी उद्‌भवत; पण ती डॉक्टरकडे क्वचित जाई. सगळी कामे करण्याचे तिचे असे जसे शास्त्र होते, तसेच तिचे असे स्वत:चे वैद्यकशास्त्र होते. लिंबाचे सरबत किंवा जास्तीत जास्त म्हणजे आल्याचे पाचक किंवा आयुर्वेदातील एखादे चूर्ण किंवा अतीच झाले तर होमिओपॅथीतील काही गोळ्या यावर तिचे सारे औषधांचे काम भागे. व्हिक्सची एखादी बाटली किंवा स्नायुदुखीवरचे एखादे मलम, अंग किंवा पोट शेकण्याकरिता एखादा तवा आणि कापडाचा बोळा एवढ्यावर ती सगळे भागवून नेई; पण किरकोळ तक्रारी सोडल्यास तिची अलीकडे उलटी तक्रार चालू झाली होती. ती तक्रार करायची, ''माझी तब्येत आता सुधरतच चाललीये.'' कधी म्हणायची, ''मला घेऊन जायचे देव विसरून गेला असे दिसते.'' पण आपलं मरण चट्‌कन यावं, त्यात वेदना नसाव्यात आणि इस्पितळात राहणे मुळीच नसावे एवढी तिची फार फार इच्छा होती. लहानपणापासूनच गर्व प्रतिकूल परिस्थितीवर झगडूनझगडून मात करणाऱ्या माईची याबाबतीत मात्र मोठी निराशा झाली. सगळ्या दुखण्यांत वेदनामय म्हणजे भाजणे. भाजून इस्पितळात राहायला लागले हा म्हणजे तिच्यावर दुर्दैवाने काढलेला रागच होता. ''ड्रेसिंग म्हणजे अगदी नरकयातना रे बाबा,'' असे म्हणायची. यापूर्वीही एकदोन वेळा माझ्यापाशी स्वेच्छामरणाविषयी बोलली होती. आज प्रत्यक्ष प्रसंग पुढे येऊन ठाकल्यावर तिचा स्वेच्छा मरणाचा आग्रह चालला होता. तिचा आग्रह तर्कशुद्ध होता पण तो मानण्याचे सामर्थ्य कुणातच नव्हते.

''शरद, तू माझी मोठी निराशा केलीस. मला फार आशा होती, की तू तरी सगळ्यांना समजावून सांगशील आणि मला यातून सोडवशील,'' माईचं चाललं होतं आणि मीही ओढून ताणून युक्तिवाद करत होतो,



''अशा परिस्थितीत मरण मागणे हा पळपुटेपणा आहे. तू बरी हो, घरी चल; मग मरायचे आहे असे सांगितले तर त्याचा विचार करता येईल. तू आत्ता मरायचे म्हणतेस तो तुझा खरा निर्णय कशावरून? जगण्याची तुझी खरंच इच्छा नसती तर भाजण्याच्या वेळी तू आपणहून अंगावर पाणी कशाला ओतून घेतले असतेस?'' हे असले युक्तिवाद इस्पितळात खाटेवर पडलेल्या आईशी करणे यातली विक्षिप्तता आणि क्रूरता मला क्षणाक्षणाला जाणवत होती; पण माईला इतक्या स्पष्ट बोलण्याखेरीज चाललेच नसते. तीनचार तास थांबून मी टॅक्सीने मुंबईला जायला निघालो. संध्याकाळी तेथून विमान पकडून वर्ध्याला पोचायचे होते. १३ तारखेला वर्धा जिल्ह्यातला लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम पार पाडायचा होता.

तीन तारखेला झालेल्या अपघाताची बातमी कळल्यापासून आणि, विशेषत:, नागपूरला श्रेयाचा निरोप मिळाल्यापासून मनावर मोठे दडपण होते. ऐंशीच्या वर वय गेले. त्यात हा असला अपघात. यातून माई उठते की नाही याबद्दल शंकाच वाटत होती. इस्पितळात आज तिचा खणखणीत आवाज ऐकला आणि बराच धीर आला. डॉक्टरांनी मात्र परिस्थिती अगदी स्पष्ट केली.

''वीस टक्के भाजणे, म्हणजे काही फार गंभीर नाही, पण ऐंशीव्या वर्षी वीस टक्के भाजणे ऐंशी अधिक वीस, शंभर टक्के भाजणे आहे. माईंना मधुमेह वगैरे नाही त्यामुळे जखम भरून येईल; पण दुसऱ्या काही अडचणी त्यातून उद्‌भवण्याची शक्यता आहे.'' थोडक्यात, एकूण प्रकरण वाटते तितके सोपे नाही; पण शेवट येणार असला तरी तो अगदीच काही आज उद्या, इतक्यात नाही एवढा तरी मनाला धीर आला.

वर्ध्याला गेल्यापासून पुन्हा लक्ष्मीमुक्तीच्या कार्यक्रमाचा आणि निवडणुकीच्या प्रचाराचा धबडगा चालू झाला व २३ फेब्रुवारीला रात्री नांदेड जिल्ह्यात किनवट तालुक्यात या कार्यक्रमाची सांगता झाली. जवळ जवळ सतत ५० दिवस एकसारखा दौऱ्याचा, भाषणांचा कार्यक्रम चालूच होता. सर्वसाधारणपणे रात्री दीड-दोनपर्यंत झोपणे नाही आणि सकाळची पहिली सभा नऊदहापेक्षा उशिरा नाही. दोन सभांच्या मध्ये प्रवासात मिळेल तेवढाच विरंगुळा आणि आराम. बसल्या जागी बोटसुद्धा हलवावेसे वाटू नये इतका मी थकलो होतो; पण १२ तारखेला इस्पितळातून निघताना माईला आश्वासन दिले होते, की मी २५ तारखेस येईन. भावाबहिणींनाही सांगितले होते, 'तोपर्यंत तुम्ही सांभाळा, मग मी बघतो.' दौऱ्याचा धबडगा संपवून आता इस्पितळात बसणे शक्य होणार होते. १२ तारखेला निघताना डॉक्टर म्हणाले होते, ''तुम्ही परत या, माईंच्या

शेजारचीच खोली तुम्हाला देऊन तूम्हाला ॲडमिट करून घेतो.'' पण पुण्याला ताबडतोब परतणेही शक्य नव्हते. लासलगावला कांद्याचे आंदोलन उभे राहू पाहत होते. भास्करराव बोरावके लासलगावच्या कांदेबाजारात अनिश्चित कालीन उपोषणास बसले होते. पुण्याला एकदा गेलो म्हणजे तेथून सुटका केव्हा होईल याची काही शाश्वती नाही. त्यामुळे नांदेडहून अगदी मध्यरात्री निघून दुसरे दिवशी सकाळी लासलगावला भाऊंच्या भेटीला गेलो. तिथे सगळा गोंधळच होता. थोडीफार शिस्त लावून तेथून निघून आंबेठाणला आलो. एक रात्र विश्रांती घेऊन दुसरे दिवशी इस्पितळात हजर झालो.

एकूण बातमी चांगली होती. जखमा खूप चांगल्या भरून येत होत्या. दोन-चार ठिकाणीच जखमा अजून ओल्या आहेत. इ... माईंनी खाणेपिणे बंद केल्यामुळे अशक्तता खूप आली होती; पण आदल्या दिवशी रक्त दिल्यामुळे बरीच टवटवी आली होती.

माईजवळ पुन्हा बसलो. तिने पुन्हा इच्छामरणाचा आग्रह धरला; पण या वेळी बोलण्यात तेवढा जोरही नव्हता. माझ्या आणि श्रेयाच्या हाताने तिने थोडेफार खाणेही घेतले. हळूहळू पावलांनी का होईना, सुधारणा होत आहे असे एकूण चित्र दिसले. आता सर्वांत जास्त गरज धीराची आणि सोशिकतेची होती. माझी एकूण अवस्था पाहता सर्वांनी मी दोनतीन दिवसतरी पूर्ण विश्रांती घ्यावी असा आग्रह धरला. मी आंबेठाणला परत आलो, तो तापाची कणकण घेऊनच.

२९ फेब्रुवारीला सकाळी पुन्हा एकदा इस्पितळात गेलो. मीनावहिनी, सिंधूताई खूपच आनंदात दिसल्या. ''पुन्हा रक्त दिल्याने माई आणखी टवटवीत झाल्या आहेत.'' असे त्यांचे म्हणणे . मला आज माईच्या चेहऱ्यावर अगदीच वेगळा भाव दिसला. तिच्या चेहऱ्यावरचा नेहमीचा करारीपणा आणि जगाशी झुंजत चालल्याची भावना आज अजिबात दिसत नव्हती. त्याऐवजी, एखादे अगदी लहान मूल निरागसपणे झोपले असावे असा भाव तिच्या चेहऱ्यावर होता. जनविपरीत दिसेल हा धोका पत्करूनही मी तीनतीनदा म्हटले की, आज माईची एकूण परिस्थिती काही वेगळीच दिसते.

संध्याकाळी अंदाजपत्रक जाहीर व्हायचे होते. डॉ. मनमोहनसिंग यांचे भाषण दूरदर्शनवर ऐकायचे, पाहायचे होते. त्यावर टीकाटिप्पणी करायची होती. हे सगळे होईपर्यंत रात्रीचे ११ वाजले. रात्री साडेअकरा वाजता चाकणला जाऊन जुन्नर मुंबई एस.टी. गाडी पकडली. बॉम्बे सेंट्रलला जाऊन ४.५० ची गुजराथ एक्सप्रेस पकडून बिलिमोरा येथे एका महत्त्वाच्या कार्यक्रमाला जायचे होते. दुपारी राम जेठमलानींची तार आली होती. ३ तारखेला सुप्रिम कोर्टात कर्जमुक्तीच्या प्रकरणाची सुनावणी व्हायचे ठरले होते. बिलीमोराहून



तसेच पुढे आगगाडीने दिल्लीला जावे असा विचार होता.

एस.टी. गाडी कधी नव्हे ते अगदी वेळेवर म्हणजे पहाटे साडेतीनलाच मुंबई सेंट्रलला पोचली. तिकीट खिडकीपाशी खासगीत तिकीट विकणारे अनेक टोळभैरव फिरत होते. म्हणून त्यांच्याकडून तिकीट घेतले नाही आणि नंतर खिडकी उघडली तेव्हा तिकीट मिळू शकत नाही असे समजले. स्टेशनमास्तरांपर्यंत जाऊन तक्रार केली. त्यांनीही काही दाद दिली नाही. मग सत्याग्रह म्हणून विनातिकिटाचा आगगाडीत जाऊन बसलो. त्याच गाडीतून बिपिनभाई देसाई आणि गुणवंतभाई चालले होते. त्यांनी तिकीट तपासनिसाशी काहीतरी जमवले असावे. मला काही त्रास झाला नाही.

अंमलसाडच्या कोट्यावधी रुपयांचा व्यवहार असणाऱ्या विविध सेवा सहकारी सोसायटीच्या सुवर्ण महोत्सवाचा कार्यक्रम पार पडला. केंद्रीय मंत्री, राज्यमंत्री हजर होते. महाराष्ट्रातून माझ्याखेरीज मणिभाई देसाई यांनाही बोलावले होते. कार्यक्रम साडेतीनच्या सुमारास आटोपला. आता मला बडोद्यास पोचून राजधानीने दिल्लीची वाट धरायची होती. मोटारगाडी मला बडोद्यापर्यंत सोडायला येणार होती. सुरतला पोचल्यावर माझ्याच मनात विचार आला. 'इथून बडोद्यापर्यंत एकशे पंचवीस कि.मी. गाडीने जायचे आणि ती गाडी रिकामी परत यायची त्यापेक्षा सुरतहून आगगाडीने बडोद्यास गेलो, तर बाकीच्या सगळ्या सहकाऱ्यांचा कितीतरी त्रास वाचेल.' कर्णावती एक्स्प्रेसमध्येही गर्दी होती. सकाळीच रेल्वे व्यवस्थेशी भांडण केले होते, आता पुन्हा झंझट नको म्हणून मी निमूट दुसऱ्या वर्गाच्या डब्यात दोन तास उभे राहून प्रवास केला. बडोद्याला पोहोचेपर्यंत पायाचे पार तुकडे पडले. राजधानी यायला अजून दोन तास अवकाश होता. फलाटावरूनच दिल्लीला फोन केला, मी येत असल्याचे कळवले आणि टेलिफोनच्या खोक्यातून बाहेर पडलो.

तेवढ्यात बिपिनभाईंचे बडोद्याचे एक मित्र समोर आले. त्यांनी एका वाक्यात निरोप दिला: ''माईची तब्येत गंभीर आहे. रक्ताच्या उलट्या होताहेत.'' तेथूनच पुन्हा पुण्यात इस्पितळाशी संपर्क साधला. मोठी बहीण जबलपूरला परत जाता जाता मुंबईहून पुण्याला परत आली होती. मीही यावे असे सगळ्यांचे मत दिसले. परत तर यायला पाहिजे, पण जायचे कसे? बडोद्याहून रात्री एक खासगी बस पुण्याला जायला निघते. चौदा तासांत पोचते. दररोज दोन गाड्या निघतात; पण आज एकच निघणार होती. कारण दुसऱ्या गाडीला आदल्या दिवशी अपघात झाला होता. त्यामुळे गाडीत जागा मिळणे अशक्यच होते. बसमालकांवर सामदाम प्रयोग करून झाले. गुजरातेतील सहकाऱ्याने मी 'शेतकऱ्यांचा

फार मोठा नेता आहे' वगैरे 'भलावण' केली; पण बस कंपनीला त्याचे काहीच कौतुक दिसले नाही. भल्या पहाटे टोळभैरवांकडून तिकीट घ्यायला मोठ्या ताठर मानेने नकार दिला होता. आता अशा एका टोळभैरवाला शोधून काढावे लागले. वरकड पैसे घेऊन सिटांच्या मधल्या जागेवर बसू देण्याचे त्याने मोठ्या औदार्याने कबूल केले. एकूण चौदा तासांचा, घाटांनी भरलेला प्रवास... नजीकच्या भविष्यकाळात तरी त्याची आठवण विसरायला होणे नाही.

पुण्याला परत फिरण्याचा निरोप मला बडोद्याला मिळाला तो जवळजवळ दहा तासांच्या पाठलागानंतर. मी चाकणहून निघाल्यानंतर दोनएक तासांनी माईची प्रकृती खालावल्याची आणि रक्ताच्या उलट्या सुरू झाल्याची बातमी आंबेठाणला पोचली. तोपर्यंत मी मुंबईची निम्मी वाट चालून गेलो होतो. नितीन प्रधान यांच्यामार्फत दादर प्लॅटफॉर्मवर निरोप द्यायला कुणी माणूस गेला होता; पण त्याला मी दिसलो नाही. सुरतला बिपिनभाई देसाईंच्या घरी निरोप ठेवला होता; पण कर्णावती पकडून बडोद्याला जायच्या बदलामुळे सुरतलाही हा निरोप मिळाला नाही. शेवटी बिपिनभाईंनी बडोद्यातल्या त्यांच्याच मित्राला फोन करून निरोप पोचवला. अगदी सुरतला जरी निरोप असता, तर निदान तीनशे कि.मी.ची कष्टयात्रा कमी झाली असती. पुण्याला पोचायला साडेदहा वाजले. अंघोळबिंघोळ करून तातडीने इस्पितळात पोचलो. आता वातावरण अगदीच वेगळे होते. माईला वरून सलाईन लावले होते, नाकामध्ये अन्न देण्याकरिता नळी खुपसली होती. मी आल्यावर काही तरी बोलण्याचा तिने प्रयत्न केला; पण नाकातील नळीमुळे तिची वाक्यं सराईतांच्यासुद्धा ध्यानात येत नव्हती. नाकात नळी खुपसलेली असल्यामुळे बोलणे आणखीच अस्पष्ट झाले होते. संध्याकाळच्या सुमारास डॉक्टरांनी निरोप पाठवला की, पुन्हा एकदा रक्त देणे आवश्यक आहे. पूर्वी ज्यांची नोंदणी केली होती ते रक्तदाते, दिवस महाशिवरात्रीचा असल्यामुळे पुण्यात भेटेनात; मग श्रेयाची एक मैत्रीण आणि शेजारच्या खोलीतल्या रुग्णाचे चिरंजीव अशा दोघांना घेऊन प्रयोगशाळेत गेलो. रक्त तपासणीकरिता दिले. रक्त जुळले तर पुन्हा वेळेचा अपव्यय नको म्हणून दोघांचेही रक्त काढून ठेवले. कोणत्याही परिस्थितीत ब्लड बँकेतले रक्त घ्यायचे नाही असे डॉक्टरांनी सांगितल्यामुळे तपासण्या होईपर्यंत आणखी चार तास तरी जाणे भाग होते. रात्री एक वाजता प्रयोगशाळेला फोन केला. त्यांना रक्त जुळत असल्याची शुभवार्ता सांगितली. इस्पितळात रात्री दोन वाजता डॉक्टरांनी रक्त देण्यासाठी शीर शोधायला सुरुवात केली. माई आता इतकी अशक्त झाली होती, की अक्षरश: डझनवारी ठिकाणी सुया खुपसूनसुद्धा



हवी ती शीर सापडेना. शेवटी डॉक्टर कंटाळले आणि त्यांनी सगळाच कार्यक्रम दुसऱ्या दिवसावर ढकलला.

तीनच्या सुमारास दुसरी एक डॉक्टरीण मुलगी आली. एवढ्या अर्ध्या रात्रीसुद्धा तिच्या चेहऱ्यावर आणि वागण्यात इतका काही उत्साह होता, की आम्हालाही बरे वाटले. ती श्रेयाची वर्गमैत्रीण होती हे तिने स्वत:च आवर्जून सांगितले आणि तिने, खरोखरच नातीने आजीची सेवा करावी अशी सुरुवात केली. कोपराजवळ शीर सापडेना; दंडाच्या वर खांद्यापाशी शीर शोधून काढली; रक्त चालू केले; त्याबरोबर द्यायची वेगवेगळी औषधेही ठिबकाबरोबरच देऊन टाकली. माईला श्वास घ्यायला त्रास होत होता म्हणून पलंगाची डोक्याकडची बाजू थोडी आणखीन वर केली. माईचा श्वास संथ झाल्यासारखे वाटले.

चारसाडेचार वाजले होते. नमाताई आणि सिंधूताई दोनतीन दिवस सतत जागत होत्या, त्यांना मी बळेच आग्रहाने थोडे आडवे व्हायला सांगितले. गेले दोनतीन दिवस माईचे श्वासाबरोबर सतत कण्हणे चालूच होते. आतासुद्धा श्वास जास्त संथपणे चालला होता; पण तिचे कण्हणे हळूहळू वाढत जाई तसतसे मी तिचा हात थोपटे किंवा कपाळावरून हात फिरवे. थोडेफार बोले, मग तिचे कण्हणे बंद पडायचे आणि पाचदहा सेकंदातच हलक्या आवाजात कण्हणे सुरू व्हायचे.

सगळ्या इस्पितळात नीरव शांतता होती. फक्त माईच्या चढत्या कण्हण्यामुळे गाडी कष्टाने घाट चढत असावी असा आवाज येत होता. पहाटेच्या वेळी गाडी चालवणाऱ्यांना क्षणभर गुंगी येते तशी क्षणभर का होईना मला आली असावी आणि एकदम लक्षात आले, की माईच्या श्वासाचा आवाज यायचा थांबला आहे.

मग यथाकाळ यथोचित यथाविधी जे काही पार पडायचे ते पार पडले. सगळ्या लोकांना फोन गेले. दिल्लीचे थोरले बंधू, अमेरिकेतील धाकटे भाऊ, फ्रान्समधील गौरी. दिल्लीचे वडील बंधू लगेच निघाले पण पुण्याला पोचायला त्यांना निदान ४ वाजणार होते. त्यामुळे अंत्यविधी वैकुंठात चार वाजल्यानंतर करायचे ठरले. इस्पितळातून शव माईच्या लाडक्या घरी परत आणले. रुग्णवाहिकेत मागच्या बाजूला शवाबरोबर मी एकटाच बसलो होतो. यापूर्वी दोनतीन वेळा शवाबरोबर प्रवास करण्याचा प्रसंग आला होता. त्या प्रत्येकवेळी मनावर काहीएक विचित्र दडपण होते. शवाच्या सान्निध्यात काही एक अमंगलता आहे आणि हा प्रसंग जितक्या लवकर आटोपेल तितके बरे असे वाटत असे. या वेळी मात्र असे नव्हते. शैशवात आणि बालपणी ज्या आईने मला लहानाचे मोठे केले ती, चाळिशीच्या आतील आई आणि माझ्यासमोरचे ८२ वर्षांच्या वृद्धेचे शव यात

थोडासुद्धा सारखेपणा नसणार; पण दूरभाव कणमात्र वाटत नव्हता. गाडीमध्ये, नंतर घरी पोचल्यावर, शेवटच्या तयारीच्या वेळी- किती वेळा शवाला स्पर्श करावा लागला, तरी एकदाही काही दूरभाव जाणवला नाही. हे काय गूढ आहे हे माझ्या अजून तरी लक्षात आलेले नाही.

दिल्लीचे बंधू आले. वैकुंठ यात्रा सुरू झाली. माझ्यापुरते पुत्रकर्तव्य इथे संपले. आता वैकुंठातील विधी, सारे सव्यापसव्य आणि त्यानंतरचे धार्मिक कार्यक्रम यांचा माझा काही संबंध नव्हता. ती जबाबदारी मोठ्या मुलाची. पुण्याचे प्रख्यात मोघे गुरुजी विधी सांगत होते, वडील बंधू बाळासाहेब विधी पार पाडत होते. माईच्या शवाजवळ उभे असताना मला एका गोष्टीची खाडकन जाणीव झाली. जन्मापासूनच्या माझ्या आयुष्यातली पहिली आठवण जिच्याशी संबंधित आहे त्या व्यक्तीच्या संबंधाचा हा शेवटचा प्रसंग.

माझ्या आयुष्यातली मला स्वत:ला आठवणारी पहिली घटना. त्या वेळी आम्ही सातार्‍याला राहत होतो; म्हणजे मी तीन वर्षांचा असावा; फार तर साडेतीन वर्षांचा. शनिवार पेठेतल्या दत्तमंदिरासमोरच्या गुजराच्या घरातल्या पहिल्या मजल्यावर आम्ही भाडेकरू म्हणून राहत होतो. सरळ अरुंद जिना चढून वर गेले म्हणजे उजव्या हाताला एक खोली. त्यात स्वयंपाकघर, जेवणघर, माजघर सगळे एकत्र असावे. डाव्या हाताला दुसरी जरा मोठी बैठकीची खोली. त्याच्या बाहेरच्या, रस्त्याच्या बाजूला एक छोटीशी गॅलरी.

आठवणींचा प्रसंग तसा किरकोळ आहे. स्वयंपाकघरातून निघून जिन्याच्या शेवटच्या टप्प्यावर येऊन, तेथून मी बैठकीच्या खोलीत आलो आणि गॅलरीकडे जाण्याचा विचार होता. खोलीच्या मध्यभागी एक लहान गोल टेबल असावे. माझ्या त्यावेळच्या उंचीच्या मानाने हे टेबल भले उंच वाटत होते. टेबलाला उजवीकडून वळसा घालून मी छोट्या पावलांनी गॅलरीच्या दिशेने जाणार, इतक्यात मला जाणीव झाली, की माझी आईही जिना ओलांडून बैठकीत आली आहे आणि मधल्या टेबलाला डाव्या बाजूने वळसा घालत आहे. टेबलाच्या दोन बाजूंनी आम्ही दोघे पुढे सरकत होतो. मी छोट्या पावलाने आणि आई खूपच जास्त जलद. माझ्या मनांत विचार आला, तो हा, की आपण व आई टेबलाच्या पलीकडे एकाच वेळी पोचणार आणि समोरासमोर भेटणार. त्याबरोबर अशीही खात्री वाटली, की असे समोरासमोर भेटल्यानंतर आई आपल्याशी नक्की काहीतरी बोलेल. हा अंदाज मनात बांधल्यानंतर प्रत्यक्षात टेबल ओलांडून आम्हाला समोरासमोर यायला



फार तर दोनतीन सेकंद लागले असतील; पण तो अवधी मला खूप लांब वाटला. अखेरीस एकदाचे ते टेबल संपले. शेवटी एकदाचे मी आणि आई समोरासमोर आलो आणि काय आश्चर्य आणि केवढा आनंद. आई खरोखरच माझ्याशी बोलली. काही तरी बोलली. काय बोलली ते आठवत नाही पण काहीतरी बोलली.

नाळ कापून मोकळा झाल्यानंतर तीनेक वर्षांच्या साठवलेल्या अनुभवाने मी एका वेळी तीन गोष्टींचा आडाखा मांडला. वेळ जमणार, आम्ही समोरासमोर येणार, आणि आई बोलणार आणि हे तीनही आडाखे बरोबर ठरले. याचा मला विलक्षण आनंद झाला होता. माझी ही पहिली आठवण. त्या आठवणीच्या भागीदाराशी दुवा जोडणारा शेवटचा प्रसंग माझ्यासमोर घडत होता.

थोड्या वेळात वैकुंठातील विजेरी भट्टीचे दार उघडले आणि एका अध्यायाचा शेवट झाला.

(शेतकरी संघटक, २१ मार्च १९९२)

■■

# मुहूर्तम् ज्वलितम् श्रेयम्

१९९८ च्या डिसेंबर महिन्यात पंतप्रधानांनी बोलावलेल्या एका महत्त्वाच्या बैठकीकरिता दिल्लीस जाण्यासाठी निघालो असताना एकाएकी शरीराचा काही डावा भाग लुळा पडला; बोलता येईनासे झाले. काही जुजबी उपाययोजना करून दिल्लीच्या विमानात बसलो. तेथील विमानतळावर उतरल्या उतरल्या सुहृद मित्रांनी इस्पितळात भरती केले. तेथून एका मोठ्या भयानक संवत्सराची सुरुवात झाली.

दोन मोठ्या शस्त्रक्रिया ही, त्या मानाने किरकोळ बाब. १९८४ मध्ये चंडीगडच्या तुरुंगात असताना पहिला मोठा हृदयविकाराचा झटका आला होता. त्याआधीही एकदोन वेळा किरकोळ झटके येऊन गेले असावेत. ८४ साल संघटनेच्या कारकिर्दीतील धामधुमीचे वर्ष. महाराष्ट्र प्रचारयात्रा, त्यानंतर राजीव गांधींनी जाहीर केलेल्या निवडणुका, राजीवस्त्राविरुद्धची चळवळ या सगळ्या धामधुमीत अडखळू लागलेल्या हृदयाकडे लक्ष देण्याची फुरसद मिळाली नाही आणि तसे करावे असा विचारही मनात आला नाही. १९८६ आणि १९९५ मध्ये पुन्हा दोन मोठे झटके आले, त्यांच्याकडेही दुर्लक्ष झाले. आवश्यक ती उपाययोजना म्हणजे शस्त्रक्रिया, ती त्या काळी हिंदुस्थानात फारशी होत नसे; शस्त्रक्रिया यशस्वी झाली तरी त्यानंतरची शुश्रूषा व्हावी तशी होत नसे. केवळ औषधोपचारासाठी परदेशात जाणे झेपण्यासारखे नव्हते त्यामुळे तो विषय तसाच राहिला.

१९९५ मध्ये एक जुजबी शस्त्रक्रिया करून घेतली; पण धावपळीत आणि मनस्तापात फरक काहीच झाला नाही; झाली ती वाढच झाली. शेगाव कार्यक्रमातील शेतकऱ्यांच्या संस्था स्थापणे आणि चालवणे यात कामाचा बोजा वाढला. शेतकरी सॉल्व्हंट, शिवार, भामा कन्स्ट्रक्शन या सगळ्याच प्रकल्पांना राजकीय पुढारी आणि शासन यांचा विद्वेष भोवू लागला. शेतकरी संघटनेच्या स्थापनेपासून १५ वर्षे आर्थिक चिंता फारशी जाणवली नव्हती, आता त्या चिंतेची नवीन भर पडली.

हृदयविकाराचे एक बरे असते; ढकलून न्यायचे म्हटले तर काही काळ ढकलून नेता येते. शरीराला रक्तपुरवठा करणाऱ्या त्या मूठभर पंपाला झेपेनासे झाले, की डिझेलचा पुरवठा अडकल्यावर इंजिन बंद पडते तसे हृदय बंद पडते; सगळाच खेळ खलास. मग, और्ध्वदेहिकापलीकडे फारशी यातायात नाही.

मी इतका सुदैवी नाही; हृदयाच्या अनियमित स्पंदनांमुळे शरीराच्या हालचालींचे



नियंत्रण करणाऱ्या मज्जासंस्थेवरच आघात झाला. अनेकांचे आशीर्वाद फळले, कित्येकांचे शिव्याशाप बारगळले म्हणून डावा हात, थोडी दृष्टी आणि ओठ एवढ्यापुरताच आघात मर्यादित राहिला; पण तरीही अगदी न्हाणीघरातसुद्धा चालत जाणे कठीण व्हावे, पायजम्याची नाडीसुद्धा स्वत:ची स्वत:ला बांधता येऊ नये, जेवणाचा घास स्वत:च्या हाताने स्वत:ला भरवता येऊ नये; थोडक्यात, बहुतेक कामांसाठी परावलंबी व्हावे ही मोठी भयानक गोष्ट आहे.

ज्ञानमार्गाचा मी यात्रिक, ज्ञानाचे मुख्य साधनच विस्कळित झाले, जे काही चलनवलन गेले ते पुन्हा परत मिळण्याची शक्यता नाही. पुन्हा दुसरा, तिसरा झटका येऊन असमर्थता आणखी वाढू नये यासाठी डॉक्टरांची धावपळ. रक्तदाब वाढू नये, रक्ताच्या गुठळ्या होऊ नयेत, रक्त पातळ राहावे म्हणजे मेंदूमधील सूक्ष्म रक्तवाहिन्यांच्या जाळ्यात रक्तप्रवाह कोठे अडकून राहू नये यासाठी वेगवेगळ्या औषधांचा सारखा मारा चालू होता.

तिसऱ्या दिवसापासून व्यायामाचे डॉक्टर येऊ लागले. हाताची बोटे किती हालतात, हात कोपऱ्यातून, खांद्यातून किती हालचाल करू शकतो याची परीक्षा झाली. बालवर्गातील किंवा अंगणवाडीतील मुलांना जसली खेळणी देतात तसली खेळणी माझ्यापुढे ठेवण्यात आली. एका गजातून लाकडी चकत्या काढून त्या दुसऱ्या गजात टाकणे, फिरवणे असा व्यायाम चालू झाला. अंगठा आणि तर्जनीच्या पकडीत लहानशी लाकडाची चकतीही सांभाळता येईना. इतके श्रम होत, की डोक्याला घाम फुटे. मग एकदम लक्षात आले, आपण पुन्हा लहान बाळ झालो आहोत. ६३ वर्षांचे लहान बाळ! दुपट्यावर पडल्या पडल्या बाळ पाय हलवत राहते, हात वेडेवाकडे फिरवत राहते. बाहेरच्यांना त्या सगळ्या धडपडीचा काही अर्थ लागत नाही. आपल्याला पाहिजे तसे हातापायांचे चलनवलन करू शकण्याचे कौशल्य बाळ हळूहळू कमावीत आहे हे पाहणाऱ्यांना समजत नाही. मीही तसाच हालचालींच्या व्यायामाला लागलो. 'अडगुलं मडगुलं, सोन्याचं कडबोळं' या बालगीताच्या शेवटी 'तीट लावू तान्ह्या बाळा' असं म्हटल्यावर बाळाचे हात कपाळाच्या मध्यभागी न जाता भलतीकडे- डोक्यात,कानाकडे- का जातात याचे रहस्य समजू लागले.

जिभेच्या व्यायामाचे डॉक्टर आले. जिभेवर अडखळणाऱ्या इंग्रजी शब्दांच्या मालिका ते म्हणून दाखवत आणि म्हणायला सांगत ' it rains in spain mainly in planes, ' किंवा 'she sells sea-shells on the sea shore.' वूडहाऊसच्या कादंबऱ्यांत, दारू पिऊन झिंगलेला माणूस सापडला म्हणजे लंडनचा पोलिस बॉबी तो कितपत शुद्धीवर

आहे हे तपासण्यासाठी असली, जिभेची परीक्षा घेणारी वाक्ये म्हणायला सांगतो, ते आठवले आणि तशाही अवस्थेत हसू आले. मी डॉक्टरीणबाईंना भगवद्गीतेतील ११ वा अध्याय खाडखाड म्हणून दाखवला, पाचपंधरा ठिकाणी शब्दोच्चार चुकले, संस्कृत न शिकलेल्यांना संस्कृत वाचायला सांगितले म्हणजे जसे होते तसे काहीवेळा झाले. पण, आपली वाचा पुष्कळशी शाबूत आहे हे कळल्याने आत्मविश्वास वाढला. पण, व्यायाम डॉक्टरांनी या उत्साहावर थंड पाण्याचा घडा टाकला. 'पाठांतरावरून विशेषत: लहानपणी केलेल्या पाठांतरावरून जिभेवरील मज्जानियंत्रणाची परीक्षा होऊ शकत नाही. लहानपणी केलेले पाठांतर जिभेच्या अंगवळणी पडलेले असते. एकप्रकारे जिभेचे एक स्वत:चे स्मरणशक्तीचे केंद्र बनलेले असते. जुनी पाठांतरे म्हणताना जिभेला मुख्य मेंदूतील स्मरणसंग्रहातून आठवावे लागत नाही.' हिरमुसला झालो; पण, ब्राह्मण घरातील लहानपणाच्या, पंतोजींच्या कठोर पद्धतीने पाठांतर करवून घेण्याच्या हव्यासाचा थोडा अर्थ नव्याने उमगला. आजच्या संगणक युगातील भाषेत सांगायचे तर मुख्य मेंदूतील संग्रहणसामर्थ्याला जोड देणारी ताकद पाठांतराने मिळते. लहानपणी घरी पाठांतराचा दंड कसलेल्या घरातील मुले शाळेत, कॉलेजात अभ्यासात पुढे का राहतात आणि असा सराव नसलेली, प्रामुख्याने असवर्ण जातींतील मुले सगळी हुशारी असून औपचारिक अभ्यासात लठ्ठ-मठ्ठ असल्याच्या कुचेष्टेस का पात्र होतात हे समजले. हे सगळे व्यायाम आजही चालू आहेत. हाताची बोटे आता मेंदूचा हुकूम पाळताहेत. कोपर, खांदा अजून काहीशी कुचकुच करतात. बोलण्यातील दोष आता फारसा काही जाणवत नाही.

डोळ्यात काही दोष निर्माण झाला आहे, हे माझ्या लक्षात आलेच नव्हते. दुसऱ्या तिसऱ्या दिवशी डॉक्टरांनी डोळ्यासमोर डावीकडून उजवीकडे आणि वरपासून खालपर्यंत बोटे नाचवली तेव्हा लक्षात आले, की डाव्या बाजूकडील खालील गोष्टी नजर टिपत नाही. मग एक निश्चित निष्कर्ष काढण्यासाठी एक आधुनिक गणकयंत्रसंचालित यंत्राला डोळे लावून बसवले. समोरील पडद्यावर एकापाठोपाठ एक सर्व दिशांना लहान काजव्यासारखे दिवे लुकलुकत. तो दिवा नजरेने टिपला की हातात दिलेले एक विजेचे बटण दाबायचे. त्या परीक्षेतही निश्चित झाले, की डाव्या हाताकडील खालची नजर अपंग झाली आहे. झटका आला तेव्हा नजर सर्वांत शेवटी हबकली. जे पहिल्यांदा हबकले ते पहिल्यांदा परत येईल. शेवटी हबकलेली नजर सगळ्यात सावकाश परत येईल.

अपंगपणात डोळ्याची कमजोरी सगळ्यात कष्टदायक. माझ्या आईची नजर लहानपणापासून अधू होती. ती ८५ वर्षांपर्यंत जगली. त्यात चाळिशीनंतर तिला स्पष्ट



असे काहीच दिसत नसे. सगळे काय दिसायचे ते धुक्याने आच्छादल्यासारखे -अस्पष्ट आणि अंधूक. पण तिचा वाचनाचा आणि लेखनाचा अट्टहास महाप्रचंड. अगदी शेवटच्या अपघातापर्यंत ती डोळ्यासमोर भिंग धरून वर्तमानपत्र वाचत राहिली, हाती येईल त्या चतकोर कागदावर वेड्यावाकड्या अक्षरांत लिहीत राहिली. आम्ही मुले कधी हाती लागलो म्हणजे, 'माझ्या कविता एकदा चांगल्या अक्षरांत उतरवून दे ना!' म्हणून तोंड वेंगाडायची.

नव्या अपंग अवस्थेत लहान बाळाशी साधर्म्य पाहून हसू आले. अगदी लहान बाळ पुन्हा पुन्हा वारंवार निरखून पाहावे अशी इतकी प्रबळ इच्छा झाली, की एखाद्या मातृत्व नाकारलेल्या स्त्रीची आठवण व्हावी. आईने शेवटचे दिवस कसे काढले असतील, शेवटपर्यंत अधू डोळ्याने ती विजेचे दिवे इत्यादी घरगुती सामान किती पराकाष्ठेने दुरुस्त करी याची आठवण झाली आणि अक्षरश: हुंदक्यावर हुंदके येऊ लागले.

हा एक नवा अनुभव. एरवी मी कशानेही फारसा कळवळत नाही; पण माझ्या मोठ्या वहिनीने एक दिवस '*बडा कडा है सफर, थोडासा साथ चलो*' ही गजल म्हटली आणि मी ओक्साबोक्शी रडलोय. मेंदूचे नियंत्रण कमी झाले, की साहजिकच भावविवशता वाढते.

इस्पितळात दाखल होऊन पुरे ४८ तास होतात न होतात, तोच सरोजावहिनी, सुमनताई, शैलाताई एवढ्या अंतरावर दिल्लीस इस्पितळात दाखल झाल्या. बद्रीनाथ देवकर, हेमंत देशमुख आदी सहकारीही मागोमाग आले. माझे थोरले बंधू दिल्लीजवळ फरिदाबादला असतात; त्यांना बातमी लागून ते भेटायला येईपर्यंत माझ्या खाटेभोवती बिल्लाधारींचा झालेला जमाव पाहून त्यांना मोठे अद्‌भुतच वाटले. ते म्हणाले,

''हे तुझे खरे कुटुंब. आम्ही रक्ताच्या नात्याचे; पण आम्हीसुद्धा इतक्या त्वरेने धावून आलो नाही.''

सुमनताई अग्रवाल, शैला देशपांडे यांनी पूर्वीच्या काही आजारांतही माझी देखभाल केलेली. त्यांनी सगळ्या व्यवस्थेचा ताबा तत्परतेने घेतला. मधू किश्वर, मीना पाटील याही लवकरच येऊन पोचल्या.

चांगले इंजिन एका ठराविक गतीने चालते. त्याच्या फिरण्याचा आवाज एका लयीत चालू असतो. इंजिनमध्ये डिझेल पोचवणाऱ्या नळीत मळगाळ साठून राहू लागला म्हणजे इंजिनाची लय बिघडते व ते आचके खाऊ लागते. कधी एकदम वेगाने पाणी सोडते, तर कधी पाणी ओढायचेच बंद करते. काही वेळा डिलिव्हरी पाइप फुटतो, पाणी कुठे कुठे पसरले आहे हे पाहिले म्हणजे कोणता पाइप फुटला असणार याची अचूक कल्पना शेतकऱ्याला येते. मेंदूत अब्जावधी पेशी काम करीत असतात. प्रत्येकीचं काम स्वतंत्र

आणि खाते वेगळे. नेमक्या कोणत्या पेशींना इजा झाली आहे त्याचा नकाशा डॉक्टरांकडील आधुनिक साधने अचूक लावतात. सगळ्याच निदान परीक्षांच्या आणि उपचारांच्या काळात माझ्यासारख्या आधुनिक विज्ञानाची भाषा बोलणाऱ्या माणसालादेखील अद्‌भुत वाटावे अशा परीक्षा होत होत्या. छातीवर एक नळी लावावी आणि सरळ संगणकाच्या पडद्यावर लयीत स्पंदन करणारे स्वत:चेच हृदय पहावे; रक्तवाहिन्यांवरून तीच नळी फिरवली की त्यातील रक्ताच्या प्रवाहाचा धो धो वाहणाऱ्या धबधब्याप्रमाणे आवाज यावा; सगळ्या शरीरात कोणत्या रक्तवाहिन्या कोठे तुंबल्या आहेत याचे अचूक चित्र स्पष्ट व्हावे. याबाबत, वैद्यकीय अभियांत्रिकीने इतकी कमालीची भरारी मारली आहे, की कोणीही थक्क होऊन जावे. आधुनिक औषधोपचाराची जी उपाययोजना होते, ती योग्य की अयोग्य याबद्दल मोठे वाद चालू आहेत. आहारनियमन, व्यायाम, ध्यानधारणा, योगासने इत्यादिंच्या नियमित दिनचर्येने हृदयविकार आपण ताब्यात आणू शकतो असे आग्रहाने प्रतिपादणारी या ना त्या जुन्या औषधव्यवस्थेतील तज्ज्ञ मंडळी जागोजाग भेटतात. अमेरिकेतील डीन ऑर्निश हा सर्व योगी आणि ध्यानी यांचा वसिष्ठमुनी बनला आहे. या वैकल्पिक औषधांचाही काही अनुभव मी अलीकडे घेण्याचा प्रयत्न करतो आहे; पण, रोगनिदानाच्या बाबतीत वैद्यकी अभियांत्रिकीला तोड नाही यात काही शंका नाही.

मेंदूचे नकाशे निघाले. आघात झालेल्या भागांचे पुंजके पाहता स्पष्ट निष्कर्ष निघाला, की हृदयातून मेंदूकडे जाणाऱ्या प्रमुख रक्तवाहिनीत रक्त गाठळून साठले आहे. अपुऱ्या रक्तप्रवाहामुळे हृदयाचा पंप आचके देऊ लागला, की त्यातील काही गाठी सुटतात. त्या मेंदूकडील रक्तवाहिनीत जाऊन अडकल्या, की संबंधित भागातील रक्तपुरवठा थांबतो. याला म्हणायचे मज्जासंस्थेचा झटका.

पुढे पहिली शस्त्रक्रिया झाली ती मेंदूकडे जाणारी मुख्य रक्तवाहिनी साफ करून तिथे ती पुन्हा भरून जाऊ नये यासाठी एक लहानशी लोखंडी जाळीदार नळी बसवायची. ही शस्त्रक्रिया परदेशातच होऊ शकते असे म्हणत; पण आम्हाला एक शल्यचिकित्सक सापडले, तेही मूळचे पुण्याचेच. ती शस्त्रक्रिया निर्विघ्न पार पडली. दोन महिन्यांनी मुंबई येथील इस्पितळात हृदयाची शस्त्रक्रिया झाली. इंजिनकडे जाणाऱ्या डिझेल पाइपातील मळगाळ काढलेला भाग कापून टाकून कापलेल्या भागाऐवजी दुसऱ्या नळीचा जोड देणे अशी ही शस्त्रक्रिया. आता ती अपल्या देशात, अगदी जिल्ह्याच्या गावीही होऊ लागली आहे.



ही दुसरी शस्त्रक्रिया ४ एप्रिलला झाली. तीन तारखेलाच महाराष्ट्राच्या सगळ्या जिल्ह्यांतून सहकारी कार्यकर्ते रक्तदानासाठी येऊन पोचले. 'गंगा सिंधू सरस्वती च यमुना, गोदावरी नर्मदा' अशा सगळ्या नद्यांचे पाणी एकत्र करून शिवरायांचा राज्याभिषेक झाला होता. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तरुण शेतकरी रक्तदानासाठी आले. मागितले असते तर जीवदान देण्यासही ते कचरले नसते. स्वयंसेवक जास्त झाले म्हणून काही जणांचे रक्त घेण्यास डॉक्टरांनी नकार दिला. ते स्फुंदून स्फुंदून रडले. शस्त्रक्रियेच्या दिवशी सकाळी पहाटेपासूनच सगळी आप्तमंडळी आणि शेतकरी संघटना परिवार एकत्र झाला. स्ट्रेचर ऑपरेशन थिएटरकडे निघाले. नांदेडच्या करुणा पा. हंगर्गेकर स्वत: शस्त्रक्रियेच्या वेळी भूल देण्यातल्या निष्णात डॉक्टर. ऑपरेशन थिएटरच्या बाहेर स्ट्रेचर असताना 'सगळं काही ठीक आहे' असं त्यांनी सांगितले. त्यांची भाची डॉ. अनिता हिनेही हाताने बाय बाय केले. त्यानंतरचे काहीच स्पष्ट आठवत नाही.

भूल दिल्याने सर्व शुद्ध जाते, काहीच जाणीव होत नाही असे मी ऐकले होते. प्रत्यक्षात तसे काही होत नव्हते. शरीरातील सर्व संवेदना बधिर झाल्या आहेत याची जाणीव होत होती. मध्येच कोणीतरी लाकडाच्या गिरणीत कापण्यासाठी फिरते चाक वापरतात तसे चाक बरगडीच्या मध्यभागी हाडावरून चालवते आहे याची जाणीव झाली; दुखले मात्र काहीच नाही. मग, माझी स्वत:चीच डावी बरगडी उचलून कोपऱ्यात ठेवली आहे असे दिसले आणि मग सगळेच चिडीचूप झाले. मध्ये बराच काळ गेला असावा. थोडी थोडी आसपासच्या हालचालीची जाणीव होत होती. हालचाल शक्यच नव्हती, कारण शरीरातून अनेक नळ्या बाहेर काढल्या होत्या. तोंडात एक भलीमोठी प्लॅस्टिक नळी कोंबली होती. त्यामुळे बोलणे अशक्य होते.

ग्लानीने पुन्हा डोळे मिटले आणि अगदी स्पष्ट जाणीव झाली, की आपण आता या लोकातले राहिलो नाही आणि आपल्याच अंत्ययात्रेची तयारी चालू आहे. डाव्या, उजव्या हातापाशी, उशापाशी स्वच्छ घडीची कापडं आणून लावत होते. समोरून अंत्यदर्शनाला आलेल्या लोकांची रीघ लागलेली होती. संपूर्ण काळा वेश परिधान केलेला एक पाद्री काही मंत्र म्हणत होता. माझ्या कानाशी कोणीतरी पुटपुटलेही Ultime sanction झाली - ख्रिश्चन धर्मातील, तोंडात गंगाजल टाकण्यासारखा विधी. कितीतरी वेळ गेला. भेट देणाऱ्यांची रीघ होती. 'आता निघायचंय' असंही कानावर आलं; पण शव कोणी उचलेना. मग जाणीव झाली, आपण मेलो खरे; पण खरे मेलो नाही. अजून हाताला आतमध्ये कोठेतरी संवेदना जाणवते आहे. हे असेच विद्युतदाहिनीत सरकवणार की काय? त्याआधी

कोणाला तरी आपली सर्व संवेदना संपलेली नाही हे सांगायला पाहिजे. ही स्वप्नवत अवस्थाही बराच काळ टिकली. प्राण जात नाही आणि तो गेला तर या सगळ्या त्रासांतून मुक्तता होईल अशी प्रचंड उत्कंठा होती. एखाद्या भांड्यातून पाणी ओतायला सुरवात करावी आणि पाणी भांड्याच्या काठाला ओथंबून चिकटून रहावे असे काहीसे वाटत होते. पडू पाहणाऱ्या पाण्याला थोडा कोणी स्पर्श करून वाट करून दिली तर खळखळा पाणी वाहून जाईल आणि मोकळे मोकळे होईल असे वाटत होते; पण हे काही घडत नव्हते.

मग कानाशी बऱ्यापैकी स्पष्ट आवाज आला.

''जोशी, मी काय बोलतोय ऐकू येतंय? मी डॉक्टर भट्टाचार्य बोलतोय. काही त्रास वाटतोय?'' मी तोंडातील नळीकडे हात करून बोलता येत नसल्याची खूण केली आणि मला लिहायला कागद-पेन्सिल हवी आहे असे खुणेने सांगितले. डॉक्टरांनी हातात पेन्सिल दिली आणि मी कसेबसे मोजून चार शब्द लिहिले, 'कृपया, मला मरू द्या.' 'पेशंट म्हणतोय मला मरू द्या.' कोणा बाईचा आवाज; बहुधा डॉक्टरीणबाई असावी. भट्टाचार्यांनी खांद्यावर थोपटले आणि ते म्हणाले ऑपरेशन अगदी उत्तम झाले. आता विश्रांती घ्या आणि ते निघून गेले. माझी प्रतिक्रिया, 'काय खोटं बोलतायत? ऑपरेशन सगळं फसलंय, यांना हे चांगलं माहिती आहे. एक लहानसा स्पर्श आणि सारा जीवनौघ जायला उत्सुक झाला आहे. किती खोटं बोलताहेत?'

त्यानंतर मग अर्धवट जागृत अवस्थेतील दोन दिवस गेले. इतर पेशंट एकदोन दिवसांत विशेष दक्षता विभागातून बाहेर जातात. माझ्याबाबतीत जास्त वेळ लागणार आहे असे कानावर आले. माझी मुलगी श्रेया भेटून गेली. तेथे कोणाला येऊ देत नसतानाही महिला आघाडीची सरला कदम एकदा डोकावून गेली. शेवटी, एकदम एक दिवस माझ्या खोलीत जायला डॉक्टरांनी सांगितले. आपण पुन्हा या जगात प्रवेश करणार आहोत, हे खरेच वाटेना. अतिदक्षता विभागातून बाहेर पडलो. एकदोन दिवस चालण्याचे, चढण्याचे, श्वासोच्छ्वासाचे व्यायाम झाले आणि डॉक्टरांनी मला चक्क घरी जायला सांगितले; टाकेसुद्धा आठ दिवसांनी काढू म्हणाले!

आजारपण अकस्मात आले आणि आपल्या देशात जितके काही चांगले उपचार शक्य आहेत या सगळ्यामुळे आणि अनेक मित्रांनी मदतीचा हात दिल्यामुळे आजारपणाचे गंडांतर संपले. त्यानंतर, श्रेयाला बरोबर घेऊन अमेरिकेत जागतिक शेतकरी परिषदेला जाऊन आलो. १९९९ च्या निवडणुकांमधील वेगवेगळ्या पक्षांशी बोलणी चालली आणि



राजकीय निर्णयासंबंधी सहकाऱ्यांमधील भांडणतंटे हे सगळे सोसले. आंबेठाणला न जाता पुण्यात राहिलो, पण काही मनाला विश्रांती मिळते असे वाटेना. बिपिनभाई देसाईंच्या प्रेमाखातर गुजरातेत राहिलो. त्यांच्याबरोबरच हिमालयाच्या प्रवासाला गेलो. अट्टहासाने केदारनाथाची चढण्याची आणि उतरण्याची यात्रा एकट्याने पायी केली; नैनितालचे चीन शिखरही एकट्याने सर केले. अनेक दिवसांच्या विश्रांतीनंतर आणि सकाळ संध्याकाळ नियमित माफक व्यायाम करूनही जो आत्मविश्वास येत नव्हता तो एकट्याने पायी डोंगर चढण्याच्या माझ्या आग्रहामुळे फार झपाट्याने येऊ लागला.

गुजराथेत असताना नर्मदा प्रश्नाचा अभ्यास झाला. माझ्या सवयीप्रमाणे गप्प राहवले नाही म्हणून आंदोलनाचा नकाशा बनवला आणि नेतृत्वही गळ्यात पडले. आंदोलनाचा धडाका चालू झाला आणि दर दिवशी प्रकृतीत सुधारणा दिसू लागली. शेवटी आंदोलनच प्रकृतीला सर्वांत जास्त मानवले म्हणायचे!

आजारपण आले तेव्हा अमरावतीची जनसंसद नुकतीच संपली होती. भारताच्या गरिबीची आणि ऱ्हासाची कारणे कोणती याची मीमांसा, स्वत:ला संतोष वाटावा इतकी स्वच्छ झालेली होती. 'माधान'च्या शिबिरात खुल्या अर्थव्यवस्थेचा आराखडा स्पष्टपणे बोलून झाला होता. वधूची आई मांडवपरतणीनंतर आजारी कोसळावी तशातला हा प्रकार!

नर्मदा जनआंदोलनाच्या काळात गुजराथेत आणि महाराष्ट्रात दोन्हीकडे टीकेची राळ उडाली. गुजराथ शासनाने केवळ अट्टहासापोटी आणि पक्षीय हितासाठीच कारसेवेचा सुंदर सोहळा विस्कटण्याचा घाट घातला.

परत पुण्याला आलो. महाराष्ट्रातील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडी शासनाचा कारभार पाहिला. दिल्लीत अर्थव्यवस्था, महिलांचे आरक्षण, राजीव गांधींवरील आरोपपत्र इत्यादींचा गदारोळ पाहिला.

निर्यातबंदीमुळे कांद्याचे भाव कोसळलेले, कधी नव्हे ते महाराष्ट्र कापूस एकाधिकार योजनेत भा.ज.प. शिवसेना युतीच्या शासनाने 'ठोकून देतो ऐसा जे' पद्धतीने कापसाचा भाव जाहीर केल्यामुळे प्रथमच महाराष्ट्राबाहेरील कापसाचे भाव कोसळले, साखरेच्या आयातीमुळे साखर कारखाने आणि ऊसउत्पादक शेतकरी त्रस्त, तेलबियाण्यांच्या शेतकऱ्यांची अशीच दीनवाणी अवस्था हे सगळे पाहिले. शेतकऱ्यांची परिस्थिती जशी २० वर्षांपूर्वी शेतकरी संघटनेच्या उदयाच्या वेळी होती जवळजवळ तशीच; फरक एवढाच, की १९८० मध्ये समाजवादाच्या नावाखाली शेतीमालाची लूट होत होती,

आज खुल्या व्यवस्थेचा उद्घोष करणारे शासन शेतकरीविरोधी धोरणे पुढे चालूच ठेवत आहे. यावर तोडगा काढायचा म्हणजे सत्याग्रह किंवा सविनय कायदेभंग यापेक्षा काही प्रतिभाशाली आयुधे तयार करायला पाहिजेत.

शेतकरी संघटनेचा पाया मजबूत; पण नेतृत्व मोडकळीस आलेले. निवडणुकीतील पराभवानंतर कोणत्याही पक्षात काही अंदाधुंदी, बेबंदशाही माजतेच; पण अक्षरश: पोटच्या पोरांप्रमाणे ज्यांना मानले आणि जोपासले त्यांची एकमेकांतील वर्तणूक, मी मृत्यूच्या छायेत गेलो असे कळल्यावर किती बदलली हे कळून हे सोसण्यापेक्षा आजारपण बरे होते असे वाटले.

यानंतर आता सगळे काही पुन्हा उभे करायचे आहे. अनेक मित्र, नातेवाईक, सल्ला देतात, ''तुमचे काम बहुतक झालेलेच आहे. राहिलेले होणार आहे. तुमचा प्रत्येक शब्द खरा होतो आहे. श्रेय नावाने कोणी तुम्हाला देत नाही, एवढेच. यापुढे जीवाचा आटापिटा करायचा नाही. शांतपणे, संयमाने जितके होईल तितकेच करायचे.'' मी विचार करतो, 'आपले काय चुकले?' डीन ऑर्निशच्या विचारपठडीतली माणसे 'संयत दिनक्रम ठेवा' म्हणतात. मी आपला नेहमीचा प्रश्न विचारतो-

''प्रात:काळी उठून पुरुषसुक्त आणि ध्यानधारणा यांनी दिनचर्येला सुरवात करणारे, ध्यान आणि येग यांनी चित्त एकाग्र करण्याची साधना करणारे यांना माझ्याप्रमाणे हृदयविकाराचा झटका आला नसेल; पण, त्यांच्या निरामय प्रदीर्घ आयुष्याचे साफल्य काय? त्यांनी मिळवले काय? स्वत:च्या मनाची शांती, एवढेच?''

पूर्वी आंबेठाण येथे नियमित प्रशिक्षण शिबिरे होत. त्या वेळी इतर काही विषयांवर नाही तरी उत्क्रांती आणि ज्ञानमार्ग या दोन विषयांवर मी आग्रहाने बोलत असे. वर्षभराच्या आजारपणात गमावले खूप; पण एक कमाईही झाली. प्रशिक्षण शिबिरात मी जे बोलत होतो त्याचा अगदी खोलवर अनुभव झाला. माणसाचे हृदय हे लयीवर चालणाऱ्या इंजिनपंपासारखे आहे. घड्याळातील स्प्रिंग ही घड्याळाच्या सर्व काट्यांना एका लयीत गती देते. माणसाच्या शरीरातील ऊर्जास्रोत लयीत स्पंदन करणाऱ्या हृदयातून मिळतो. त्या स्पंदनांशी 'ताल से ताल' मिळवणाऱ्यांचे घड्याळ दीर्घकाळ चालते आणि व्यवस्थित काम देते. तसेच माणसाचे आहे. आयुष्यातील सर्व दिनचर्यांना एक लय ठेवली तर त्या शरीराची नासधूस, मोडतोड फारशी होत नाही, ते टिकते जास्त आणि काम बऱ्यापैकी करते. डिन ऑर्निशच्या सर्व शिकवणुकीचे सार एवढेच आहे; पण ज्ञानमार्ग हा लयविरोधी आहे. विश्वभरच्या प्रत्येक वस्तूशी संपर्क जुळवणे (Networking), क्षणाक्षणाने आणि



कणाकणाने नवीन अनुभव वेचणे, त्यांची गाळणी करणे, साठा करणे, परस्परसंबंध जोडणे, काही ठोकताळे बसवणे, नवनवीन अनुभवांती जुने ठोकताळे चुकले असे लक्षात आले तर निर्दयपणे ते फेकून देणे; पडणे, स्वत:ला सावरणे आणि कोणत्याही निष्कर्षाला सज्जड पुराव्याचा आधार असला तरी त्याविषयी मनात शंका बाळगणे हा सर्व ज्ञानमार्ग विरोधविकासी आहे. क्षणाक्षणाला नवीन अनुभव देणारा आहे. त्याला लय नाही, चक्रनेमीक्रम नाही. म्हणजे, काहीही वेगळे करायला निघालेला माणूस हृदयाच्या स्पंदनाच्या लयीला तोडल्याखेरीज काम करूच शकत नाही.

'पिक्चर ऑफ डोरियन ग्रे' चा लेखक ऑस्कर वाईल्ड याने ही कल्पना फारच सुंदर मांडली आहे. कोणी कवी घ्या, लेखक घ्या, कलाकार घ्या-प्रतिभा असली, की माणसाचा चेहरा कुरूप बनतो, कपाळ मोठे होते, नाक बाकदार होते, चेहरा सुरकुतून जातो, डोळे ओढलेले दिसतात. नेमकी याउलट गोष्ट चर्चमधल्या पाद्र्याची. लहानपणी शिकलेली वाक्ये वापरून तो आयुष्यभर पोपटपंची करत राहतो. त्यामुळे, पाद्र्याचा चेहरा नेहमीच सुडौल, बांधेसूद आणि सतेज दिसतो; कारण त्याला कधी डोक्याला त्रास द्यावाच लागत नाही.

वर्षानुवर्षाच्या धावपळीमुळे अनियमितपणामुळे, ताणामुळे एवढा मोठा आजार आला. शारीरिक आणि बौद्धिक अपंगत्व म्हणजे काय याची खोलवर विदारक जाणीव झाली. संयत नियमित दिनचर्या ठेवली असती तर हे आजरपण ओढवले नसते हेही उमजले. पण, शेवटी निष्कर्ष काय निघाला? सार्थक जीवनाचा मार्ग लयबद्ध असूच शकत नाही.

*मुहूर्तम् ज्वलितम् श्रेयम् ।*
*न च धूमायितम् चिरम् ॥*

(शेतकरी संघटक, ६ जानेवारी २०००)

■■

# माझी शिक्षणगाथा

आमच्या काळी महाविद्यालयाची प्रवेशपरीक्षा शाळेच्या अकराव्या वर्षाच्या शेवटी होई. १९४९ सालापर्यंत या परीक्षेला मॅट्रिक्युलेशनची परीक्षा म्हणत; सर्वसामान्यांच्या बोलण्यात नुसतेच मॅट्रिक. मॅट्रिक म्हणजेच मोजमाप. हे मोजमाप झाले, की उच्चशिक्षणाची व विश्वविद्यालयीन अभ्यासाची दारे खुली होत.

शाळेतले विद्यार्थी जवळ असताना वडीलधारी माणसे सरकारी नोकरीत असली, वकील असली तर आपल्या विद्यार्थिजीवनाविषयी फारसे बोलत नसत. मॅट्रिक झाले म्हणजे मोठी बाजी मारली, पदवीधर म्हणजे ग्रॅज्युएट होणे म्हणजे तर पराक्रमाचा कळसच. त्या काळी बी.ए. झाल्यानंतर एम.ए. वगैरे करण्याच्या भानगडीत फारसे कुणी पडत नसे; प्राध्यापक होतकरूच एम.ए.च्या वाटेला जायचे. विद्वन्मान्यतेचे एकदोनच आदर्श. एक, आचार्य अत्रे, बी.ए.,बी.टी.,टी.डी. (लंडन), एवढा शिकलेला आणि वर आचार्य, म्हणजे काहीचा काहीच विद्वान माणूस असे वाटायचे. वकील होण्यासाठी बी.ए. होण्याची आवश्यकता नसे, एरवीही कायद्याच्या पदवी परीक्षेला बसता येत असे. पुष्कळसे वकील तर बऱ्यापैकी व्यवसाय चालणाऱ्या वकिलांच्या पदरी कारकुनी करतच वकिली व्यवसायात घुसलेले असायचे.

तालुक्याच्या गावचा वकील हा भीतीचा विषय होता, आदराचा नव्हता. वकिली प्रदेशातला मान्यवर म्हणजे 'बॅरिस्टर'. त्यावेळचे बहुतेक सारे वंदनीय नेते बॅरिस्टरीची परीक्षा विलायतेत देऊन आलेले. महात्मा गांधी बॅरिस्टर; जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, स्वातंत्र्यवीर सावरकर, जमनादास मेहता सारे सारे बॅरिस्टरच. कोणी माणूस अत्रापपणे युक्तिवाद करू लागला, की कुचेष्टेने त्याला, 'बाळा, बाळा, बॅरिस्टर का रे नाही झालास?' असे विचारीत.

वकिलांचे सगळ्यांचे उत्पन्न चांगले असे. बॅरिस्टर लोकांचा थाट मोठा. काळा डगला, पांढरा शुभ्र खमीस. ही माणसे सारी बिनकॉलरच्या खमीसावर दोरीने कॉलर का बांधत हे आम्हाला समजायचे नाही. इंग्लंडच्या थंड हवेतल्या बॅरिस्टरचा डगला हिंदुस्थानच्या उष्ण दमट हवेत घातला, की पांढराफेक कडक इस्त्रीचा शर्ट दोन दिवस लागोपाठ घालणे काही शक्य होत नाही आणि एक एक दिवस धुलाईचा शर्ट घालावा अशी मिळकत बहुतेक त्या काळच्या बॅरिस्टरांना मिळत नसावी.



पुढे पुढे बॅरिस्टर हे आमच्या मर्जीतून पार उतरले. बॅरिस्टरची अशी परीक्षा नसतेच. कोणत्या तरी गुत्त्यात (bar) आठ गिनी खर्च करून (१२ पेन्स = १ शिलिंग व २१ शिलिंग = १ गिनी) आणि जुन्या बॅस्टिरना खूश केले, की बॅरिस्टरी आपोआप मिळते असे कुणी सांगितले. त्यामुळे विलायतेत जाऊन फक्त बॅरिस्टर होऊन आलेल्यांचा भाव मनात ढासळला. त्याऐवजी आयसीएस करून आलेले सुभाषचंद्र बोस, चिंतामणराव द्वारकानाथ देशमुख हे आमचे चरित्रनायक झाले.

डॉक्टर त्या काळी फार फार म्हणजे M.B.B.S. M.D. आणि F.R.C.S. झालेले डॉक्टर मी मुंबईला आल्यावर तेथील इस्पितळातच पाहिले. जिल्ह्यापर्यंतचा मोठा डॉक्टर म्हणजे M.B.B.S. ! या पदवीचे मोठे वैचित्र्य वाटायचे. B.A., B.Sc. या धर्तीवर B.M.B.S. किंवा नुसते B.M. & S. अशी सुटसुटीत पदवी का देत नाहीत, हे कळायचे नाही. बहुतेक डॉक्टर, कुणी आजारी असले तर तपासायला घरी जात असत. अगदी चांगल्या डॉक्टरचीसुद्धा घरी भेट देण्याची फी ३ ते ५ रुपयांच्या वर नसे. दाताच्या डॉक्टराची पत्रास तर न्हाव्यापेक्षा फारशी वरची नव्हती. ते कदाचित रोग्याला बसवायच्या खुर्चीतील सारखेपणामुळेही असेल ! M.B.B.S. झालेल्या आणि होऊ पाहणाऱ्या सगळ्या भद्र लोकांनी आम्हाला पार पटवून दिले होते, की M.B.B.S. च्या पाच वर्षांच्या पाच परीक्षा एकदाही नापास न होता सरळसोट पाच वर्षात कोणी विद्यार्थी पार करूच शकत नाही. एखादे वर्ष तरी बुडणारच. विद्यार्थी फारच हुशार असला तर असूयेपोटी प्राध्यापक त्याला एक वर्ष तरी नापास करतातच अशी आमची पक्की समजूत होती. अशीच काहीशी समजूत C.A. (चार्टर्ड अकौंटंट) या हिशेब तपासनिसाच्या संबंधी सर्वदूर होती. कुणा हिशेब तपासनिसाकडे उमेदवारी करता करता तीन परीक्षा द्यायच्या; पण बहुतेकांचा हा कार्यक्रम वर्षानुवर्षे चालायचा. महाराष्ट्रात त्या काळी दोनतीन Actuary खूप गाजले होते. या लोकांचा नेमका व्यवसाय काय हे बऱ्याच वर्षांनी कळले होते. जीवनविमा उतरवणाऱ्यांच्या हप्त्यांची रक्कम काय असावी याचा हिशेब करण्याचा हा धंदा. याला एवढा मान का असावा आणि त्यात एवढे काय कठीण असावे की ज्यामुळे भारंभार पगार मिळावा हे आमच्या समजेपलीकडेचे होते. खूप खूप वर्षांनंतर स्वित्झर्लंडमध्ये माझ्या कार्यालयात काम करणारा माझ्या बरोबरीचा एक सहकारी पाहून ॲक्च्युअरी होण्याकरिता लागणाऱ्या बुद्धिमत्तेचे आणि तपस्येचे आपले हिशेब चुकले तर नव्हते ना, असे वाटू लागले.

मी प्रवेशपरीक्षा पास होण्याआधी इंजिनिअर लोकांना फारसा मान नव्हता. पहिले

कारण, ही मंडळी फारशी शुभ्र स्वच्छ कपड्यात दिसत नसत. वेषभूषेवरूनच त्यांची गाठ शारीरिक कष्टाशी आहे हे उघड होई. ब्राह्मणी परंपरेत वाढलेल्या कोणालाही इंजिनिअर होण्याचे फारसे आकर्षण नसे. इंजिनिअरांचे प्रकार फक्त तीनच होते. बांधकामे करणाऱ्यांना सिव्हिल इंजिनिअर म्हणत, विजेशी काय संबंध असेल तो असणाऱ्यांना इलेक्ट्रिकल म्हणत आणि यंत्राच्या साह्याने कापाकापी, घासाघाशी असली कामे करणाऱ्यांना मेकॅनिकल म्हणत.

१९४९ सालापर्यंत इंजिनिअरिंग शिकण्यासाठी प्रवेश मिळविणे फारशी कठीण गोष्ट नव्हती. आताप्रमाणे लाखांनी 'हुंडा' देऊन प्रवेश कधीकाळी मिळवावा लागेल यावर कोणाचा विश्वासही बसला नसता. पुण्यासारख्या प्रतिष्ठित अभियांत्रिकी महाविद्यालयाचे धुरीणही घरोघर जाऊन होतकरू तरुणांना अभियांत्रिकीचे महत्त्व पटवून बळेच आपल्या कॉलेजात आणीत. त्यांच्या महाविद्यालयात एकदा गेले, की मध्ये फारशी अडचण न येता माणूस इंजिनिअर म्हणूनच बाहेर पडे.

लग्नाच्या बाजारात वकिलांचा मान मोठा, सरकारी नोकरांचा त्याहून मोठा; डॉक्टर, इंजिनिअर हे उतरत्या भाजणीने त्यांच्या खालचे. आता अभियांत्रिकीतच शंभर सव्वाशे शाखा आहेत. M.B.B.S. होऊन कोणीच डॉक्टर थांबत नाही. प्रत्येकाला काही ना काही विशेष प्रावीण्य पदवी (Super specialisation) मिळवल्याखेरीज चालतच नाही. वकिलावकिलात विशेष नैपुण्याच्या शाखा झाल्या. वकील साधा वकील राहिला नाही. गुन्हेगारी खटले चालवणारे वेगळे, नागरी कायदे चालवणारे वेगळे, व्यपारी कायद्यांचे वेगळे, करमहसुलांचे वेगळे, हे सगळे अलीकडे अलीकडे घडले.

गेल्या आठवड्यात मुंबईच्या एका मान्यवर महाविद्यालयात एका कार्यशाळेसाठी गेलो होतो. तिथल्या प्राचार्यांनी, कलाशाखेबद्दल विद्यार्थ्यांत फारशी रुची नाही याबद्दल हळहळ व्यक्त केली.

कला विभागाची मोठी गंमत आहे. गेली काही दशके तरी ज्यांना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळण्याइतके गूण मिळत नाहीत, अभियांत्रिकीलाही जाता येत नाही, अगदी वाणिज्य शाखेतसुद्धा प्रवेश मिळण्यासारखा नसतो तेव्हाच विद्यार्थी, अगदी नाइलाजाने, कला महाविद्यालयात जाऊन बी.ए. पदवीचा प्रयत्न करू लागतो. बाकीच्या शाखांत प्रवेश मिळणे कठीण झालेल्या या विद्यार्थ्यांतही वर्षानुक्रमे द्वितीय वर्ग, प्रथम वर्ग, विशेष प्रावीण्य, सुवर्णपदके इ. मिळवणारे निपजतात. असे उशिरा चमकू लागणारे खडे पदवीनंतर प्रशासकीय सेवेत जाण्याचा प्रयत्न करू लागतात. ते नच जमल्यास



[illegible] ललित साहित्याचे पुस्तक घेऊन कोणत्याही विषयातले प्राध्यापक होतात. [illegible] त्यात मागास पूर्णवेळ कायद्याची पदवी संपादन करू पाहतात. एकदा वकिलीला लागला आणि बऱ्यापैकी पैसा मिळू लागला, की वैकुंठाची वाट धरेपर्यंत आपला व्यवसाय कुणी सोडत नाही. ज्यांची वकिली चालतच नाही ते वेगवेगळ्या तऱ्हांच्या खटाटोपींनी धागेदोरे जमवून मॅजिस्ट्रेट बनतात, पुढे चढत चढत न्यायाधीश बनतात, कालानुक्रमाने उद्याच काय सर्वोच्च न्यायालयातही न्यायाधीश बनतात.

अलीकडे राजकारणी राज्यकारभाराचे काम करीत नाहीत, त्यामुळे न्यायाधीशांच्या हातीच सर्व सत्ता येऊ पाहत आहे. रस्त्यावर धावणाऱ्या गाड्यांना इंधन कोणत्या प्रकारचे वापरावे, दुचाकीवाल्यांनी डोक्यावर शिरस्त्राणे घालावी किंवा नाही, विद्यालयातील फिया काय असाव्यात येथपासून तर इतिहासात कोणत्या काळी कोठे देऊळ होते का मशीद होती इथपर्यंतचे सर्व निर्णय शैक्षणिक पात्रतेच्या सगळ्या चाळण्यांत गणंग ठरलेले करतात.

कला महाविद्यालयाच्या प्राचार्यांना आपण निव्वळ मातेऱ्यातून माणके तयार करतो याचा खरे पाहिले तर अभिमान वाटायला पाहिजे. हे मातेरे प्रवेश घेताना भरभक्कम 'हुंडा' देऊन येत नाहीत हेच खरे त्यांचे दु:ख असावे!

ब्राह्मणी घरात वाढलेला मी, कोणत्याही शारीरिक कष्टाचा कंटाळा होता असे नाही, त्यात कमीपणा वाटे असेही नाही; पण, परमेश्वराने एवढे आयुष्य दिले आहे ते कारखाने काढणे, रोग्यांची शुश्रूषा करणे, कोर्टात वितंडवाद घालणे, सरकारी नोकरीत मान खाली घालून वर्षानुवर्षे काम कण्यात जाणे ही गोष्ट मोठी भयानक वाटे.

तिसरीचौथीत असताना प्रभातचा 'रामशास्त्री प्रभुणे' हा सिनेमा पाहण्यात आला. हूड आणि निर्बुद्ध मानला गेलेला राम काशीला जातो. 'रामोहरि करी भूऽभृत' अशी घोकंपट्टी करतो; आणखीही काही घोकत असेल; पण सिनेमात एवढेच दाखवले आहे. एवढ्या आधारावर तो प्रकांड पंडित मानला जाऊन राजसत्तेलाही नमवण्याचा अधिकार प्राप्त करतो हे काही छान आहे; असे काहीतरी केले पाहिजे असे वाटे. आठवीत संस्कृतच्या तासाला 'राम: रामौ रामा:' कानावर आल्यावर आता आपला रामशास्त्री होणे काही काळाच्या अवधीचाच प्रश्न आहे असे वाटू लागले. नाशिकच्या शाळेतील आमचे संस्कृतचे गुरुजी... सर्वांना जड वाटणारा विषय इतका सुरस करून सांगणारा असा शिक्षक मी नंतर कधी पाहिलाच नाही. पहिल्याच दिवसापासून त्यांनी पाठांतर बाजूला ठेवून सर्वांनी संस्कृतात बोलले पाहिजे असा आग्रह धरला. फळ्यावर रामरक्षेतील 'माता

रामो, मत्पिता रामचंद्रः' हा 'अनुष्टुप' लिहिला आणि मराठी मातृभाषिकाला संस्कृत ही आजीच आहे असे वाटावे असा बदल तासाभरात घडवून आणला. मग, जिद्दीने संस्कृतच्या परीक्षांना बसवणारे, सुभाषितकाव्यांचे पाठांतर करून घेणारे, सारी भगवद्गीता मुखोद्गत करून घेणारे शिक्षक भेटण्याचे भाग्य लाभले. बाणभट्टाची कादंबरी आणि नादमाधुर्याने तोंडाला सुटणारे पाणी सावरत सावरत तन्मयतेने शिकवणारे गुरुजीही भेटले. 'संस्कृत ही काव्याची भाषा आहे. संस्कृतमध्ये करायचे भाषांतर पद्यबद्धच झाले पाहिजे' असा आग्रह धरून पानेच्या पाने इंग्रजी उतारे सुबोध, नादमधुर काव्यात, पाण्याचा प्रवाह धो धो वाहावा तसे, सांगणारे आचार्यही भेटले.

संस्कृतची गोडी किती लागली या प्रश्नाचे उत्तर आजही कठीण आहे; पण पुत्रप्राप्तीकरिता गाईपाठोपाठ फिरणारा दिलीप राजा, नारदाच्या तंबोऱ्यावरील फुलांची माळ कोसळल्याने मृत्यू पावलेल्या इंदुमतीबद्दल बाष्पगदगद होऊन विलाप करणारा अज राजा आणि सीताहरणानंतर दंडकारण्यातील झाडाझाडांना सीता कोठे आहे असे बेभानपणे विचारत फिरणारा राम या विश्वात, काही नाही तरी, वर्तमानातल्या असुखद वास्तवाच्या भानाची भूल पाडण्याचे सामर्थ्य हाते. ती एक धुंदीच होती, मस्ती होती. इतरांना ज्या क्षेत्रात रस नाही त्यात आपण आकंठ आनंदात बुडून जात आहोत याचा अहंकारही मोठा असावा. आयुष्यात जगण्यासारखे, करण्यासारखे, अभ्यासण्यासारखे, स्वतःला झोकून द्यावे असे काही असेल तर ते म्हणजे संस्कृतचा व्यासंग अशी माझी पक्की धारणा झाली होती.

काशीहून विद्या घेऊन आलेल्या रामला पेशवाईत हुकमी दक्षिणा मिळे. आता संस्कृत व्यासंग्याला भिक्षा मिळण्याचीही शक्यता फारशी नाही; पण त्या व्यासंगाची गोडीच अशी की 'फार काय, पोटात काटे भरावे लागतील एवढेच ना?' अशी अविचारी गुर्मीही होती. परीक्षेत चागले गुण मिळवले आणि दैवयोगे करून चांगल्या महाविद्यालयामध्ये संस्कृत भाषेचा प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली तर मग पोटापाण्याचाही प्रश्न फारसा राहत नाही. विद्वत्तापूर्ण व्यासंगाची जनमान्यता, सुखवस्तूपणे जगता यावे इतकी अमदनी आणि महाविद्यालयातील वर्गात तारुण्यात नुकतेच पदार्पण करू पाहणाऱ्या तरुणतरुणींना कुमारसंभवातले बारकावे समजावून सांगण्याचे काम! इतका काही सगळा बारकाव्याने विचार आखला गेला होता असे काही नाही; पण संस्कृतचा प्राध्यापक व्हायचे एवढे मनात ठामपणे ठरलेले होते.

साहित्याच्या रसाची मस्ती चाखण्याचा अनुभव आला, की तो साहित्यापुरताच



मर्यादित राहत नाही. तारुण्याच्या भरात शक्तीच्या अमदानीत उसळणाऱ्या नवनव्या ऊर्मींचे सार्थक करून दाखवण्याची झिंग तयार होते. ६ जून १९५१ - एस.एस.सी.च्या परीक्षेचा निकाल लागला, मी शाळेत पहिला आलो. गुणांच्या याद्या मिळाल्या. आमच्या मंमूत 'आता पुढे काय?' याची चर्चा सुरू झाली. आकंठ जेवून तृप्त झालेल्याला रस्त्याकाठी बसलेल्या माणसाच्या पोटातील भुकेची जाणीव नसावी तसा, काही आढ्यतेने मी म्हणालो, 'पुढे कोणता शिक्षणक्रम घ्यायचा यात एवढा विचार करण्यासारखे काय आहे? कोणताही शिक्षणक्रम घेतला तरी फरक काहीच पडत नाही. चिंतामणराव द्वारकानाथ देशमुख, त्यावेळचे आमचे दुसरे चरित्रनायक, म्हणतात, 'आवडणारी गोष्ट कोणीही करेल; करावी लागणारी गोष्ट आवडीने करणे यात पुरुषार्थ आहे.' आपल्या लोकोत्तरतेच्या धुंदीत आपल्या हातानेच आपले आयुष्य कडू करून घेण्यात गोड मानणारे कितीतरी खांडेकरी नायक डोक्यात बिळे करून बसले होते.

एका अत्यंत प्रिय मित्राने म्हटले, "तुला काहीच चिंता नाही. तुझे ठरलेच आहे, तू संस्कृत घेऊन एम.ए. करणार आणि प्राध्यापक होणार!" मी? विश्वाच्या निर्मितीतील एक प्रमुख प्रमेय असलेले माझे आयुष्य आणि हा कसेबसे ५४ % मार्क मिळालेला मित्र मला माझी वाट सांगतो आहे? शब्दाशब्दाने वाद वाढला, ' प्राणापेक्षा प्रिय असलेल्या सीतेचा, राजधर्माचे परिपालन करण्याकरिता त्याग करायलाही मी मागेपुढे पाहणार नाही." अशा रामचंद्री अभिनिवेशात मी संस्कृत अभ्यासक्रम न घेण्याचा निर्णय जाहीर करून टाकला. वर्षानुवर्षे ज्या आयुष्यक्रमाची तयारी केली, तो क्षणार्धात हेकटपणे लाथाडला, आता पुढे काय? आईवर रागावलेले बाळ हट्ट करून जेवायला नकार देते; त्यामुळे आईचे हृदय पिळवटते आहे या जाणिवेत त्याला काय आनंद होतो? लव-कुशांनी रामाच्या साऱ्या सैन्याचा पराभव केला, सीतेचे निष्कलंकत्व सिद्ध झाले. तिला कोणी पतिता म्हटले तर लवकुशांचे पराक्रमसिद्ध धनुष्यबाण आकर्ण ताणून सिद्ध झाले असते तरीही रामाने, 'सीतेने पुन्हा एकदा अग्निदिव्य करावे' असा आग्रह धरून मनातल्या मनात कोणत्या असीम कडूजहर सुखाचा अनुभव घेतला?

संस्कृत नाही म्हणजे नाही; पण मग कोणता अभ्यासकम घ्यायचा? संस्कृत भाषेचे लालित्य, माधुर्य, सौंदर्य सोडून त्याच्या नेमक्या उलट्या टोकाचा नीरस, शुष्क, कठोर विषय कोणता घ्यावा? माझे त्यावेळचे संस्कृतचे आचार्य- आयुष्यात विविध कलांचा, गुणांचा, विद्यांचा त्यांच्याइतका व्यापक आणि सखोल आविष्कार करणारा मी आजपर्यंत पाहिलेला नाही. १९५० सालच्या एस.एस.सी. परीक्षेत त्यांचा विद्यार्थी बोर्डात पहिला

आला होता- आज नाणेशास्त्रात अर्थशास्त्रात जगभर शिखराची कीर्ती मिळवलेला आणि बहुधा येत्या काही वर्षांत नोबेल पारितोषिक मिळवण्याची निश्चिती असणारा जगदीश भगवती. कोठल्या अपघाताने कोणाच्या आयुष्याला कसे वळण लागेल कोणालाही सांगणे शक्य नाही. मी वाणिज्य शाखेत प्रवेश घेण्याचा निश्चय जाहीर केला. केला म्हणजे केला, 'शेंडी तुटो पारंबी तुटो' आता माघार घेणे नाही.तोंडातून निघालेला शब्द मागे घेणे भाग पडून होणाऱ्या अपमानाने मलिन झालेले जीवन जगण्यात तरी काय अर्थ आहे?

*जीवेन किम् तत् विपरीत वृत्ते: । प्राणैहि उपक्रोष मलीमसै: वा ॥*

मी मध्यमवर्गीय कारकुनाचा मुलगा. त्या वेळी मुंबईत वाणिज्य शाखेची दोन महाविद्यालये होती. एक फोर्टातील सिडनेहॅम आणि दुसरे माटुंग्याचे पोद्दार.सिडनेहॅम कॉलेजात मोठ मोठे उद्योगपती, गडगंज धनी, व्यापारी यांची मुले वंशपरंपरागत व्यवसाय पुढे नेण्याच्या मिषाने दोनचार वर्षे उल्लूपणा करण्याच्या बुद्धीने आलेली, त्यांचे विश्व वेगळे. महाविद्यालयात येताना दोन दिवस लागोपाठ तीच मोटारगाडी घेऊन येणे त्यांच्या जगात कुचेष्टेचा विषय होई.

माटुंग्याच्या पोद्दार कॉलेजची परिस्थिती वेगळी. तेथे उच्चमध्यमवर्गीय मुलांचा भरणा अधिक. महाराष्ट्रातले थोडेफार वर आलेले उद्योगपती आपल्या मुलांना तेथे पाठवीत;, पण बहुतेक पोद्दारवाशी विद्यार्थ्यांची महत्त्वाकांक्षा बँका, विमान कंपन्या, व्यापारी पेढ्या, कारखाने, त्या वेळी एका हाताच्या बोटावर मोजता येण्याइतक्या अल्पसंख्य बहुराष्ट्रीय कंपन्या यांत भरगच्च पगाराच्या नोकऱ्या मिळवण्याची. थोडी मेहनत केली असती तर पोद्दारच्या गटात अधिकच सहजतेने सामावू शकलो असतो; पण सिडनेहॅम ९० % पारशी, गुजराथी, मारवाडीबहुल. तिथला मराठी विद्यार्थी 'घाटी' मानला जाणारा; कपडे, राहणेसाहणे या सर्वच बाबतीत वेगळा दिसणारा.

वर्ग सुरू झाले आणि 'हरियाली' सोडून 'पथरीला' रस्ता स्वीकारणाऱ्यांच्या वेदना क्षणाक्षणाला जाणवू लागल्या. 'रघुवंशा'तील इंदुमतीस्वयंवरात राजकन्या इंदुमती एका एका राजापुढे जात, ज्याच्या पुढे ती उभी राही त्या राजाचा चेहरा आशेने उजळून जाई. वेत्रवति सुनंदेने राजाची माहिती सांगितल्यानंतर, स्वारस्य न वाटल्याने, इंदुमति पुढे सरकली, की त्या मागे पडलेल्या राजाचा आशेने उजळलेला चेहरा व्याकुळतेने काळा पडे. या जगप्रसिद्ध उपमेकरिता कालिदास 'दीपशिखी कालिदास' म्हणून प्रसिद्ध आहे. साहित्याला धि:क्कारून वाणिज्यात शिरलो आणि आयुष्य असे वैराण, खडतर वाटू लागले. हिशेब ठेवण्याच्या पद्धती अभ्यासणे हा काय आयुष्याचा हेतू होऊ शकतो? व्यवसाय



करायला एक मालकी, भागीदारी, सहकारी, भागभांडवली कंपनी इ. पद्धतीच्या बांधणी असतात त्यांचा अभ्यास करायकरिता जगायचे?

तेवढ्यात, अगदी तरुणसे प्राध्यापक आले. वर्णाने काळसर. भर वर्गातही काळा चष्मा घातलेले आणि इंग्रजी बोलताना ओढून ताणून आणलेला अर्धांग्ल थाट. यांच्याकडे तर ४५ मिनिटे पाहणे आणि यांचे बोलणे ऐकणे अशक्यप्राय आहे असे वाटू लागले; पण क्षणार्धात चमत्कार झाला.

त्या अवताराकडे पाहून समोरच्या बाकावरील एक विद्यार्थी हसला असावा. हसणे मला ऐकू आले नाही; मात्र प्राध्यापकांचा आवाज वीज कडाडावी तसा ऐकू आला, 'वर्गात हसायचे असेल तर दात साफ ठेवत जा.' त्या विद्यार्थ्याचा चेहरा काही दिसला नाही, पण भूमीने गिळले तर बरे अशी त्याची अवस्था झाली असणार. प्राध्यापकांनी त्यांच्या करड्या आवाजाचा सूर चालू ठेवला, "कोणा ऐऱ्यागैऱ्या कॉलेजात आला नाही. वाह्यातपणा करायचा असेल तर कला शाखेत जा, शास्त्रात जा आणि कोठेही जा; वाणिज्य हा गंभीर अभ्यास आहे. जे कोणी केवळ बँकेत किंवा पेढीवर कारकून होण्यासाठी म्हणून वाणिज्याकडे आले असतील त्यांनी आजच वेगळा मार्ग धरावा. सिडनेहॅम हे आशियातील सर्वांत पहिले आणि सर्वश्रेष्ठ वाणिज्य महाविद्यालय आहे. आम्ही कारकून आणि हिशेबनीस तयार करत नाही. येथे प्रवेश घेतलेला विद्यार्थी चार वर्षांत पदवीधर होताना सर्व भारताचा वित्तमंत्री होण्याचे ज्ञानाचे आणि बुद्धीचे गाठोडे जमा करतो. असा काही मानस असेल तर या अभ्यासक्रमात रहा, या महाविद्यालयात रहा, नाही तर आपला दुसरा मार्ग पकडा."

प्राध्यापक महाशयांचा शिकवण्याचा विषय जाहिरातशास्त्र होता; म्हणजे फारसा गंभीर नाही. त्यांनी लगेच सूर बदलून आपल्या विषयाला सुरवात केली; पण त्यांच्या चार वाक्यांनीच माझी मन:स्थिती पार पालटून गेली. कालिदास, भवभूतीची संगत सोडल्याचा विषाद क्षणार्धात नाहीसा झाला आणि अर्थकारण, व्यापार यांसारख्या रूक्ष विषयात पाऊल टाकून, पाहिजे तितके परिश्रम करून, या साऱ्या क्षेत्रात जे काही घडत असेल त्याची पूर्णत: नस पकडण्याची महत्त्वाकांक्षा मनात तयार झाली.

त्यानंतरच्या ६ वर्षांत पूर्वी संस्कृतचा अभ्यास करायचा, तसाच अर्थशास्त्राचा करायला घेतला. संस्कृतचा पेपर एक, त्याकरिता आवश्यक असलेली तयारी फार थोडी. पण तरीही बाणभट्ट, कालिदास, भवभूती, वाचण्याचा जिद्दीने प्रयत्न केला त्याच जिद्दीने अर्थशास्त्रासंबंधी जे मिळेल ते पुस्तक, अहवाल, मासिके बारकाईने अभ्यासण्याचा झपाटा लावला.

शेतकरी झाल्यानंतर शेतीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. महाविद्यालयातून शिकलेल्या अर्थशास्त्रातल्या सिद्धांतांचे वास्तवाशी काहीच जुळेना. थातुरमातुर अभ्यास केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांची सहज प्रवृत्ती अशी होते, की आपण शिकलो ते खोटे असे कबूल करण्यापेक्षा आपला अनुभव खोटा, शेती खोटी असे मान्य करून टाकावे. शेतकऱ्याच्या, पदवी पदरात पाडून घेतलेल्या मुलाला ती पदवी एवढेच अभिमानस्थान असते, त्याला धब्बा लागू देण्यापेक्षा साऱ्या शेतीच्या इमानाला कलंक लावायला तो मागेपुढे पाहत नाही. शेतकऱ्यांची अनेक पदवीधर मुले राजकारणात पुढे आली, शेती तोट्याचा व्यवसाय असल्याचा अनुभव घेतला आणि तरीही, शेतकरीच अडाणी आहे, आळशी आहे, व्यसनी आहे, खर्चिक आहे असले सिद्धांत मानले. पढिक अर्थशास्त्र खोटे आहे असे छातीवर हात ठेवून सांगण्याची त्यांची हिंमत झाली नाही कारण अर्थशास्त्राच्या अभ्यासाविषयीचा आत्मविश्वास तितकाच लुळापांगळा.

अभ्यासक्रम संपल्यानंतर सिडनेहॅम कॉलेजमध्येच व्याख्याता म्हणून नेमणूक झाली. माझे एक प्राध्यापक मित्र कोल्हापूरला वाणिज्य महाविद्यालय स्थापन करत होते. त्यांच्या मदतीला जाण्यासाठी भावुकपणाच्या भरात मी कोल्हापूरला जायचे ठरवले. संस्कृतचा अभ्यास सोडून देण्याच्या तिरमिरीत घेतलेल्या निर्णयाइतकाचा हा निर्णयही सगळे आयुष्य बदलून टाकणारा ठरला.

त्या काळी प्राध्यापकांचे पगार फार बेताबेताचे होते. म्हणून मी नोकरी सोडून प्रशासकीय सेवेत गेलो. संयुक्त राष्ट्रसंघात गेलो. हा सारा इतिहास बहुतेकांना माहीत आहेच. मधल्या काळात समाजवादी व्यवस्था होती. लायसन्स परमिटची व्यवस्था चालवायला प्रत्यक्ष पानाची गादी चालवण्याचा अनुभवही नसलेले प्राध्यापक अर्थतज्ज्ञ म्हणून मान्यता मिळवून गेले. खुल्या बाजारपेठेचे धोरण आल्यानंतर अर्थशास्त्राची पोपटपंची करणाऱ्या साऱ्या प्राध्यापकांचे धाबे दणाणले आहे. गेल्याच आठवड्यातला माझा अनुभव- मुंबईच्या एका कला आणि वाणिज्य महाविद्यालयात भाषण देण्याचा योग आला. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रदर्शनात शेतीसंबंधी संघटनापूर्व शेतकरीद्वेष्टी विचारसरणी आग्रहाने मांडली होती. शेतकरी विद्यार्थ्याला उद्देशून मी लिहिलेले एक पत्र खूप गाजले. त्याच आधाराने भाषण केले. कोणताही ग्रंथ सर्वप्रमाण मानू नका. कोणीही गुरू अनंतकाळ पुरणारा नाही. 'शेतकरी आईबापांच्या आयुष्यात सुखाचा एकही दिवस उजाडत नाही, असे कोणते पाप त्यांनी केले?' या प्रश्नाचे उत्तर देईल ती विद्या, बाकी



सर्व अविद्या.

[illegible] प्राध्यापक मंडळी गडबडून गेली, परीक्षेकरितातरी या पुस्तकांचा मान राखा म्हणू [illegible]. पुस्तकी विद्येविरुद्ध बंड उभे राहिले तर आपल्या नोकऱ्यांचे काय याची चिंता त्यांना पडली असावी. 'सरकार' ही संस्थाच दिवाळ्यात निघू लागल्यानंतर अर्थमंत्री होण्यातही कोणाला फारसे स्वारस्य राहिले नाही, हे उघड आहे.

माझा हल्ला पुरा नव्हता म्हणून की काय, दुसरे एक व्याख्यातेही उभे ठाकले. शेअर बाजारातील घडामोडी या विषयातील तज्ज्ञ म्हणून त्यांची प्रसिद्धी आहे. गुंतवणुकीसंबंधी सल्लागार म्हणून ते काम करतात. शिवाय, हर्षद मेहता, गुजराथमधील सहकारी बँका अशी घोटाळ्यांची प्रकरणे तयार झाली की चौकशीसाठी त्यांना आग्रहाने निमंत्रण जाते. थोडक्यात, गुंतवणूकक्षेत्रातील सर्व गुन्ह्यांचे चतुर डिटेक्टिव्ह 'धनंजय' अशी त्यांची प्रसिद्धी आहे. त्यांनीही आपल्या भाषणात आपल्या यशाचे श्रेय स्वत: पुस्तकांकडे केलेल्या दुर्लक्षाला दिले.

मग, प्राध्यापकवर्गात खूपच चुळबूळ सुरू झाली. अध्यापकांनी जगावे कसे? त्यांची पोटे भरावी कशी? समाजवादाच्या काळात महाविद्यालये निघत, ती सरकारी परमिटने; प्राध्यापकांचे पगार ठरत ते सरकारी समित्यांच्या अहवालांच्या शिफारशींप्रमाणे. अव्वाच्या सव्वा पगार वाढूनही प्राध्यापकांचे संप आणि आंदोलने चालूच आहेत. दिवस झपाट्याने बदलत आहेत. प्राध्यापक म्हणून नेमणूक होतानाच त्यांना खंडणी भरावी लागते. पगार पुरा क्वचितच् हातात ठेवला जातो. कला आणि वाणिज्य महाविद्यालयांची संख्या घटत आहे. महाविद्यालयेच बंद पडतील काय अशी धास्ती सर्वांनाच पडली आहे.

काही वर्षांपूर्वी डॉ. वि.म. दांडेकर यांनी शिक्षणाच्या खासगीकरणासंबंधी एक प्रस्ताव मांडला होता: 'महाविद्यालयांची आवश्यकता नाही. ज्या त्या प्राध्यापकाने आपापला स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करावा, जे विद्यार्थी येतील त्यांना शिकवावे, स्वसंतोषाने जी देतील ती गुरुदक्षिणा, देतील त्यांत संतोष मानावा.' अर्थात्, हा प्रस्ताव प्राध्यापकांना मान्य होण्याची काही शक्यता नव्हती. गुणवत्ता आणि फलनिष्पत्ती दाखवून मेहनताना स्वीकारणे हे पांढरपेशांच्या प्रकृतीस जमणारे नाही!

दांडेकरांची पद्धती स्वीकारली गेली असती तर अर्थशास्त्राचे फारच थोडे प्राध्यापक पोट भरू शकले असते. त्यांतील एक रिकार्डो. ॲडम स्मिथच्या बरोबरीने विद्वत्मान्य असलेल्या रिकॉर्डोचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लंडनच्या शेअर बाजाराचा अचूक अंदाज करून तो स्वत: पैसे गुंतवत असे. या उलाढालीत त्याने प्रचंड कमाई केली.

माझ्यावेळचे सिडनेहॅमचे प्राचार्य अत्यंत आदरणीय आणि व्यासंगी. अमेरिकेच्या अध्यक्षांनीही त्यांना सल्ला देण्यासाठी बोलावले होते. त्यांनी एकदा मुंबईच्या शेअर बाजारात पैसे गुंतवले आणि सगळे घालवले. अर्थशास्त्राच्या गुणवत्ता आणि फलनिष्पत्ती यांच्या आधाराने अमदनी करून देण्याचा एक चांगला मार्ग सोबतच्या व्याख्यात्यांमुळे मला सुचला. नोकरीला लागताना एक भांडवली रक्कम प्रत्येक अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाला द्यावी. पगारवाढ, बढती यांचा संबंध पोपटपंची, प्रबंध लिखाण, पुस्तके यांच्याशी नसावा. मुळात दिलेली भांडवली रक्कम बाजारात गुंतवून त्याच्यातून निघणाऱ्या उत्पन्नातून उपजीविका चालविणे कोणाही सच्च्या अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाला सहज शक्य व्हावे.

मोठ्या धारिष्ट्याने ही कल्पना मी सभेत मांडली. एक प्राध्यापिका म्हणाली, 'असे उत्पन्न मिळाले तर आम्ही नोकऱ्या सोडून देऊ.' बरोबरचे व्याख्याते म्हणाले, "'औषधावाचून खोकला गेला!''

ज्या ज्ञानसंपादनाच्या वैशिष्ट्यांमुळे मानवाने चराचर विश्वावर आपली अधिसत्ता स्थापन केली आहे, त्या ज्ञानाच्या प्राप्तीसाठी उभ्या राहिलेल्या शिक्षणक्षेत्राची होत असलेली घसरण आणि त्याबद्दल समाजाची अनास्था ही मोठी चिंतेची बाब आहे.

(शेतकरी संघटक, ६ व २१ सप्टेंबर २००३)

■■



# विद्या नामे अविद्येचा शिक्षक

सन १९५७ सालची गोष्ट. मी नुकतीच पदव्युत्तर परीक्षा पहिल्या क्रमांकाने पास झालो होतो. लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसायचे ठरले होते आणि त्या दिवसात परीक्षेला बसल्यानंतर उत्तीर्ण होणार नाही, हा विचारही मनाला शिवत नसे. निकाल लागेपर्यंत, वर्षभर तरी जाई, त्या काळात काही तरी करावे असे वाटत होते. थोडी फार, स्वत:पुरती का होईना कमाई करण्याची आवश्यकता होती.

त्या काळी मुंबई विद्यापीठात व्यापार विभागाच्या पदव्या अर्थशास्त्राच्या व्याख्यात्याच्या जागेकरिता अपुऱ्या समजल्या जात. मी बँकिंगचे सुवर्णपदक मिळवलेले. अर्थशास्त्रीय संख्याशास्त्र आणि गुणवत्ता नियोजन तसेच आंतरराष्ट्रीय नाणेव्यवस्था असे असाधारण विषय एकत्र केलेले होते. नदीखोरे योजनांवरील माझ्या प्रबंधास मुंबई विद्यापीठाचे पारितोषिक नुकतेच मिळाले होते, तेव्हा अर्थशास्त्राच्या व्याख्यात्याच्या जागेकरिता मी मुद्दाम अर्ज केला होता. त्याबरोबर संख्याशास्त्र आणि व्यापार या विभागातील जागांसाठीही केला होता.

महाविद्यालय सुरू व्हायच्या आधी आठच दिवस भणग्यांचा निरोप आला. त्या वेळी संपूर्ण महाराष्ट्रात व्यापार महाविद्यालये तीन. त्यातली दोन मुबईत, एक पुण्यात. आम्ही सिडनेहॅमचे विद्यार्थी बाकीच्या दोन्ही महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना तुच्छ मानायचो. भणगे कोल्हापुरला व्यापार महाविद्यालय निघत होते तेथे प्राचार्य झाले होते. तसे कोल्हापूरचे राजाराम कॉलेज जुने आणि गाजलेले. तेथील विधी महाविद्यालय फार जुने. आणखी एक कॉलेज होते, तरीही कोल्हापूरला व्यापार महाविद्यालय ही कल्पनासुद्धा मला हास्यास्पद वाटत होती. भणग्यांना तिथे यायला व्याख्याते मिळत नव्हते. मी आलो असतो तर नवीन कॉलेजची ख्याती बरी झाली असती.

माझा जीव खरे म्हणजे अर्थशास्त्राच्या व्याख्यात्याच्या जागेवर केवळ जिद्दीपोटी अडकला होता. भणगे म्हणाले, "तू कायम शिक्षणक्षेत्राततर राहणार नाहीस. मग तुला एवढी जिद्द करण्याचे काहीच कारण नाही.'' त्यांनी मला तीन वर्षांची पगारवाढ आधी देऊ केली. का कोणास ठाऊक मी त्यांचे म्हणणे मानले. भणग्यांच्या मैत्रीखातर? जादा पगारासाठी? कुणास ठाऊक.

या निर्णयाचा मला पुढे पश्चाताप झाला. महाविद्यालय सुरू झाल्यानंतर तीन दिवसांनी

मुंबई विद्यापीठातील तीनही व्याख्यात्यांच्या शासकीय सेवेतील जागांकरिता निवड झाल्याच्या तारा आल्या. शासकीय जागेकरिताची निवड माझ्यावर सोपविण्यात आली होती. पुन्हा एकदा भणग्यांना सोडून जाण्याचा मोह झाला. भणगे अगदी काकुळतीला आले. अधिकार स्नेहाचा होता. मग थोडा नैतिकतेचाही प्रश्न त्यांनी उठवला आणि मी कोल्हापूरलाच रहावयाचे ठरवले. लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसताना याचा मला प्रचंड त्रास झाला. नवे काम, नवी संस्था; सिडनेहॅममध्ये दोन-तीन तास घेऊन अभ्यासाला मोकळा झालो असतो; इथे क्षणाचीही फुरसद मिळेना. परीक्षा चालू झाली तरी मला रजा घेणे अशक्य, कोल्हापूरहून संध्याकाळच्या एस.टी.ने निघून पुण्यास यायचे. रात्रीची पॅसेंजर पकडून कुर्ल्याला उतरायचे. सकाळी ६ पर्यंत अंधेरीला मोठ्या भावाच्या घरी जायचे, आंघोळ वगैरे उरकून परीक्षाकेंद्रावर जायचे आणि परीक्षा झाल्याबरोबर बोरीबंदरला धावत जाऊन 'जनता' पकडायची आणि कोल्हापूरला पहाटे पोहचून पहिल्या व्याख्यानाला हजर रहायचे असे पाचही पेपरांसाठी करावे लागले. पेपर अगदी भिकार गेले. उत्तीर्ण होणे अशक्य असे मी मनातल्या मनात समजून चाललो होतो. स्नेहापोटी एक वर्ष गेले. वार्षिक परीक्षा संपल्या की पुण्याला यायचे. सहा महिने पुन्हा झटून अभ्यासाला लागायचे आणि पुढच्या परीक्षेला पुन्हा बसायचे असे मी निश्चित केले. पण नापास होणे ही गोष्ट फार कठीण आहे.

अशा थोड्या व्यस्त अवस्थेतच मी कोल्हापूरच्या पहिल्या काळात तरी होतो. मुंबईच्या सिडनेहॅम महाविद्यालयात आम्ही मराठी विद्यार्थी म्हणजे निव्वळ कचरा समजले जायचो. कान्ति पोद्दार, ढोलकिया ही आज उद्योगपती झालेली मंडळी त्यावेळी उद्योगपती-पुत्र होते. सन १९५१ मध्ये महाविद्यालयाच्या वार्षिक दिनी चिंतामणराव देशमुख आले होते. त्यांनी म्हटले, ''देशात गोळा होणाऱ्या आयकरापैकी २५ % आयकर सिडनेहॅम विद्यार्थ्यांच्या पालकांकडून जमा होतो.'' आठवड्यातील सहा दिवस नव्या गाड्या आणणारे, कॅंटीनमध्ये पोरींबरोबर आडवे-तिडवे पैसे उधळताना पाहून, अगदी बाळबोध मनालासुद्धा हेवा वाटणारे मला मिळणारे महिन्याचे पाच रूपये ४ दिवससुद्धा टिकत नसत. आताचे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ जगदीश भगवती त्यावेळी आमचा आदर्श होता. एस.एस.सी.ला बोर्डात पहिला आलेला. सकाळी मोटारगाडी त्याला कॉलेजमध्ये सोडायला यायची. हातात पुस्तकांचा गठ्ठा घेऊन तो मान थोडी कलती ठेवून वाचनालयात यायचा, व्याख्यानांचा काळ सोडल्यास मुक्काम संध्याकाळपर्यंत तेथेच. अभ्यासाची पुस्तके वाचायचा कंटाळा आला म्हणजे संस्कृतचे पुस्तक काढून



वाचायला लागायचा.

प्राध्यापकांबद्दलही असाच दबदबा. साहित्यिक म्हणून गाजलेले गंगाधर गाडगीळ अर्थशास्त्र शिकवायला तर कवि पु.शि. रेगे वाहतुकीचे अर्थशास्त्र शिकवायला. मराठवाडा विद्यापीठातील डॉ. बोरकर, डॉ. कान्ता रणदिवे, हरिभाऊ परांजपे ही मंडळी एकावेळी अध्यापक वर्गात होती. रणदिवेबाईंचे आम्हाला खूप कौतुक असे. जॉन रॉबिन्सन आणि चेंबरलेन यांच्या मूल्य विवेचनाचा गणिती भाग बाई तोंडातून शब्दांचा स्त्रोत चालू ठेवत डाव्या हातांनी फळ्यावर उतरवत असत.

पण खरे दैवत म्हणजे डॉ. एस.के. मुरंजन, सिडनेहॅमचे प्राचार्य. आंतरराष्ट्रीय नाणेतज्ञ म्हणून मान्यता मिळालेली, नुकतेच अमेरिकेहून परतलेले, मराठीत त्यांच्या नाणेव्यवस्थेवरील गाजलेली दोन पुस्तके नुकतीच प्रसिद्ध झाली होती. ही पुस्तके मराठीत लिहिल्याबद्दल तक्रार झाली. त्यांनी उत्तर दिले की, '' ज्यांना या विषयाचा इतका उच्च अभ्यास करायचा आहे. त्यांनी मराठी शिकायला काय हरकत आहे.'' बस्स. या एकाच उत्तरावर आम्ही लट्टू होतो. त्या एका वाक्याने पदोपदी मराठी माणसाचे दैन्य धुतले गेल्यासारखे वाटत होते. मुरंजनांनी आम्हाला बँकिंग काही शिकवल्याचे मला आठवत नाही. पण कांटशी ओळख त्यांनी करून दिली. ''I think, therefore, I am. '' या उक्तीतला सगळा उल्हास आणि आवेग मुरंजनांच्या चेहऱ्यावर अनुभवला. कोणी विद्यार्थी बेशिस्त वागला म्हणजे काही न बघता एका सहामाहीची फी दंड करण्याचा त्यांचा प्रघात असे. जिन्यावरून मुरंजन येत आहेत, हे कळले तरी आमची धावाधाव व्हायची. त्यांची एक 'चलती का नाम गाडी' होती. उद्योगपती पुत्र तिची खूप कुचेष्टा करायचे पण मुरंजनांनी गाडी असल्याशिवाय आयुष्य कसे व्यर्थ आहे, यावरच एक व्याख्यान दिले आणि त्याचा आम्हाला कुणालाच खेद झाला नाही.

सकाळी अंधेरीहून लोकलने मरिन लाईन्सपर्यंत यायचे आणि तेथून चालत बोरीबंदरला जायचे. आपण आपला आभ्यास. क्रिकेट नाशिकलाच सोडलेले. देशाविषयी, अर्थव्यवस्थेविषयी, समाजातील सर्व संस्थांविषयी आमच्या कल्पना सगळ्या पुस्तकी. धनवानांच जगाचे ज्ञान कितीतरी जास्त व्यापक होते. एकदा विद्यार्थ्यांच्या गटात काही चर्चा चालली होती, समाजातील भ्रष्टाचाराबद्दल. कोणीतरी मराठी मुलानेच मुद्दा मांडला. ''पण न्यायव्यवस्था तरी अजून स्वच्छ आहे. अशी माणसे आहेत तोपर्यंत काही आशा करायला जागा आहे.'' मला वाटते कान्ती पोद्दारनेच मुद्दा फटकारून टाकला, '' कोणाला काय पुरवायला लागते, मे मला विचारून घे.'' एका वाक्यात एक नवे विश्वरूपदर्शन झाले.

पण कोल्हापुरात आल्यावर आता मी धनवानांत जमा झालो होतो. त्याकाळी रु. २१० एकूण पगार म्हणजे वैभव होत. कोल्हापूरच्या सर्वोत्तम लॉजमध्ये शाकाहारी जेवणाला महिन्याला रु. ३० लागत होते. मांसाहारी जेवणाला रु. ३५. मी पद्मा गेस्ट हाऊसमध्ये उतरलो होतो. अजून रहावयाची जागा शोधत होतो. शेवटी वसतिगृहावर व्यवस्थापक म्हणून रहायला गेलो.

एका संध्याकाळी गेस्ट हाऊसवर जेवत असताना, वाढणाऱ्या मुलाने चाचरत मला विचारले, "सर, ओळखलं का मला?" मी वर पाहिले. मला खरोखरच ओळख पटली नाही. तेव्हा तोच म्हणाला, "सर, मी तुमच्या वर्गात विद्यार्थी आहे, खांडेकर माझे नांव."

महाविद्यालयातील विद्यार्थी, इथें गेस्ट हाऊसमध्ये वाढण्याचे काम करतो आहे. एकूण सर्व परिस्थितीची कल्पना येणं कठीण नव्हते. याच कोल्हापुरात माझे वडील अनाथ विद्यार्थी होते. जेवणाची इकडे तिकडे सोय लावून शिकले होते. मी माझी परीक्षा, माझे भविष्य, माझी स्वप्ने यांच्या पलीकडे असलेल्या एका जगाचा पडदा खांडेकरने उघडून दाखवला होता.

सन १९५७ साली फार आड खेड्यापाड्यांतली शेतकऱ्यांची मुलं महाविद्यालयांत यायला लागली नव्हती. त्यांची फीची जबाबदारी शासनाने घेतल्यानंतर त्यांची संख्या वाढली. तरी दोनतीन मुलांच्या पुस्तकांची फीची व्यवस्था करणे पडले तेवढ्यावरच सामाजिक कर्तव्याची बाजू भागली.

शिक्षणाचे माध्यम त्यावेळी इंग्रजी होते. भगण्यांचे इंग्रजी आणि मराठीवर सारखेच प्रभुत्व. ते वर्गात दोघांचे मिश्रण करीत. मला हे पटत नसे. मुंबईतही इंग्रजी वक्तृत्वाबद्दल माझी प्रसिद्धी होती. कोल्हापुरात त्याकाळी असे इंग्रजी दुर्मिळच होते. इतर कॉलेजांतले विद्यार्थीही केवळ इंग्रजी ऐकायला येऊन बसत असत. मोराने आपलाच पिसारा खुलवून नाचावे आणि त्यातच समाधान मानावे तसा हा प्रकार. अगदी जाहिरातशास्त्राच्या व्याख्यानातसुद्धा. साहित्य काव्यात्मक इंग्रजी व्याख्यान मी द्यायचो. पाच दहा विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दाद मिळे. बाकीचे सगळे, 'अजि म्यां ब्रह्म पाहिले' अशा आविर्भावात बसून रहात. याबद्दल कधी वाईट वाटले तर मी स्वत:ची तुलना माझ्या प्राध्यापकांशी करे. डॉ. मुरंजन, डॉ. रणदिवे कुठे आम्हाला समजले आहे किंवा नाही याचा विचार करीत होते? ते त्यांच्या वेगाने जात. आम्ही त्यांच्यामागे जीव मुठीत धरून धावायचो, दमछाक व्हायची पण हळू हळू दम वाढत गेला. स्वत:च झेप घेण्याची ताकद आली. मग या विद्यार्थ्यांनाच ते का जमणार नाही? आवश्य जमेल, आपण आपल्या



गतीनेच गेले पाहिजे. प्राध्यापक म्हणजे शाळकरी शिक्षक नव्हे.

त्यावेळी माझ्या लक्षात आले नव्हते की, माझ्याबरोबरचे विद्यार्थी आणि माझे विद्यार्थी यात महदंतर होते. आर्थिक चणचण असली तरी सिडनेहॅममधला विद्यार्थी जात्याच आणि संस्काराने सर्वांगपरिपूर्ण होता. त्याच्या अवयवांत दोष नव्हता. व्यायाम दिल्यास आणि खुराक मिळाल्यास तो बलभीम बनू शकत होता.

कोल्हापूरला माझ्यासमोर भक्तिभावाने ऐकणारे विद्यार्थी अपंग होते. एका अर्थाने मतिमंद होते. प्राध्यापकाला उड्डाण करताना पाहता पाहता पंख उभारून उडण्याचा प्रयत्न करण्याचेही सामर्थ्य त्यांच्यात नव्हते. पिढ्यान्‌पिढ्यांची गरिबी आणि निरक्षरता यांनी त्यांना सर्वार्थाने खच्ची केले होते. तसे ते शिक्षणासाठीही आलेले नव्हते. महाविद्यालयाचा परिस अंगाला लागला तर शेतीच्या खातेऱ्यातून सुटू या आशेने ते आलेले होते. महाविद्यालय, शिक्षण, प्राध्यापक ही त्यांच्या दृष्टीने प्रगतीची साधने नव्हती, अपरिहार्यपणे उल्लंघण्याचे अडथळे होते. आणि हे अडथळे ओलांडत खेड्याच्या जीवनातून जिवंत कसे सुटता येईल हे ते घाबऱ्या डोळ्यांनी निरखत होते.

आज नाही म्हटले तरी माझ्या भाषणांचा एक लौकिक आहे. अतिरिक्त मूल्य आणि भांडवल निर्मिती, आर्थिक विकासाच्या नैसर्गिक प्रक्रिया हे असले पदव्युत्तर विद्यार्थ्यांनाही जड वाटणारे विषय, बहुतांश अडाणी, निरक्षर शेतकऱ्यांच्या हजारोंच्या सभेत समजावून सांगतो; एकही इंग्रजी शब्द न वापरता, एकही बोजड शब्द न वापरता. शेतकऱ्यांच्या शब्दांत त्यांच्या उदाहरणाने, त्यांच्या रूपकांत. शेतकऱ्यांना ते समजते. त्याकरिता ते जीव ओवाळून टाकायला तयार होतात. हा एक चमत्कारच आहे. पण तसा समजायला कठीण नाही.

पुस्तकातली विद्या इकडे खरीदून तिकडे विकायच्या दलालीत प्रतिभा येणार कोठून? सगळा पदव्यांचा भार सोडून आंबेठाणच्या माझ्या कोरडवाहू शेतीत मी उभा राहिलो आणि आर्थिक विकासाच्या प्रश्नाचे उत्तर मलाच मनोमन मिळाले. म्हणून वाचा सरस्वती फुलली. विद्यानामे अविद्येचे ओझे टाकले तेव्हा मी खरा विद्यार्थी बनलो आणि शिक्षकही.

(शेतकरी संघटक, १० ऑक्टोबर १९८५ प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश भाग २ - प्रथमावृत्ती, डिसेंबर १९८५, या पुस्तकातून)

■■

# शंकरराव गेले

शंकरराव वाघ गेले. फुफ्फुसाचा असाध्य कॅन्सर झाल्याचे तीन महिन्यांपूर्वीच लक्षात आले होते. तीन महिन्यांपासून तसा दिवस मोजण्याचाच कार्यक्रम चालू होता. ७ ऑगस्ट १९९५ रोजी दुपारी ३.१५ वाजता शेवट आला. दुपारपर्यंत हिंडते फिरते असलेले शंकरराव एकदम निघून गेले. पावणेचार-चारच्या सुमारास पुण्याला मला बातमी कळली. हातातली सारी कामे सोडून चाकणला शंकररावांच्या घरी जायला निघालो. शवयात्रा घरातून निघून गेली होती. आम्ही पाठोपाठ चक्रेश्वराच्या स्मशानभूमीत पोचलो. गर्दी दूर करून दर्शनाला गेलो. शंकररावांचा चेहरा पाहिला तेव्हा पहिल्यांदा खरी जाणीव झाली, की शंकरराव आता कायमचे गेले.

चेहऱ्यावर इतक्या प्रदीर्घ आजारानंतरसुद्धा काहीच फरक दिसत नव्हता. त्यांच्या अंगावर मांस असलेले मी कधी पाहिलेलेच नाही. नुसती हाडे आणि कातडी आणि त्यांच्या आधाराने न मावणारी चेतना आणि शक्ती. माझ्या अठरा वर्षांच्या परिचयात त्यांचे वजन दहा ग्रॅमनेसुद्धा कधी वाढलेले पाहिले नव्हते. एका रतीभरानेही वजन कमी होण्याची काही शक्यताच नव्हती. शंकररावांची एक खास बढाई असायची. ते म्हणायचे, 'मी आणि हेलन, दोनच माणसं अशी, की ज्यांचे वजन कधी बदलत नाही.' अलीकडे दूरदर्शनवर हेलन दिसली. चांगल्यापैकी टुणटुणीत दिसली; शंकरराव मात्र शेवटपर्यंत तसेच राहिले.

समोर शंकरराव पहुडलेले, फुलांच्या आवरणाखाली. तेव्हा खात्री पटली, शंकरराव खरेच गेले. चाकणच्या, नाशिकच्या, निपाणीच्या-आणि चंडीगडच्या आंदोलनांत असे कित्येक प्रसंग आले; शंकरराव कुठे बेपत्ता, कुठे गेले कोणालाच माहीत नाही आणि मग एकदम अपेक्षा नसताना ते अवतारायचे. नाशिकच्या तुरुंगात असेच कधी मध्यरात्री प्रकट झाले. बल्लारीच्या तुरुंगात मुंबईच्या वार्ताहरांना घेऊन खोट्या नावाखाली, जेल अधिकाऱ्यांना गुंगारा देऊन आले. चंडीगडच्या तुरुंगात आतंकवाद्यांच्या वेढ्यात, तूप ओसंडून पाघळणारा ट्रॅक्टरभर शिरा घेऊन आले. पुण्याला बातमी ऐकली तेव्हा मनांत कोठेतरी असे भासत होते की, गेलेत म्हणजे काय एकदम कुठंतरी अवतीर्ण होतील. शंकररावांना उचलायला दोन माणसेसुद्धा पुरी झाली असती. सहा जणांनी उचलून त्यांना सरणाकडे नेले तेव्हा खाडकन जाणीव झाली शंकररावांच्या या जाण्याला परत येणे नाही.



शेतकरी संघटनेतील नवीन कार्यकर्त्यांना शंकरराव वाघ क्वचित पाहून, थोडेफार त्यांच्याविषयीच्या आख्यायिका ऐकून माहीत आहेत. दहा वर्षांपूर्वी शंकरराव साऱ्या हिंदुस्थानभरच्या शेतकरी आंदोलनाच्या केंद्रस्थानी होते. एवढीशी फाटकी मूर्ती, पांढरा शुभ्र परीट घडीचा पायजमा, तसाच झब्बा आणि कधी न चुकणारी गांधी टोपी; निम्मा, अधिक वेळ तोंडात विडी, डोक्यात एक विशेष जागेपण. शंकरराव झोपेने पेंगुळल्याचे मी कधी पाहिलेले नाही. सगळ्या धावपळीत आम्ही सारे थकून झोपलो तरी शंकरराव त्यांच्या धावपळीतच असणार. मी उठलो आहे आणि कामाला लागायला शंकरावांची तयारी नाही म्हणून खोटी झाली असे कधीच झाले नाही. सर्व जग झोपलेले असताना जागे राहणारे शंकरराव सगळे जग जागे असताना कधी झोपलेले मी पाहिले नाही. बोलायचे नाही म्हटले तर दिवसेंदिवस बोलायचे नाहीत. त्यांना न आवडणाऱ्या गोष्टी कोणी बोलत असेलच तर संयमाने ऐकून घेणार आणि मग एका अर्ध्या वाक्यात त्याला पार धोबीपछाड घालणार.

त्यांच्या फाटक्या मूर्तीला महाराष्ट्रात शंकरराव म्हणत, पंजाबी शंकरसिंग म्हणत, गुजराथी खेडुतांचे ते शंकरभाई होते, दक्षिणेत शकरअप्पा, चंडीगडच्या साऱ्या आंदोलनात ते 'सँकर टायगर' म्हणून मशहूर होते.

अठ्ठ्याहत्तर एकोणऐंशीचा काळ, आंबेठाणच्या शेतीत वर्षादोनवर्षांच्या अनुभवाने धुके एकदम दूर व्हावे आणि विश्वरूप दर्शनाची सुरवात व्हावी तसा. शेतीमालाच्या रास्त भावाचे अर्थशास्त्र उलगडू लागले होते. आपल्या डोळ्यांना इतकी स्पष्ट दिसणारी गोष्ट बाकीच्यांना कशी समजत नाही? आपलेच तर काही चुकत नाही ना? अशीही शंका मनाला डाचून जाई. जिथे जिथे जमेल त्या त्या गावी जाऊन जास्तीत जास्त शेतकरी जनांपुढे आपल्याला आकळलेले ब्रह्मज्ञान मांडावे आणि त्यांच्या चेहऱ्यावर काही प्रतिक्रियातरी दिसते आहे का हे पहावे ही आमची धडपड. भामनहर खोऱ्यातील चोवीस गावांत त्यांना जोडणारी सडक पक्की करण्याचा विषय घेऊन जायचो आणि भाताच्या रास्त भावाचे आणि कांद्याच्या समस्येचे सूतोवाच करायचो. मी परदेशातून आलेला. स्वित्झर्लंडच्या राहणीमानाने आलेले तेज अजून न उतरलेला. शेतकरी मला पाहून गोंधळून जात. एका निवडणुकीच्या निमित्ताने शंकरराव वाघ आणि बाबूलाल परदेशी यांची ओळख झाली. लहान पोरांनी दिवाळीत लहान लहान किल्ले बांधावेत आणि लुटूपुटूच्या लढाया खेळाव्यात तसा खरा प्रकार. पाच पिढ्यांत शेतीशी संबंध नसलेला, शेतकऱ्यांच्या वैरी जातीत जन्मलेला, तपभरतरी मराठीचा स्पर्श नसलेला मी; कसाबसा पदवीधर, शिक्षकीचा

थोडा अनुभव, कीर्तनकार म्हणून थोडे नाव आणि सदा समाजवादी चळवळीच्या जवळ असलेला बाबूलाल परदेशी, त्याने काही वेगळ्याच हेतूने 'वारकरी' नावाचे साप्ताहिक सुरू करण्यासाठी नोंदणी करून ठवेली होती. त्याच नावाशी आंदोलनाचा अकटोविकट बादरायणी संबंध जोडून 'वारकरी' साप्ताहिक सुरू झाले, ९ ऑगस्ट १९७९ रोजी. शंकरराव चाकणचे जुने रहिवासी. घर धार्मिकतेकरिता प्रसिद्ध. अगदीच काही अनामिक नाही. काही काळ चाकणचे सरपंच राहिलेले, राष्ट्र सेवा दल आणि डाव्यांच्या चळवळीच्या बांधावर राहून मदत केलेले. शेतीपोटी भरड जमीन. म्हणून दुकानदारी, व्यापार, ट्रक वाहतूक, मुंबई-पुण्याची अडत, इतर काही व्यवसाय अशा खटाटोपी केलेला. काय दैवाच्या गाठी होत्या कुणास ठाऊक ? मी जायचे, तिथे त्यांनी दोघांनीही यायचे असा सुरवातीच्या काळातला नियम.

बाबूलाल पट्टीचा वक्ता, मोठा बहुश्रुत. माझ्याबरोबर येण्याच्या कष्टांची बाबूलालच्या बाबतीत काही तरी भरपाई होती. शंकररावांच्या बाबतीत तीही नाही. चुकून कधी व्यासपीठावर शंकरराव पाऊल टाकायचे नाहीत. पुष्कळ वर्षांनी कार्यकर्त्यांच्या एका बैठकीत त्यांनी बोलायचा प्रयत्न केला; पण माईकचं आणि शंकररावाचं कधी जमलं नाही. खासगी बैठकीत म्हणजे सगळेजण बसलेले असताना जिभेवर अफाट अनुभवाची, परखड मतांची सरस्वती नाचवणारे शंकरराव सभेत अगदी 'मौनीबाबा'.

माझ्या प्रेमापोटी शंकररव संघटनेत आले. या कामातली माझी तळमळ आणि उत्साह निरर्थक आहे अशी त्यांची मनोमन खात्री असावी; पण 'बाबा काहीतरी धडपतोय ना, मग त्याला साथ द्यावी.' त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर ''तुम्ही फक्त 'की' म्हणा आम्ही 'जय' म्हणायला आहोतच.'' शेतकरी भोळा असतो, गरीब नाडला जात आहे, त्याच्या गुलामीतून सुटण्याकरिता तो नांगर टाकून तलवार हाती घेईल ही माझी सारी खुळचट स्वप्ने आहेत ही शंकरावांची धारणा. अगदी चाकणच्या आंदोलनापासून ते मला बजावीत, ''तुम्ही कांद्याच्या भावाविषयी बोलता म्हणून हे लुच्चे येतात; तुरुंगात जायची वेळ आली, की हे कोणी तहान लागली म्हणून, कोणी लघवीसाठी, कोणी कशासाठी असे काढते पाय घेतील.'' अशी त्यांची खात्री.

आणि तरीही कोणताही कार्यक्रम निघाला, की सांगितल्या वेळी सांगितल्या जागी शंकरराव हजर. त्यांच्या घरची परिस्थिती बिकट. शंकरराव कर्ता कारभारी माणूस. मुले लहान लहान. त्यांच्या गैरहजेरीत कुटुंबातील लोकांची चांगलीच दैना होत असणार; पण या सगळ्यांचा शंकररावांनी कधी अवाक्षरानेही उल्लेख केला नाही.



त्यांच्या कोणत्यातरी व्यवसायाच्या निमित्ताने साखर कारखानदारांशी त्यांची घसट झालेली. नाशिकच्या आंदोलनात सर्व काळ शंकरराव माझ्याबरोबर होते. माधवराव मोरे, प्रल्हाद पाटील कराड सारे कसलेले जाणकार; पण शंकरराव शाब्दिक चकमकीत कधी कमी पडले नाही. 'ऊसवाले आणि कारखानदार म्हणजे सारे कुऱ्हाडीचे दांडे, गोतास काळ' हे त्यांनी सरळ मांडले. 'साखर कारखानदार म्हणजे एकाहून एक माजलेले पोळ, एकास एक बिलंदर. महाराष्ट्राचे राजकारण खेळणारी इरसाल माणसं', ही शंकररावांची टिप्पणी. आग्रा रोडवरील रास्ता रोकोत सरकारी अधिकारी ट्रक ड्रायव्हरांशी संगनमत करून माझ्या जिवावर उठण्याचा खेळ खेळताहेत हे हेरण्याचा चाक्षाणपणा शंकररावांचाच. मी तुरुंगात उपोषण करत असताना माझ्या बायकोबरोबर रात्री मध्यरात्री गावोगाव फिरून शेतकऱ्यांना 'तुमचा बाप उपास करतो आहे, तुम्ही काय भाकऱ्या मोडत बसलात?' असे बजावणारेही शंकररावच.

शंकररावांना आदर किंवा धाक वाटेल इतका मोठा माणूस जन्माला आलाच नाही. त्यांनी मोठेपणाचा कधी हव्यास धरला नाही. माझी एका अर्थाने सावली होण्यात समाधान मानले; पण सर्वकाळ डोळे उघडे, मेंदूतील चाके अविरतपणे चालणारी, विरोधातील कोण कसा आंदोलनात आलेला, कोण हौशा, कोण नवशा, कोण गवशा यावर शंकररावांची टिप्पणी मोठी ऐकण्यासारखी असे. माणसांचा त्यांचा अंदाज मोठा अचूक. सभा चालू असताना दौऱ्याच्या काळात त्यांचे काही विचित्रच उद्योग चालत. सभेच्या मागच्या बाजूला उभे राहून एखादे सोईस्कर सावज हेरून त्यांना 'काय येडे झाले का तुम्ही? या बामणाचे ऐकता?' किंवा 'याला काय शेतीतलं समजतं' अशा तऱ्हेने भडकावून देऊन लोकांची प्रतिक्रिया अजमावून पाहण्याचा त्यांचा धंदा. शंकर धोंडगेसुद्धा शंकरराव वाघांच्या या चाळ्यांना बळी पडले आणि माझ्याकडे तक्रार करू लागले, 'तुमच्या अगदी जवळच्या माणसांतदेखील संघटनेविरुद्ध उघड बोलणारी माणसं आहेत.'

निपाणी आंदोलनाच्या शेवटच्या काळात, भाई धारियांना पोलिसांनी लाठीचा खूप प्रसाद दिला, 'शरद जोशींना यांनीच निपाणीला आणले.' हा त्यांचा राग व्यक्त करीत. भाईंनी ही गोष्ट नंतर सांगितली. मी म्हटले, 'तुम्हाला मी आंदोलनात आणले अशी माझी कल्पना. तुम्ही मला आणले हे माहीत नव्हते.' भाई रहस्यपूर्ण हसले. शंकरराव म्हणाले, 'आम्हाला कोणी आणले नाही आणि आम्हीही कोणाला आणत नाही. आम्ही फक्त नदीच्या काठी टोपली ठेवून बसतो, गळसुद्धा टाकत नाही. मासे आपण होऊनच टोपलीत येऊन पडतात आणि आम्हीच कोळ्याला धरले अशी फुशारकी मारतात !'

एका राजकीय पक्षाच्या पुढाऱ्याला संघटनेत राहवतही नव्हते आणि ती सोडवतही नव्हते. त्यावर शंकररावांचे लाडके भाष्य 'माकडा हाती फुटाणे!' फुटाणे सोडवत नाहीत आणि मूठ सोडल्याशिवाय हात मडक्यातून निघत नाही!

शंकरराव त्यांच्या आवडीची एक आठवण अनेकदा सांगत. यशवंतराव चव्हाण गृहमंत्री असतानाची गोष्ट. पुण्याच्या सर्किट हाऊसवर त्यांचे जेवण झाले आणि मग लोकांच्या भेटीगाठी सुरू झाल्या. जेवणातील कोंबडीचा एक धागा यशवंतरावांच्या दातात अडकून त्यांना मोठा बेचैन करत होता. वारंवार त्यांची जीभ तिकडे वळत होती. शंकररावांनी परिस्थिती अचूक हेरली आणि खिशातून दातकोरणे काढून यशवंतरावांना सादर केले. त्यांचा चेहरा एकदम उजळून गेला. शंकररावांचा खिसा ही एक जादूगाराची पोतडीच होती. विडी, माचीस या त्यांच्या गरजा. त्याखेरीज कुणाला लागली तर लवंग, सुपारी, कुणाचे डोके दुखु लागले तर ॲस्प्रिन, कुणाच्या घरात लहान मूल असेल तर त्याच्यासाठी निदान लिमलेटची गोळी, टोपीत कोठे तरी टाचणी, सुईदोरा, मला बऱ्याच दिवसांनी भेटत असले तर खाऱ्या शेंगदाण्याची एखादी पुरचुंडी. असं सारं म्युझियम त्यांच्या इवल्याशा खिशात कायम हजर.

सगळ्या जगाकडे अनादराने आणि धुत्काराने पाहण्याची शंकररावांची ताकद मोठी अजब. त्या काळी मी समाजवाद्यांविरुद्ध उघड बोलत नसे; पण 'समाजवादी' हा शंकररावांचा खास चेष्टेचा विषय. 'प्राथमिक शिक्षिका असलेल्या बायकोकडून दहा रुपयांची खर्ची मिळवून, सामाजिक परिवर्तनासाठी बाहेर पडलेले' ही त्यांची टिप्पणी.

पत्रकार आंदोलन समजून घेत नाहीत, शेतीमालाच्या भावाचे अर्थशास्त्र त्यांना कळलेले नाही याचा आम्हाला मोठा उद्वेग वाटायचा. गोविंद तळवलकर आपल्याविरुद्ध लिहितात यात चिंता करण्यासारखे काही नाही. 'ज्या दिवशी महाराष्ट्र टाईम्स् आपल्या बाजूने लिहील त्या दिवशी आपले काहीतरी चुकते आहे की काय ते तपासून बघा' अशी माझी मल्लिनाथी. शंकरराव असली मखलाशी करत नसत. त्यांचा आपला एक लोहाराचा टोला, 'पत्रकारांना तुम्ही एवढे मानता का? ते काय चित्रगुप्त आहेत का स्वर्गातून उतरले आहेत? एस.टी. मध्ये कंडक्टरची नोकरी मिळाली नाही, ते पेपरात चिकटले. त्यांना काय एवढे महत्त्व द्यायचे?'

संघटनेच्या कामांत अनेक माणसे आली; कोणी वकील, कोणी डॉक्टर. आमचा कामाचा खाक्या मोठा विचित्र. दिल्लीच्या प्लॅटफॉर्मवर वर्तमानपत्राचा कागद अंथरून आम्ही झोपणार. अंबाल्याच्या बस स्टेशनवर पथारी टाकणार. बसच्या टपावर बसून



यात्रा करणार. जेवायची सोय म्हणजे मुरमुरे आणि शेंगदाणे. या मोठ्या लोकांना फार जड वाटायचे. त्यांची हयगय दिसली, की शंकररावांना तोंडाचा फटका द्यायची चांगली संधीच. त्यांनी कुचेष्टा चालू केली, की 'भीक नको, कुत्रा आवर' म्हणून भलेभले चूप व्हायचे.

संघटनेच्या आधी अनेक आंदोलनांशी शंकररावांचा संबंध आला. पण, तुरुंगात जाणे हे त्यांना न आवडणारे काम. त्यांना दोन खास सवलती होत्या. 'बहिर्जी नाईकी' करण्याकरिता पाहिजे तेव्हा बिल्ला न लावण्याची मुभा आणि तुरुंगाच्या बाहेर राहण्याची कामगिरी. आंदोलकांना तुरुंगात राहणे ही सगळ्यात आरामाची सुखावह गोष्ट. तुरुंगाच्या बाहेर राहणाऱ्यांना श्वास घ्यायची उसंत मिळत नाही. सतत धावपळ. पत्रकारांना भेट, वकिलांशी संपर्क साध, कार्यकर्त्यांना सूचना दे, तुरुंगातील लोकांना लागणाऱ्या तंबाखू, विड्या पोचवा, त्यांच्या कुटुंबियांना निरोप द्या. हा सगळा कामाचा बोजा शंकररावांनी प्रामुख्याने उचलला.

ऑपरेशन ब्ल्यू स्टारनंतर पंजाबमधली परिस्थिती मोठी रौद्र आणि विचित्र झाली होती. मार्च ८४ च्या पंजाबच्या राजभवनाच्या घेराओच्या कार्यक्रमात खांद्याला खांदा लावून लढलेले पंजाबी शेतकरी आता शिखांवर काय भयानक अत्याचार चालू आहेत याची काहीशी अतिरंजित, रक्त तापवणारी वर्णनं करत होते. शेतकरी आंदोलन वाचवायचे असेल तर स्वस्थ बसून चालणार नाही. काहीतरी आंदोलनाचा कार्यक्रम घेतला पाहिजे असे ठरले. सत्याग्रह चालू करून भारतीय किसान युनियनच्या हजारो शेतकऱ्यांना तुरुंगात घेऊन जाणे आणि त्यांच्या सत्याग्रहाला साऱ्या देशभरातील शेतकऱ्यांनी सक्रिय पाठिंबा देणे असा कार्यक्रम ठरला. त्यामुळे पंजाबातील शेतकऱ्यांना आपण एकाकी नाही, देशातील वेगवेगळ्या राज्यांतील वेगवेगळ्या धर्मांचे, वेगवेगळ्या जातींचे शेतकरी आपल्याबरोबर आहेत असा विश्वास वाटेल अशी कल्पना. जुलै ८४ मध्ये सत्याग्रह सुरू झाला. आम्ही सगळ्यांनी तुरुंगात जायचे, शंकररावांनी मात्र छातीला बिल्लासुद्धा न लावता बाहेर राहायचे. पंजाबमधील सत्याग्रहाला पुरेसा प्रतिसाद मिळतो आहे असे दिसले, की महाराष्ट्रात आंदोलन घडवून आणण्यासाठी निरोप द्यायचा असे ठरले. हजारएक सरदार शेतकऱ्यांबरोबर आम्ही महाराष्ट्रातील दहा जण चंडीगड जेलमध्ये गेलो आणि चार दिवसांत महाराष्ट्रात शेतकरी संघटनेचे आंदोलन सुरू झाल्याची बातमी वर्तमानपत्रांत वाचायला मिळाली. हे एवढे चटकन घडले कसे? त्या वेळी चंडीगडहून बाहेर निरोप पाठवणेसुद्धा जवळजवळ अशक्य होते. शंकररावांनी चंडीगडमधील एका फळविक्रेत्याकडून पुणे

मंडईतील एका अडत्याला तार पाठवली होती: 'सफरचंदे पाठवू नयेत.' पुण्यातील अडत्यांनी रामचंद्र बापू आणि भास्करभाऊंना तो सांकेतिक निरोप कळवला. त्यांना अर्थ समजला आणि लगेच आंदोलनाची घोषणा झाली. सांकेतिक संदेशाची ही व्यवस्था मी घालून दिलेली नव्हती, ही सारी शंकररावांची दूरदृष्टी, कल्पनाशक्ती.

कॉलेजचे तोंड न पाहिलेले शंकरराव राम जेठमलानींना आमची केस कशी समजावून सांगत कोण जाणे? चंडीगडच्या उच्च न्यायालयात भालसिंग मलिक म्हणजे मोठे मशहूर वकील. संघटनेवर त्यांचे मोठे प्रेम. आपल्या युक्तिवादाने आणि भाषणाने भल्याभल्या न्यायाधीशांना आणि प्रतिपक्षाच्या वकिलांना चकित करणारे भालसिंग शंकररावांसमोर हात जोडून ''शंकररावजी, तुम्ही फक्त हुकूम द्या, अंमल करण्याचे काम आमचे,'' असे म्हणताना मी ऐकले आहे. चंडीगडच्या इस्पितळात तीन आठवडे माझ्याबरोबर शंकरराव होते. हिंदुस्थानातील श्रेष्ठ श्रेष्ठ तज्ज्ञ डॉक्टरांचा तेथे गड्डा होता;. पण त्या सगळ्यांना शंकरराव मोठ्या थाटात हुकूम सोडत असत.

कांद्याचे आंदोलन मागे पडू लागले, तसे मी त्यांना शेवटी म्हटले, 'आता बाहेर काहीच काम नाही, चला तुरुंगात आराम करू, ' तेव्हा फक्त एकदाच शंकरराव आमच्याबरोबर औरंगाबादच्या हर्सूल तुरुंगात दहा दिवस आले. नाहीतर त्यांची कामगिरी 'डुबाव', कोणाच्या नजरेस न येणारी; गाजावाजा न होणारी, पण अत्यंत मोलाची.

चाकण म्हणजे 'मावळांचे प्रवेशद्वार.' तीनशे वर्षांपूर्वी जगाच्या दृष्टीने नगण्य असलेल्या मावळ्यांनी तेथे इतिहास घडवला. स्वराज्याची लढाई झाली नसती तर कितीक तानाजी, बाजीप्रभू, येसाजी आणि सावळ्या तांडेल जगाला अज्ञात राहिले असते. शेतकरी आंदोलन झाले नसते तर शंकरावांची विलक्षण बुद्धी, परखड मते, कोणाचा मुलाहिजा न ठेवता तोंडावर बोलण्याचा निर्भीडपणा, घरच्या साऱ्या अडचणी दूर ठेवून कोंडाण्याच्या लग्नाला पुढे जाण्याची तत्परता, निष्ठा सगळे समुद्राच्या तळातल्या रत्नाप्रमाणे अज्ञात राहिले असते.

पुढे, शंकररावांच्या घरच्या अडचणी वाढल्या. आंदोलनाचे स्वरूप बदलले, आवाका वाढला, शंकरराव स्थानिक संघटनेच्या कामापुरते राहिले; पण कुठे मोठी सभा असली, अधिवेशन असले, कार्यकारिणी असली, की अनंत अडणी दूर करून शंकरराव येणार, आपल्या धन्याच्या समाधीपुढे मूकपणे येऊन बसणाऱ्या 'खंड्या'सारखे बसणार. संघटनेच्या कार्यक्रमाविषयी एक अक्षर बोलणार नाहीत. पसंती दाखवणार नाहीत, नापसंती नाही. संघटनेने 'की' म्हटले की 'जय' म्हणण्याचे आपले काम. मी पुन्हा कधी



हाक मरली आणि आपण हजर नव्हतो असे होता कामा नये ही त्यांची तहान.

माझ्या आजारपणात इस्पितळात असताना शंकररावांना असाध्य कॅन्सर झाल्याची बातमी कळली. काही दिवसांचाच प्रश्न आहे हेही स्पष्ट झाले. इस्पितळातून बाहेर पडल्यावर मी त्यांना भेटायला गेलो आणि ऐंशी सालच्या गप्पाटप्पांच्या थाटांत म्हणालो, 'शंकरराव मला सोडून पुढे चालले काय?' जणू काही झालेलेच नाही अशा अविर्भावात शंकरराव म्हणाले, ''छ्यॅ, छ्यॅ, आपण कुठे जात नाही.' पंधरा वर्षांपूर्वी त्यांनी असे बोलल्यानंतर बिडी काढून शिलगावली असती, आता ते शक्य नव्हते. बिडीही ओढायची नाही आणि सध्या संघटनेचे काही निकडीचे काम लवकर निघायची शक्यता नाही हे हेरून शंकराव गेलेले दिसतात. त्यांची ओळख झाली ते पूर्वजन्मीचा ऋणानुबंध असल्यासारखी. पुढच्या कोणत्या तयारीसाठी शंकरराव निघून गेले, कळायला आज काहीच साधन नाही.

(शेतकरी संघटक, २१ ऑगस्ट १९९५)

■■

# अफाट बाबूलाल

शेतकरी संघटनेच्या पहिल्या पिढीच्या कार्यकर्त्यांना बाबूलाल परदेशी यांची ओळख होती. त्यांच्याविषयी अनेक आख्यायिका ऐकून माहीत होत्या. संघटनेतील दुसऱ्या आणि अगदी अलीकडच्या तिसऱ्या पिढीला बाबूलाल ही व्यक्ती म्हणा, प्रकरण म्हणा फारसे माहीत नाही. बाबूलाल परदेशी २३ मे २००४ रोजी पहाटे त्यांच्या चिमुकल्या परिवाराला आणि संघटनेच्या मोठ्या कुटुंबाला सोडून गेला.

गेली कित्येक वर्षे बाबुलालची भेट व्हायची ती कोणत्या ना कोणत्या इस्पितळात. तो अगदी जिवावरच्या दुखण्याने आजारी असायचा आणि आता जगतो का नाही या चिंतेने त्याची बायको, भाऊ आणखी एखादा कुटुंबीय डोळ्यातील पाणी आवरत दरवाजापाशी उभे असायचे.

हा माणूसच तसा अफाट. अफाट माणसांचा आजार मधुमेह त्याला लहान वयातच जडला. अफाट माणसे जेवण्याखाण्याची शिस्त थोडीच बाळगणार! 'हल्ली लघवीतून मुंगळे जातात हो', हा नंतर अनेकवेळा ऐकलेला विनोद, मी पहिल्यांदा बाबूलालच्या तोंडी ऐकला. काही वर्षांपूर्वी काही जखमेचे निमित्त झाले आणि मोठ्या आतड्याच्या टोकाचा भाग शस्त्रक्रिया करून काढून टाकावा लागला. जिवावरचे दुखणे. डॉक्टरांनी आशा सोडलेली; पण मी भेटायला गेलो तरी एवढ्या सगळ्या दुखण्यातून डोळ्यातून लकाकणाऱ्या विनोदाचा झोत सोडत, त्याचे हसणे आणि विनोद करणे चालूच असायचे. मी एकदा त्याला म्हटले, ''तुझे वागणे पाहून स्वित्झर्लंडमध्ये ऐकलेल्या एका लोककथेची आठवण येते. तिथल्या एक कँटनचे लोक मोठे-विनोदी आणि सतत हसणारे म्हणून काहीसे कुप्रसिद्धच आहेत. या कँटनमधला एक सैनिक जुन्या काळी लढाईवर गेला. धुमश्चक्रीत एक बाण त्याच्या आरपार जाऊन झाडाच्या खोडात रुतला. युद्ध संपले, दोन्ही सैन्ये निघून गेली. हा बहाद्दर आपला झाडाला अडकलेलाच. नंतर दुसऱ्या दिवशी तेथे आलेल्या सेनापतीला हा सापडला. त्याची सुटका केल्यावर सेनापतीने विचारले, ''किती वेदना सहन केल्यास. फार दुखत असेल नाही?'' सैनिकाने उत्तर दिले, ''फारसे नाही, पण हसताना मात्र असह्य वेदना व्हायच्या.''

बाबूलालचे हे असे होते. तो जन्मभर जगाला हसवून गेला; पण त्याचा शेवट मात्र कर्मविपाकाच्या सिद्धांताविषयी जबरदस्त संशय यावा अशा पद्धतीने झाला.



शेवटी शेवटी संघटनेचे काम सोडून बाबूलालने चाकण जवळच्या एका कारखान्याला मजूर पुरवण्याचे कंत्राट घेतले. व्यवसाय फायद्याचा, बाबूलालच्या घरची व्यवसायाची परिस्थिती झपाट्याने सुधारली. संघटनेच्या कामाच्या काळात पार टोकाला गेलेली ओढग्रस्त त्याने संपवून टाकली. स्वत:चे घर बांधले. भाड्याने देण्याकरिता काही खोल्या बांधल्या. एक मंगल कार्यालयही बांधायला सुरवात केली आणि त्याच्या भाग्याला दृष्ट लागली. कारखान्यातील वादावादीमुळे बहुधा असावे, कोणीतरी त्याच्यावर राग काढला. एक दिवस त्याच्या स्कूटरजवळ बाबूलाल जखमी आणि बेशुद्ध अवस्थेत सापडला. लोकांनी त्याला आणून कँपातील रुबी हॉलमध्ये दाखल केले.

या काळात मीही एका इस्पितळातून दुसऱ्या इस्पितळात जात होतो. शेजारच्या इस्पितळात मी होतो. बाबूलालला अत्यवस्थ अवस्थेत इस्पितळात ठेवले आहे, तो बेशुद्धीत आहे, मेंदूला मार लागला आहे असे कळले होते. इस्पितळातून सुटल्यावर मी त्याला भेटायला गेलो. अजूनही तो शुद्धीवर आलाच नव्हता; पण क्वचित हातपाय हलवू लागला होता. आता या जुन्या सहकाऱ्याची ही शेवटचीच भेट असे मनोमन म्हणून बाबूलालला नमस्कार करून मी निघालो. दिल्लीला परतलो. परत आंबेठाणला आलो तेव्हा कळले की, आता बाबूलाल पुष्कळसा ठीक झाला आहे. नीट बोलता येत नाही. स्मरणशक्ती घटली; पण निदान चालतो, बोलतो.

पुन्हा त्याला घरी भेटायला गेलो. चारचौघांच्या नजरेत त्याच्यात काहीच दोष दिसला नसता. तो बोलण्याचा मोठ्या आकांताने प्रयत्न करी आणि एकेकाळचा हा शब्दांचा राजा, त्याला नेमका शब्दच आठवत नसे. शेवटी शब्द सापडला नाही तर कोणत्याही शब्दाऐवजी तो 'बॉल' म्हणे. जन्मात कधी बॉलने न खेळलेल्या बाबूलालच्या मनाच्या आतल्या कप्प्यात कोणती खिडकी खोलून हा बॉल घुसला होता कोण जाणे!

आजारपणाच्या आधी विनोदी आणि कोटीबाज भाषणांच्या खळखळाटात सगळ्यांना डुबवणारा असा शब्दांनीच पाठीत सुरा खुपसून बेजार केलेला माझा एक मित्र मी पूर्वी पाहिला होता. अशा प्रसंगाशी ही दुसरी गाठभेट. पहिला मित्र विद्वान, जुना प्राध्यापक, महाराष्ट्राच्या अर्थकारणावरचा मान्यवर अधिकारी. वाचा साथ देत नाही तरी त्याच्या मनाचा तोल सुटलेला नव्हता. पक्षाघातामुळे ओठ साथ देत नाहीत, जीभ वळत नाही अशाही अवस्थेत तो मित्र मोठ्या संयतपणे निरर्थक आवाज काढे. ते पाहून मी हादरलो होतो. बाबूलालचे तसे नव्हते. जीभ चालायची तेव्हा तो सारा जीव ओतून बोले आणि बोलत राही. वाचा खचल्यावर पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे तो जीवाच्याआकांताने

बोलण्याचा प्रयत्न करी. हे असे दोनतीन वर्षे चालले.

मग अलीकडे कळले, की बाबूलाल पुन्हा इस्पितळात आहे. त्याची दोन्ही मूत्रपिंडे निकामी झाली आहेत. डायलिसीसवर आहे. पिंपरी-चिंचवडच्या इस्पितळातून त्याला घरी परत आणले. एव्हाना पुन्हा घरी पैशाची ओढग्रस्त चालू झालेली. डॉक्टरांनी सल्ला दिला, की 'इस्पितळात राहण्यात काही अर्थ नाही. खर्च मोठा होईल. घरी घेऊन जा. आठवड्यातून दोनदा इस्पितळात डायलिसीससाठी घेऊन या.'

पुन्हा एकदा घरी भेटायला गेलो. आता बाबूलालला धड चालताही येत नव्हते. त्याची बायको सुषमा त्याला सांभाळत सांभाळत रस्त्यापर्यंत पायी, मग रिक्षाने बसपर्यंत, बसने चिंचवड आणि तेथून इस्पितळात पायी घेऊन जाई. डायलिसीस करून घेई आणि त्याच मार्गाने परत-ज्याच्या बऱ्या होण्याची फारशी आशा नाही अशा नवऱ्याला सांभाळत- घरी घेऊन जाई. मला आलेले पाहिल्यावर सुषमा कोसळलीच. आवरून धरलेले सारे आसू पाटाने वाहू लागले. मोठी धीरोदात्त बाई! आधुनिक युगातील सावित्रीच म्हणावी; पण कलियुगातील सावित्रीलादेखील पतीचे प्राण परत मिळत नाहीत.

बाबूलालइतकेच सुषमाविषयीदेखील लिहिण्यासारखे आहे. बाबूलालच्या आणि माझ्या सहवासाच्या त्रोटक इतिहासात तिचा वारंवार उल्लेख येणार आहे. आता बाबूलालला भान नव्हते. तो चिडचिड करी. जो दिसे त्याच्यावर ओरडे, शिव्या घाली. सगळ्या रागाचा सगळ्यात मोठा बळी म्हणजे सुषमाच. ती वैतागून गेली होती. "साहेब, आता माझ्याच्याने नाही सोसवत. असे वाटते जीव द्यावा; पण दोन मुले आहेत. त्यांत एक मुलगी. म्हणून तोही धीर होत नाही."

शेतकरी संघटनेच्या अनेक संबंधितांनी प्रयत्न केले. अगदी आरोग्यमंत्र्यांपर्यंत जाऊन डायलिसीसच्या खर्चात सूट मिळवली. अपुऱ्या राहिलेल्या मंगल कार्यालयाच्या बांधकामाकरिता घेतलेल्या कर्जाचे भाकड ओझे झाले होते. त्याची थोडीफार सोय कोणी मिळवून दिली. पण, ज्याचे त्याचे दु:ख ज्याने त्यानेच झेलायचे असते.

काही दिवसांपूर्वी कळले, की आता डायलिसीसमध्येही काही अर्थ नसल्याने तो उपचारही बंद पडला आहे. बाबूलालला घरी ठेवले आहे, पण उपचार सगळे संपलेच आहेत.

शेवटच्या अंकाला सुरवात झाली. बाबूलालचे खाणेपिणेच बंद झाले. काहीही पोटात गेले, की पोट ढळे किंवा उलटी होई. निव्वळ निपचित पडून होता तरी त्याला भेटायला गेलो तेव्हा त्याने मला ओळखले. "साहेबांना ओळखले का?" असे विचारल्याबद्दल



बायकोवर खेकसला. गेल्या पाचसहा वर्षात तिसऱ्यांदा 'ही गाठभेट अखेरचीच' अशी मनाशी खूणगाठ बांधत मी निरोप घेतला. वर्धा मुक्कामी २३ मे २००४ रोजी म्हात्रे सरांचा फोन आला - 'आज पहाटे चार वाजता बाबूलाल गेला.'

आयुष्यात काही माणसांची जवळीक अशी साधली जाते, की तिची सुरवात कोठून झाली हे लक्षातच राहत नाही. अगदी पहिल्यापासून ही ओळख आहेच अशी भावना राहते. नंतर कालमानाप्रमाणे भेटीगाठी विरळ होत चालल्या तरी जवळिकीची भावना अबाधितच राहते.

बाबूलालची आणि माझी ओळख पहिल्यापासूनची नाही हे उघडच आहे. मी आंबेठाणला येऊन शेतकरी बनलो, चाकणला जाऊयेऊ लागलो. त्याच्या आधीचा काही परिचय असण्याची शक्यता नाही. १९७७ मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांना चाकणचे मामा शिंदे आमदारकीसाठी उभे होते. मामा शिंदे ही चाकणमधील एक संस्थाच आहे. 'चाकणचे सानेगुरुजी' म्हटले तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची पर्याप्त कल्पना येऊन जाते. त्यांनी खरे म्हणजे निवडणुकीच्या फंदात पडायलाच नको होते; पण निवडणुकीच्या या भोवऱ्यात नि:शंकपणे पाण्यात पाहेणारे किती जीव खेचले जातात! त्यांतलेच एक मामा. तसा त्या वेळी मामांचा आणि माझा परिचय चुटपुटताच होता. मी जुना सेवादलाचा आणि मामाही सेवादलाचे. एवढाच काय तो बादरायणी संबंध. पण, मामांनी फॉर्म भरला आणि पहिल्याच दिवसापासून मी त्यांना सांगितले, "माझी जीप, तिचे डिझेल आणि मी ड्रायव्हर तुमच्या कामासाठी हजर आहोत.' प्रचाराचा सगळा काळ पहाटेपासून मध्यरात्रीपर्यंत मी मामांबरोबर फिरलो. पुष्कळ अनुभव गाठीस जमला.

हा काळ असा, की माझे नावही कुणाला माहीत नव्हते. निवडणुकीच्या सभांमध्ये चाकणच्या गोपाळ जगनाडेंच्या १२-१४ वर्षांच्या मुलाचेही भाषण होई; पण मी सहसा स्टेजवरही नसे. या निवडणुकीच्या मोहिमेतच बाबूलाल परदेशी, शंकरराव वाघ, गोपाळ जगनाडे हे सारे मावळे भेटले. दिवसभर गाडीच्या स्टिअरिंगवर मी आणि मागेपुढे बसलेले हे मावळे. त्यांच्याकडून साऱ्या परिसरातील नेत्यांच्या कथाकहाण्या ऐकायला मिळत. शेतीतले काटे तोपर्यंत मला खुपू लागले होते; पण दु:खांची पुरी समज काही आली नव्हती. जेवढी आली होती तेवढे मी बोले; शास्त्र कमी, अभिनिवेश जास्त असेच असणार.

पण, नुकताच परिसरात आलेला शरद जोशी या मावळ्यांना खूप भावला. माझे शेतीविषयीचे बोलणे हे त्याचे कारण नसावे. मी त्या वेळी नुकताच परदेशातून आलेलो. स्वित्झर्लंडची 'शायनिंग' अजून शिल्लक होती. माझ्या गतवैभवाच्या पुष्कळ कंड्या

चाकणच्या परिसरात षट्कर्णी झाल्या होत्या. त्या काळाचे बाबूलाल पुढे वर्णन करी, ''साहेब म्हणजे काय थाट होता! सिगरेट घ्यायलासुद्धा गाडीतून उतरायचे नाहीत. खिशातून हात काढून पैसे द्यायचे आणि पाकिट घ्यायचे.'' सुरवातीला तरी हा 'फॉरेन रिटर्न्ड'चा दबदबा असावा. निवडणुकीच्या काळात चांगली ओळख झाली. मामा निवडून येणार अशी आमची खात्री होतीच. ते निवडून आले, की इतर आमदारासारखे होऊ द्यायचे नाही. सगळ्या खेड तालुक्याची परिपूर्ण विकासाची योजना तयार करून त्याच्या अंमजबजावणींची जबाबदारी आम्ही तिघांनी घ्यायची. त्यात चाकणचे अप्पा देशमुखही सामील झाले.

माझ्या शेतीवर त्या वेळी विहिरीचे काम चालू होते. आंबेठाणला त्या वेळी वीज नव्हती. त्यामुळे डिझेल इंजिन व पंप वापरावे लागत. अप्पांचे चाकणला इंजिन दुरुस्तीचे छोटेसे वर्कशॉप होते. सायकलचे पंक्चर काढण्याच्या दुकानापासून सुरवात केलेले चाकणमधील एक अप्पा देशमुख आणि बाबूभाई शहा. तोपर्यंत बाबूभाई गडगंज श्रीमंत झाले होते. पुढारी झाले होते. अप्पांची प्रगती सुखवस्तू पण अंगमेहनत करणाऱ्या दुकानदारापर्यंतच झाली होती. अप्पांनाही वाचा सरस्वतीचे वरदान होते. खरे म्हटले तर पाचजणांत समानता काही नव्हती. मी उच्चविद्याविभूषित, परदेशात जाऊन आलेला, सुखवस्तू. बाकीच्यांतला बाबूलाल बी.ए. पास, एलएल.बी.ची एखादी टर्म भरलेला. बाकीचे शाळेचा डाग लागलेले. गोपाळ तुकारामांचा लेखकू जगनाडे यांचा वंशज. शंकरराव भाजीची विक्री, अडत, ट्रक क्लिनर, ट्रक ड्रायव्हर अशा अनेक व्यवसायांतून निघालेले. मामांमुळे समाजवादी चळवळीतही आलेले.

बाबूलालचा चाकणमध्ये छापखाना होता. आमची बैठक त्या छापखान्यात किंवा अप्पा देशमुखच्या दुकानात. साधा ट्रेडलचा छापखाना, छपाईचे काम यायचे ते हँडबिलांचे किंवा लग्नपत्रिकांचे. बाबूलालचा कारभार तसा गबाळग्रंथी आणि अस्ताव्यस्त. छपाईच्या कामात मजकुराची दुरुस्ती गिऱ्हाईक कधी करून देत नसे. खिळे जुळाऱ्याचे शुद्धलेखन मग मुद्राराक्षसाचे थैमान घाली. आम्ही छापखान्यात गप्पा छाटत बसलो असताना अनेकवेळा गिऱ्हाईक यायचे, छपाईच्या किंवा ठरलेल्या वेळी पत्रिका छापून तयार न झाल्याबद्दल तक्रारी घेऊन. बाबूलालचे उत्तर ठरलेले, ''झाल्या दोनचार चुका म्हणून काय बिघडले? लग्न कुणाचे आहे, कुठे आहे, वधूवरांचे नाव ठीक आहे ना?'' उशिराने त्रस्त झालेल्या गिऱ्हाइकाला बाबूलालचे उत्तर, 'पुष्कळ छापखान्यात तर पत्रिका मुलाच्या बारशाच्या वेळीच आईबापांच्या हाती पडतात.' गिऱ्हाईक फारच तंडायला लागले तर



बाबूलालच त्यांच्यावर ओरडणार, 'दिसत नाही का साहेब बसले आहेत?' बिचारे गिऱ्हाईक माझ्या धाकाने निघून जायचे. पण, शेवटी व्हायचे तेच झाले. छापखाना बुडायला आला.

बाबूलालचे त्या वेळी थोड्या वर्षांपूर्वीच लग्न झाले होते. त्याच्या लग्नाची आख्यायिका तो सांगे, 'माझी शेती आहे, छापखाना आहे, मी ग्रॅज्युएट आहे; पण कोणी मुलगी देईना. मग मी देहूच्या एका शाळेत शिक्षकाची तात्पुरती नोकरी मिळवली. मुलगा नोकरदार आहे म्हटल्यावर मुलींच्या बापांच्या ह्या रांगा लागल्या. शेवटी, पार दूरच्या नागपूरच्या सुखवस्तु कुटुंबातल्या सुषमाचा बाप आला. लग्न ठरले. इष्ट हेतू साध्य झाल्याबरोबर मी नोकरी सोडून दिली.'

बाबूलालचे पूर्ण नाव मोहनलाल बिहारीलाल परदेशी. चाकणात परदेशींचा गोतावळा मोठा आहे. देहूआळंदी क्षेत्रांशी येऊनजाऊन संबंध दाट. बाबूलाल लहान वयातच कीर्तने करू लागला; अगदी धोतरकुडता, उपरणेपागोटे घालून. कीर्तनकारीच्या या कालखंडातच बाबूलालने पुराण -भागवतातील अनेक कथा- अख्यायिका आणि चुटके यांचे संपन्न भांडार जमा केले. तुकारामाचे पाठांतर कोणताही संदर्भ विनासायास देण्याइतके चांगले होते. तुकारामात xxx घालून वाचावेत असे अभंग अनेक. ते बाबूलालला अगदी मुखोद्गत. बहुतेक कीर्तनकारांच्या शैलीतच एक चावटपणा असतो. समोरच्या श्रोतृवृंदात कोणी लक्षणीय दिसल्यास, मग त्याची सरस्वती अधिकच पाल्हाळू लागते. हा कीर्तनकारांचा परंपरागत गुण बाबूलालने आपल्या बी.ए. पर्यंतच्या शिक्षणाचा आणि संस्कारांचा मसाला घालून चांगलाच अंगी बाणवला होता. कीर्तन पुराणभागवतातील कथांचे आणि पाचकळपणा आधुनिक पुणेरी कॉलेजातील टवाळखोरीचा असे हे मोठे स्फोटक मिश्रण होते.

आंबेठाणच्या शेतीच्या अनुभवाने जसजसा पोळत गेलो तसतसे माझे विचार अधिक स्पष्ट होऊ लागले. पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूटमधल्या वाचनाचा पुरेपूर उपयोग करून माझ्या अनुभवाला प्रस्थापित अर्थशास्त्राची जोड मिळाली होती. १९७८-७९ मध्ये मोहन धारियांनी कांद्याच्या निर्यातीवर बंदी आणली; भाव पडले. इतरांबरोबर आम्हीही कलेक्टर साहेबांच्या कार्यालयात तक्रार घेऊन गेलो. कार्यालयातल्या साऱ्या खुर्च्या चाकणच्या भारदस्त पुढाऱ्यांनी आणि बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अडवलेल्या. सगळ्यांची बोलणी झाल्यावर मला शंकररावांनी आग्रह करून बोलायला लावले. 'माल शेतकऱ्याच्या हाती असताना निर्यातबंदी, माल व्यापाऱ्याकडे गेला म्हणजे निर्यात खुली' या मुद्द्यावर मी बऱ्याच धारेचे बोललो. 'दुष्काळाच्या काळात सक्तीने लेव्ही घेणारे

सरकार आता शेतकऱ्यांच्या मदतीस का येत नाही?' हा संघटनेतील पायाचा विचार त्या वेळी मी पहिल्यांदा मांडला. ४० पैसे किलोने खरेदी करण्याचे ठरले. आंदोलन वगैरे करावे लागलेच नाही.

मग, आमचा ठिय्या चाकण बाजारात. लिलाव योग्य होतात किंवा नाही, ४० पैशाच्या खाली भाव जात नाहीत हे पाहण्याकरिता कांद्याच्या पुरुषपुरुष उंचीच्या ढिगांना तुडवत आम्ही फिरायचो. एखादे वेळी भाव घसरला तर शेतकरी आम्हांला शोधत येऊ लागले. हळूहळू शेतकऱ्यांच्या दु:खांना वाचा फोडणारी एक संघटना हवी, शेतीमालाला रास्त भाव मिळवून देणे हे तिचे प्रमुख काम असले पाहिजे हेही ठरले.

त्याचवेळी शेतीप्रश्नाचे माप काढण्यासाठी मी 'भूमिपुत्र' म्हणून भूमिहीन शेतकऱ्यांना एकत्र करून आणीबाणीच्या काळात त्यांना मिळालेल्या जमिनीवर किफायतशीर शेती करण्याच्या अंगारमळ्यातील प्रयोगाला समांतर प्रयोग करीत होतो. चाकण-आंबेठाण रस्ता पुढे वांद्रापर्यंत जातो; पण रस्ता असा, की पहिला पाऊस झाला की आठ महिने यातायात बंद. भामनेरचा रस्ता पक्का व्हावा याकरिता ४०-४२ कि.मी.च्या सडकेवरील गावागावांत जाऊन मी एक मोर्चा काढण्यासाठी माणसे जमवीत होतो.

मामा शिंदे कुचेष्टेने म्हणायचे, 'आम्ही पुढारी सारखे चाकणहून मुंबईला जात असतो. शरद जोशी कायम आंबेठाण ते वांद्रे जात असतात.' या सगळ्या प्रवासात बाबूलाल, शंकरराव आणि अप्पा हमखास सोबतीला असायचे.

शेतकऱ्यांची संघटना कशी असावी, संघटना उभारण्यातल्या अडचणी कोणत्या, मार्ग कोणते याबद्दल चर्चा व्हायची. ती 'वारकरी'च्या दुसऱ्या आणि तिसऱ्या अंकात आली आहे. मुळात प्रश्न 'वारकरी' सुरू कसा झाला?

शेतकरी संघटनेची बांधणी कशी करावी, याचा बारकाईने तपशीलवार आराखडा तयार झाला होता. बाजारपेठेचे गाव शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र आहे. बहुतेक शेतकरी आठवड्यातून एकदा तरी बाजाराच्या गावी येतात. बाजाराच्या दिवशी त्यांना एकत्र येण्यासाठी संघटनेचे कार्यालय तयार केले व त्या कार्यालयात प्रत्येक दिवशी काही वेळ आणि बाजाराच्या दिवशी सर्ववेळ संघटनेचा कुणी संपर्क कार्यकर्ता हजर ठेवावा अशी कल्पना होती. चाकणला त्याप्रमाणे त्या वेळी न परवडणाऱ्या भाड्याने एक खोली घेउन तेथे कार्यालयाची पाटी लावली. बाजाराच्या दिवशी आम्ही सारे मावळे सकाळपासून हपापल्या नजरेने कोणी शेतकरी येतील अशा आशेने बसून राहू लागलो. बाजारातील विक्री आणि घरसामानाची खरेदी झाल्यानंतर डोकावून जाण्याकरिता



एकटेदुकटे शेतकरी येत. त्या प्रत्येकाकरिता सर्व प्रशिक्षण करणे शक्य नव्हते. मंडळी एकत्र कोणत्याही वेळी जमा होईनात. मग, पर्वताने महंमदाकडे येण्याची आशा सोडून महंमदाने पर्वताकडे जाण्याचे घाटू लागले.

भामनेरच्या वाटेवरच्या गावांकडे मी जातच होतो. पुष्कळवेळा बाबूलाल, शंकरराव माझ्याबरोबर असत. गावात जाऊन आम्ही उभे ठाकायचे. गावातला एखादा पाहुणा माझ्या सोबत्यांच्या परिचयाचा असायचा. त्याचा आधार घेऊन आम्ही कोठे पारावर, देवळात, शाळेत किंवा पंचायतीत ठाण मांडायचो. गावकऱ्यांना बोलावण्याकरिता आवतणे द्यायचो. गावचा वतनदार निरोप घेऊन गावात गेला म्हणजे तास दोन तास तरी कोणी न जमण्याची निश्चिंती. ज्या गावात पंचायतीने किंवा तरुण मंडळाने लाऊडस्पीकर बसवलेला असेल त्या गावात घोषणा व्हायची, 'आपल्या गावी सुप्रसिद्ध शेतकरी नेते शरद जोशी आले आहेत. गावकऱ्यांनी या संधीचा अवश्य फायदा घ्यावा. तातडीने अमुकअमुक ठिकाणी जमावे.' सभा संपल्यानंतर गाडीत बसल्यावर बाबुलाल या घोषणांचे व्यंग काढायचा, ''गावातील समस्त शेतकरी बंधूंनो आणि भगिनींनो, आपल्या गावात जागतिक कीर्तीचे शेतकरी नेते आलेले आहेत. त्यांना पाहण्याची, ऐकण्याची संधी गमावू नका. संधी चुकवाल तर पस्तवाल, काही करत असला तर हात न धुता तातडीने हजर रहा.'' बाबूलालच्या या व्यंगाने आणि आविर्भावाने हसून मुरकुंडी वळे. अशा तऱ्हेने सगळा जन्म गेला तरी हजारभर शेतकऱ्यांपुढे संघटनेची मांडणी होणार नाही हे उघड होते. मग, करावे काय? संघटनेचे एक साप्ताहिक असावे अशी एक कल्पना निघाली. नियतकालिक काढायचे म्हणजे काय याचे मला ज्ञान नाही. पंजीकरण कुठे करायचे, नाव राखून कसे ठेवायचे, टपाल खात्याकडून परवाना कसा मिळवायचा सारेच कसे अगम्य !

तेवढ्यात बाबूलालने सांगितले, ''चिंता नको. कीर्तनकार म्हणून भक्तिमार्गाचे एक साप्ताहिक काढण्याचा माझा बरेच दिवस विचार होता. त्याकरिता मी 'वारकरी' नावाची नोंदणी केली आहे. या नावाखाली आपण साप्ताहिक एकदोन आठवड्यात सुरू करू शकतो.'' शेतकरी संघटनेचे मुखपत्र आणि नाव 'वारकरी' काही मेळ जमेना; पण दुसरे नाव मिळवायचे म्हणजे पाचसहा महिन्यांचा खटाटोप आणि खोळंबा! १९८० सालच्या कांद्याच्या हंगामात म्हणजे फेब्रुवारी १९८० मध्ये कांद्याचा प्रश्न पुन्हा उग्ररूप धारण करणार असे उघड उघड दिसत होते. २६ जानेवारी १९८० ला भामनेर सडकेसाठी मोर्चा काढायचाही कार्यक्रम ठरला होता. साप्ताहिक तर नोव्हेंबर महिन्यात चालू होणे

आवश्यक होते. मग, आम्ही 'वारकरी' या नावानेच सुरवात करायचे ठरवले. नाव मिळाले. बाबूलालचा छापखाना तयारच होता. कोणाच्या तरी ओळखीने पुण्याच्याच एका दैनिकाकडे असणारा जादा न्यूजप्रिंट आम्ही मिळवला. मोठी बाजी मारली असे वाटले.

पहिल्याच अंकात (३ नोव्हेंबर १९७९) वारकरीच्या पहिल्या पानावर उाव्या बाजूस संत ज्ञानेश्वर व उजव्या बाजूस तुकोबांचे चित्र छापले. कारण, त्यांचे ब्लॉक छापखान्यात तयार होते. 'ॐ नमोजी आद्या' या ज्ञानेश्वरीतील पहिल्या ओवीच्या पूर्वार्धाने मी संपादकीय लिहिले. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संस्थापनेच्या काळी आणि त्याआधी महाराष्ट्राची परिस्थिती आणि वर्तमान परिस्थितीची समांतरता दाखवून दिली. बाबूलाल मोठा खूष झाला.

त्यानंतर दर आठ दिवसांनी 'वारकरी'चा एक अंक काढणे म्हणजे मोठे दिव्य होऊन बसले. महाराष्ट्रातील माझ्या दौऱ्यांना त्या वेळी सुरवात झाली होती. ते सांभाळून गुरुवार किंवा शुक्रवारी चाकणला पोहोचायचे.

चाकणच्या बाजारात ११-१२ वाजेपर्यंत तरी अंकाच्या प्रती पोहोचाव्यात म्हणून लेख घेऊन मी बाबूलालच्या घरी अंधारात पोहोचे. सगळीकडे सामसूम. पाच पन्नास हाका मारल्यानंतर बाबूलालची बायको उठायची, मला ऐकू येईल अशा मोठ्या आवाजात नवऱ्याला हलवून जागे करीत म्हणायची, 'अहो, तुमचे सासरे आलेत, उठा लवकर.' काही वेळाने बाबूलाल खाली उतरायचा. जवळच्या छापखान्यात जायचो. खिळे जुळवायला कुणी असेल तर बरे, नाही तर कोणाला तरी आणून वेठीला धरायचे. माझा लेख जुळवून होईपर्यंत बाबुलाल आणि मी अंक भरण्यासाठी मजकूर तयार करण्याच्या खटाटोपाला लागायचो. माझे लेख आताच्या प्रमाणात थोडे कमी लांबीचे असत. बाबूलाल चतुरस्र सामग्री तयार करणारा. कधी विनोद, कधी-चुटके, कधी वात्रटिका, किस्से, पण या सगळ्या चुरचुरीत मामल्यात त्याने लिहिलेला जनावरांच्या बाजारातील अडत्यांच्या भाषेसंबंधीचा लेख सर्वत्र गाजून गेला. (जोड असर - शेतकरी संघटक : ग्रामीण अनुभूति विशेषांक : २६ जुलै १९८५) खरे म्हटले तर या लेखाला मराठी भाषेतील काही पुरस्कार मिळायला पाहिजे होता.

१९८० चा फेब्रुवारी महिना आला. चाकणच्या आंदोलनास तोंड फुटले. कांद्याचा बाजार १३ पैशांपर्यंत पडलेला; पण शेतकऱ्यांमध्ये काही धाडसाची ठिणगी पडेना. आज शेतकरी संघटना दांडगी शक्ती आहे, तरी जागोजागी शेतकरी कच खातात. त्या वेळी तर शेतकरी संघटित होणे म्हणजे कुत्र्याचे शेपूट सरळ होण्याइतके कठीण अशी



भावना होती. आमच्याकडे सर्वसाधारण शेतकरी दुर्लक्ष करी आणि पुढारी तुच्छतेने बघत.

शेतकरी संघटनेची ताकद ती काय, मूठभर. कांद्याला भाव मिळवायचा, त्याबद्दलचा हुकूम निघतो तो दिल्लीहून. मग बाजारात उभे राहून शेतकऱ्यांनी कांदा विकणे बंद करावे आणि बाजारपेठेला लगत असलेला पुणे-नाशिक हमरस्ता बंद करावा अशी घोषणा आम्ही करायचो आणि मोठ्या थाटाने मी पुढे होऊन कूच करायचो. बाजारातून निघताना माझ्यामागे बऱ्यापैकी लोंढा असायचा. रस्त्यावर पोचेपर्यंत तो पातळ होत जायचा. पुष्कळदा, उन्हात तापणाऱ्या डांबरी रस्त्यावर बसायला पाचपन्नास शेतकरीच असायचे. सगळ्यांनी मध्यभागी बसावे तर बाजूच्या कच्च्या सडकेवरून वाहने निघून जायची. सगळ्या रस्त्याची रुंदी अडवावी इतकी माणसे आमच्याकडे नसायची. असतील तितक्या माणसांना बसवून आम्ही भाषणे सुरू करायचो. पहिला वक्ता हरहमेशा मोहन बिहारीलाल परदेशी. कधी लाऊड स्पीकर असायचा; बहुधा नाहीच. कधी बॅटरीवर चाललेला कर्णा. त्याची फिकीर बाबूलालला फारशी नसे. बोलायला सुरवात करून पाचदहा मिनिटांत तो लोकांचे कान आणि मने ओढून घेत असे. कथा, संतांची वचने, भरपूर पाचकळ विनोद आणि पुढाऱ्यांवर सडकून ओढायचे आसूड अशा सामग्रीवर बाबूलाल वाटेल तितका वेळ बोलू शकत असे. शेवटपर्यंत लोकांचे आकर्षण कायम टिकवून २००-५०० चा जमाव जमला, की मी बाबूलालला मागून खूण करायचो, 'आता तुझे भाषण थांबव, आता मी बोलतो.' बाबूलाल कसला खट्याळ! तो लोकांपुढेच कैफियत मांडायचा, "बघा, मी गेले तासभर उन्हातान्हात बोलतो आहे, आता माणसं जमली तर साहेब म्हणतात बसा. तुम्हीच सांगा, मी थांबवू का?" यावर लोक हलकल्लोळाने, 'तुमचेच भाषण चालू द्या' असे एकमुखाने सांगायचे. तशातही मी उठायचो आणि बाबूलालच्या साऱ्या खमंग चुरचुरीत भाषणानंतर 'शेतीमालाचा भाव', 'शेतकऱ्याचे मरण, सरकारचे धोरण' असला अर्थशास्त्रीय विषय मांडायला लागायचो. चमत्कार हा, की लोकांनी माझे बोलणे ऐकून घेतले.

बाबूलालच्या खट्याळपणाबद्दल एकदा अद्दल घडली. चाकणजवळच्या गावाच्या एका काँग्रेस पुढाऱ्याने शेतकरी संघटनेचे नेते म्हणून आम्हाला सत्कार समारंभाला बोलावले, गावाच्या जत्रेच्या दिवशी. जत्रेत तमाशाचा फड रंगला होता. गणगौळण झाल्यानंतर चहापानाच्या सुटीत आमच्या सत्काराचा कार्यक्रम करण्याची योजना होती. गौळणच खूप रंगली. मग सत्काराच्या कार्यक्रमाची घोषणा झाली. पहिला वक्ता बाबूलाल.

त्या दिवशी भाषण झाल्यानंतर त्याने कबूल केले व तो म्हणाला, "दर वेळी तुम्हाला मी कोणत्या संकटात टाकतो ते मला आज कळले."

बाबूलालचा छापखाना जुन्या पद्धतीचा. त्यात कधी मोडतोड व्हायची, कधी जुळारी नसायचा तर कधी वीजच जायची. अशाप्रसंगी तयार झालेला मजकूर घेऊन मी पुण्यात जायचो, पुण्याच्या जुन्या भागात एका छापखान्यात ते घेऊन जायचो, दादापुता करून रात्रीत खिळ्यांची जुळणी करून द्यायला सांगायचो. तिथेच बसून राहायचो आणि जुळणी होईल तसे मुद्रिते तपासून द्यायचो.

'वारकरी'च्या प्रकाशनाचा कार्यक्रम ठरला त्याच वेळी छातीला बिल्ले लावण्याचीही कल्पना निघाली. लाल रंग असावा, पांढरी अक्षरे असावीत हेही ठरले; पण कागदी बिल्ले करणे हे कुणाला पटेना. बाबूलालचाच कोणी शहा म्हणून मित्र पुण्यात होता. त्याच्याकडे जाऊन त्याला आम्ही गळ घातली. त्याने २४ तासांत प्लॅस्टिकचे बिल्ले तयार करून द्यायचे अंगावर घेतले. या पहिल्या बिल्ल्याचा नमुना आजही काही जणांकडे असेल ! नंतर, परभणी अधिवेशनापासून बिल्ले पत्र्याचे निघाले. एवढेच नव्हे तर, हा बिल्ला संघटनेच्या झेंड्यावरही अवतरला. आज शेतकरी संघटनेचा हा बिल्ला कुठेही दिसला तर लोकांना खूण पटते. त्या प्रतीकाचे श्रेय बाबूलालकडे जाते.

आंदोलन सुरू झाले. कांद्याची बाजारपेठ बंद पडली. त्याच वेळी भामनेर सडकेचे आंदोलनही पेटू लागले. भामनेरचे बार्डोली बनले. करबंदीची चळवळ सुरू झाली. एस.आर.पी.च्या गाड्या भरभरून भामनेर रस्त्याला जाऊ लागल्या. रस्ता कसला खाचखळग्यांनी, दगडगोट्यांनी भरलेला व जवळजवळ सर्व अंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूंस टेकड्यांचे उंचवटे. गावकऱ्यांनी गोफणीच्या हत्याराने एस.आर.पी.ना अडवण्याची तयारी चालवली. तेवढ्यात निवडणूक आली आणि साऱ्या भामनेरच्या २४ गावांनी मतदान केंद्रे उघडूच द्यायची नाहीत आणि मतदानही करायचे नाही असे जाहीर केले. मग, सरकारनेही पावले उचलायला सुरवात केली. आम्हा दहा जणांना चाकण बाजारात पकडले. खेडच्या कोर्टात नेऊन उभे केले. कोर्टाने दहा दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली. आम्हाला सगळ्यांना पोलिसांनी निळ्या गाडीत बसवले. त्यांत बाबुलालही आला. गाडी पुण्याकडे निघाली. आमची चर्चा सुरू झाली. 'येरवड्याला नेतात वाटतं?' गाडी येरवडा ओलांडून नगर रस्त्याला लागली. 'नगरच्या तुरुंगात नेतात असे दिसते.' पहाऱ्यावरच्या पोलिसाला बाबूलालने विचारले, 'गाडीत पेट्रोल भरपूर आहे ना? नाही तर मध्येच कुठेतरी थांबवाल.' बाबूलालने विचारायचा अवकाश, गाडी गचकन् थांबली. 'पेट्रोल नसावे.'



ड्रायव्हरचा अंदाज. 'असे कसे होईल ! बघा बघू.' एका पोलिसाने पेट्रोल टाकीचे झाकण उघडून अंधरात आत बघायचा प्रयत्न केला, भोवती आमचे कोंडाळे, "अहो, हवालदारसाहेब, असं कसं दिसेल? टॉर्च नाही का? मग ही काडीपेटी घ्या, काडी शिलगवा आणि टाकीच्या तोंडाशी धरून बघा." आम्ही हसून हसून बेजार. नगरहून गाडी पुढे औरंगाबादकडे गेली. हर्सूल तुरुंगाच्या प्रांगणात जाऊन थांबली. तोपर्यंत सकाळ झाली होती. तुरुंग अधिकारी आम्हाला घ्यायला तयार नाही. वरून सूचना नाही म्हणे. मग आम्ही तेथील पारावर मुक्काम ठोकला. कैद्यांना भेटायला आलेली त्यांची नातलग मंडळी भोवताली होती. आम्ही पँट मनिलावाले दिसलो. त्यांना वाटे आमचा काही उपयोग होईल. नातलग कैद्याला कसे सोडवावे याची विचारणा ते करत. बाबूलाल आणि शंकरराव अगदी गंभीर चेहऱ्याने त्यांना सांगू लागले, 'ते नाही जमत बाबा, ते लई खर्चाचे काम. दोनपाच हजार रुपये तर वरच्या अधिकाऱ्यांनाच द्यावे लागतील. आमच्या सारख्या मधल्याचे आणखी दोनपाच हजार.' एका पाहुण्याने खरंच हजारभर रुपये बाबूलालच्या हातावर ठेवले आणि म्हणाला, 'गरिबाचे काम एवढ्यात भागवा.' आमची हसून हसून मुरकुंडी. तेथून जी हसायला सुरवात झाली ते कोठडीचे दहा दिवस आम्ही हसतच होतो.

हर्सूल येथील तुरुंगाचे खाणे अगदीच भिकार. आम्ही कांदा मागवून घेतला. अधिकाऱ्याने सांगितले कांदा विकत घ्यावा लागेल. "काय भाव?" "एक रुपया किलो." यावर बाबूलालची तंबी, "काय साहेब, ६० पैसे भाव मिळावा म्हणून आम्ही तुरुंगात आलो आणि तुम्ही आमच्याकडून रुपया भाव घेता? हे फार गंभीर प्रकरण आहे. आम्हाला तक्रार करावी लागेल.' बिचारा तुरुंग अधिकारी! त्याने मान्य केले, "तुम्ही असेपर्यंत तुम्हाला कांदा फुकट."

बाबूलाल आपल्या घरच्या कहाण्या सांगायचा. आईची नक्कल करायचा. आई म्हणते, "एवढा नऊ महिने मी तुला पोटात वाढविला आणि लग्नानंतर ८ दिवसांत तू बायकोच्या तालावर नाचू लागलास?"आता आईला सोडून नवे नवरे बायकोचे का ऐकू लागतात काय सांगावे? बाबूलाल कथा सांगत होता, "मी उत्तर दिले, तू मला पोटात वाढवलेस खरे, पण त्यावेळी माझे वजन ते काय? अगदी शेवटीसुद्धा सातआठ पौंड. उलट, सुषमाचे बघ." या अफाट विनोदावर आम्ही सर्व सत्याग्रही कैदी अक्षरशः गडबडा लोळू लागलो.

असा हा बाबूलाल २३ मे २००४ रोजी आम्हांला सोडून गेला.

शेतकरी संघटनेच्या सुरवातीच्या काळात संघटनेचे नाव माहीत नाही, कोणी नेता नाही, साधने नाहीत अशा परिस्थितीत शिवाजीच्या या मावळखोऱ्याच्या परिसरात ही

त्या दिवशी भाषण झाल्यानंतर त्याने कबूल केले व तो म्हणाला, ''दर वेळी तुम्हाला मी कोणत्या संकटात टाकतो ते मला आज कळले.''

बाबूलालचा छापखाना जुन्या पद्धतीचा. त्यात कधी मोडतोड व्हायची, कधी जुळारी नसायचा तर कधी वीजच जायची. अशाप्रसंगी तयार झालेला मजकूर घेऊन मी पुण्यात जायचो, पुण्याच्या जुन्या भागात एका छापखान्यात ते घेऊन जायचो, दादापुता करून रात्रीत खिळ्यांची जुळणी करून द्यायला सांगायचो. तिथेच बसून राहायचो आणि जुळणी होईल तसे मुद्रिते तपासून द्यायचो.

'वारकरी'च्या प्रकाशनाचा कार्यक्रम ठरला त्याच वेळी छातीला बिल्ले लावण्याचीही कल्पना निघाली. लाल रंग असावा, पांढरी अक्षरे असावीत हेही ठरले; पण कागदी बिल्ले करणे हे कुणाला पटेना. बाबूलालचाच कोणी शहा म्हणून मित्र पुण्यात होता. त्याच्याकडे जाऊन त्याला आम्ही गळ घातली. त्याने २४ तासांत प्लॅस्टिकचे बिल्ले तयार करून द्यायचे अंगावर घेतले. या पहिल्या बिल्ल्याचा नमुना आजही काही जणांकडे असेल ! नंतर, परभणी अधिवेशनापासून बिल्ले पत्र्याचे निघाले. एवढेच नव्हे तर, हा बिल्ला संघटनेच्या झेंड्यावरही अवतरला. आज शेतकरी संघटनेचा हा बिल्ला कुठेही दिसला तर लोकांना खूण पटते. त्या प्रतीकाचे श्रेय बाबूलालकडे जाते.

आंदोलन सुरू झाले. कांद्याची बाजारपेठ बंद पडली. त्याच वेळी भामनेर सडकेचे आंदोलनही पेटू लागले. भामनेरचे बार्डोली बनले. करबंदीची चळवळ सुरू झाली. एस.आर.पी.च्या गाड्या भरभरून भामनेर रस्त्याला जाऊ लागल्या. रस्ता कसला खाचखळग्यांनी, दगडगोट्यांनी भरलेला व जवळजवळ सर्व अंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूंस टेकड्यांचे उंचवटे. गावकऱ्यांनी गोफणीच्या हत्याराने एस.आर.पी.ना अडवण्याची तयारी चालवली. तेवढ्यात निवडणूक आली आणि साऱ्या भामनेरच्या २४ गावांनी मतदान केंद्रे उघडूच द्यायची नाहीत आणि मतदानही करायचे नाही असे जाहीर केले. मग, सरकारनेही पावले उचलायला सुरवात केली. आम्हा दहा जणांना चाकण बाजारात पकडले. खेडच्या कोर्टात नेऊन उभे केले. कोर्टाने दहा दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली. आम्हाला सगळ्यांना पोलिसांनी निळ्या गाडीत बसवले. त्यांत बाबुलालही आला. गाडी पुण्याकडे निघाली. आमची चर्चा सुरू झाली. 'येरवड्याला नेतात वाटतं?' गाडी येरवडा ओलांडून नगर रस्त्याला लागली. 'नगरच्या तुरुंगात नेतात असे दिसते.' पहाऱ्यावरच्या पोलिसाला बाबूलालने विचारले, 'गाडीत पेट्रोल भरपूर आहे ना? नाही तर मध्येच कुठेतरी थांबवाल.' बाबूलालने विचारायचा अवकाश, गाडी गचकन् थांबली. 'पेट्रोल नसावे.' ड्रायव्हरचा अंदाज. 'असे कसे होईल ! बघा बघू.' एका पोलिसाने पेट्रोल टाकीचे झाकण उघडून अंधरात आत बघायचा प्रयत्न केला, भोवती आमचे कोंडाळे, ''अहो, हवालदारसाहेब, असं कसं दिसेल? टॉर्च नाही का? मग ही काडीपेटी घ्या, काडी शिलगवा आणि टाकीच्या तोंडाशी धरून बघा.'' आम्ही हसून हसून बेजार. नगरहून गाडी पुढे औरंगाबादकडे गेली. हर्सूल तुरुंगाच्या प्रांगणात जाऊन थांबली. तोपर्यंत सकाळ झाली होती. तुरुंग अधिकारी आम्हाला घ्यायला तयार नाही. वरून सूचना नाही म्हणे. मग आम्ही तेथील पारावर मुक्काम ठोकला. कैद्यांना भेटायला आलेली त्यांची नातलग मंडळी भोवताली होती. आम्ही पँट मनिलावाले दिसलो. त्यांना वाटे आमचा काही उपयोग होईल. नातलग कैद्याला कसे सोडवावे याची विचारणा ते करत. बाबूलाल आणि शंकरराव अगदी गंभीर चेहऱ्याने त्यांना सांगू लागले, 'ते नाही जमत बाबा, ते लई खर्चाचे काम. दोनपाच हजार रुपये तर वरच्या अधिकाऱ्यांनाच द्यावे लागतील. आमच्या सारख्या मधल्याचे आणखी दोनपाच हजार.' एका पाहुण्याने खरंच हजारभर रुपये बाबूलालच्या हातावर ठेवले आणि म्हणाला, 'गरिबाचे काम एवढ्यात भागवा.' आमची हसून हसून मुरकुंडी. तेथून जी हसायला सुरवात झाली ते कोठडीचे दहा दिवस आम्ही हसतच होतो.

हर्सूल येथील तुरुंगाचे खाणे अगदीच भिकार. आम्ही कांदा मागवून घेतला. अधिकाऱ्याने सांगितले कांदा विकत घ्यावा लागेल. ''काय भाव?'' ''एक रुपया किलो.'' यावर बाबूलालची तंबी, ''काय साहेब, ६० पैसे भाव मिळावा म्हणून आम्ही तुरुंगात आलो आणि तुम्ही आमच्याकडून रुपया भाव घेता? हे फार गंभीर प्रकरण आहे. आम्हाला तक्रार करावी लागेल.' बिचारा तुरुंग अधिकारी! त्याने मान्य केले, ''तुम्ही असेपर्यंत तुम्हाला कांदा फुकट.''

बाबूलाल आपल्या घरच्या कहाण्या सांगायचा. आईची नक्कल करायचा. आई म्हणते, ''एवढा नऊ महिने मी तुला पोटात वाढविला आणि लग्नानंतर ८ दिवसांत तू बायकोच्या तालावर नाचू लागलास?''आता आईला सोडून नवे नवरे बायकोचे का ऐकू लागतात काय सांगावे? बाबूलाल कथा सांगत होता, ''मी उत्तर दिले, तू मला पोटात वाढवलेस खरे, पण त्यावेळी माझे वजन ते काय? अगदी शेवटीसुद्धा सातआठ पौंड. उलट, सुषमाचे बघ.'' या अफाट विनोदावर आम्ही सर्व सत्याग्रही कैदी अक्षरशः गडबडा लोळू लागलो.

असा हा बाबूलाल २३ मे २००४ रोजी आम्हांला सोडून गेला.

शेतकरी संघटनेच्या सुरवातीच्या काळात संघटनेचे नाव माहीत नाही, कोणी नेता नाही, साधने नाहीत अशा परिस्थितीत शिवाजीच्या या मावळखोऱ्याच्या परिसरात ही

अद्‌भुत माणसे भेटावी त्यातले शंकरराव पूर्वीच गेले. आता बाबूलालही गेला. आजही बाबूलाल शेतकरी संघटकचा कागदोपत्री मालक आहे. फक्त सा. वारकरीचा वेलू गगनावरी गेला आहे. संघटनेचे 'बीज एकले' रोवण्यास ज्यांची मदत झाली, त्यांची रोप वाढल्यानंतर आणि संघटनेचा वृक्ष झाल्यानंतर भरल्या अंत:करणाने आठवण करून, त्यांना श्रद्धांजली देणे एवढेच आजच्या पाइकांच्या हाती राहते.

(शेतकरी संघटक, ६ जून २००४)

■■



# मुशीतील आचेने सिद्ध झालेले कार्यकर्ते

२० एप्रिलला मी दिल्लीत होतो. माझ्यापर्यंत निरोप यायला उशीर झाला. आंबेठाणहून मला फोन आला, 'गुरुजी गेले'. पन्नास वर्षांपूर्वी हेच दोन शब्द मी ऐकले होते. सानेगुरुजींनी जळगावमध्ये विष खाऊन आत्महत्या केली. त्या वेळीही सेवादलाच्या सैनिकांपुढे हे दोनच शब्द आले होते - 'गुरुजी गेले.'

श्रद्धांजली, श्रद्धांजली म्हणून माणसाकडून जी काही वाहिली जाते ती बातमी कळल्यानंतर पहिल्या दहा सेकंदांत वाहिली जाते. हे माणूस आता पुन्हा आपल्याला दिसणार नाही; त्याचं चालणं कसं, त्याचं बोलणं कसं, त्याचं सलगी देणं कसं हे पुन्हा आपल्याला अनुभवायला मिळणार नाही असं लक्षात आल्यानंतर त्याच्या आणि आपल्या ओळखीचा, सहवासाचा सगळा चित्रपट त्या पहिल्या दहा सेकंदांत आपल्या डोळ्यासमोर उघडून जातो. ओळख कोठे झाली, त्याची काय काय वैशिष्ट्ये दिसली, आपल्यावर त्याचा काय प्रभाव पडला त्याचे सिंहावलोकन ही खरी मनोमनची श्रद्धांजली त्या पाचदहा सेकंदांत वाहिली जाते आणि मग, औपचारिकरीत्या आपण सगळे एकत्र जमतो, आपल्या आठवणी दुसऱ्यांना सांगतो, दुसऱ्यांच्या आठवणी ऐकून घेतो. तो एक औपचारिक बुडबुडे काढण्याचा भाग असतो. त्याच्यात आपल्या दु:खावर थोडं मलम लागतं आहे का याचा थोडा तपास असतो.

मी सकाळी शेवाळेगुरुजींच्या घरी गेलो. त्यांच्या वृद्ध आई काठी टेकीत टेकीत आल्या आणि मी त्यांना सहज म्हटलं, ''या वयामध्ये एवढा मोठा कर्तासवरता मुलगा जाणं याच्याएवढं मोठं दु:ख कोणतं नाही.'' पण मग पटकन माझ्या लक्षात आलं, की आपण शेवाळेगुरुजींच्या आईवर फार कठीण वेळ आहे, असं म्हटलं तर त्याहीपेक्षा कठीण वेळ माझ्यावर आली आहे. आता गुरुजींना श्रद्धांजली वाहताना अनेकांनी म्हटलं, की शेवाळेगुरुजी हे शेतकरी आंदोलनातील एक गुरू होते. म्हणजे एका तऱ्हेने पात्रता नसताना, गोविंदाची भूमिका माझ्याकडे येते. त्या गोविंदाची अवस्था, प्रत्यक्षात आपला शब्द जगभर पसरवणारा गुरू जगातून नाहीसा झाला तेव्हा किती कठीण झाली असेल?

माझी अशी अवस्था होऊ नये अशी माझी फार इच्छा असते. दोन वर्षांपूर्वी मी स्वत: आजारी होतो. आपल्यापैकी अनेकांनी मला त्यावेळी त्या अवस्थेत पाहिले आहे, सेवा केली, मदत केली. त्या वेळी मला असं वाटत होतं, की या आजारातून मी काही

आता उठत नाही. तेव्हा जर का मला असं वाटलं असतं, की यापुढे आपण उठून काय करणार आहोत तर ज्यांना आपण पंचवीस वर्षे लहानाचे मोठे झालेले पाहिले त्यांची काय अवस्था झाली असती? गुरुजी बुलडाण्याचे; पण प्रत्येक जिल्ह्यात असे एकदोन तरी गुरू आहेत. त्यांच्यामुळे ही शेतकरी संघटना उभी आहे. त्यांच्यापैकी काही कार्यकर्ते माझी भेट झाली तेव्हा दहावीबारावीत शिकत होते, काही कॉलेजमध्ये जात होते. बहुतेकांची अजून लग्नं व्हायची होती. त्या सगळ्यांना आपापल्या जिल्ह्यांमध्ये काम करताना, पुढे येताना मी पाहिलेले आहे. त्यांची लग्नं लागली. लग्न झाल्यानंतर त्यांच्या नवपरिणत पत्नींच्या तक्रारी मी ऐकल्या आहेत, ''यांनी लग्नं कशाला केली? हे तर सारखे शेतकरी संघटनेच्या कामासाठी गावोगाव धावत असतात. घरसंसार कसा काय व्हायचा?'' त्यांची समजूत घालण्याचंही काम मी केलं आहे आणि ही अशी मुलं डोळ्यसमोर गेलेली पहण्याकरिताच जर आयुष्य राहिलेलं असेल तर त्या आयुष्यात काही फारसा अर्थ नाही असं मला शेवाळेगुरुजींच्या वृद्ध आईचं सांत्वन करताना खरोखरच वाटलं.

शेवाळेगुरुजींच्या आठवणी सांगा असं मी इथं जमलेल्या कार्यकर्त्यांना म्हटलं. कारण श्रद्धांजलीच्या भाषणात महात्मा, कार्यकर्ता, निष्ठावान वगैरे शब्द वापरले म्हणजे त्या शब्दांतून माणसाच्या अंतर्मनाचा काही फारसा परिचय होत नाही. सर्वांनी अनेक आठवणी सांगितल्या; पण गंभीरपणे काम करणारे, गावात जाऊन दवंडी पिटण्यापासून, सतरंज्या घालण्यापासून, लाऊडस्पीकर्स जोडण्यापासून शेवटचं भाषण करून पुन्हा घोषणाही देणारे शेवाळेगुरुजी हे स्वभावाने गोड, विनोदी, चेष्टेखोर, मिश्किल होते. हा अनुभव मला आला आहे; दुसऱ्या कोणाला आला किंवा नाही कोणास ठाऊक?

मी बुलडाण्यात आलो म्हणजे नेहमी म्हणतो, की हा बुलडाणा जिल्हा म्हणजे एक चमत्कार आहे. १९८५ मध्ये कापसाचं आंदोलन सुरू व्हायचं होतं तेव्हा सीआयडीचे एक साहेब वर्ध्याला मला भेटायला आले. त्यांनी विचारले, की उद्यापासून तुमचा 'रास्ता रोको' चालू होणार तर कोणकोणत्या जिल्ह्यांत किती लोक रस्त्यावर येतील याचा अंदाज सांगा. आम्हांला निदान तुरुंगाची व्यवस्था करायला पाहिजे. मग मी त्यांना चंद्रपूरपासून सुरुवात करून प्रत्येक जिल्ह्याचे अंदाज सांगू लागलो. सगळं सांगून झाल्यानंतर ते मला विचारू लागले, ''बुलडाण्याचं काय? तुम्ही बुलडाण्याचं नाव नाही घेतलं.'' त्या वेळी बुलडाण्याची परिस्थिती अशी होती, की १९८० मध्ये ज्यांनी या जिल्ह्यात काम सुरू केलं होतं ते निवडणुकीच्या काळात काही वादविवाद झाल्यामुळे



आपल्यापासून दूर झाले होते. त्यामुळे, ''सध्या बुलडाण्यात आमचं काही काम नाही, तेव्हा बुलडाण्यात काही फारसं मोठं आंदोलन होईल असं काही मला वाटत नाही.'' असं मी त्या अधिकाऱ्यांना म्हटलं. ते हसले; त्यांना बहुतेक त्यांच्या खात्याकडून आधी माहिती मिळाली असणार, की बुलडाण्यामध्ये फार प्रचंड आंदोलन होणार आहे आणि मी नागपूरच्या तुरुंगात गेलो तेव्हा माझ्या असं लक्षात आलं, की तेथील बराकींपैकी तीन बराकी फक्त बुलडाण्याच्या सत्याग्रहींनीच भरलेल्या आहेत. म्हणून मी नेहमी म्हणतो, की बुलडाणा हा चमत्कारांचा जिल्हा आहे.

बुलडाण्यात असे चमत्कार कसे शक्य होतात? बुलडाण्यातील बहुतेक कार्यकर्ते स्वत:ची मोटारसायकलसुद्धा नसलेले असे आहेत; ज्या थोड्यांकडे आहेत तेसुद्धा आपल्या मोटारसायकली रॉकेलवर चालवू शकतात इतपतच आर्थिक ताकद असलेले आहेत. एखाद्या सभेसाठी, कार्यक्रमासाठी बाहेर जायला निघताना परत येईपर्यंत घरामध्ये भाकरीची सोय आहे किंवा नाही हे बायकोला विचारून घ्यावं लागतं. समोर साधनं नाहीत, हाती वर्तमानपत्रं नाहीत, हँडबिलं वाटायची म्हटली तरीसुद्धा हाती पैसे नाहीत. सकाळी उठल्यापासून रात्रीपर्यंत गावागावात जायचं तर हा प्रदेश कसा आहे? धड विदर्भात नाही आणि धड मराठवाड्यात नाही. त्यामुळे या जिल्ह्यातले लोक मराठवाड्यातल्या लोकांना आपले वाटत नाहीत आणि विदर्भातल्या लोकांनाही फारसे आपले वाटत नाहीत. अशा प्रदेशामध्ये अशी ही साधनरहित कार्यकर्ती मंडळी फिरतात आणि एवढं मोठं काम उभं होतं कसं काय, असा प्रश्न मला नेहमी पडायचा. त्यावर मला एकदा शेवाळेगुरुजी म्हणाले, ''तुम्ही चेष्टा करता आहात आमची. तुम्हाला माहीत नाही होय, बुलढाण्यात कसं काय काम होतं ते?'' मी म्हटलं, ''नाही, खरंच समजत नाही.'' तेव्हा ते म्हणाले, ''अहो, तुम्हीच आम्हाला समजावून सांगितलं, की बाजारपेठेमध्ये व्यापारी एकत्र येतात आणि बाजारपेठेत नेमकी अशी एक किंमत ठरते, की त्या किमतीमध्ये उत्पादकांचा जेवढा मालाचा पुरवठा तेवढाच ग्राहकांच्या मागणीचा रेटा असावा अशी व्यवस्था तयार होते.'' खरं आहे. त्या काळच्या भाषणांमध्ये मी अर्थशास्त्रातला एक अत्यंत कठीण गणिती सिद्धांत साध्या मराठी भाषेत समजावून सांगितला होता. ''एखाद्या गजबजलेल्या घरामध्ये एखादं नवविवाहित जोडपं असलं, की त्या दोघांचं ठरलेलं असतं, की सगळ्या लोकांना चुकवून जितकं जमेल तितकं कुठंतरी भेटायचं. मग, ती सगळी मंडळी हजर असतानासुद्धा डोळ्याच्या नुसत्या एका कटाक्षाने किंवा चेहऱ्यावरील एखाद्या स्नायूच्या हालचालीनेसुद्धा 'पाच मिनिटांनी मी अमक्या अमक्या नारळाच्या झाडाखाली

जाणार आहे,' असा निरोप ते देऊघेऊ शकतात. अशीच संपर्क व्यवस्था बाजारपेठेच्या या घटकांमध्ये असते आणि त्यामुळेच बाजारपेठेची व्यवस्था यशस्वी होते. पण, बाजारपेठेतील तीच माहिति आकड्यांमध्ये कागदावर मांडली आणि सचिवालयात पाहोचली, की ती मेलेली असते, त्यामुळे नियोजन हे अयशस्वी होतं आणि बाजारपेठ यशस्वी होते.'' असा हा सिद्धांत मी समजावून सांगितला होता. गुरुजी म्हणाले, ''बुलडाण्यात हेच झालं. इथं सर्व शेतकऱ्यांच्या पोटामध्ये दु:ख आहे आणि त्या दु:खावर जे औषध आहे ते तुमच्या शब्दांत सांगणारे आम्ही गेलो की प्रेमात पडलेल्या माणसाला जसं एकमेकांकडे नुसतं पाहिलं तरी मनातील विचार समजातो, तसं बुलडाण्यामध्ये आम्ही ज्या ज्या गावांत गेलो तिथं भाषणंसुद्धा निमित्तमात्र झाली. शरद जोशींची माणसं आली असं म्हटल्यानंतर डोळ्याला डोळे भिडल्यानंतर लोकांच्या लक्षात येतं, की आपण जे काही शोधत होतो ते गवसलं आणि म्हणून बुलडाण्याचे कार्यक्रम नेहमी यशस्वी होतात.''

हे साधं गूढ सांगणारा मनुष्य कोण ? अर्थशास्त्राचा पदवीधर नाही, शाळेमध्ये शिकविणारा साधा मास्तर. प्रत्यक्ष श्रीकृष्णालासुद्धा प्राकृतामध्ये अर्थ सांगणारा ज्ञानेश्वर एकच भेटला. माझं भाग्य असं, की जे काही अर्थशास्त्र मी सांगितलं ते लातूरमध्ये अर्धवट कानडी, अर्धवट मराठी,अर्धवट उर्दू अशा भाषेत सांगणारा एक 'पाशा पटेल' नावाचा ज्ञानेश्वर मला भेटला, बुलडाण्याच्या भाषेत सांगणारा एक 'गुरुजी' भेटला. प्रत्येक जिल्ह्यामध्येच नव्हे तर महाराष्ट्राबाहेर प्रत्येक राज्यामध्ये खुल्या बाजारपेठेचं हे अत्यंत गहन अर्थशास्त्र; जेव्हा जगामध्ये कोणीही ते मानायला तयार नव्हतं, तेव्हाही सांगणारे ज्ञानेश्वर भेटले आणि तेसुद्धा भगवद्गीतेची जडजंबाळ भाषा टाकून साध्या, जनसामान्यांच्या भाषेत सांगणारे जे लोक मला भेटले त्यांत गुरुजी एक होते.

सानेगुरुजींनाही स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जीव नकोसा झाला आणि त्यांनीही विष खाऊन आत्महत्या केली. जगामध्ये सात्त्विक सात्त्विक म्हणून काही असेल, सोज्वळ सोज्वळ म्हणून काही असेल, शांत प्रकृतीचं म्हणून काही असेल तर त्या सगळ्यांची मूर्ती म्हणजे सानेगुरुजी. शेवाळेगुरुजी शांत होते. विनोदी होते; पण ते काही सानेगुरुजी नव्हते हे नक्की. या दोन भिन्न प्रकृतींच्या माणसांमध्ये एक समानता होती. साने गुरुजींची त्यांच्या कार्यावर जेवढी निष्ठा आणि प्रेम होतं, तेवढी निष्ठा आणि प्रेम, कदाचित् त्याहीपेक्षा जास्त निष्ठा आणि प्रेम शेवाळेगुरुजींनी शेतकरी संघटनेच्या कामाबद्दल बाळगली. मग प्रश्न असा पडतो, दोघांपुढेही अशी कोणती समस्या उभी राहिली, की



त्यामुळे त्यांना जीवन असह्य व्हावं. जर का शेवाळेगुरुजींनी केलेल्या कामाचं श्रेय तुम्ही मला भरभरून देत असाल तर माझ्या कार्यकर्त्यांना इतकी बिकट अवस्था सोसावी लागली, अशा दुर्धर जीण्याला सामोरं जावं लागावं याची जबाबदारीही माझ्यावर येते.

कोणताही पक्ष किंवा संघटना आपल्या कार्यकर्त्यांच्या चरितार्थाची, उपजीविकेची काहीतरी सोय करतो. मी या बाबतीत नालायक ठरलो हे कबूल करायला हवं. आपल्या कार्यकर्त्यांनी घरामध्ये सगळ्या अडचणी सोसून, धावपळ करून जर का हे काम निभावलं तरच, जशी सोन्याला आच लागली तरच त्याची परीक्षा होते तशी, खरी परीक्षा होईल आणि आपण जो काही विचार सांगायला निघालो आहोत तो लोकांपर्यंत ते पाहोचवतील असं मानायचं काही कारण नव्हतं. पण, वर्षानुवर्षे लुटल्या गेलेल्या शेतकऱ्यांच्या संघटनेला आर्थिक बळ मिळवायचं कोठून? मनात खंत वाटे. त्यावर शेवाळेगुरुजी म्हणायचे, ''तुम्हाला काय वाटतं, आम्हाला तुमचे शब्द लोकांपर्यंत पाहोचवता येणार नाहीत? साधनांनी संपन्न लोक तुमच्याबरोबर येऊन भाषणं करून दाखवतील पण लोकांचा त्यांच्यावर काहीही परिणाम होणार नाही. आम्हीमात्र लोकांसमांर तुमचे विचार ठेवले, की ते त्यांच्या मनाला भिडतात; कारण आमचं सोनं मुशीच्या आचेतून तावूनसुलाखून सिद्ध झालेलं आहे; हिणकस सोन्याला त्याची कधी बरोबरी करता येणार नाही.''

कार्यकर्त्यांच्या चरितार्थाची, उपजीविकेची काही सोय कण्याची व्यवस्था उभी करणे ही माझी जबाबदारी आहे हे खरे; पण, एक दिवस, कदाचित गोविंद गुरुजींची जागा येईल आणि त्या वेळी तुम्हावर अशीच श्रद्धांजली वाहण्याची पाळी येईल. माझी अशी इच्छा आहे, की यापुढे जो काही चळवळीचा प्रयत्न करायचा तो आपल्या कार्यकर्त्यांनी काहीतरी खंबीर व्यवस्था करूनच चालवायचा आहे एवढाच निश्चय त्या वेळी तुम्ही करावा.

स्वातंत्र्य मिळालं तरी सानेगुरुजी गेले. ज्या स्वातंत्र्याकरिता आपण एवढं आंदोलन केलं, त्याग केला ते हेच का स्वातंत्र्य? हा प्रश्न त्यांना टोचत असावा. मला अशी शंका येते, की गेली पंचवीस वर्षे शेतकऱ्याच्या सन्मानाकरिता आंदोलन करता करता 'केवळ आमच्या हातापायातल्या बेड्या काढा आणि मग दाखवतो आम्ही काय करू शकतो ते' या निर्धाराचा संदेश गावोगाव पोहोचविणाऱ्या शेवाळेगुरुजींना अलीकडची वर्तमानपत्रं पाहिली, कानावर ज्या बातम्या येतात त्या ऐकल्या म्हणजे खरंच दु:ख होत असावं. आम्ही शेतकऱ्यांचे पुढारी आहोत असं म्हणणारी माणसं जेव्हा म्हणू लागतात, ''आपण जर का निर्यात खुली केली, आयात खुली केली तर आमचं कसं काय धड चालायचं?

तेव्हा, आम्हाला तुमचं स्वातंत्र्य नको. आम्हाला तुमचा सन्मान नको. त्याऐवजी आम्हाला तुमचं संरक्षण द्या, आमचा बचाव करा.'' म्हणजे कसाई बकरी घेऊन चालला आहे आणि बकरीला सुटायची संधी मिळाल्याबरोबर कसाई त्या बकरीला म्हणतो, 'कोठे जातेस पळून? बाहेर गेलीस तर तुला लांडगा खाईल. माझ्या दोरीला बांधून घे, एकदाच काय ती सुरी चालायची ती चालेल.' या पद्धतीने शेतकऱ्यांचे नेते म्हणवणारे लोक 'आमचा शेतकरी जगातल्या शेतकऱ्यांशी स्पर्धा करायला उतरणार नाही, तशी त्याची पात्रता नाही, त्यापेक्षा त्याला सरकारने संरक्षण दिले तर त्याच्यातच आनंद मानेल' असे म्हणताना आणि त्यांच्याबरोबरीने शेतकरी संघटनेत काही काळ काढलेले कार्यकर्तेही तसेच म्हणताना पाहिल्यानंतर शेवाळेगुरुजींची स्थिती सानेगुरुजींसारखीच झाली असावी.

तेव्हा, ही लढाई चालू ठेवणे यापलीकडे जास्त कोणती श्रद्धांजली नाही. पण, शेवाळेगुरुजींच्या मनामध्ये शतेकरी संघटनेवर नितांत निष्ठा होती. ''हिंदुस्थानातील शेतकरी जगातील कोणत्याही शेतकऱ्यापेक्षा कमी नाही, हिंदुस्थानातल्यासारखा चांगला सूर्यप्रकाश कोठे नाही, हिंदुस्थानात मुबलक पाणी आहे. तेंव्हा, जगाशी टक्कर झाली तर ती टक्कर आम्ही देऊ शकतो. आम्हाला दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची गरज नाही, आमच्या हातापायात बेड्या घातल्या आहेत, त्या काढा आणि आमचा पराक्रम पहा.'' ही जी शेवाळेगुरुजींची निष्ठा होती, त्यातील एक कण जरी आपण आपल्या मनात बाणून येथून गेलो तर शेवाळे गुरुजी नसताना, येत्या काही काळामध्ये ज्या काही मोठ्या लढाया द्याव्या लागणार आहेत, त्यांतही आपण यशस्वी होऊ. त्यासाठी जी काही तयारी करावी लागणार आहे त्या तयारीच्या वेळी शेवाळेगुरुजींची स्मृती आपल्याला स्फूर्ती देवो आणि शेतकऱ्यांना सन्मानाने व सुखाने जगता यावे याकरिता शेतीमालाला रास्त भाव हा एककलमी कार्यक्रम राबवण्यासाठी अधिक बळ मिळो, अशी प्रार्थना करतो.

(शेतकरी संघटक दि. २१ मे २००१)

■■



# दोन मनस्वी माणसे

महत्त्वाच्या घटना सहसा एकाकी घडत नाहीत. आनंदाच्या सुखदायक घटना 'जवापाडे' असल्यामुळे एकट्यादुकट्या फिरत असतात. मनाला चटका लावून देणाऱ्या दु:खद गोष्टी मात्र टोळीटोळीने फिरतात आणि एकदम कडाडून पडतात. 'देनेवाला जब भी देता है, पूरा छप्पर फाडके देता है,' हा अनुभव फार दुर्मिळ भाग्यवंतांना येत असेल. 'पण, पाऊस सरींनी येत नाही, मुसळधार कोसळतो - It never rains, it pours हा अनुभव अनेकांना आहे.

८ मे २००२ हा असाच दु:खद घटनांचा वर्षाव करणारा ठरला. एकाच दिवशी दुर्गाबाई भागवत आणि मनोहर आपटे यांच्या निधनाची बातमी कळली. दुर्गाबाई ९२ वर्षे वयाच्या झालेल्या, म्हणजे एक पिढी आधीच्या. त्यांचे जाणे समजण्यासारखे आहे. पण, मनोहर आपटे जवळपास माझ्या वयाचे. अगदी अलीकडे अलीकडेही आंबेठाणला येऊन गेलेले; आल्या आल्या घरात उपस्थित असलेल्या सर्वांच्या हाती प्रसन्न मुद्रेने एक एक गुलाबाची कळी देऊन गेलेले. मनोहरपंतांच्या मृत्यूच्या बातमीवर तर विश्वासच बसेना. आम्हा दोघांचे अनेक स्नेहसंबंधी; त्यांपैकी कोणीही अक्षरानेदखील मनोहरपंत आजारी असल्याचे कळविले नव्हते. त्यामुळे त्यांच्या मृत्यूचा धक्का अधिक हादरविणारा झाला.

दुर्गाबाई भागवत आणि माझा प्रत्यक्ष परिचय अगदीच चुटपूट. सिडेनेहॅम कॉलेजात असताना मी त्यांना एका भाषणासाठी बोलाविले होते. एशियाटिक ग्रंथालयात कधी जाणे झाले तर दुर्गाबाई म्हणजे तेथील स्थावर वाचक; त्यांच्या वाचनसमाधीचा भंग करण्याची हिंमत मला कधी झाली नाही. तरीही, दुर्गाबाई हा व्यासंग, वाणीतील प्रसाद, लालित्य आणि त्याबरोबर रणदुर्गेचा लढाऊपणा यांबाबतीतला माझ्या पिढीच्या जीवनातील आदर्श.

१९५४-५५ मध्ये आम्ही त्यांना सिडनेहॅम कॉलेजमध्ये भाषणासाठी बोलावले. मध्य प्रदेशातील एका जिल्ह्यातील आदिवासींचे जीवन, इतिहास, संस्कृती, राहणीमान यांविषयी बाई बोलल्या. रस्त्याने खाली बुंधा आणि वर हिरवळ असे दिसले, की झाड म्हणायचे इतपतच वनस्पतिसृष्टीशी संबंध असलेल्या आम्हाला बाईंनी इतक्या वेगवेगळ्या वृक्षांशी, वनस्पतींशी परिचय घडवून दिला की सारे सभागृह भारून गेले. त्यांचे भाषण

म्हणजे व्यासंगपूर्ण माहितीचा प्रसादपूर्ण धबधबा.

आदिवासी प्रदेशातील एका जुन्या देवळात अभ्यासाकरिता गेल्याची आठवण त्यांनी सांगितली. तेथील शंकराच्या पिंडीपुढील नंदीला स्त्रियांनी हात लावायचा नाही असा तेथील नियम; हात लावला तर बाईला मूल होत नाही अशी समजूत. कोणताही अभिनिवेश न ठेवता त्यांनी सहज म्हणून टाकले, ''माझ्या बाबतीत असा काहीच धोका नसल्यामुळे मी स्पर्श केला.'' एका साध्या वाक्यात बाईंनी आपल्या एकाकी आयुष्याचा एखाद्या शंकराचार्यांच्या तटस्थ वृत्तीने असा काही उल्लेख केला, की साऱ्यांची मने हेलावून गेली.

आमचे प्राचार्य एस.के. मुरंजन बँकिंग विषयातील तज्ज्ञ. दलित आणि वनवासी समाजाचा त्यांचा व्यासंग फार मोठा. या विषयावरील त्यांच्या लिखाणाकरिता ते प्रसिद्ध आहेत. भाषणानंतर बाईंचे आभार त्यांनी थोडक्यात मानले. आभाराच्या भाषणात शेवटी ते म्हणाले, ''एवढी विद्वता, कर्तृत्व, प्रसाद मूर्तिमंत समोर पाहिल्यानंतर माझ्यासारख्या अश्रद्ध माणसालासुद्धा वाटून गेले, की बाईंनी आदिवासींच्या देवळातील नंदीला हात लावायला नको होता.'' त्या काळात असा शेरा थोडा आगतुंकच. सारी सभा हास्यकल्लोळात बुडून गेली आणि बाईंनी- त्या वेळी त्यांचे वय ४५ च्या आसपास असणार- स्त्रीसुलभ संकोच आणि कर्तव्यनिष्ठ कठोर तटस्थपणा या दोघांचे असे काही अजब मिश्रण केले, की समोर बसलेल्या तरुण विद्यार्थीविद्यार्थिनींची आयुष्ये उजळून गेली.

आणीबाणीच्या शेवटच्या काळात मी हिंदुस्थानात परतलो. बांगलादेशाच्या लढाईनंतर 'दुर्गा' म्हणून गाजलेल्या इंदिरा गांधी यांनी भ्रष्टाचार आणि सत्तापिपासा झाकण्यापोटी आणीबाणी लादली. हजारो विरोधकांना तुरुंगात डांबले. सक्तीच्या कुटुंबनियोजनासाठी सरकारी गाड्या गावोगाव फिरू लागल्या. सगळीकडे दहशतीचे वातावरण होते. मुंबईच्या विमानतळावर उतरून मी दादर स्टेशनवर पुण्याच्या गाडीत चढलो. या गाडीतील प्रवासी सतत तारस्वराने राजकारणाचा काथ्याकूट करण्याकरिता आणि चढत्या स्वरात आपली मते आग्रहाने मांडण्याकरिता प्रसिद्ध; पण त्या दिवशी कोणी एक चकार अक्षरसुद्धा बोलत नव्हते. इतर देशांतील हुकूमशहांच्या तुलनेने पाहिले तर येथील सरकारी दडपशाही अगदीच हलकीफुलकी; पण तेवढ्यानेही तमाम प्रजा भयभीत झालेली होती. वरून आलेल्या लाथा माथी झेलणे आणि खालच्या लोकांवर लाथा झाडणे हे ज्यांचे ब्रीद असे बुद्धिजीवी आणि नोकरशहा यांची तर खरोखरच पाचावर धारण बसलेली. विरोधाचा शब्दही कोणी काढण्यास तयार नाही. पुढे, आणीबाणीच्या शेवटी निवडणुका जाहीर



झाल्या तेव्हा, आजकाल ध्येयनिष्ठेच्या वारेमाप आरोळ्या ठोकणारे शरद पवार एका प्रचारसभेत म्हणाले, ''विरोधकांना आम्ही तुरुंगातून सोडले आहे ते तुरुंगाची रंगरंगोटी करायला सवड मिळावी म्हणून. निवडणुका आटोपल्या म्हणजे सारे विरोधक पुन्हा तुरुंगात जातील.'' सारा हिंदुस्थान निर्वीर्य झालेला. त्या वेळी एक वीरांगना उठली, कऱ्हाड येथील मराठी साहित्य संमेलनात बोलली, एवढेच नव्हे तर, महाराष्ट्रभर गावोगाव जाऊन आणीबाणीविरोधी प्रचाराची रणधुमाळी दुर्गाबाईंनी उठविली. महाराष्ट्रात कॉंग्रेसचा पाडाव झाला त्याचे प्रमुख श्रेय 'पुलं'बरोबर दुर्गाबाईंना द्यायला पाहिजे.

वेगवेगळ्या संस्था दुर्गाबाईंना निमंत्रण देऊन त्यांचे भाषण घडवून आणण्यासाठी उत्सुक होत्या. अडचण एवढीच, की बाईंच्या भाषणाचा विषय जाहीर करताना अगदी अप्रत्यक्षपणे कोणत्याही प्रकारच्या राजकीय संदर्भाचा उल्लेख करण्याची कोणाची हिंमत होत नसे. दुर्गाबाईंचे भाषण आणि विषय 'आणीबाणी' किंवा 'सध्याची राजकीय परिस्थिती' असे प्रसिद्ध झाले, की भाषणाच्या आधीच नियोजकांची उचलबांगडी तुरुंगात होण्याची निश्चिंती. मग, नियोजक, बाईंच्या भाषणाचा विषय, दुरान्वयानेही राजकारणाशी सबंध लागणार नाही अशा पद्धतीने देत. बाईंना विचारीत, ''तुमच्या भाषणाचा विषय 'असा असा' लिहिला तर चालेल ?'' बाईंचे उत्तर सर्वदूर मशहूर झाले. ''तुम्ही विषय कोणताही द्या, मी आणीबाणीवरच बोलणार आहे.''

दुर्गाबाई, दुर्दैवाने, महाराष्ट्रातील समाजवाद्यांच्या दलदलीत अडकल्या. कारुण्यभावनेने प्रत्येक माणसाला जगण्याची आणि व्यक्तिविकासाची संपूर्ण संधी मिळाली पाहिजे एवढ्या मूलभूत भावनेतून 'कसणाऱ्याची धरणी आणि श्रमणाऱ्याची गिरणी' यापलीकडे जाऊन राष्ट्रीयीकरण, शहरीकरण, औद्योगिकीकरण अशा अमानुष कार्यक्रमांपर्यंत समाजवादी पोहोचले आणि दुर्गाबाईंची मोठी घुसमट झाली. 'पुलं'प्रमाणे त्यांनीही आणीबाणीच्या काळात मिळालेल्या तेजोवलयाचा आणि लोकप्रियतेचा हव्यास ठेवला नाही; सरळ मोकळ्या होऊन त्या आपल्या व्यासंगाच्या विषयाकडे वळल्या आणि शेवटपर्यंत कर्मयोग भावनेने ते काम करीत राहिल्या.

बाई गेल्या, दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रातूनच कळाले. त्यांच्या अंत्यविधीला जाणेही शक्य झाले नाही. नामदेव ढसाळ आदी दोनचार माणसे हजर होती असे कळले. पण, आयुष्यात काहीतरी करून दाखविण्याची जिद्द बाळगणाऱ्या हजारो लोकांच्या मनात एका इंग्लिश कवीच्या ' To ramparts we carry and not a horn was blown' या ओळीत म्हटल्याप्रमाणे आपल्या जीवनाच्या आदर्श बनलेल्या सेनापतीला मूठमाती देत

असल्यासारखे ऊर दाटून आला.

दुर्गाबाई समाजवादाच्या दुष्टचक्रात अडकून गेल्या. ६ मे रोजी निधन पावलेले मनोहर आपटे यांनी हा धोका ओळखून या दुष्टचक्राकडे चुकून पाहिलेही नाही.

पुण्यातील ज्ञानेश्वर विद्यापीठाचे संस्थापक आणि कुलगुरू म्हणून मनोहरपंत प्रसिद्ध आहेत. यापलीकडे त्यांची कोणाला फारशी आठवण राहील अशी चिन्हे दिसत नाहीत. मनोहर आपटे हे माझ्या आयुष्यात मला भेटलेल्या लोकविलक्षण अशा पाचसहा व्यक्तिमत्त्वांपैकी एक. सरकारी मान्यतेची अपेक्षा न बाळगणारे एक विद्यापीठ स्थापन करण्याची कल्पना त्यांनी मला फार फार पूर्वी बोलून दाखविली होती. लोकविलक्षण कल्पना मांडण्यात मीही काही कच्च्या गुरूचा चेला नाही; पण, मलाही, नोकरीसाठी लागणाऱ्या प्रमाणपत्रांचे छापखाने झालेली विद्यापीठे सरकारी मान्यतेखेरीज उभी राहू शकतील हे पटेना. समाजवाद संपला, सरकारशाही संपली म्हणजे शिक्षणक्षेत्रातील सरकारचा हस्तक्षेप संपेल, बाजारपेठेवर आधारित अर्थव्यवस्था उभी राहील आणि बनावट प्रमाणपत्रांवर आपल्या पित्त्यांची नोकरभरती करणे शक्य राहणार नाही; अशी नोकरदारांची भरती केली तर मालकाचा व्यवसाय खड्डयात जाईल हे सगळे मीही मानीत होतो.

खुलेपणाच्या विचाराचा प्रचार मी शेतकरी संघटनेमार्फत करीत राहिलो. स्वतंत्र भारत पक्षाच्या माध्यमातून केला; पण खुल्या व्यवस्थेतील शासननिरपेक्ष संस्था उभी करणे आणि चालवून दाखविणे मला जमले नाही.

ज्ञानेश्वर विद्यापीठाच्या प्रकल्पाबद्दल मी शंका व्यक्त केल्यानंतर वर्षभरातच आपटे भेटले आणि विद्यापीठ चालू झाल्याचे त्यांनी सांगितले. जागेची अडचण पुण्याच्या विधी महाविद्यालयातील वापरात न राहिलेली जागा उपयोगात आणून सोडविली. अध्यापकवर्ग मिळविला. प्रयोगशाळा, कार्यशाळा यांच्या सोयी परिचितांतील उद्योजकांच्या चालत्याबोलत्या संस्थांत केल्या. ज्ञानेश्वर विद्यापीठाच्या पहिल्या पदवीधर विद्यार्थ्यांना पुण्यातील उद्योजकांनी अहमहमिकेने नोकरीस लावून घेतले. शासननिरपेक्ष विद्यापीठाचा प्रयोग कला, वाणिज्य, विज्ञान या क्षेत्रात तुलनेने फारसा दुष्कर नाही. अभियांत्रिकी क्षेत्रात तो आपट्यांनी यशस्वी करून दाखविला; पण वैद्यकीय क्षेत्राचे काय? आपट्यांच्या योजनेला येथे विरोध फक्त सरकारचाच नाही तर वैद्यकीय संस्थांचाही. आपट्यांवरील विश्वासाने विद्यार्थी आले. सर्वोच्च न्यायालयाने ज्ञानेश्वर विद्यपीठाचा वैद्यकीय अभ्यासक्रम चालविण्याचा हक्कही मानला. उन्हाळी सुट्या चालू झाल्या, की पुण्याच्या आसपास वसलेल्या महाविद्यालयात प्रवेश मिळावा यासाठी मी मध्यस्थी करावी म्हणून



गळ घालणाऱ्यांच मोठी झुंबड उडते. आपट्यांना 'याची देही याची डोळां' ज्ञानेश्वर विद्यापीठांत प्रवेश मिळावा यासाठी झुंबड उडालेली पहायला मिळाली; कृतकृत्य वाटले.

आपटे हा माणूसच मोठा अफलातून. ही असली विक्षिप्त माणसे पुण्याच्या आसपास खूप पिकतात; जातिवाचक उल्लेख करायचा तर चित्पावनांत.

अगदी तरुण वयात वडीलबंधू नारायण आपटे यांच्या, गांधी खुनाच्या कटातील भूमिकेमुळे साऱ्या घरावर एक सावट आलेले; पण विद्यार्थी मनोहरने आपल्या बुद्धीच्या तल्लखपणाने अभियांत्रिकीच्या एका विशेष क्षेत्रात प्रावीण्य मिळविले; एवढेच नाही तर, त्या क्षेत्रात एक अभिनव उद्योग प्रकल्प यशस्वी करून दाखविला.

लोकमान्य टिळक म्हणायचे, ''कल्पना काय, पैशाची अफू घेतली, की पासरीभर कल्पना सुचतात.'' आपट्यांची कल्पकता लोकविलक्षण, पण अशा कल्पना जमिनीवर उतरवून दाखविण्याची त्यांची हातोटीही तितकीच लक्षणीय.

गेली पंचवीसतीस वर्षेतरी मी खुल्या व्यवस्थेचा विचारवंत म्हणून लोकांच्या डोळ्यासमोर आहे. प्रत्येक मनुष्यप्राणी अनन्यसाधारण आहे, विश्वातील गूढ सत्याचा शोध तो आपापल्या अनन्यसाधारण प्रयोगशाळेत करीत असतो. अंतिम सत्य कोणा परमेश्वरी अवताराला कळलेले नाही, प्रेषिताला कळलेले नाही. ते कळले असल्याचा दावा मांडणाऱ्या लोकाग्रणींनी मनुष्यजातीचे नुकसान केले. मनुष्यजातीची जी प्रगती झाली ती आपल्या स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याच्या अव्याहत खटाटोपात असणाऱ्या माणसांनी केली. व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधित राखणे यापरता सत्यशोधनाचा आणि कल्याणाचा दुसरा मार्ग नाही. आपले स्वातंत्र्य जोपासताना दुसऱ्याच्या पायावर पाय पडणार नाही याची काळजी घ्यावी, त्याखेरीज स्वातंत्र्याच्या मूलतत्त्वाचा काहीही अपवाद नाही.'' अशी मांडणी मी करीत आहे. भस्मासुराप्रमाणे, सरकार ज्याला ज्याला स्पर्श करील त्याचा त्याचा विनाश घडवील या विचारावर मी शेतकऱ्यांचे आंदोलन उभे केले. ग्रामीण स्त्रियांची मोठी आघाडी उभी केली. स्वतंत्रतावादाचा मी खंदा पुरस्कर्ता; पण आपटे भेटले म्हणजे आपली स्वतंत्रतेवरील निष्ठाही थोडी कच्ची तर नाही असा माझ्या मनात प्रश्न उभा राही. मी स्वतंत्रतेचा मूलतत्त्ववादी आहे, आपटे स्वतंत्रतेच्या विश्वासाने ओतप्रोत भरलेले.

इतर कोणाशीही चर्चा करायची म्हणजे स्वतंत्रतेच्या मूलसिद्धांताचा काथ्याकूट कण्यातच 'घडाभर तेल' संपून जायचे. 'It is not the business of the government to do business ' आणि ' Power corrupts and absolute power corrupts

absolutely' या दोन उक्तींवर प्रखर विश्वास असल्यामुळे आमच्या दोघांच्या भेटीगाठीत चर्चा, विचारविनिमय व्हायचा तो स्वतंत्र व्यवस्था प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आवश्यक बारकाव्यांचा.

असल्या बारकाव्यांच्या बाबतीत आपटे 'वल्ली' म्हणावे इतके लोकविलक्षण होते. त्यांच्यासमोर एखादा प्रश्न मांडला, की खटकाही न दाबता एखादी लोकविलक्षण कल्पना ऐकायला मिळे.

नैसर्गिक खतामुतांचा पुरवठा शेतीसाठी पुरेसा होत नाही, त्यामुळे बहुसंख्य जनता शौचासाठी बहिर्दिशेला जाणारी असूनही खताचा तुटवडा पडतो असे मी म्हटल्यावर आपट्यांची योजना दोन दिवसांत तयार. प्रत्येक बसच्या थांब्यावर आणि इतरत्र जागोजागी स्वच्छतागृहे उभी करावीत. प्रवेशशुल्क घेऊन त्यांचा उपयोग करू द्यावा; एकत्र झालेले खत शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे यासाठी त्यांची योजना तयार. 'सुलभ शौचालयां'नी ही कल्पना प्रत्यक्षात उतरवून दाखविली आहे.

पूर्वी मी टपाल खात्यात प्रशासकीय सेवेत होतो. टपालाच्या हाताळणीच्या गणिती मांडणीचा मी आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यताप्राप्त अभ्यासक आहे. भारतातील पिनकोड प्रणाली तयार करण्यात माझा महत्त्वाचा हातभार लागलेला होता. या विषयावर चर्चा चालू असतांना आपट्यांनी म्हटले, "या पिनकोडची इतकी माथेकूट कशाला? साऱ्या पृथ्वीच्या पाठीवर अचूक अक्षांश आणि रेखांश दिला, की कोणत्याही माणसाचा नेमका पत्ता कळून जातो.' टपालव्यवस्था अक्षांशरेखांशांच्या पत्त्यावर करण्याची त्यांच्या बुद्धीची एक चमक.

अशा योजनेतील अडचणी मी त्यांना समजावून सांगितल्या; पण मी मांडलेल्या अडचणींना गणकयंत्राच्या युगात काही महत्त्व नाही अशी त्यांची खात्री.

गणकयंत्र हा आपट्यांचा खास आवडीचा विषय. विजय भटकर आणि सी-डॅकचे इतर तज्ज्ञ यांच्याबरोबर त्यांनी देशी भाषांच्या वापरासाठी अनेक सॉफ्टवेअर सिस्टम्स् उभ्या केल्या. नॅशलन इन्फरमॅटिक्स सेंटरचा माझा संबंध आला तो मनोहर आपट्यांच्या मध्यस्थीनेच.

असल्या लोकविलक्षण प्रज्ञावंताच्या मनात स्वदेश, महाराष्ट्र, मराठी भाषा, मराठी संत यांच्याबद्दल, अतिरेकी म्हणावा इतका जिव्हाळा होता. या कोणत्याच गोष्टीबद्दल मला फारशी कदर नाही. ज्ञानेश्वर विज्ञापीठाच्या पदविदान समारंभात पसायदान म्हटले जाते आणि त्यावेळी सर्व सभा उठून उभी राहते हे मला हास्यास्पद वाटते. मनोहरपंतांना



मी हे बोलूनही दाखवले होते. त्यांच्या बुद्धीच्या झेपेला कोणताच अडसर नव्हता; पण मराठी भाषा आणि ज्ञानेश्वर हे त्याला अपवाद. हे विषय निघाले, की एरवी प्रकांड कठोर तर्क आणि कर्मठ व्यवहार मांडणारे आपटे एकदम वेगळे दिसू लागत. त्यांचा चेहरा बदले, मोहरा बदले, भाषा तर पार पालटून जाई.

आपटे हे एक अजब रसायन होते. ते पटकन निघून गेले. शेवटचे दर्शनही घेता आले नाही.

अशी मनस्वी माणसे मला मनापासून आवडतात. मनाला भावलेल्या गोष्टींकरिता सर्वस्व उधळून टाकण्याचा बेदरकार धाडसीपणा फक्त तारुण्यातच येऊ शकतो. ज्या काळात तरुण माणसेही म्हातारी बनू लागली आहेत, त्या काळात मनोहरपंतांनी त्यांचा मनस्वीपणा जपला आणि आपल्या एका दिवटीने ज्ञानेश्वर विद्यापीठाच्या कार्यकर्त्यांत एक दीपमाला तयार केली. त्यांच्या स्वतंत्रतेच्या आग्रहाने माझ्यासारख्या किती लोकांना मानसिक आधार मिळाला असेल याची गणती करणे कठीण आहे. मनोहरपंत गेले आणि माझ्यातीलच एक भाग मरून गेला असे वाटले.

(शेतकरी संघटक, २१ मे २००२)

■■

# एका कामगार चळवळीचा अस्त

१६ जानेवारी १९९७. रात्री दहाची वेळ. सकाळी उठून मुंबईला काही महत्त्वाच्या बैठकांकरिता जायचे होते म्हणून कागदांची जुळवाजुळव करत होतो. तेवढ्यात रघुनाथदादांचा फोन आला, "उद्याची मुंबईची बैठक होणार का? टेलिव्हिजनवर बातमी ऐकली का? डॉ. दत्ता सामंतांचा खून झाला आहे. उद्या मुंबईत बरीच गडबड असण्याची शक्यत आहे." मुंबईत एकदोन फोन केले. चौकशी केली. बैठक भायखळा म्हणजे भर कामगार वस्तीत असली तरी काही अडचण होणार नाही याची खात्री करून घेतली. ज्यांना शक्य होते, त्यांना निरोप दिले. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता निघायचे ठरले होते, त्या ऐवजी पाचलाच निघालो.

लोणावळ्याला वृत्तपत्रे मिळाली. सगळ्यांतच मोठी शीर्षके, फोटो, चौकटी आणि अग्रलेख घालून डॉक्टरसाहेबांच्या हत्येबद्दल मजकूर होता. प्रत्यक्ष डोक्यालाच अनेक गोळ्या लागल्यामुळे डॉक्टरीचे सर्व कसब वापरले जाऊनही चेहरा प्रचंड सुजलेला; जेमतेम ओळख पटण्यासारखा. हत्याऱ्यांबद्दल नुसत्याच वावड्या. कोणी म्हणे हे काम दाऊद इब्राहिमचे; कोणी म्हणतो अरुण गवळीचे; कोणी म्हणतो छोटा राजन. काही जणांना वाटते गिरणी मालकांनी जमिनीच्या प्रकरणी हत्या घडवून आणली असावी. डॉक्टरसाहेब खुल्या व्यवस्थेचे विरोधक; बहुराष्ट्रीय कंपन्यांचे विरोधक, तेव्हा अशा कंपन्यांच्या म्होरक्यांनीच काटा काढला असावा असा एक सूर.

ठाण्याच्या खाडीचा पूल ओलांडला, की उजवीकडे वळणारा घाटकोपरकडे जाणारा एक रस्ता, मोठा बकाली. बाजूला दुतर्फा कचऱ्यांचे ढीग आणि झोपडपट्ट्यांच्या मधून कंटेनरांचे इमले. या रस्त्याने आज बारा वर्षांनंतर गाडी घेतली. पूर्वी अनेकदा या रस्त्याने जायचो ते दत्ता सामंतांच्या पंतरनगरमधल्या जुन्या घरी जाण्यायेण्याकरिता. त्यामुळे या रस्त्यालाच आम्ही 'डॉ. दत्ता सामंत रोड' असे नाव देऊन ठेवले होते.

मध्ये बराच काळ लोटला, त्यामुळे पंतनगरमधले घर विचारत विचारतच शोधावे लागले. तेथे पोचलो तेव्हा ९ वाजले होते. लोक जथ्याजथ्याने तिकडे जात होते; पण अगदी आसपासच्या भागातील लोकही दैनंदिन कामाच्या घाईत लोकल पकडण्याकरिता चालले होते.

शवयात्रा १० वाजता निघणार होती, म्हणून मी मुद्दामच इतक्या लवकर गेलो. तेथे



जमणाऱ्या लोकांत बहुतेक सर्व समाजवादी, कामगारवादी, एके काळी काँग्रेस शासनाविरुद्ध लढ्यात बरोबर आलेले, आज त्यांच्या विचारसरणीला चिकटून राहिल्याने मागे पडलेले. अशा प्रसंगीतरी त्यांच्या गाठीभेटी व्हाव्यात असे वाटत नव्हते. पंतनगरच्या घरासमोर दोनतीनशे दर्शनेच्छुकांची रांग लावलेली होती. रांगेत उभे राहिलो असतो तर अर्धापाऊण तासतरी गेला असता; तेथूनच नमस्कार करून जावे अशा विचारात होतो, तेवढ्यात तेथील एका कार्यकर्त्याने मला ओळखले आणि रांग ओलांडून मला आत नेले. विनीताताई, प्रकाश, भूषण यांच्या चेहऱ्याकडे खरेच पाहवत नव्हते. दहा वर्षांपूर्वीच्या अनेक आठवणी झपाट्याने येऊन गेल्या; पण त्या सगळ्याच आता काळाच्या ओघाने विटून गेलेल्या आणि निरर्थक झालेल्या.

डॉक्टरांची माझी पहिली गाठभेट चाकणच्या कांदा आंदोलनातच झाली. चाकणला कांद्याची पोती रस्त्यावर टाकून, आम्ही रस्ता अडवून बसलो होतो. सुरवातीला जे काही लोक रस्त्यावर अडकले, त्यांतच डॉक्टरसाहेब आणि त्यांचे सहकारी होते. मुंबईहून आंबेगाव जुन्नरकडे जाताना ते चाकणमध्ये अडकले. मी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयाच्या इमारतीत उपोषण करत होतो. कार्यकर्ते डॉक्टरांना घेऊन माझ्याकडे आले. रस्त्याच्या कोंडीतून आम्हाला तरी सोडवा अशी माझ्याकडे विनंती करायला अनेक माणसं येत; त्यांची थोडी समजूत काढणे आणि रस्ता पार करून देणे हे सारखे करावेच लागत होते. डॉ. सामंत आले, नमस्कार-चमत्कार झाले, 'आपण प्रसिद्ध कामगार नेते आहोत, कामासाठी आलो आहोत, आम्हाला जाऊ द्या', अशी त्यांची विनंती असणार असा माझा होरा आणि त्यांना सोडून देण्याची सूचना कार्यकर्त्यांना देण्याच्या तयारीत मी होतो; पण डॉक्टरांनी अशी विनंती केलीच नाही. ते म्हणाले, "शेतकऱ्यांचे आंदोलन उभे राहते आहे ही मोठी आनंदाची आणि आशादायी गोष्ट आहे. मीही संप, आंदोलने करतो; मला आंदोलन सोडून पुढे जायचे नाही. येथे जमलेल्या शेतकऱ्यांशी दोन शब्द बोलावे एवढी इच्छा आहे."

१९८० सालच्या काळात शेतकरी आणि शेतमजूर यांच्यामध्ये मोठी खाई पेटलेली होती आणि त्यात तेल ओतण्याचे काम सातत्याने डावी मंडळी सतत करत असे. डावी चळवळ म्हणजे मजूर, कामगार यांची चळवळ आणि शेतकरी चळवळ म्हणजे निव्वळ गावातील धनदांडग्यांची स्वार्थी आघाडी असे सर्वसाधारण वातावरण होते. शहाद्याचे 'पुरुषोत्तम सेना' प्रकरण आणि त्याविरुद्ध डाव्यांनी केलेले आंदोलन; त्यामुळे शेतकरी समाज मोठा बदनाम झाला होता. शेतकरी म्हणजे ऊसवाले, कापूसवाले; भरपूर

सूटसबसिडी लाटणारे, वर टॅक्स भरण्याची जरूर नाही आणि आपल्या बहुसंख्येचा वापर करून राजकारणावर पगडा बसवणारा समाज अशी धारणा होती. 'डॉक्टरसाहेब काही तसले बोलतील तर उगाचीच बाचाबाची होईल. शेतकरी आंदोलनाच्या सुरवातीच्या काळात असे काही होणे बरे नाही. डाव्यांना चिखलफेक करायला आयती संधी मिळेल', असा विचार करून मी डॉक्टरसाहेबांच्या बरोबर रस्त्यावर गेलो. डॉक्टर सामंतांचा परिचय सर्वांना करून दिला. शेतकरी, शेतमजूर आणि शेतकरीकामगार या प्रश्नावर मी दिलेलें ते पहिले भाषण. मग डॉक्टरसाहेब उठले; बोलण्याची शैली मोठी जोरकस. माझ्या भाषणात आकडेवारी, युक्तिवाद यामुळे एक प्राध्यापकी बोजडपणा आलेला. त्याउलट, डॉक्टरसाहेबांचे भाषण म्हणजे 'दे दणादण, दे दणादण'; मुंबईला काळ्या घोड्यापर्यंत त्यांनी लक्षावधी कामगारांचे मोर्चे नेलेले आणि डॉक्टर सामंत दिसले, की एक तालात कामगार रस्त्यावर पाय आपटून 'दे दणादण'चे कीर्तन चालू करतात हे मी ऐकले होते. बोलताना त्यांची मातृभाषा मराठी नाही असे वाटत होते; पण मोठे प्रभावाचे बोलले. 'शेतकरीकामगार यांच्यात सघर्ष नाही. भांडवलशाही जुलमाचे दोघेही बळी आहेत; कामगार आता उठला आहे. शेतकरी आता उठायला सुरवात झाली आहे. या दोन ताकदी एकत्र आल्या तर घाम गाळून जगणाऱ्यांचा उदय झाल्याखेरीज राहणार नाही.' अशी त्यांनी बाजू मांडली. शेतकरीकामगार एकजुटीच्या जयजयकाराच्या घोषणा झाल्या. आम्ही त्यांना रस्ता काढून दिला. ते निघून गेले. रस्ता रोकोच्या खिंडीतून शिताफीने सुटण्याची त्यांची ही रणनीती असावी असा काहीसा भास झाला.

१९८३ च्या नोव्हेंबरमध्ये पढरपूरला 'विठोबाला साकडे' घालायचा मेळावा घ्यायचे ठरले. ८० ते ८३ या काळात कांदा, ऊस, तंबाखू, दूध अशा अनेक विषयांवर सतत आंदोलने होत होती. धुळ्याचा जनावरांचा मोर्चाही गाजला होता. संघटनेने काहीही कार्यक्रम काढला, की त्यावर आपोआप बंदी यायची आणि त्या जिल्ह्यात प्रवेश करण्याचीही बंदी माझ्यावर लागायची. यावर उपाय म्हणून आम्ही कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने 'विठोबाला साकडे' घालायचा कार्यक्रम ठरवला; पण त्यावरही बंदी घातली गेली. साऱ्या सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करण्याचीच बंदी माझ्यावर आली. शेतकरी आंदोलन चेपून टाकावे ही राज्यकर्त्यांची धडपड. पोलिसांची वागणूक बेफाम आणि अहिंसात्मक सत्याग्रही आंदोलनाच्या बेड्या आम्ही स्वत:च्याच पायात अडकवून घेतलेल्या. अशा परिस्थितीत आम्ही डॉक्टर सामंतांशी संपर्क साधला. पंढरपूरच्या कार्यक्रमाला शेतकरी-कामगार असे संयुक्त रूप द्यावे असा विचार चालू झाला. शेतकरी संघटनेच्या बरोबरच



कामगार आघाडीही मंचावर असावी अशी योजना होती; पण डॉक्टर सामंतांनी मध्येच एक खोडा घातला. ''शेतकरी संघटना आणि कामगार आघाडी यांचा अधिकृतरीत्या संयुक्त मोर्चा किंवा एखादा पक्ष तयार झाला पाहिजे. त्यासंबंधी सर्व तपशील कागदावर उतरवून जाहीर घोषणा झाली पाहिजे.'' असा त्यांनी आग्रह धरला. आम्ही याबाबत खूप सावधगिरीने वागत होतो. इतर राज्यांतील शेतकरी आंदोलनांना राजकारणाबद्दलचे फार कठोर वावडे होते. 'बैठकीत घोषणा करायच्या आणि आठ दिवसांत घटस्फोट घ्यायचा यातून काहीच साध्य होत नाही. त्यापेक्षा, आपण एकत्र कामाला लागू; एकत्र काम करता करता एकमेकांचे विचार जास्त चांगले समजू लागतील आणि यथावकाश संघटना, आघाडी किंवा राजकीय पक्ष यांचा विचार करता येईल,' अशी आमची मांडणी. त्या काळी संघटनेचे पुण्यात जंगली महाराज रोडवर कार्यालय होते. एक दिवस डॉक्टरसाहेब सहकाऱ्यांसह मोठ्या थाटाने आले. ''संयुक्त घोषणेवर सही, नाहीतर पंढरपूरच्या मेळाव्यात सहभाग नाही,'' अशी टोकाची भूमिका त्यांनी घेतली; मग बोलणेच खुंटले. 'साकडे मेळावा' झाला; भरघोस झाला. डॉक्टरसाहेबांनी अंग काढून घेतले. त्याचे खरे कारण राजकीय भूमिकेसंबंधी मतभेद हे मला आजही पटत नाही. कामगार आघाडीची फारशी माणसे पंढरपूरपर्यंत यायची नाहीत व संघटनेच्या जमावापुढे त्यांची उपस्थिती नगण्य होईल आणि एकूण आंदोलनात कामगार आघाडीचे स्थान दुय्यम राहील अशी त्यांना धास्ती वाटत असावी. जगभरात अनेक देशांत शेतकरीकामगार युतीचे नेतृत्व शेतकऱ्यांकडे राहू नये, कामगार अल्पसंख्य असले तरी अधिक 'झुंझार' असतात, त्यांच्याके नेतृत्व द्यावे या अहंकारापोटी कामगार नेत्यांनी संयुक्त आघाडी फोडण्याचे हे काही पहिले उदाहरण नाही.

१९८५ मध्ये कामगार आघाडीबरोबर एकत्र काम करण्याची आणखी एक संधी आली. प्रचंड बहुमतांनी निवडून आलेल्या पंतप्रधान राजीव गांधी यांनी कृत्रिम धाग्यांच्या वस्त्रांना सर्वतोपरी उत्तेजन देण्याचे धोरण जाहीर केले. याउलट, कापसावर मात्र निर्बंध लादून किमती पाडण्यात आल्या. संघटनेने त्याविरुद्ध मोठे आंदोलन छेडले. 'राजीवस्त्रांच्या होळ्यांचे' कार्यक्रम होऊ लागले. पुण्यामध्ये पतितपावनची मंडळी अनेक वर्षे लकडी पुला जवळ विलायती कपड्यांच्या होळीचा वार्षिक कार्यक्रम घेतात. त्यांच्या बरोबरीने आम्ही राजीवस्त्रांची मोठी होळी केली. पुण्यातले 'समाजवादी महर्षी' नाराज झाले. राजीवस्त्रांच्या होळीचा मोठा कार्यक्रम मुंबईत घेण्याचे ठरले. १२ डिसेंबर हा हुतात्मा बाबू गेनूचा स्मृतिदिन. मूळजी जेठा मार्केटातून विलायती कापडांचा ट्रक बाहेर पडत

असताना त्याच्यासमोर रस्त्यावर आडवे पडून बाबू गेनूने सत्याग्रह केला. गोऱ्या सोजरांनी ट्रक चालवून त्याच्या अंगावर घातला. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात असे समोरासमोर जाणीवपूर्वक नि:शस्त्र सत्याग्रहात हौतात्म्य पत्करल्याचे हे एकमेव उदाहरण असेल.

१२ डिसेंबर १९८५ रोजी मुंबईच्या शिवाजी पार्कवर प्रचंड मेळावा घ्यायचे ठरले. मुंबईत मेळावा घ्यायचा तर मुंबईतील काही ताकदींना बरोबर घेतले पाहिजे म्हणून शिवसेना आणि कामगार आघाडी या दोघांबरोबर बोलणी सुरू झाली. मुंबईत कापड गिरण्यांचा प्रश्न त्या काळात बराच चिघळलेला होता. कामगार मोठ्या संख्येने राजीवस्त्र वापरणारे, त्यामुळे राजीवस्त्राविरुद्धचे आंदोलन मुंबईत आणि कामगारांत लोकप्रिय होणे दुरापास्तच; पण तरीही शेतकरी मुंबईत येतो आहे; तर कामगार आघाडीने त्याच्याबरोबर असलेच पाहिजे एवढ्या एकाच कल्पनेने का होईना डॉक्टरसाहेबांनी सहकार्य देण्याचे कबूल केले. मुंबईत आणि शिवाजी पार्कवर भरणाऱ्या मेळाव्यात शेतकऱ्यांच्या उपस्थितीपेक्षा कामगार आघाडीची उपस्थिती जास्त भरघोस राहील असाही त्यांचा हिशेब असावा.

शिवसेनेला त्या वेळी काही कार्यक्रमच राहिला नव्हता. गुजराथ्यांचा द्वेष करून झाला. तामिळी, मल्याळी, उत्तर प्रदेशातील पुरभय्ये यांच्याविरुद्ध विष ओकून झाले. शिवसेना मुंबईतील मराठी तरुणांच्या बेरोजगारीच्या प्रश्नावर फोफावत होती. महानगरपालिकेच्या निवडणुका त्यांनी नुकत्याच जिंकल्या होत्या. महापौरपदी शिवसेनेचे छगन भुजबळ विराजमान झाले होते. 'नवाकाळ'चे खाडिलकर रशियाला जाऊन आले होते; त्यांनी 'व्यावहारिक समाजवाद' नावाचे प्रकरण मांडायला सुरवात केली होती. वेगवेगळ्या समाजांत भांडण लावण्याचा धंदा सोडून व्यावहारिक समाजवादाकडे शिवसेना वळली होती, तोपर्यंत त्यांना हिंदुत्वाचा गर्व तर सोडाच, पण आपल्या हिंदुत्वाचीही फारशी जाणीव नव्हती.

कामगार आघाडी आणि शिवसेना दोन्हीही राजीवस्त्रांच्या बहिष्काराच्या आंदोलनात आले तर मोठे जबरदस्त आंदोलन उभे राहील अशा हिशेबाने बोलणी सुरू झाली. बाळ ठाकरे यांच्याबरोबर झालेल्या चर्चेचा सारा वृत्तांत स्वतंत्रपणे लिहिण्यासारखा आहे. डॉ. दत्ता सामंतांच्या स्मरणलेखात त्याने जागा अडवणे योग्य होणार नाही. ठाकरे, मनोहर जोशी यांनी राजीवस्त्रांच्या विरुद्धच्या चळवळीला पाठिंबा दिला. एकत्र काम करायला लागावे मग त्याला काय मूर्त स्वरूप देता येईल ते पाहावे असे ठरले. पण तरीही शेवटी शिवसेनेने आपले अंग काढून घेतले. शिवसेना व कामगार आघाडी यांच्यातून विस्तव जात नव्हता. दत्ता सामंत मंचावर असतील तर आम्ही तेथे येणार नाही असे ठाकऱ्यांनी



सांगितले. 'शेतकऱ्यांचा मेळावा आहे' आमच्या पाहुण्यांची यादी आम्ही ठरवणार, एका पाहुण्याने दुसऱ्याचा दुस्वास करणे शिष्टाचारास सोडून आहे, वगैरे पुष्कळ समजूत घालण्याचे प्रयत्न झाले; पण शेवटी शिवसेनेशिवायच मेळावा घ्यायचे ठरले.

त्यावेळी अनिल गोटे संघटनेत होते. महिन्यापेक्षा जास्त काळ मुंबईत गोटे आणि त्यांचे सहकारी संघटनेच्या रीतीप्रमाणे अपार कष्ट करीत मेळाव्याचे काम करीत होते. भिंती रंगवण्याचे काम करणारी त्यांची टोळी एकवेळ जेवण, चहानाश्ता आणि हातामध्ये रंगाचे ब्रश, पांढरा रंग आणि जुने इंजिन ऑइल दिले, की काम करत राही. डॉक्टर सामंतांचे आणि गोटेंचे एकदम जमले. शिवाजी पार्कच्या मैदानावर स्टेज उभारायचे आणि लाऊड स्पीकरचे काम कामगार आघाडीच्या कुणी चारपाच लाख किंवा अशाच काही रकमेला ठरवले होते. गोटेंनी तीस हजारात हे काम करायचा प्रस्ताव आणला, तेव्हा डॉक्टरसाहेब त्यांच्या सहकाऱ्यांवर एकदम घसरले. डॉक्टरसाहेबांना राग आला म्हणजे त्यांच्या तोंडी शिव्यांच्या फैरीच्या फैरींची खैरात चाले. "एवढे समोरा समोर XXXXX मला गंडवता? या गोटेमुळे समजले. गेली इतकी वर्षे तुम्ही कितीला लुटले कुणास ठाऊक?" डॉक्टर सामंतांचा अनिल गोटेंवर मोठा लोभ जडला. "एवढा तुमचा कार्यकर्ता आम्हाला देऊन टाका" असा त्यांचा आग्रह कायम असे. माझ्याशी भेटणे, बोलणे त्यांना अवघड वाटे. गोटेंचे त्यांचे चांगले जमे. एका कोणा कामगार नेत्याने काहीतरी सूचना आणली आणि वर पुरवणी जोडली, "शरद जोशींच्या लक्षातसुद्धा यायचे नाही, तो आपला साधा सरळ माणूस !" डॉक्टर कडाडले, "तुम्हाला काही अकला आहेत का रे? गोटेसारखी माणसं जो जवळ बाळगतो तो काय असला साधा माणूस असणार?" गुंडगिरीच्या मोजमापात माझा भाव फुकटम्फाकटच वधारून गेला.

गोटेंनी या वेळी मोठी शक्कल लढवली. महापौर छगन भुजबळ यांच्याशी सूत जमवलं. "मुंबई शहरात एवढ्या मोठ्या संख्येने शेतकरी पहिल्यांदा येणार, त्यांच्या स्वागताला जाण्याचा मान मुंबईच्या पहिल्या नागरिकाचा- महापौरांचा आहे. शिवाजी पार्कच्या मेळाव्याला पाठिंबा असो नसो, महापौराने आपले काम केलेच पाहिजे," असा त्याने युक्तिवाद केला. छगन भुजबळांना तो पटला. त्याही वेळी शिवसेनेत त्यांचा जीव घुसमटतच होता. या निमित्ताने फारसा धोका न घेता बंडाचे निशाण उभारता येईल याची त्यांना जाणीव झाली असावी. त्यांनी यायचे कबूल केले. मोठ्या थाटात भगवा फेटा बांधून महापौराच्या झगमगाटात ते हजर झाले. शिवाजी पार्कच्या मैदानात शिवाजी महाराजांचा एक अश्वारूढ पुतळा एका प्रचंड चबुतऱ्यावर उभा आहे. पुतळ्याला शोभेसा

हार गळ्यात घालणे शिडीने शक्य होत नाही. त्याकरिता फायर ब्रिगेडची क्रेन आणावी लागते. ती महानगरपालिकेकडून भाड्याने मिळते. माझ्या आठवणीप्रमाणे एक वेळचे भाडेच पंचवीसतीस हजारांचे होते. महापौर आल्यामुळे क्रेन बिनभाड्याची मिळाली आणि शेवटी प्रत्येक पदाचा काही रुबाब असतोच! छगन भुजबळ आले तेव्हा साहजिकच पत्रकारांचा गराडा तिकडे धावला; कॅमेऱ्याचे फ्लॅश त्यांच्यावरच चमकले; क्रेनमध्ये चढून पुतळ्याला हार घालण्याच्या कार्यक्रमात सगळ्यांचे लक्ष त्यांच्या फेट्यावरच राहिले. फक्त स्वागताचे भाषण करून त्यांनी दुसऱ्या कामाला निघून जायचे असे ठरले होते. नंतर शेतकरी संघटना व कामगार आघाडी यांचाच मेळावा दीडदोन तास चालला असता. डॉ. दत्ता सामंतांना मंचावर घेणे ठाकऱ्यांना पसंत नव्हते ते त्यांनी स्पष्ट केले. डॉ. दत्ता सामंतांना छगन भुजबळ येणेही पंसत नसावे; पण ते त्यांनी स्पष्ट केले नाही आणि एक युक्ती केली.

शिवाजी पार्कचे मैदान सगळे भरले होते. मुंबईच्या बाहेरून आलेले शेतकरी बहुसंख्येने होते व अपेक्षेच्या मानाने कामगार आघाडीचे लोक खूपच कमी आले होते, हेही स्पष्ट होते; पण मंचाच्या अगदी समोर महिलांच्या राखीव जागेत कामगार आघाडीच्या ४००-५०० बाया कामगार आघाडीच्या लोकांनी आणून बसवल्या होत्या. छगन भुजबळ उभे राहिले की त्या हुर्योवाडी करायला लागायच्या; घोषणा द्यायच्या. अगदी त्यांच्या मुर्दाबादच्याही घोषणा देत होत्या. छगन भुजबळ निघून जाईपर्यंत हे चालू होते. मंचावर माझ्याशेजारी बसलेल्या डॉक्टरसाहेबांना मी हा प्रकार थांबवण्याची अनेकदा विनंती केली. त्यांनीही थोडे दटावल्याचे नाटक केले; पण सगळा आधी रचलेला बनावच! काही परिणाम झाला नाही. भुजबळ नाराज होऊन गेले. शिवसेनेतून त्यांना फोडण्याचे श्रेय नंतर शरद पवारांना मिळाले; ते १२ डिसेंबर १९८७ ला अनिल गोटे यांनाच मिळाले असते.

या काळात दोनतीनं वेळा डॉक्टरसाहेबांशी चर्चा करण्याचा प्रसंग आला. एकदा मी त्यांना विचारले, ''तुम्ही पगारवाढीच्या आणि बोनसच्या मागण्या करता त्या बेहिशेबी आणि काहीच्या बाही असतात असा आक्षेप आहे. आम्ही कांद्याचा भाव मागितला तर मोठ्या शास्त्रीय पद्धतीने त्याचा उत्पादनखर्च काढतो. आम्ही वापरत असलेली पद्धत कृषिमूल्य आयोगाच्या पद्धतीपेक्षाही अधिक शास्त्रीय आणि परिपूर्ण आहे असा आमचा आग्रह आहे. तुम्ही १५०० रु. ची दरमहा पगारवाढ मागितली याला आधार काय?'' डॉक्टरसाहेबांनी काही हयगय न करता उत्तर दिले 'कसले हिशेब करता? हे कारखानदार सगळे खोटे हिशेब आणि ताळेबंद मांडतात. मुंबईत एकाचाही फायदा २००-३००



टक्क्यांखाली नाही. एकदा लायसेंस परमिट मिळाले की ग्राहकाला लुटायला हे XXX मोकळे. ताळेबंदात दाखवणार फायदा २० नाही तर ३० टक्क्यांचा. मला हे माहिताय, की एक दिवसदेखील कारखाना बंद ठेवणे या XXXXX ना परवडणारे नाही. त्यांनी ताळेबंद काढला, की आम्ही त्याच्यावरच हल्ला करतो. पहिल्यांदा ५०० रुपये वाढ मागितली तेव्हा मला उगाचच वाटले आपण फार मागितले; मालक मंडळी हे काही द्यायचे नाहीत आणि संप चालवणे कठीण होऊन जाईल; पण काही नाही XXXX नी पहिल्याच झटक्यात कबूल करून टाकले. मग माझीही भीड चेपत गेली आणि अशक्य वाटणाऱ्या मागण्या केल्या तरी त्या मनवून घेता येतात. कसले हिशेब आणि अर्थशास्त्र! हे XXX दिवसाढवळ्या देशाला लुटून राहिलेत. मी कामगारांकरिता त्यांच्याकडून जितकं काढून घेता येईल तितकं रपाटून काढून घेतो.'

एकेकाळचे शोषित कामगार आता शोषक वर्गाचे भागीदार बनले आहेत. कामगारांचे संप शोषकशोषितातील संघर्ष नाही. दोन शोषकांमधील वाटणीच्या या लढाया आहेत हा मुद्दा स्पष्टपणे मांडायला मी त्यानंतरच सुरवात केली. यानंतर पुन्हा एकदा सामंतांची आणि आमची एक बैठक झाली तिचा वर्तमानपत्रात बराच गाजावाजा झाला. ती बैठक संपवून माझ्या एका भाचीच्या लग्नाला हजर राहण्याकरिता मी गेलो. माझे मेव्हणे कापड गिरणी क्षेत्रातील मोठे मान्यवर प्रस्थ होते. त्यांच्या मुलीच्या लग्नाला मुंबईतील गिरणीमालक किंवा व्यवस्थापन यांचे झाडून सारे प्रतिनिधी हजर होते. माझी ओळख करून दिल्यावर सगळ्यांनी मला गराडा घातला आणि थोडे घाबरत घाबरतच प्रश्न विचारले, ''डॉक्टर साहेबांनी कापड गिरणी कामगारांचा संप जाहीर केला आहे; तुम्ही त्यांचे मित्र आहात. अर्थशास्त्र जाणता. हे असे त्यांनी कसे काय केले? त्यांनी संप जाहीर केल्यामुळे आम्ही सगळे पेढे वाटण्याच्या मन:स्थितीत आहोत. आता गिरण्यांचा आतबट्ट्याचा धंदा राजरोसपणे आम्ही बंद करू शकू. दत्ता सामंत आज आम्हाला देवदूतांसारखे वाटताहेत. हे झाले कसे काय? ठाण्याच्या उत्तरेस असलेल्या कारखानदारीच्या क्षेत्रात आजपर्यंत सामंतांनी काम केले; ही सगळी नवीन कारखानदारी आहे, तेथे भरपूर फायदा आहे म्हणून कामगार आघाडीचे तंत्र यशस्वी झाले; पण कापड गिरण्या आधीच डबघाईला आलेल्या हे डॉक्टरसाहेबांना कोणीतरी सांगायला पाहिजे.'' हा एक अप्रत्यक्ष पुरावा - इतर कोणी काही म्हणाले तरी डॉक्टरसाहेबांनी गिरणी मालकांकडून पैसा घेऊन संप केला आणि गिरणी कामगारांना तोंडघशी पाडले या आरोपात काही तथ्य नाही, हे दाखवणारा.

१९८९ मध्ये विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या प्रचंड सभा संघटनेने महाराष्ट्रात

भरवल्या. विश्वनाथ प्रताप सिंग पंतप्रधान झाले आणि मुंबईच्या शिवाजी पार्कवर व्ही.पी. सिंग, चंद्रशेखर यांच्यासमवेत एक सभा झाली. त्यात मीही मंचावर होतो. जनता दलाचे सरकार दिल्लीत आल्यापासून एका नव्या अर्थशास्त्रीय चर्चेला तोंड फुटले होते. दुसरे स्वातंत्र्य आणण्याची भाषा चालू झाली होती. हे नवे पर्यायी अर्थकारण ग्रामीण व्यवस्थेला आणि शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून चालेल असा रागरंग दिसत होता. नंतर थोड्याच काळात सगळेच उलटले. देवीलालांच्या व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेने उचल खाल्ली आणि ते मंत्रिमंडळातून बाहेर पडले. हडबडून गडबडून गेलेल्या विश्वनाथ प्रताप सिंगांनी जातीय आरक्षणाचा झेंडा फडकावला आणि देश एका दरीत ढकलून दिला.

त्या सभेला सुरवाती सुरवातीला गर्दी बरी होती. शेवटी शेवटी मैदान ओसच पडले. त्या वेळचे दलाचे कोणी दलित समाजातील नगण्य व्यक्तिमत्त्व अध्यक्ष म्हणून बोलायला उभे राहिले तेव्हा मैदानावरच्यापेक्षा मंचावरचीच संख्या अधिक अशी परिस्थिती झाली होती. मंचावर डॉक्टरसाहेब माझ्या बाजूसच बसले होते. ते सारखे चडफडत होते. "या xxx कामगारांना मी दोनदोन तीनतीन हजार रुपये पगारवाढ मिळवून दिली. xxxxx नी संपाच्या वेळी माझ्यामागे आणि मिटिंगांना शिवसेनेच्या. यांचेच संप आम्ही चालवत राहिलो हीच मोठी चूक झाली. आम्ही महाराष्ट्रभर पसरायला पाहिजे होतं. देशभर पसरायला पाहिजे होतं; कामगार चळवळीचा; डाव्या चळवळीचा फायदा या xxxxx नी घेतला. स्वत:ची घरं भरली. बिचारा खराखुरा कामगार तसाच असंघटित राहिला. आमचा सारा हिशेबच चुकला."

कामगार युनियनची पगार, सोयीसवलती वाढवून घेण्याची चळवळ आणि तिचे समाजवादी क्रांतीतील स्थान या विषयावर भरपूर जडजंबाळ पांडित्य दाखवणारे प्रचंड लिखाण आहे. डॉक्टरसाहेब काही विद्वान मार्क्सवादी नव्हते. ट्रेड युनियन चळवळीत त्यांनी प्रवेश केला तो उत्तर मुंबईतील दगड खाणींच्या आसपासच्या झोपडपट्टीत एक डॉक्टर म्हणून. त्या कामगारांची दु:खे पाहून मन पिळवटले म्हणून ते कामगार चळवळीकडे वळले. चळवळ मोठी झाली; डॉक्टरसाहेबांचे नाव गाजले. आर.जे. मेहता, जॉर्ज फर्नांडिस आणि त्यानंतर डॉक्टरसाहेब यांनी अधिकाधिक झुंजार आणि अधिकाधिक तत्त्वशून्य कामगार चळवळ पुढे चालवली. असंघटित कामगार, शेतमजूर तसेच राहिले. प्रिमिअर, गोदरेज असल्या कंपन्यांचे कामगार सुखवस्तू बनल्यावरही कामगार क्रांतीच्या घोषणा देत राहिले. काहीतरी चुकते आहे याची डॉक्टरसाहेबांना निदान आठ वर्षे आधी जाणीव होती. फक्त सुटावे कसे ते समजत नव्हते. समाजवादाचा भुलभुलैया संपला. कामगार



क्रांतीची स्वप्ने उडून गेली; पण निव्वळ सवयीपोटी उच्चभ्रूंची आंदोलने लाल झेंड्याखाली होत राहिली. जिभेला वळण पडले म्हणून शोषणमुक्तीच्या वल्गनांना उच्चार मिळत गेला.

डॉ. दत्ता सामंत हे खरे तर एका महत्त्वाच्या कालखंडाचे नाव आहे. दहाबारा वर्षांची पोरं मुंबईच्या गिरणीत पंधरापंधरा, सोळासोळा तास काम करीत. पगार तीन आणे; रजा नाही, सुटी नाही, बदलीची सोय नाही, विश्रांती नाही, गिरणीतील मागासमोरच थकून पडणारी. या काळात ना.म.जोशी यांनी कामगार चळवळ उभी केली. श्रीपाद अमृत डांगे यांनी त्याला समाजवादी सिद्धांताचे स्वरूप दिले. 'कामगारांचा लढा पगाराकरिता नाही, पगार हे निमित्त आहे, खरे उद्दिष्ट कामगार क्रांतीचे आहे,' अशी भाषा दिली. गिरणी कामगारांनी डांग्यांनाच तोंडघशी पाडले. कामगार मैदानावर एका संध्याकाळी एक महिनाभर चाललेला गिरणी कामगारांचा संप निर्धाराने पुढे चालवण्याच्या घोषणा टाळ्यांच्या कडकडाटात देण्यात आल्या आणि दुसरे दिवशी सकाळी झाडून सारे गिरणी कामगार कामावर हजर झाले. तत्त्वनिष्ठ कामगार चळवळीचा त्याच दिवशी अंत झाला.

कामगार चळवळ नंतर व्यावसायिक बनली. आर.जे. मेहता, जॉर्ज फर्नांडिस यांनी संघटित कामगारांच्या दंडेलशाहीचे स्वरूप कामगार चळवळीला दिले. या मालिकेतले डॉक्टर सामंत हे शेवटचे टोक. या चळवळीला आळा घालण्यासाठी कॉंग्रेसवाल्यांनी शिवसेनचा राक्षस पोसला. आज तोच राक्षस कॉंग्रेसवाल्यांना खाऊन बसला आहे. डॉक्टरसाहेब तर निघून गेले. सुखवस्तू कामगार धर्मवादी, जातीयवादी बनले. असंघटित कामगार आणि शेतमजूरही त्याच दिशेने ओढले जात आहेत.

कधी नव्हे इतकी एका तरुण दत्ता सामंताची गरज असताना कुणा चारपाच गुंडांनी सुपारी घेतली. सामंतांची गाडी अडवली आणि घरासमोर बेछूट गोळीबार करून एक कालखंड संपवला. कामगार विश्वातील जबरदस्त ताकद समजल्या जाणाऱ्या डॉक्टरसाहेबांना कामगार चळवळीत काय घडते आहे याची जाण आली होती, असे का होते आहे हे समजले नव्हते. आता उरलेल्या डाव्या चळवळीत समजही नाही, जाणही नाही आणि शोधण्याची इच्छाही नाही.

(शेतकरी संघटक, ६ फेब्रुवारी १९९७)

■■

# महाविद्यालयातील विद्यार्थ्यास पत्र

'अंगारमळा', आंबेठाण,
ता. खेड, जि. पुणे.
१४ ऑगस्ट १९८५

प्रिय मित्र,

हे पत्र तुला लिहितो आहे; पण खरे तर महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात जन्मलेल्या आणि यंदा महाविद्यालयात येऊन पोचलेल्या हजारो विद्यार्थी-मित्रांना उद्देशून लिहितो आहे.

तसेच नवे वर्ष सुरू झाल्याबरोबर लगेचच तुझ्या हाती पडावे अशा बेताने हे पत्र लिहिण्याचा विचार होता. पण म्हटले थोडे थांबावे. सुरुवातीच्या काळात तुझी खूपच धांदल चाललेली असणार. इतक्या घाईगर्दीत माझे पत्र वाचायला तुला फुरसत कोठून मिळावी? आणि 'पुढे कधी तरी वाचू' म्हणून हे पत्र बाजूला ठेवलेस, की 'पुढे' कधी उगवण्याची खात्री काहीच नाही.

पहिली गोष्ट, तुझी राहण्याची सोय व्यवस्थित झाली की नाही? कुणा नातेवाईकाकडे किंवा ओळखी-पाळखीच्या माणसाकडे उतरावयाची सोय झाली म्हणजे बरे असते. खर्च कमी होतो हे तर खरेच. पण कपडे अंथरुण-पांघरूण याबाबतसुद्धा काटकसर करता येते. पावसाळ्यात कपडे वाळायची अडचण होते म्हणून नाही तरी अगदी कपड्याच्या एका जोडातही भागवता येते. घरच्या जेवणात खानावळीतला ताट-वाट्यांचा चकचकाट नसतो; पण साध्या स्वच्छ घरच्या जेवणात प्रकृतीला अपाय तरी नाही. खानावळ परवडणे कठीणच. मग एस्टीने घरून डबा मागवता आला तर बरेच. प्रत्येक वेळी डबा उघडला म्हणजे घरच्या सर्वांची भेटच झाल्यासारखे वाटते. पण एस्टीचा भरवसा कमीच. कधी उशीर, कधी काय. सकाळचे रात्री खाण्याची घरी सवय नसते असे नाही. पण शहरातल्या खोलीत सूर्य मावळल्यावरती सकाळचेच समोर वाढून घेऊन जेवायले बसले, की डोळ्याला पाणी आल्याशिवाय राहत नाही.

वसतीगृहात रहायला मिळण्याइतकी ऐपत असलेले भाग्यवानच म्हणायचे. एखाद्या पुढाऱ्याची मुले सोडल्यास वसतिगृहात मुलांना ठेवण्याची शेतकरी आईबापांची परिस्थिती कधीच नसते. बिचारे इकडे तिकडे उधार-पाधार उसनवार करून आणि अक्षरश: आपले



पोट आवळून घेऊन पोरांना वसतिगृहात ठेवतात; पण त्यांच्या मुलांची वसतीगृहात कुचंबणा काही कमी होत नाही. पुढाऱ्यांच्या आणि शहरातल्या मुलांच्या सामानाचा झगमगाट पाहून डोळे दिपूनच जातात. थंडी वाजू नये म्हणून आईने बळेच दोन गोधड्या दिलेल्या असतात. घरी एक कमी पडत असूनसुद्धा. इतर पोरांच्या रंगीबेरंगी फुलांच्या नक्षी असलेल्या गाद्या, उशा, पलंगपोस, चादरी पाहिल्या म्हणजे आईची प्रेमाची गोधडीसुद्धा लपवून ठेवावीशी वाटते. श्रीमंत पोरांचे सगळेच वेगळे. नव्या कोऱ्या कपड्याच्या चळती, नवी पुस्तके, छत्र्या रेनकोट, काय न् काय. पाहून हेवा तर वाटतोच; पण अगदी प्रामाणिकपणे सांगायचे तर आपल्या शिक्षणाच्या सोयीकरता यंदा स्वत:साठी नवे कपडे करणारच नाहीत याचासुद्धा विसर पडतो. या भाग्यशाली झुळझुळीत कपड्यात फिरणाऱ्या, दररोज नवीन घडीच्या रुमालावर सुगंध शिंपणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर रहावे, त्यांच्यासारखे वागावे-दिसावे, मित्र-मैत्रिणींच्या नजरेतील कौतुकांचा नजराणा गोळा करीत फिरावे असे वाटणे अगदी नैसर्गिक आहे. विडी-सिगारेट पिणे, प्रसंगी अपेयपान करणे, सिनेमा, नाटक, तमाशा हे सगळे वाईट असे हजारदा मनावर ठसवलेले असले, तरी नव्या मित्रांना या भानगडी करताना पाहून राग तर येत नाहीच; पण आजपर्यंत पूजिलेली सर्व मूल्ये आणि कल्पना भुरूभुरू उडून जातात आणि एकदा का होईना त्यांच्यासारखे करावे, मग त्यासाठी लागेल त्या मार्गाने पैसे उभे करावे, आवश्यक तर खऱ्या-खोट्या सबबी सांगून घरून आणखी पैसे मागवून घ्यावे असे वाटणे साहजिकच आहे.

मोहनदास करमचंद गांधी विद्येसाठी इंग्लंडला गेले, तेव्हा त्या भावी महात्म्यालासुद्धा हे सर्व मोह झाले होते. जुनागडच्या दिवाणाच्या मुलाचा पाश्चिमात्य जीवनाशी परिचय नसेल, पण मायदेशी तो काही दारिद्र्यात नव्हता. इंग्लंडमधील नवे जग जुनागढपेक्षा आकर्षक खरे; पण फरक अंशाचा. आज खेड्यातून शहरात शिकायला येणाऱ्या मुलांच्या आयुष्यात होणारा फरक अंशापळांचा नाही, गुणवत्तेचा असतो. बंगलेवाल्या पोराने कौतुकाने उचलून घरात नेलेल्या रस्त्यावरच्या कुलंगी कुत्र्याच्या पिलांची व्हावी अशी आपली गत शहरात आल्यावर होते. कुत्र्याच्या पिलाचे कोडकौतुक त्याचा छोटा मालक करतो, दूधपोळी खाऊ घालतो. गरम बिछाना करतो. आपली तशी सोय होत नाही. आपण इतरांचे चोचले नुसते बघायचे. कारण आपल्याला कोणी उचलून नेलेले असते. आपली स्थिती बंगल्यात घुसलेल्या कुत्र्याच्या पिलासारखी. मोहनदास करमचंद गांधींच्या काळी भारत-इंग्लंड यामध्ये जेवढा फरक होता त्याच्या कितीतरी पट जास्त तफावत आज आपल्या देशातल्या देशात-खेड्यात-शहरात आहे. तरुण मोहदनदासला ज्या

कसोटीला तोंड द्यावे लागले, त्या पेक्षा कितीतरी पटीने जास्त प्रखर कसोटीला शहरात आलेल्या शेतकऱ्यांच्या पोरांना सामना करावा लागतो. अगदी चाळीस एकराच्या सवर्ण जातीच्या खातेदार घरातल्या मुलांची ही परिस्थिती. आदिवासी, दलित, बौद्ध, मुसलमान, शेतमजूर घरातल्या मुलांना तर, काय कसोटीचा सामना करावा लागत असेल याची कल्पनाच असह्य होते. त्यांच्या जन्माला गेल्याखेरीज खऱ्या अर्थाने त्यांच्या यातना कळणे कठीणच.

महाविद्यालयातील, वर्गातील, वसतिगृहातील विद्यार्थी मित्रांचे वैभव हे मन पोळणारे. याउलट शहरात बाजारपेठेत फिरताना होणाऱ्या वैभवाच्या दर्शनाने काहीच क्लेश वाटत नाहीत. दुकानांतील वस्तूंची विविधता, आकर्षक मांडणी, ग्राहकांची गर्दी, सुबक, डौलदार घरात राहणारी गोंडस कुटुंबे, आखीव बागबगीचे, त्यात आनंदाने विहरणारे तरुण-तरुणी, अनेक मजल्यांच्या प्रचंड इमारती, मोटारीची अखंड वाहतुक पाहिल्यानंतर खेड्यातून आलेल्या विद्यार्थ्याला आश्चर्य वाटते. हे सर्व आपल्या डोळ्यांनी पाहायला मिळाले, याचा आनंद वाटतो आणि आता गावातील ते भयानक आयुष्य मागे टाकून या नवीन विश्वात सुखी होऊन जाऊ या कल्पनेने त्याचा उत्साह उसळू लागतो.

पण या नवीन जगात स्थान मिळवणे सोपे नाही. अपरिमित कष्ट करूनही ते जमेल किंवा नाही शंकाच आहे. शहरातली पोरे आणि पुढाऱ्यांची पोरे नुसतीच श्रीमंत नाहीत. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून आली आहेत. एकमेकांतसुद्धा फाडफाड इंग्रजी बोलतात. आपल्याला इंग्रजी बोलणे तर सोडूनच द्या. बोललेले समजणेसुद्धा कठीण. त्या पोरांना इंग्रजी सिनेमातल्या नायिकासुद्धा काय बोलतात ते समजते, आपल्याला प्राध्यापक काय बोलतात हे सुद्धा कळणे मुष्किल. अभ्यास करायचा कसा? आणि पास व्हायचे तरी कसे?

अभ्यासाचं हे रडगाणं तसं नवं नाही. सगळे विषय मराठीत होते तेव्हा सुद्धा पुस्तक आपल्याशी बोलत नव्हती. गणिताच्या पुस्तकांची भाषा अ,ब,क च्या कामांची, आगगाडीच्या-विमानांच्या वेगाची, गड्डमल मारवाड्याच्या फायद्यातोट्यांची; त्यात पीक पिकवण्याकरिता लागणाऱ्या श्रमाची आणि खर्चाची बेरीज नव्हती. कर्जाच्या हिशेबात, बँकेच्या अधिकाऱ्याला काही द्यावे लागत नव्हते. भूगोलात पृथ्वीपाठीवरच्या लांबलांबच्या प्रदेशांतल्या हवामानाची, पिकांची यादी होती; पण आपल्या भागात होणाऱ्या उत्पन्नाचा आर्थिक भूगोल नव्हता. बळीराजानंतर शेतकऱ्यांचा राजा झाला फक्त शिवा; पण आमचा इतिहास किती थोर राजांची, सम्राटांची आणि धर्मवीरांची जंत्रीच्या जंत्री देत होता. आमच्या भूमितीच्या धड्यांना शेताच्या आकारांचे, झाडांच्या उंचीचे, विहिरींच्या



गोलाईचे आणि बांधकामाचे वावडे होते आणि अ,ब,ड,ई त्रिज्येच्या वर्तुळाची परिमिती म्हटले, की आपले तर कान बंद. तीच गोष्ट बीजगणिताची. वर्गातला स्कॉलर गुरुजींच्या भूमिती बीजगणिताच्या प्रश्नांना चटाचट उत्तर देऊ लागला की 'हा काय दैवी चमत्कार!' अशी मुद्रा आम्ही करायचो. विज्ञानाने, रसायनाने मातीशी इमान कधी साधलेच नाही. हिंदुस्थानला लुटण्याची यंत्रणा राबवण्याकरिता कारकून तयार करण्यासाठी शिक्षणाची व्यवस्था झाली. इंग्रज गेला तरी व्यवस्था तीच राहिली. आता काळ्या इंग्रजाच्या तैनातीला उभे राहण्याकरता कारकून पाहिजेत, अधिकारी पाहिजेत. ज्या खेड्यांना लुटायचे तेथील शेतकऱ्यांच्या पोरांना जमत असले तर त्यांनी शिकावं! पास व्हावं! सर्वांना समान संधीचं हे लोकशाही युग आहे.

हे कठीण आहे. महा कर्मकठीण आहे. आज शहराच्या नवलाईच्या दर्शनाने सुखावलो आहोत. आजतरी आपल्या विद्येकरता गावाकडे मायबापे काय उस्तवारी करत आहेत, याचासुद्धा विसर पडतो. त्यांची इच्छा एक, पोरानं परीक्षा द्यावी, पास व्हावं, नोकरी धरावी. घरशेती कर्जातून सोडवावी आणि हे पाहून त्यांनी सुखानं डोळे मिटावेत; पण शेतकऱ्यांच्या पोरांना शहरांतली परीक्षा म्हणजे हत्तीला दोरीवरच्या उड्या मारायला सांगणं आहे. जमावे कसे? दरवर्षी बारावीतले, पदवीच्या शेवटच्या वर्षातले शेकडो विद्यार्थी कपाळाला हात लावून बसतात. दोन-चार वर्षं चैनीत बरी गेली, परीक्षा हाती पडणं दुरापास्त, नोकरी त्याहून कठीण. आता कोणत्या तोंडानं मायबापापुढं जावं? शेकडोजण पळून जातात, मुंबईला जातात, जे मिळेल ते काम करतात. मायबाप तिकडे पोराचं झालं तरी काय असेल या नव्या चिंतेने तोंडात माती घालून घेतात. नाहीतर शिकलेली पोरं नोकरीबिकरी शोध शोध शोधतात आणि एक दिवस गावाकडं परततात, शेतात खपावसं वाटत नाही. म्हातारे म्हातारी घाम गाळतच राहतात.

मित्रा, महाविद्यालयात प्रवेश केल्यानंतरच्या पहिल्या महिन्यात लिहिलेल्या पत्रात इथल्या मुक्कामाच्या शेवटी तुझी जी अवस्था असेल त्याविषयी लिहून तुला नाउमेद करण्याची माझी इच्छा नाही. स्वप्नात मश्गुल राहिलास तर शोकांतिका अटळ आहे.

हे असे का? गावात जन्मभर शेतीवर राबणाऱ्या मायबापांना एक सुखाचा घास नाही आणि इकडे एक काडीही इकडची तिकडे न फिरवणारी माणसं नोटा उधळू शकतात कशा? इथली नवरा बायको हसून खेळून राहतात, मुलांची कौतुकं करतात, घरं सजवतात. गावातल्या शेतीवर जगणाऱ्यांना हे का जमत नाही? अरबी भाषेतील सुरस कथांत भाग्य फळफळायचे दोनच मार्ग- गुप्त खजिन्याची गुहा सापडणे किंवा जादूचा दिवा किंवा

अंगठी सापडणे. कष्टाने घाम गाळून कोणीच लक्ष्मी मिळवत नाही, शेतकऱ्याला भाग्य उजळायचे दोनच मार्ग- पुढारी बनणं, नाहीतर शहरात येणे. हे असं का?

लाखात एकाद्याच शेतकऱ्याच्या पोराला मिळणारी विचार करण्याची, अभ्यास करण्याची संधी तुला मिळाली आहे. ती किमान या एका प्रश्नाचं उत्तर शोधून काढण्यासाठी वापर. 'माझ्या आईबापांनी असं कोणतं पाप केलं होतं, की त्यांना चिखलात झिजत राबावं लागतं? त्यांच्या श्रमाचं मोल त्यांना का मिळालं नाही? त्यांच्या घामाचं दाम कोण्या हरामाने हिरावून नेलं?'

मोहनदास करमचंद गांधी इंग्लंडच्या नव्या ऐश्वर्याला भुलून काही काळ साहेब बनण्याचा प्रयत्नाला लागले; पण त्यांनी स्वत:ला सावरले आणि स्वातंत्र्याचे प्रणेते, राष्ट्रपिता झाले. ते स्वत: इंग्लंडमधल्या सुखात रममाण झाले नाहीत. तुझ्या मायबापांना लुटणाऱ्यांच्या वैभवात बोटे घालून त्यात धन्यता मानण्याचा मोह पडू देऊ नकोस.

आजची तुझी स्थिती सीतेच्या शोधासाठी गेलेल्या हनुमानासारखी आहे. लंकेचे वैभव, प्रासाद, तलाव, बागबगीचे पाहून हनुमानही विस्मयचकित झाला; पण त्या भिकारड्या रामाची कसली भक्ती करता, या रावणाच्या अजिंक्य, महाबलाढ्य, सुखसमृद्ध ऐश्वर्याचा उपभोग घेऊ असा विचार त्याच्या मनाला शिवलाही नाही. अशोकवनातील विरही, दु:खी सीतेचा शोध त्याने चालू ठेवला म्हणून रामायण घडले.

आज भूमिकन्या सीता पुन्हा वनवासात आहे. आम्ही भूमिपुत्र तिच्या विमोचनाच्या कामाला लागणार, का लंकेश्वर रावणाच्या वैभवाचे वाटेकरी व्हायला बघणार हा प्रश्न तुझ्याकडे ठेवण्यासाठी हा पत्राचा प्रपंच

तुझा,
**शरद जोशी**

(प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश भाग २-प्रथमावृत्ती डिसेंबर १९८५, या पुस्तकातून.)



# शेतकरी आंदोलन आणि साहित्यिक

शेतकरी कुटुंबाची ही बैठक आहे. एका बाजूला, कालिदासाच्या शब्दांत सांगायचं झालं तर,

*निसर्गभिन्नस्पदमेकसंस्थम्*
*अस्मिन् द्वयम् श्रीश्च सरस्वती च ॥*

म्हणजे, ज्यांच्यावर सरस्वती प्रसन्न आहे आणि श्री काही फारशी अप्रसन्न नाही अशी मंडळी आणि दुसऱ्या बाजूला, लक्ष्मी आणि सरस्वती दोघींपासून फारकत झालेली मंडळी अशी ही एका कुटुंबातली माणसं जमली आहेत. मला जेव्हा या साहित्य संमेलनाचं निमंत्रण मिळालं तेव्हा मी फारसा काही उत्साही नव्हतो हे खरं, पण मी 'हो' म्हणालो त्याचा आज अत्यंत आनंद होतो आहे. गेली वीस वर्षे अनेक सभा केल्या. पण, तिथं पाहोचलो की कार्यकर्त्यांनी पटकन मंचावर घेऊन जायचं, बोलत्या वक्त्याला बाजूला सारून मला बोलायला उभं करायचं आणि भाषण संपलं की पुढच्या सभेची वेळ झाली म्हणून धावत पळत निघून जायचं. गेले दोन दिवस, मधे एक लहानसा प्रश्न विचारला ते सोडलं तर नुसता ऐकण्याचा आनंद घेत होतो. दोन दिवस फार आनंदात गेले याबद्दल तुम्हा सर्व साहित्यिकांना आणि संमेलनाच्या संयोजकांना धन्यवाद देऊ इच्छितो.

दोनच दिवसांपूर्वी आंबेठाणला काही मंडळी जमली होती. सध्या आमच्या आंदोलनाचे काही फारसे चांगले दिवस नाहीत हे सर्वांनाच ठाऊक आहे. त्यावेळी चर्चा निघाली की गेली २० वर्षे आपण जी काही धावपळ केली, लोकांच्या म्हणण्यानुसार, संसार उजाड करून टाकले त्याचे शेवटी काही सार्थक झाले का? हाती काही लागलं का? तेव्हा कुणीतरी म्हणाले, ''नाही कसं म्हणता? शेतीमालाच्या भावाचा तुमचा सिद्धांत जगन्मान्य झाला आहे; वीस वर्षापूर्वी वि.म. दांडेकरांसारखे अर्थशास्त्रज्ञसुद्धा तो मानत नव्हते. देशात डंकेल प्रस्तावाबद्दल चर्चा चालली होती तेव्हा हिंदुस्थानातले सगळे अर्थशास्त्रज्ञ एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला शेतकरी संघटना अशी कुस्ती झाली आणि आपण त्यात जिंकलो. शेतकरी महिला आघाडीच्या 'लक्ष्मीमुक्ती' कार्यक्रमाने १८ महिन्यात २ लाखांच्यावर महिलांच्या नावाने जमिनी झाल्या.'' खरं आहे. शेतकरी संघटनेचे महिला अधिवेशन झाले नसते आणि शेतकरी महिला आघाडी तयार झाली नसती तर आम्ही आमच्या लक्ष्मीकडे कायमचं जनावर म्हणून पाहिलं असतं, माणूस

म्हणून कधी पाहिलं नसतं' असं म्हणणारी शेतकरी भावांची अनेक पत्रे माझ्याकडे आहेत.

मला सार्थकतेचा आणखी एक अनुभव इथे आल्यानंतर मिळाला. रा.रं. बोराडे म्हणाले, ''साहित्यिक मंडळी सहजासहजी अशी एक मंचावर जमा होत नाहीत. त्यांना बोलावणं पाठवावं लागतं, त्यांची मिनतवारी करावी लागते. हा येणार आहे का, तो येणार नाही ना असा थोडा पडताळा केला जातो. आणि यायचं मान्य केलं तरी शेवटी व्यवहाराचा भाग असतोच. येण्याजाण्याच्या खर्चाचं काय? तिथे खाण्यापिण्याची, राहण्याची सोय कशी होणार अशी चौकशी केली जाते.''

इतर साहित्य संमेलनात अशी व्यवस्था, शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आयोजित केलेल्या संमेलनात असू शकत नाही. पण, बोराडेंनी पुढे आणखी एक वाक्य वापरलं, ''शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यानं संमेलन आयोजित केलं आहे आणि शरद जोशी दोन्ही दिवस ऐकायला बसणार आहेत हे समजल्यावर आम्ही ताबडतोब यायचं ठरवलं; कोणी प्रवास खर्चाचा विषय काढला नाही, ना सोयीसुविधांचा.'' माझ्या सार्थकतेच्या कलमात एक कलम वाढवायला हरकत नाही. धन्य झालो.

शेषराव मोहिते, रघुनाथदादा पाटील हे शेतकरी संघटनेचे मोठे उत्साही कार्यकर्ते आहेत. त्यांना असं वाटत की ज्यांची ज्यांची गावाबद्दल निखळ स्वच्छ भावना आहे त्यांनी त्यांनी सगळ्यांनी एकजुटीनं चालावं म्हणजे आपण हा जो यज्ञ आरंभला आहे- शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यासाठी- त्याची सांगता लवकर करता येईल आणि उत्साहाच्या भरात त्यांनी ते बोलून दाखवलं; पण त्यामुळं या साहित्य संमेलनातील परिसंवादाला एक वेगळंच स्वरूप आलं. आमची घोडी थकली आहेत तेव्हा साहित्याच्या चळवळीचं घोडं शेतकरी चळवळीच्या रथाला जोडून तो थोडा वेगाने चालता करावा अशी शेतकरी संघटनेची इच्छाविनंती पुढे मांडण्यासाठी हे साहित्य संमेलन भरवलं असावं असा समज होऊन थोडी चकमक उडाली.

या संमेलनात एका परिसंवादाचा विषय 'उदारीकरण आणि शेतकरी' असा होता, तो केवळ तसा न ठेवता, 'उदारीकरण आणि शेतकरी व साहित्यिक' असा ठेवला असता तर या संमेलनाच्या चौकटीत चपखल बसला असताच, शिवाय वरील चकमकीत आनंद यादवांना जो मुद्दा मांडावा लागला- व्यक्तिमत्वाचा, साहित्यिकांच्या व्यक्तिमत्वाचा, कलाकाराच्या व्यक्तिमत्वाचा- ते करण्याची गरज उरली नसती. कारण हा व्यक्तिमत्वाचा मुद्दाच गृहीत धरून सारी शेतकरी चळवळ चालली आहे, आर्थिक उदारीकरणाची चळवळ चालली आहे. साहित्यिक तेवढेच काय ते स्वत:च्या वक्तिमत्वाला जोपासणारे असं



समजू नका. शेतकरी संघटनेच्या प्रतिज्ञेत म्हटले आहे की, 'सामान्य माणसासारखं का होईना जगता यावं.' चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनातील घोषणा पत्रातही म्हटलं आहे, 'की आम्ही लाख लाख स्त्रिया घोषित करतो की आम्ही माणूस आहोत.' माणसाला माणूस न मानता एका समूहाचा, एका कळपाचा सदस्य करण्याचं काम शेकडो वर्षे चाललं आहे - धर्मिकांनी चालवलं, जातीच्या नावानं चालवलं आणि समाजवादाच्या नावाखालीही तेच केलं गेलं. या कळपवादातून माणसाला मोकळं करण्याचा विचार देणारी ही शेतकरी संघटना आहे.

उदारीकरण झालं तर काय होईल? एका दाण्याचे शंभर दाणे करणाऱ्या माणसाला, ज्यांच्या कारखान्यामध्ये एक किलो लोखंडात एक कणभरही वाढ होऊ शकत नाही त्यांच्याकडे भीक मागायला जावं लागतं. या कोड्याचं उत्तर शोधण्याकरिता साहित्यिकांना त्याचा काहीतरी उपयोग झाला असता. साहित्यिकांच्या दृष्टिने उदारीकरणाला काय महत्त्व आहे? समाजवादाच्या पद्धतीमध्ये राजकीय सरकारने सगळा समाज ग्रासून टाकला आहे. सरकार पाहिजे; सरकार नको असं कोणी म्हणत नाही. कायदा आणि सुव्यवस्था टिकविण्याकरिता, परकीय आक्रमणापासून देशाचं रक्षण करण्याकरिता सरकार पाहिजे, मजबूत पाहिजे; जो कोणी कायदेभंग करायला जाईल त्याला भीती वाटेल अशा तऱ्हेचं ताकदवान सरकार पाहिजे. पण, त्या सरकारची भूमिका एवढीच मर्यादित पाहिजे; अर्थकारणात सरकारला काहीही स्थान नाही. ' जिथं सरकार व्यापारी बनतं, तिथं प्रजा भिकारी बनते' अशी गुजराथीत म्हण आहे. मला आजकालच्या साहित्यिकांची, कलाकारांची, बुद्धिमंतांची मोठी कीव येते. भर्तृहरीच्या अनेक साहित्यामध्ये एका प्रसंगाचा उल्लेख येतो. एका गुरूच्या एक शिष्य राजाच्या दरबारात उभा राहून राजाला सांगतो, 'तू मोठा श्रीमंत असशील; आपल्या वैभवाचा, साम्राज्याचा तुला अभिमान असेल; पण मलासुद्धा ज्या गुरूची मी उपासना केली त्या गुरूच्या परंपरेचा अभिमान आहे. माझाही मोठा शिष्यगण आहे. माझं हे वैभव तू मानत नसशील तर मीही तुला मानत नाही; मी हा निघून चाललो.' ज्याला तुम्ही सरंजामशाही म्हणता त्या सरंजामशाहीच्या काळामध्ये, जिथे काही न्याय नाही, जिथे जुलूम होतात अशा राजाच्या दरबारमध्ये उभा राहून एक विद्वान आपल्या विद्वतेचा डौल सांगतो.

आणि आज? आज आपल्याकडे लोकशाही आहे असं आपण म्हणतो. या लोकशाहीच्या काळात, बी. कॉमच्या परीक्षेत कॉपी करताना पकडला गेलेला मनुष्य जर मुख्यमंत्री झाला आणि तो आपल्या केबिनमध्ये येतो आहे म्हटलं तर आमच्या विद्यापीठांचे

कुलगुरूसुद्धा उठून उभे राहतात ! हे म्हटल्यानंतर एका प्राचार्यांनी मला सांगितले की ''मुख्यमंत्री कशाला, मुख्यमंत्र्याचा चपराशी येतो आहे असं कळलं तरी आम्ही उभे राहतो !''

साहित्यिकांच्या स्वातंत्र्याला मी मानतो. पण, ते स्वातंत्र्य आपण मिरवतो आहोत, वापरतो आहोत असं साहित्यिकही मानणार नाहीत. माझं एखादं पुस्तक छापायची परवानगी कोणी मागितली तर मी एक अट घालतो- कोणत्याही परिस्थितीमध्ये हे पुस्तक सरकारी पारितोषिकाकरिता पाठवले जाता कामा नये.

शेतकरी संघटनेने साहित्यासाठी काही केलं का, साहित्यासंबंधी काही अभ्यास केला का असा एक प्रश्न या संमेलनात विचारला गेला. खरं म्हटलं तर मी शेतकरीही नाही. या सगळ्या हॉलमध्ये, शेतकऱ्यांच्या घरी जन्मलेला नाही असा, बहुतेक मी एकटाच आहे. त्यामुळे माझ्याकडे भूमिहीन शेतमजुराच्या किंवा शेतमालकाच्या घरी जन्मल्याचा डौल सागण्यासारखं काही नाही.

आणि मी साहित्यिकही नाही. साहित्यिक होण्याचा माझा विचार होता. मी कॉलेजमध्ये असताना कथा लिहायला सुरवात केली होती. माझा त्यावेळेचा आवडता लेखक सॉमरसेट मॉम- आजही आवडता आहे - याच्या कथांचं भाषांतर करू लागलो. त्यावेळच्या एका प्रसिद्ध मराठी मासिकामध्ये माझी एक गोष्ट प्रसिद्ध झाली. मुंबईत लोकल गाडीखाली सापडलेल्या एका तरूणाचे प्रेत घरी आणल्यानंतर तिथे जमलेल्यांमध्ये काय प्रतिक्रिया उमटल्या असाव्या असा त्या कथेचा विषय होता. चाळीमध्ये त्या तरूणाच्या शेजारी एक विधवा स्त्री रहात होती. तिच्या चेहऱ्यावर काय भाव उमटला असावा याचे वर्णन करताना, मी माझ्या खवचट स्वभावाने, लिहिले होते की, 'एखाद्या विधवा बाईला दुसऱ्या बाईचा नवरा मेल्यावर समाधान झाल्यावर व्हावा तसा तिचा चेहरा झाला होता.' माझ्या वडिलांनी ती प्रसिद्ध झालेली गोष्ट वाचली. माझे वडील अगदीच वेगळ्या पठडीचे. राग आला तर दुष्ट, कपटी, अभद्रेश्वर, राक्षस यापलीकडे पाचवी शिवी त्यांना माहिती नव्हती. माझी गोष्ट वाचून ते रागाने म्हणाले, ''मनुष्य जितका दुष्ट आहे तितकं सगळं कागदावर लिहिण्याची काही आवश्यकता नाही.'' मी मोठा पंचाईतीत सापडलो; जे आहे, जे मला दिसतंय ते लिहायचं नाही, म्हणजे मग काय करायचं? मग मी हळूहळू साहित्यापासून दूर व्हायला लागलो.

शेतकरी आंदोलन चालू झाल्यानंतर, सुदैवाने, 'योद्धा शेतकरी'चे लेखक भेटले. त्यांना सांगावं नाही लागलं की तुम्ही आमच्याबरोबर या. कुठे तरी अपघातानं गाठ पडली



आणि त्यांना आम्ही सांगितलं की आम्ही नाशिक भागांमध्ये असं असं आंदोलन करतो आहोत; चाकणच्या आंदोलनासंबंधी तुम्ही वाचलंच असेल. ते म्हणाले, ''शरदराव, आजपासून मी, माझी गाडी आणि माझी बायको तुमच्याबरोबर राहणार.'' आणि त्या गृहस्थाने निपाणीचं तंबाखू आंदोलन संपेपर्यंत अकरा महिने मोठ्या तपश्चर्येनं काम केलं. हे काही विनंत्या करून होणारं काम नाही. मी जो जो शब्द त्या काळात बोललो- सभेमध्ये असो, खासगी बैठकीमध्ये असो- तो शब्दन् शब्द कॅसेटवर नोंद करून कागदावर उतरून काढण्याचं महान तपस्येचं काम त्यांनी केलं. त्यातूनच 'योद्धा शेतकरी' तयार झालं. मानलं पाहिजे ! मीसुद्धा बऱ्यापैकी प्रभावी गद्य लिहितो. ललित साहित्य लिहित नसलो तरी अर्थशास्त्रासारखा कठीण विषय सर्वसामान्यांना समजेल अशा शब्दांमध्ये मांडतो. पण माझ्या पुस्तकांनी शेतकरी संघटनेचा प्रचार झाला नाही तितका 'योद्धा शेतकरी'ने झाला ही गोष्ट खरी. त्यांनी निपाणीच्या आंदोलनातील रक्तकांडावरही 'रक्तसूट' नावाची लेखमालिका 'माणूस' मधून लिहिली. अंतिमत: अशी पुस्तके कितपत उपयुक्त ठरू शकतील याबद्दल माझ्या मनात शंका आहे. पण स्वत:हून असा उपक्रम करणारांचा उत्साहभंग मी करीत नाही. शेतकरी संघटनेवर शिंतोडे उडविणारी पुस्तकेही लिहिली गेली. किंबहुना अशी पुस्तके जाणीवपूर्वक, पैसे देऊन लिहून घेतली जातील. संघटनेचे कार्यकर्ते आनंद यादवांना विनंती करतात की 'गावा'बद्दल तुमच्या मनात सहानूभूती आहे, तेव्हा तुम्ही उभे रहा आणि काहीतरी 'गावां'तील भावांबद्दल बोला. अशी पुस्तकं येऊ लागली तर त्याची येणारी प्रतिक्रियाही लक्षात घ्यायला हवी. ज्यांच्याकडे पैसे आहेत अशी मंडळी भाडोत्री लेखक लावून हवी तशी पुस्तकं लिहून घेतील. तेव्हा, कोणताही कार्यक्रम हाती घेताना त्याला प्रतिक्रिया काय येईल हे लक्षात घेणं महत्त्वाचं आहे.

चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनात आम्ही एका कार्यक्रमाचा प्रस्ताव केला होता. ज्या बायांचे नवरे दारूडे असतील त्यांना गावातल्या सगळ्या बायांनी पकडून पाण्यात बुचकळावं किंवा ठोकून काढावं. आमच्या कार्यकर्त्या महिलांना खूप आनंद वाटला. महिला प्रश्नाच्या विचाराबाबतीत मी ज्यांना गुरूस्थानी मानतो अशा एका महिलेने मला सांगितले की हे चूक आहे. कोणत्याही पद्धतीने महिला चळवळ हिंसाचाराच्या मार्गाने नेऊ नका. जर का हिंसाचाराचा मार्ग अवलंबला तर दुसऱ्याही बाजूने हिंसाचार होईल आणि हिंसाचार वाढला म्हणजे स्त्रिया नेहमीच दोन पावले मागे हटतात. आमचा प्रस्ताव आम्ही मागे घेतला.

स्वयंप्रेरणेने लिहिले जाणे काही अशक्य नाही; भास्कर चंदनशिवांना काही आम्ही सांगायला गेलो नाही की तुम्ही लिहा. पण जर का आत्मप्रेरणेने कुणी साहित्य तयार करायला निघालेलं नसेल आणि त्याला जर का आपण लिहिण्याची गळ घातली आणि असं जर लिहिलं गेलं तर तेच हत्यार आजच्या जगामध्ये चुकीचं वापरलं जाण्याचीसुद्धा शक्यता आहे. निपाणी आंदोलनात त्याचा आम्ही अनुभव घेतला आहे.

सुरुवातीला प्रचाराचे साहित्य तयार करण्याबद्दल माझ्या आणि अरविंद वामन कुलकर्णी वगैरेंमध्ये बरेच वाद झाले. माझा प्रश्न होता की तुम्हाला कुणापर्यंत निरोप पोहोचवायचा आहे ? शेतकरी संघटनेचा विचार शेतकरी समाजापर्यंत पाहोचवायचा आहे ना? त्याला वाचता येतं का? ज्या थोड्यांना थोडंफार वाचता येतं त्यांना वाचण्यात रस नाही. ही गोष्ट आजही खरी आहे. मी 'शेतकरी संघटक'मध्ये लिहितो. पण शेतकरी संघटनेच्या अनेक कार्यकर्त्यांच्या घरी त्या अंकाच्या पिनासुद्धा न काढलेल्या प्रती अजूनही सापडतात. आणि ज्यांना वाचायची आवड आहे ती माणसं तुमच्या प्रचाराने आणि पुस्तकांनी बदलतात यावर माझा मुळीच विश्वास नाही. कारण माणसाचं विचाराचं इंद्रिय मेंदू नसून खिसा आहे. माणूस विचार करतो म्हणजे आपल्या खिशाला परवडणारं, सोयीस्कर जे आहे त्याचं समर्थन करण्याकरता त्याचा मेंदू वेगवेगळे तर्कवितर्क लढवतो. त्यामुळे मतपरिवर्तन हे काही खरं नाही. ज्याचा पगार ठरलेला आहे तो शेतीमालाच्या भावाच्या बाजूने येणं शक्य नाही; अपवादानं एखादा येईल. पण साधारणपणे पगारदाराच्या मनातला हिशोब असा की तीन हजार रूपये पगारातल्या पाचशे रूपयांत जर का दूध, भाजीपाला, खाणंपिणं करता आलं तर उरलेल्या अडीच हजारात मला अमुक खरेदी करता येतं, पुढच्या महिन्यात रेडिओ घेता येईल, पुढच्या वर्षापर्यंत टेलिव्हिजन घेता येईल. असे त्याचे हिशेब सगळे तयार असतात. तेव्हा ज्वारीचा भाव तुम्ही वाढवून मागितला की त्याच्यासमोर उत्पादनखर्च येत नाही, तुमच्या 'माये'ची उघडी पाठ येत नाही, तुमच्या डोळ्यातले अश्रू येत नाहीत, रिकामं जातं येत नाही; खाण्यापिण्यावर पाचशेच्यां ऐवजी सातशे रूपये खर्च करावे लागले तर माझा रेडिओ आणि टू इन वन यायला किती वेळ लागेल याबद्दल पहिल्यांदा त्याच्या मनात प्रश्न उभा राहातो. आणि मग, तो युक्तिवाद शोधून काढतो- शेतीमालाचा रास्त भाव हे मुळी गरिबाच्या फायद्याचं कलम आहे का? यात शेतमजुरांचा विचार आहे का? त्यांनी फारसे शेतमजूर पाहिले असतात असे नाही. त्यांच्या घरची मोलकरीण जिन्याखाली तुटक्या कपातून चहा पीत असेना. हे युक्तिवाद अशासाठी काढले जातात की मुळात आर्थिक



संबंधांचा काही संदर्भ असतो. माझी भूमिका ही अशी असल्यामुळे माझी पुस्तकं प्रसिद्ध करायला मी काही राजी नव्हतो. त्यामुळे पुस्तकं प्रसिद्ध करण्याचे मी बराच काळ युक्तिप्रयुक्तीने टाळलं. ज्या लोकांपर्यंत मला पाहोचायचं आहे त्या लोकांपर्यंत मला त्यांच्या शब्दांनीच पोहोचावे लागेल, पुस्तकं वगैरे आधुनिक साधनं कितीही परिणामकारक असली तरी ती काही सगळ्यालोकांपर्यंत पोहोचणार नाहीत याबद्दल माझ्या मनात शंका नव्हती-नाही.

एकदा विनय हर्डीकर भेटले. म्हणाले, "मला काम करायचे आहे. पण, मला शेतीचा अनुभव पाहिजे. तुमची भाषणं ऐकली की आम्हीही तशीच भाषणं करतो, प्रसंगी अधिक सरस करतो. पण भाषणानंतर शेतकऱ्यांच्या ज्या बैठका होतात त्यात एखाद्यानं शेतीतील एखादी अडचण, समस्या मांडली तर तुमच्याकडे त्यावर उत्तर तयार असतं. असं उत्तर आम्ही देऊ शकत नाही, आम्ही तिथं कमी पडतो." मी हर्डीकरांना सांगितलं की "कोणाही एका माणसाचं 'मॉडेल' समोर ठेवून मोठं होण्याचा प्रयत्न करू नका. तुम्हाला शरद जोशींबद्दल आदर वाटत असेल तर आनंदाची गाष्ट आहे; पण 'शरद जोशी' ही कमीत कमी उंची गाठायची आहे आयुष्यात, हे लक्षात ठवा."

मी त्यांना म्हटलं, "हिंदुस्थानच्या सगळ्या भाषांमध्ये मला शेतकरी नायक म्हणून कुठं दिसत नाही. साहित्यात शेतकरी म्हणजे दुष्ट, जमीनदाराचा पोरगा, खांद्यावर बंदूक टाकून फिरतो, तमासगिरीणीकडे जातो, पोरी पळवतो किंवा विदूषक असतो, सोंगाड्या असतो; माणसासारखा माणूस हाडामांसाचा शेतकरी मला कोणत्याच साहित्यात सापडत नाही- मराठी नाही, हिंदी नाही, गुजराती नाही, कोणत्याच भाषेत नाही. तुमचा विषय साहित्य आहे तर शोधून काढा, ही काय भानगड आहे ते." त्यांनी बरेच परिश्रम घेऊन अभ्यास केला, गावोगाव परिसंवाद घडवले.

आम्ही गद्य माणसं असल्यामुळे डाव्या चळवळीकडे आहेत तशी लेखक कवी माणसं आमच्याकडे वळत नाहीत हे खरं आहे.

मी शेतकरी जीवनाचं उदात्तीकरण करण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. काय ते जीवन, काय ती हिरवी हिरवी झाडं, काय स्वच्छ हवा, कसं झुळझुळ पाणी, शेतीवर असणं म्हणजेच परमेश्वराच्या सान्निध्यात असणं असला वाह्यातपणा मी काही केला नाही.

शेतकरी ही एक जीवनपद्धती आहे. इतिहासाच्या एका ठरावीक काळामध्ये त्यांचं महत्त्व होतं. पण पुढे, जितकी माणसं शेतीतून निघून बिगरशेती व्यवसायाकडे वळतील तितका त्या समाजाचा विकास आहे. फक्त, शेतकऱ्यांनी उत्पन्न केलेलं वरकड मूल्य

लुटून नेणारे, शेतकऱ्यांची संपदा लुटून नेतात आणि शेतकऱ्याला मागे ठेवतात स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षातील महत्त्वाची आकडेवारी कोणती? शेतीवरील लोकसंख्या जवळजवळ कायम - ७४ ऐवजी ७० % आहे; आणि शेतीचा राष्ट्रीय उत्पादनातील हिस्सा ६४ % वरून आज २३ % वर आला आहे. शेतीतील मालमत्ता बाहेर घेऊन जायची आणि माणसं तिथंच ठेवायची हे होऊ नये, हे इतिहासाच्या विरूद्ध आहे, निसर्गाच्या विकासाच्या सिद्धांताच्या विरूद्ध आहे अशी मांडणी आम्ही करत आलो आमच्या मागे साहित्यिक, कवि, शाहिर का आले नाही याचं रहस्य यातच असेल कदाचित, पण या प्रश्नाचा शोध घेतला पाहिजे.

'ग्रामीण मराठी साहित्य संमेलन' असे या संमेलनाचे नाव आहे. यातील तीन शब्दांचा थोडा विचार करू या.

'ग्रामीण' म्हणजे काय? 'हत्ती आणि चार आंधळे' ही गोष्ट सर्वांनाच ठाऊक आहे कोणाचा हात पायाला लागता तो म्हणे हत्ती खांबासारखा आहे आणि ज्याच्या हाती शेपटी आली तो म्हणे हत्ती दोरीसारखा आहे. आनंद यादवांनी पाहिलेल्या त्यांच्या गावाचं जे वर्णन केलं ते एक विदारक सत्य आहे यात काही शंका नाही; पण बोराड्यांनी, त्यांनी पाहिलेल्या गावाचं केलंलं वर्णन हेही विदारक सत्य आहे. मग गावाची नेमकी व्याख्या काय? 'ग्रामीण' म्हणून वर्णन करताना गावाच्या कोणत्या मुखवट्याचा आपण विचार करतो? त्यापलीकडे, हा फक्त साहित्याचाच प्रश्न आहे काय? मला असं दिसतं की शेतकरी आंदोलनाविषयी जसं साहित्य तयार झालं नाही, तसंच एकही नाटक तयार झालं नाही. माझ्याकडे मराठीमधील दोनचार प्रसिद्ध नाटककार येऊन गेले, त्यांनी माझे विचार एकदोनदा ऐकले आणि विचार सोडून दिला. शेतमजुरांवर आणि आदिवासींवर आधुनिक असे कितीतरी चित्रपट निघाले. का? शेतमजूर आणि आदिवासींच्या जीवनावर आधारित चित्रपटात अभिनेत्रींना अधिक आकर्षकपणे दाखविण्याची संधी होती म्हणून. सांगायचा मुद्दा हा, की शेतकरी नायक नाही; शेतमूजर असू शकतो, आदिवासी असू शकतो हे फक्त साहित्याच्याच बाबतीत नव्हे तर सर्व कलांच्या बाबतीत खरे आहे. म्हणजे, या प्रश्नाचा विचार करावयाचा झाला तर फक्त गावाविषयी करून चालत नाही, फक्त मराठीविषयी करून चालत नाही, फक्त साहित्याविषयी करून चालत नाही; तर एका अर्थाने सर्वच शेतकरी समाज आणि नागरी समाज यांच्यातल्या संबंधांचं कोडं सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आम्हालातरी इतक्या वर्षांनीसुद्धा हे कोडं उलगडलेलं नाही.



मी काही जन्माने शेतकरी नाही; पण या बाबतीत माझ्या मनात जे काही प्रश्न तयार झाले ते सांगतो. संयुक्त राष्ट्रसंघामध्ये काम करीत असताना वेगवेगळ्या देशांत जाण्याचा योग आला. तिसऱ्या जगातील गरिबीचा उगम शेतीत आहे हे त्यावेळी लक्षात आले आणि मग मी शेती विकत घेऊन शेतकरी बनलो. मी शेतकऱ्याच्या जातीचा नाही; किंबहुना ज्यांनी शेतकऱ्यांना पिढ्यान् पिढ्या पिळलं अशा ब्राह्मण जातीत जन्मलेला आहे. हे मुद्दाम सांगतो, अशाकरिता, की कोणी आपल्या पैतृक वारशाने शेतकऱ्यांशी निष्ठा सांगू नये. मी जेव्हा हिंदुस्थानात परत आलो, त्याच्या आधी बारा वर्षे मराठी बोलत नव्हतो; घरी मुलींबरोबरसुद्धा फ्रेंचमध्येच बोलत होतो. जन्माने शेतकरी नाही, धर्माने नाही, मराठीशीही संपर्कही नाही. एवढं असूनसुद्धा शेतकरी झाल्यानंतर ज्या काही गोष्टी मला प्रकर्षानं जाणवल्या, त्या गोष्टी मला ग्रामीण साहित्यामध्ये सापडल्या नाहीत. यावर्षी, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न उभा राहिला तेव्हा सगळीकडे खळबळ उडाली; पण फारशी नाही. मंडल आयोगाचा अहवाल जेव्हा व्ही.पी. सिंगांनी मान्य केला त्यावेळी राजेंद्र गोस्वामीने आत्मदहनाचा प्रयत्न केल्यानंतर पाच आत्महत्या झाल्या आणि सरकार पडलं. दिल्लीमधल्या एखाद्या गटानं आंदोलन केलं, काहींनी आत्महत्या केली तर संबंध देश खळबळून उठतो, पेटून उठतो, सरकार पाडतो आणि आज पाचशे शेतकरी मेले तर कोणी म्हणतं, "कदाचित कर्जाच्या बोजामुळे असेल किंवा इतरही काही कारणांनी हे घडलं असेल, काय भानगडी असतील आपण काय सांगावं?" असं मुख्यमंत्रीसुद्धा खुशाल सांगत फिरू शकतात.

ग्रामीण आणि नागरी समाजातील संबंधांबाबतच्या कोड्याच्या आधीची कोडी माझ्या मनात आहेत, ती सांगतो.

पूर्वी गावातल्या सावकारांनी, जमीनदारांनी गावातील छोट्या शेतकऱ्यांचं, शेतमजुरांचं शोषण केलं यात काहीही शंका नाही. पण हे शोषणाचं आदिकारण आहे असं धरणारांची निरीक्षणशक्ती कुठे कमी पडली नाही ना? कागलच्या ब्राह्मण वस्तीतून जातांना तिथं राहतात ती सुखवस्तू दिसतात हे पाहतांना त्यांच्यातील सर्वच काही शेतीतून श्रीमंत झालेले नाहीत, एखादा त्यांनं स्वीकारलेल्या वकिलीच्या व्यवसायामुळे श्रीमंत झाला आहे हा मुद्दा त्यांच्या लक्षात का नाही आला? मी वीस वर्षांपूर्वी सांगायला सुरवात केली, की शेतीवर श्रीमंत होणे अशक्य आहे. शेती जर तोट्याचं साधन असेल तर शेती जितकी मोठी तितका तोटा अधिक. शेती घेऊन लाखोंचा नफा मिळवणारे कुणी असतील तर ते अशी कोणती पिकं घेऊन तो मिळवतात त्याचा हिशेब तर सांगू द्यात? वीस

वर्षांपूर्वी मी हे मांडायला सुरवात केली तेव्हा वि. म. दांडेकरांपासून सगळ्यांनी विरोध केला. पण आज या विषयावर काही वाद नाही राहिला. आता हिंदुस्थान सरकारने जागतिक व्यापार संघटनेकडे पाठविलेल्या आकडेवारीत कबूल केले आहे, की हिंदुस्थानातल्या शेतकऱ्याला बाजारपेठेत जितकी किंमत मिळाली असती, त्याच्यापेक्षा ७२ % कमी मिळावी अशी आमची व्यवस्था आहे. आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी आपल्याला शेतकऱ्यांचा प्रश्न समजला असं सांगितलं, कुणी बिनधुराच्या चुली काढल्या, कुणी स्वच्छताकूप काढले, कुणी पाणी जिरण्यासाठी शोषखड्डे घेतले, कुणी म्हणाले सुबाभूळ लावा, कुणी म्हणाले संकरित गायी पाळा. यांना सगळ्यांना आमचा विनम्र प्रश्न आहे, की तुमच्या ग्रामोद्धाराच्या या ज्या काही योजना होत्या त्या योजनांमध्ये सरकारने जाणीवपूर्वक ठरविलेली ७२ % लूट भरून काढण्याचा काही मार्ग होता? तुमच्या लक्षात आलं नसेल तर तो काही अक्षम्य गुन्हा नाही; पण आता ते स्पष्ट झाल्यानंतर तुमच्या अहंकारापोटी तुमचंच म्हणणं चालू ठेवलं तर तुमच्या ग्रामीण जीवनाशी सांगितलेल्या निष्ठांबद्दल संशय तयार होतो.

मी शेती चालू केली तेव्हा पहिल्यांदा बटाटे लावले. खूप तण झालं होतं, डोंगराच्या उताराचा भाग असल्यामुळे. तण काढायला माणसं लावायला पाहिजेत, नाहीतर बटाट्याचं पीक जाणार अशी परिस्थिती उभी राहिली. माणसं शोधायला गेलो तर गावातल्या लोकांनी सांगितलं, की आता तण काढायला कुणी मजूर मिळणार नाहीत; बाया नाहीत आणि पुरुषही नाहीत. का? तर म्हणे, आषाढी एकादशी जवळ आली आहे आणि लोक मोठ्या संख्येनं पंढरपूरच्या वारीत चालले आहेत. मला मोठं आश्चर्य वाटलं. ज्या काळात शेतकऱ्याच्या शेतामध्ये प्रचंड कामं असतात अशा वेळेला लाखो लोकांना उठवून पंढरपूरला घेऊन जाणारी ही भक्तिमार्गाची परंपरा टिकलीच कशी? केवळ विठोबाच्या दर्शनाकरिता ही मंडळी जातात हे काही मला पटेना; मग मी सरळ देहूला गेलो, यात्रेमध्ये सामील झालो आणि एक भयानक विदारक सत्य माझ्यासमोर आलं.

आमच्या कोरडवाहू भागातील शेतकरी, बियाण्यासाठी कशीबशी बाजूला ठेवलेली ज्वारी शेतामध्ये फुंकून टाकली, की घरी खायलासुद्धा काही राहत नाही म्हणून वारीमध्ये जातो आणि वारीच्या पहिल्या दिवसापासून कुठं फुटाणे वाटताहेत, कुठं कुरमुरे वाटताहेत, कुठं केळी वाटताहेत त्याच्या आशेवर पुढे पुढे जात राहतो. देहूपासून पंढरपूरपर्यंत जाणाऱ्या या यात्रेचा भक्तिसंप्रदायाशी काहीही संबंध नाही, कोरडवाहू भागातल्या उपाशी शेतकऱ्यांची पंढरपूरपर्यंतच्या रस्त्यावरील पाण्याची सोय असलेल्या भागातून जाणारी



ती भीकदिंडी असते. हे साहित्याला का जाणवले नाही?

चाकणच्या कांदा आंदोलनाच्या वेळी तेथे जे पोलिस इन्स्पेक्टर होते त्यांची पुढे पुणे स्टेशनला बदली झाली. तेथून ते एकदा मला भेटायला आले. त्यांनी मला सांगितले की पुण्याच्या रेल्वे स्टेशनवर दररोज चारपाच तरी अल्पवयीन मुली, खेड्यापाड्यातून आलेल्या, सैरभैर अवस्थेत उतरतात. नंतर त्या दिसत नाहीत; पण तपास केल्यानंतर कळले, की शेतीवर राबणाऱ्या आईबापांच्या घरी धड पोट भरत नाही म्हणून घर सोडून काम शोधण्यासाठी आलेल्या या मुली असतात. त्यांच्या या प्रवासाचा शेवट कुंटणखान्यात होतो. घर सोडून आल्यानंतर कुंटणखान्यात जाईपर्यंत त्यांच्या मनाची काय अवस्था असेल? नंतर सबंध आयुष्य त्या मनाच्या कशा अवस्थेत कंठीत असतील? पुण्यामुंबईसारख्या शहरांतील हे वेश्यांचे पिंजरे शेतीमालाला भाव नसल्यामुळे दरिद्री होणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनाचे, खेड्यातल्या परिस्थितीचे प्रतीक आहेत. त्याचं चित्र साहित्यात कुठेच उतरलेलं दिसत नाही.

शेतकऱ्यांच्याबद्दल एक विचित्र गोष्ट लक्षात आली. बहुतेक शेतकऱ्यांच्या घरी एकाच भावाचा संसार धड होतो. दुसऱ्या भावाची बायको माहेरी तरी लावून देतात किंवा त्याची मुलं जगतच नाहीत. मला कळेना, सगळीकडे असं कसं होईल? मग, माझ्या असं लक्षात आलं, की जमिनीचे तुकडे फार पडू नयेत म्हणून शेतकऱ्यांच्या घरामध्ये एकाच भावाचा संसार साधारणपणे धड होतो. हे असं मुद्दाम घडवून आणतात का आणखी काही मार्गाने होतं हे तपासून पाहावे लागेल; पण, आकडेवारीने तपासले तर असे घडते हेच कळून येते. मला 'ग्रामीण' अनुभूतीमध्ये हे दिसत नाही.

अजून एक गोष्ट माझ्या मनाला बरेच दिवस लागून राहिली आहे.

शेतकरी आईबाप म्हातारे झाले की त्यांच्या लक्षात येतं, की आपल्या हातून काही काम होत नाही. पोराच्या संसाराला आपण ओझं झालो आहोत. ते म्हातारे आईबाप पोराला म्हणतात, "पोरा, आमचं आता वय झालं, सारा काही संसार पार पडला, तूही आता कर्तासवरता झाला, आता एकच इच्छा राहिली आहे; काशीला मरण यावं आणि देहाचं सोनं व्हावं. एवढी एक इच्छा पुरी करू द्या, नाही म्हणू नका." शेतकऱ्याघरचे म्हाताराम्हातारी काशीला जायला निघतात. एखादं बोचकं आणि घेतले तर पाचपन्नास रुपये घेऊन. पोहोचली तर पोहोचली. काशीपंढरपूरसारख्या तीर्थस्थानी पोहोचलीच तर तिथे पुष्कळ धर्मात्मे 'पुण्याय पापक्षालनाय च' भोजनावळी घालत असतात. तिथं जितके दिवस जगता येईल तितके दिवस जगावं आणि काशीला मरण आलं तर सरणाचाही

खर्च येत नाही. कोणीही गंगेत लोटून दिलं, की गंगामाई वाहून नेते. सिंदबादच्या कहाण्यां एक वर्णन आहे- एका बेटावर हत्तींची अशी एक दरी असते. म्हातारे झालेले हत्ती ति जातात आणि मरतात. काशी हे हिंदू लोकांचे, विशेषत: शेतकऱ्यांचे धर्मभावनेने ठेवण्याचं स्थान नाही; तर आपल्या पोराला आपला भार सोसत नाही म्हणून आईबाप करावयाच्या आत्मत्यागाची जागा आहे. हे विश्लेषण मी अनेक लोकांशी बोलून, च करून केले आहे. हे विश्लेषण मला साहित्यात कुठे सापडत नाही. माझ्यासारख्या बाहेर माणसाला या गोष्टी समजतात, 'ग्रामीण' म्हणवणारे, सर्व गावाचं दु:ख घालवण्याऐव गावागावामधले वाद; हे झोपडं, ती वस्ती, तो वाडा यांच्याच वर्तुळात गिरक्या घेत बसतात? गावामध्ये वाडा आहे, वाडी आहे, वस्ती आहे आणि गावाचं रूप वाडा हे खरं आहे, वस्ती हेही खरं आहे आणि वाडी हेही खरं आहे. या सगळ्यांच्या छटा ग्रामी साहित्यात आल्या आहेत. आपण ग.ल. ठोकळांच्या कवितेची चेष्टा करतो. त्यांच्यासारखे इतरही अनेक कवी आहेत. गावावर जेव्हा ब्राह्मण, सावकार, जमीनदार, शिक्षक यांचा पगडा होता त्या वेळी जी काव्यरचना झाली, त्याचं प्रातिनिधिक स्वरूप 'ग.ल.ठोकळ' आहेत. 'अजुनि कसे येती ना परधन्या राजा' यांसारख्या ब्राह्मणी तोंडवळ्याची; प जानपद भाषेतील कविता त्या काळात तयार झाली. हा त्या ग्रामीण आविष्काराचा एक भाग आहे. त्यानंतर पाटील, माडगूळकर, मिरासदार अशी मंडळी आली, ती कोणाचे प्रतिनिधित्व करतात? वाड्यांमधून सहकारी चळवळीत किंवा त्या संबंधात जी माणसं गेली आणि मोठी झाली त्यांचा गाव सांगणारे साहित्य ते तयार करतात. तेही गाव आहे; पण ते गावाचं एक वेगळं रूप दाखवतं. ग्रामीण साहित्य चळवळ म्हणून जी म्हटली जाते तिने मोठं काम केलं आहे. त्यातल्या प्रत्येकानं आपल्याआपल्या अनुभवातलं गाव चितारलं; ते अत्यंत प्रामाणिक चित्रण आहे; पण ते हत्तीचा पाय किंवा शेपूट सांगणारं आहे. याच्या पलीकडे वाडा, वाडी आणि वस्ती यांचं एकक सांगणारं ग्रामीण साहित्य का तयार होत नाही. मी असं म्हणत नाही, की गावातला सावकार अन्याय करतो तरी त्याच्याविरुद्ध बोलू नका. कोणी कोणाला अडचणीत आणीत असेल तर ते सांगितलं पाहिजे. पण, तेच तेच सांगायचं, गावातली झोपडी आणि विटांचं घर यांच्यातला संघर्ष वारंवार सांगायचा आणि गावातल्या झोपडी आणि विटांच्या घरातील दरिद्री जीवनामागे मुंबईच्या चोवीस मजली इमारती आहेत, त्याच्याबद्दलमात्र एक अक्षर काढायचं नाही. असं दिसत नसेल तर 'जे न देखे रवि ते देखे कवी' ऐवजी सोयीसोयीनं पाहणारा हा कवी आहे असा प्रकार होईल. आजकालचं शेतकरी साहित्य किंवा ग्रामीण



साहित्य म्हणजे जणू विनोदी विषय आहे. या साहित्यातील शेतकरी म्हणजे कुठे गण्याभामट्या किंवा पाटलाचा पोर- खांद्यावर बंदूक टाकून जुलूम करणारा नाही तर सोंगाड्या किंवा विदूषक किंवा थोडाफार अर्धवट. ग्रामीण साहित्यामध्ये जिवंत हाडामांसाचं चित्रण फार कमी होतं; Characterization(व्यक्तिचित्रण) कमी होतं, caricaturingच (विद्रूपीकरण) जास्त होतं. म्हणजे लेखक काही गुण मनात धरतो आणि एखादी व्यक्ती म्हणजे त्या गुणांचं मूर्तिमंत रूप असं धरून पहिल्या पानापासून तीनशे बावन्नाव्या पानापर्यंत त्या व्यक्तीची तीच गुणवत्ता कायम ठेवून मांडणी करतो.

शेतकरी संघटनेमध्ये एकेका वेळी लाखांनी माणसं आंदोलनात उतरली; सभांना जमली, शहरामध्ये जाऊन पराभूत होऊन परतलेला, पायजमा घालणारा शेतकऱ्याचा मुलगा या संघटनेचा पाईक आहे. याच्या ऊर्मी काय? घरचे सर्व पैसे खर्च करून हा का धावतो आहे? मला प्रश्न पडतो, की या शेतकरी तरुणाचं चित्रण का झालं नाही? त्यापलीकडे, शेतकरी महिला आघाडीचं काम आहे. दोन लाख महिलांच्या नावावर जमिनी करून दिल्या. तुम्ही शेतकरी बायांना विचारलं तर त्या सांगतील, की 'चांदवडच्या महिला अधिवेशना'नंतर आम्हाला, पहिल्यांदा, माणूस म्हणून जगायला मिळालं; आधी आमची घरची माणसंसुद्धा आम्हाला माणसासारखं वागवत नव्हती. या महिलेचं चित्रण साहित्यामध्ये का नाही दिसत? तसंच आणखी एक पात्र आहे; महाराष्ट्राच्या जिल्ह्या-जिल्ह्यात आहे. शेतकरी संघटनेच्या आंदोलनामध्ये शिकलेली बी.ए., एम.ए. झालेली, थोडाफार पैसा हाती असलेली मुलं आली, एखाद्या आंदोलनामध्ये तडफेने चमकली आणि दुसऱ्या आंदोलनाच्या वेळी चमत्कार असा घडला, की ती राज्यकर्त्या पक्षात सामील झाली. आपल्या साहित्यात त्याचं प्रतिबिंब कुठंतरी पडायला काय हरकत आहे? सत्तर टक्के शेतकरी आहेत म्हणजे सत्तर टक्के साहित्य शेतकऱ्यांचंच असलं पाहिजे असा काही माझा आग्रह नाही. किंबहुना, ते तसं असूही शकणार नाही. कारण, साहित्य हा सौंदर्याच्या आविष्काराचा भाग आहे आणि सौंदर्याची व्याख्या,

*क्षणेक्षणेऽयं नवतामुपैति । तदैव रूपम् रमणीयताय: ।।* अशी आहे. सतत बदलत असतं तिथं सौंदर्याचा साक्षात्कार होतो आणि त्याच्या आविष्कारातून साहित्यकृती जन्माला येते. आपण आजूबाजूला वावरत असताना संदर्भाने महत्त्वाच्या ज्या गोष्टी असतात, त्याच नोंदल्या जातात. उदाहरणार्थ, एखादा रहदारीचा रस्ता ओलांडताना डावीउजवीकडून येणारी सगळी वाहने आपल्या नजरेसमोरून जातात, पण एकदा का रस्ता ओलांडला आणि कुणी विचारलं, की कशाकशा गाड्या होत्या तर काही सांगता

येत नाही; रस्ता ओलांडत असताना एखादी गाडी करकचून ब्रेक लावून थांबली असेल तर तेवढंच लक्षात राहतं. तेव्हा, महत्त्वाच्या ज्या गोष्टी अनुभवाला येतात त्याच साहित्यात नोंदल्या जातात. त्यामुळे, शेतकरी जीवनात जितकं नवनवीन घडलं असेल तितकंच साहित्यात उतरेल हे मला माहीत आहे; पण महाराष्ट्राच्या ग्रामीण साहित्याचा वारसा सांगताना, गेल्या वीस वर्षांत महाराष्ट्रातील शेतकरी जीवनात जे घडलं ते पूर्णपणाने न येवो, पण त्याची छटाही ग्रामीण साहित्यात दिसत नाही, हे का? बीजिंग परिषदेच्या नावाने जगभरच्या महिला जमा झाल्या आणि त्यांनी काढलेल्या जाहीरनाम्यात म्हटले की बायांना स्वातंत्र्य नको, स्वातंत्र्य मिळालं तर बायांचं नुकसान होतं. महाराष्ट्रातल्या शेतकरी महिला एकमेव अशा, की शिक्षणात मागे पडो की आरोग्यात मागे पडो आम्ही स्वातंत्र्य हे मूल्य महत्त्वाचं मानतो. ज्या ज्या प्राण्याला जीव आहे तो स्वतंत्रतेवर जगतो. ही बाई ग्रामीण साहित्याला कशी दिसली नाही?

मागे, मला दिल्लीच्या एका महाराष्ट्रीयन विद्वानानं सांगितलं, ''हल्ली कोणीही उठतो आणि डंकेल प्रश्नावर बोलतो; कोणी काही वाचलेलं नसतं किंवा डंकेल प्रस्ताव पाहिलेला नसतो. डंकेल साहेब आहे, राक्षस आहे, तो तुमचं बियाणं काढून नेईल, गाईचा गोऱ्हा ओढून नेईल, - काय तोंडाला येईल ते सांगावं. फक्त सभागृहामध्ये कोणी लाल बिल्लेवाला बसला नाही ना पाहावं आणि वाट्टेल ते बोलावं !'' शेतकरी संघटना ही आंदोलनापेक्षाही महाराष्ट्रातलं महाप्रचंड विद्यापीठ आहे याचं हे प्रमाणपत्र नाही काय? एक संपूर्ण वेगळा विचार संघटनेनं दिला. जे विद्वानांना समजत नाही ते अर्थशास्त्र शेतकऱ्याघरच्या अर्धशिक्षित/अशिक्षित पोराला समजू लागलं. याची आपल्या साहित्यात काही छटा उमटावी अशी आम्ही अपेक्षा ठेवली तर ती चूक होईल; पण माफी न करण्याइतकी चूक होईल?

शेतकरी संघटनेचा मी अभिमान बाळगतो; पण ग्रामीण साहित्याला ती दिसली नाही. एका अर्थाने शेतकरी संघटनेचा पराभव झाला आहे आणि ग्रामीण साहित्याचीही चळवळ काही फार जोरात चालू नाही. एका तऱ्हेने आपण दोघेही हरतो आहोत आणि ज्या लोकांचा आपण कडवा विरोध केला ते लोक आता मोठ्या तेजाने तळपताहेत. वेगळ्या अर्थाने सांगायचे झाले तर, जोतिबा फुल्यांचा तिसऱ्यांदा पराभव झाला आहे. जोतिबांनी स्पष्टपणे मांडलं आहे- इंग्रज इथं कायमचा राहणार आहे असं नाही, इंग्रज एक दिवस जाणारच आहे; पण हजारो वर्षे आपण जातीजातींना दास्यात ठेवलं, इंग्रजांमुळे त्यांना विद्या मिळायची शक्यता पहिल्यांदा तयार झाली आहे, ती विद्या गावागावात



माणसामाणसापर्यंत पोहोचू द्या. मग, आपण इंग्रजांना काढून लावू या. वासुदेव बळवंत फडके रामोशांच्या मुलांची डोकी फिरवून इंग्रजांना विरोध करतो आहे असे जोतिबा फुल्यांनी स्पष्टपणे मांडले. 'जोपर्यंत राष्ट्र एक नाही 'एकमय लोक' या अर्थी राष्ट्र नाही तोपर्यंत 'न्याशनल कॉंग्रेस' कसली काढता?' असा परखड प्रश्न त्यांनी केला. लोकांना 'अविद्ये'चे अंकितच ठेवून स्वातंत्र्याची चळवळ केली आणि स्वातंत्र्य मिळालं, तर इथे पुन्हा पेशवाई अवतरेल हे सांगणारा महात्मा शंभर वर्षांपूर्वी होऊन गेला.

जोतिबा फुल्यांचा पहिला पराभव राष्ट्रवाद्यांनी केला. ते म्हणाले, आपल्यातलं जातीयवादाचं प्रकरण आपण नंतर बघून घेऊत, लोकांना विद्या द्यायचं कामही नंतर करू; पण परदेशी संस्कृतीचा, परदेशी तंत्रज्ञानाचा वारा आमच्याकडच्या खालच्या जातीच्या लोकांना मिळता कामा नये; म्हणून त्यांनी ओरडा केला, 'राष्ट्र महत्त्वाचं आहे, स्वातंत्र्य महत्त्वाचं आहे' आणि जोतिबा फुल्यांचा पहिला पराभव झाला.

स्वातंत्र्य मिळालं. शेतकरी समाज सगळा स्वातंत्र्याच्या चळवळीत सामील झाला होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शेतकरी समाजाला वाटलं, की आतातरी शेतकऱ्यांचं स्वातंत्र्य येईल, आतातरी विद्येचा प्रवाह आमच्यापर्यंत येईल. सरकारनं सांगितलं की विद्येचा प्रवाह तुमच्यापर्यंत आवश्य येईल पण तो खळाळत वाहणारा नसेल. आमच्या शिक्षणखात्याच्या डबक्यातून जेवढं पाणी तुमच्याकडे सुटेल तेवढंच घ्या; जगाशी तुमचा संबंध नाही. पहिल्यांदा जोतिबांचा पराभव झाला राष्ट्रवादाच्या नावानं; १९४७ मध्ये त्यांचा पुन्हा पराभव झाला आणि समाजवादाच्या नावाखाली देश स्वावलंबी बनविण्याच्या कल्पनेने पुन्हा एकदा स्वातंत्र्याचे दरवाजे बंद झाले.

१९९१ मध्ये समाजवादाचे वाटोळे झाले आणि आता पुन्हा एकदा खुले वातावरण येईल, बाहेरच्या तंत्रज्ञानाशी लोहार, मिस्त्री, तांबट अशांसारख्यांचा संबंध येईल म्हटल्याबरोबर पुन्हा राष्ट्रवादी उठू लागले आहेत, स्वदेशीवाले उठू लागले आहेत. जोतिबांचा तिसऱ्यांदा पराभव होतो आहे.

मी स्वत:ला जोतिबांची पताका घेऊन जाणारा समजतो. मी फार थोड्या लोकांना मानतो. जोतिबांना मानतो ते व्यक्तिपूजा म्हणून नाही. जोतिबांनी जे काही लिहिले आहे त्यातले सात-आठ टक्केच मला मान्य आहे; पण शंभर वर्षांपूर्वी लिहिलेल्यातील तुम्हाला सात-आठ टक्के पटावं ही काही लहानसहान बाब नाही.

जोतिबांच्या विचारात मला सापडलेले काही महत्त्वाचे पैलू सांगतो. जोतिबा फुल्यांनी तीन सरहद्दी ओलांडायला सांगितल्या.

पहिली गावामध्ये वाडा, वाडी, वस्ती हा भेद नको. आठ बैलांचा ज्याचा बारदाना आहे अशा शेतकऱ्याच्या घरची काय दुरवस्था आहे हे त्यांनी सविस्तरपणे सांगितलं; संघर्ष आहे तो शूद्र आणि भटशाहीतला आहे, वाडी-वस्तीतला नाही.

दुसरी सरहद्द. हिंदु-मुसलमान वाद खोटा. 'महंमदाचे जवांमर्द शिष्य' जेव्हा हिंदुस्थानात आले तेव्हा कुणब्यांनी त्यांचं स्वागत केलं, हे त्यांनी रोखठोकपणे सांगितलं; आजसुद्धा असं म्हणायची कोणी हिंमत करीत नाही.

आणि तिसरी. इंग्रज आले तरीसुद्धा पाश्चिमात्य संस्कृतीचा फायदा आपल्याकडच्या सर्व जातीजमातींना मिळाला पाहिजे.

अशा तऱ्हेने गावातले अंतर्गत भेद बाजूला टाका, हिंदू-मुसलमान भेद बाजूला टाका; राष्ट्र आणि परराष्ट्र असा भाव न ठेवता विद्येचा अवलंब करा असं सागणारा विशाल दृष्टीचा, खुल्या मतवादाचा पाईक जोतिबांच्या रूपाने आपल्यासमोर आला. शेतकरी संघटनेमध्ये आम्ही जोतिबा फुल्यांचंच काम चालवतो आहोत, हे मी सुरवातीपासूनच सांगत आलो आहे.

जोतिबा फुल्यांचा पराभव झाला आणि मग काय झालं? जोतिबांच्या विचारातील काही भागाचं महत्त्व फार वाढवलं. उदाहरणार्थ जातिवाद. त्यापलीकडे, समाजवादाचं खूळ सगळीकडे पसरलं तेव्हा जोतिबा फुले आणि समाजवाद असं मिश्रण तयार केलं गेलं; त्यापुढे जाऊन फुले, आंबेडकर, मार्क्स असं काहीही! जे जे चटपटीत असेल त्याची भेळ करा, इथे खपते ! फुले आणि मार्क्स यांच्यामध्ये काही मूलभूत फरक आहे, तो लक्षात न घेता फुल्यांच्या विचाराला मार्क्सवादाचं झापड लावून सामूहिक पुरुषार्थाच्या कल्पना त्यामध्ये टाकल्यामुळे फुले मागे पडले. शेतकरी संघटनेने महात्मा फुल्यांचा आत्मा जपला, व्यक्तिस्वातंत्र्याची निष्ठाही जपली आणि त्यांच्या सहा कार्यक्रमांपैकी 'शेतीमालाचा भाव' हा कार्यक्रम घेऊन पुढे मार्गक्रमण सुरू केलं. आता आम्हीही थकलो.

आज आपण या ठिकाणी विचार करायला जमलो. तुम्ही साहित्यिकांनी 'साहित्य कामाठी' करावी अशी माझी मुळीच इच्छा नाही. कारण तुमच्या व्यक्तिस्वातंत्र्याची चिंता तुमच्यापेक्षाही मला जास्त आहे. तुम्हाला आतून ऊर्मी येऊन या प्रश्नावर काही लिहावंसं वाटलं तरच लिहा, नाही तर, खुद्द शरद जोशींनीसुद्धा कधी चुकून सांगितलं 'लिहा' तरी लिहू नका. तुम्हाला लिहायला लावायचंच असं ठरलं तर मी काय करीन? मी सगळ्या शेतकऱ्यांना सांगेन, की प्रत्येक शेतकरी कुटुंबाने दरवर्षी निदान एक मराठी कादंबरी घ्यावी. तुम्हीच काय, गंगाधर गाडगीळ आणि व.पु. काळेसुद्धा ग्रामीण कथा



लिहायला लागतील. ग्रामीण भागामध्ये कादंबऱ्यांचा खप एक कोटीचा आहे असं झालं तर हे अशक्य नाही. तेव्हा, साहित्यिकांना ग्रामीण साहित्य लिहिण्यास उद्युक्त करायचे झाले तर त्यासाठी मी काही संमेलनांत आणि परिषदांत जाणार नाही.

आपण जे जमलो आहोत ते त्याच्याहीपेक्षा जास्त महत्त्वाच्या प्रश्नांवर विचार करायला. शेतकरी आणि नागरी समाजांमध्ये ही अशा तऱ्हेची भिंत तयार का व्हावी?

पहिलं कारण, शेतकरी हा वाचण्यात आणि लिहिण्यात, दोन्हींतही कच्चा आहे. म्हणजे, पुस्तक लिहिणं हे काही शेतकऱ्यापर्यंत पोहोचायचं साधन नाही. भजनं, कीर्तनं, तमाशे, लावणी अशाच साधनांनी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचता येतं ही फार जुनी परंपरा आहे. 'लिहिणारा ब्राह्मण, गाणारा महार, नाचणारी महारीण' ही फार जुनी परंपरा आहे. त्यात, कुणबी किंवा शहाण्णव कुळीच्या मराठ्याने कविता लिहिल्या असं काही कुठं दिसत नाही. तात्पर्य असं, की शेती करणाऱ्या ज्या काही जाती आहेत त्यांचा लिखाणाशी काही संबध नाही; भजनं करतील, कीर्तनं ऐकतील, वारीला जातील, संत वाङ्मय पाठ असेल हे सगळं खरं; पण हे श्रवणभक्तीनं आलेलं आहे, लिखाणावाचनाने नाही.

दुसरा मुद्दा. मराठीतील पुस्तकं सगळ्यात जास्त कोण वाचतो? मुंबईतील लोकल गाडीत बसलेला मनुष्य तासभरच्या प्रवासात वाचतो. त्यामुळे, मराठीतील सर्वश्रेष्ठ, जास्तीत जास्त खप असणारे साहित्यकार आहेत ते रहस्यकथा किंवा पाणचट कथा लिहिणारे आहेत. शेतकरी वाचत नाही तर त्याच्या बाजूनं लिहिलेलं साहित्य प्रकाशक कसे काय प्रकाशित करणार? शेवटी व्यवहार आहेच. पुस्तकाची बाजारपेठ ही शहरी आहे. त्यानंतर, सगळ्यांना मान्य करावं लागेल की, बहुतेक साहित्यिक नोकरदार आहेत, त्यांतलेही बहुतेक प्राध्यापक आहेत. अर्थशास्त्रीसुद्धा जवळजवळ सगळे प्राध्यापक आहेत. आणि शेवटी शेतकऱ्याचा पोटचा मुलगा मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर गेला, की तो बापाचीसुद्धा कीव करीत नाही. ज्याचं पोट शेतावर आहे तोच फक्त आपल्या शेतकरी बापाची काळजी करतो; दुसऱ्या व्यवसायात गेलेला कुणी करीत नाही. त्या नोकरदाराने आपल्या आईबापाचं दु:ख कितीही आठवून लिहिण्याचा प्रयत्न केला तरी त्यात प्रतिभा थोडीच उतरणार आहे? माओ त्से तुंगने म्हटलं की 'पर्मनंट रिव्होल्युशन' तरी ते अशक्य आहे. तुमची राहण्याची स्थिती सुधारली, घरात टेलिव्हिजन आला, दारापुढं गाडी आली, छानशी बायको आली, की क्रांती करू नये असं वाटतं ! तेव्हा, माझी सर्व ऐहिक परिस्थिती बदलली, सुधारली तरीसुद्धा माझ्या विचारात फरक पडत नाही असं कोणी म्हणेल तर तरे खरं नाही. परिस्थिती बदलल्यानंतर मनुष्य बदलणारच.

पुस्तकांना सरकारी आश्रय हीही एक महत्त्वाची गोष्ट बनली आहे. शेतकऱ्याच्या जीवनामध्ये नवनवीनता नाही; वर्षावर्षाला चक्र तेच आहे. मनुष्याच्या आयुष्यात सर्वांत महत्त्वाची गोष्ट हवा; पण या इतक्या महत्त्वाच्या गोष्टीला काही किंमत पडत नाही कारण ती सदासर्वकाळ सहज उपलब्ध असते. जी वस्तू सहजी उपलब्ध होत नाही तिचा जितका तुटवडा तितकी तिची किंमत वाढते. बाळाचा जन्म होणे हे सगळ्यांत मौल्यवान उत्पादन, मोठा चमत्कारच असतो तो; पण,एवढा चमत्कार फार वेळा होतो म्हणून आपण तक्रार करतो आणि कुटुंबनियोजन करतो. एवढंच नव्हे तर एवढं महत्त्वाचं उत्पादन करणाऱ्या उत्पादकांना काहीच महत्त्व नाही. ज्या कारणाने बाईच्या उत्पादनाला महत्त्व नाही त्याच कारणानं शेतकऱ्याच्या उत्पादनाला महत्त्व नाही. किंबहुना शेतकरी आणि बाई या दोघांची परिस्थिती सारखीच असते. शेतकरी हा देशाची 'बायको' आहे असं समजलं तर यामागचं सगळं कोडं समजेल. तुम्ही उत्पादन करता ते महत्त्वाचं आहे, पण त्यात जर नवनवीनता नसेल तर त्याला महत्त्व येण्याची शक्यता नाही आणि साहित्यिकांचं, कलाकारांचं काम नवनवीन असेल त्याचा उन्मेष दाखवणं आहे, हेही आपण लक्षात घेतलं पाहिजे.

सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा. ॲडम स्मिथचा मी भक्त आहे. १७ व्या शतकामध्ये इथे शिवाजी महाराज जेव्हा इतिहास घडवीत होते त्याच वेळी त्याचं ' Wealth of the Nation (राष्ट्राची संपत्ती)' सारखं पुस्तक लिहिलं गेलं, हे मला मोठं अद्‌भुत वाटतं; पण ॲडम स्मिथनं आणखी एक पुस्तक लिहिलं, त्याची माहिती फार थोड्या लोकांना आहे. या पुस्तकाचं नाव आहे 'Theory of Moral Sentiment '. मनुष्याला स्वार्थाची भावना आहे का? जो तो स्वार्थाकरिताच धावतो काय?

बाजारपेठेचं तत्त्वज्ञान सांगणारा ॲडम स्मिथ म्हणतो, 'नाही. मनुष्याला स्वार्थ ही जितकी उपजत प्रेरणा आहे तितकीच सहानुभूती आणि करुणेची नैसर्गिक प्रेरणा असते.' तुम्ही कुणाचं दु:ख पाहिलं तर कसं पाहता? तुम्हाला दुसऱ्याचं दु:ख पाहून दु:ख का होतं? कारण, आपल्या बुद्धीची रचनाच अशी असते, की अपण स्वत: त्या माणसाच्या जागी आहोत अशी कल्पना करतो. एखाद्या माणसाला जखम झालेली पाहिली, की आपल्याला अशी जखम झाली तर काय होईल या कल्पनेत आपण जातो. म्हणून तर डॉक्टर टाके घालीत असताना ते पाहणारे चक्कर येऊन पडतात. मेडिकल कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना मुद्दामहून सांगतात, की टाके घालताना आपण माणसाच्या शरीराला टाके घालत नसून एखाद्या ज्वारीच्या पोत्याला टाके घालतो आहोत अशी कल्पना करा.



दुसऱ्याविषयी करुणा असणं, सहानुभूती असणं ही माणसाची उपजत प्रेरणा आहे. आपण हळूहळू हुशारीहुशारीनं आपल्या करुणेवर पांघरूण घालात आलो. 'मदर तेरेसा' वेगळी. रस्त्यावर कितीही मरणारे दिसले तर ते उचलून घेऊन जातात. आपण दररोजच्या कामातली माणसं. आपण काय करतो? आपण विचार करतो, एकदा थांबलो होतो; आता थांबलो तर उशीर होईल, साहेब रागावेल आणि म्हणून तिथून पुढे निघतो. मग आपण मनाला शिकवतो, मनामध्ये उत्पन्न होणारी करुणेची भावना झाकून टाकायला शिकवतो.

हिंदु-मुसलमान दंगा झाला तर हिंदू मेला का मुसलमान मेला, बलात्कार झालेली बहीण हिंदू होती का मुसलमान याने काय फरक पडतो? पण कोणी सांगितलं, ''दंगा झाला'' की आपण विचारतो ''किती मेले आज?'', सांगणारा सांगतो, ''बावन्न.'' मग आपण विचारतो, ''त्यांचे किती? आणि आपले किती ?'' जणू काही क्रिकेटचा स्कोअर आहे. कारण, आपल्या संस्कृतीने आपल्याला जे आपल्या धर्माचे नाहीत त्यांच्याविषयी करुणा बाळगायची नाही अशी मन बधिर करायची कला शिकवली आहे. पाकिस्तानातही हिंदुस्थानच्या लोकांविषयी बधिरता तयार झाली आहे. नागरी समाज आणि शेतकरी यांच्यामध्ये अशी बधिरता आणण्याचा कार्यक्रम चाललेला असतो आणि माझ्या मते, ग्रामीण साहित्य प्रभावशाली न होण्याचं सर्वांत मोठं कारण हे आहे. नगरे आणि खेडी यांच्यातला संघर्ष फार जुना आहे. मार्क्सने त्याबद्दल लिहिलं आहे, गांधीजींनीही लिहिलं आह; पण आज फ्रान्समध्ये, जपानमध्ये, अमेरिकेमध्ये शेतकरी विरुद्ध नागरी किंवा शेतकरी विरुद्ध बिगरशेतकरी हा संघर्ष संपलेला दिसतो. त्याचं कारण, आज या सगळ्या सुधारलेल्या देशांमध्ये शेती तोट्याची नाही, इतकेच नव्हे तर शेतीला सबसिडी दिली जाते- जपानमध्ये ८० %, युरोपमध्ये ६० %, अमेरिकमेध्ये ३५ %- लोकांनी शेतकरी राहावं म्हणून. गाव विरुद्ध शहर हा वाद या सगळ्या देशांमध्ये मिटला. हिंदुस्थानात अजूनही शेतीला उणे बहात्तर टक्के सबसिडी का आहे?

सगळ्या जगामध्ये शेती आणि बिगरशेती यांच्यामध्ये दोन फरक आहेत. एक म्हणजे शेतीच्या कामाचं स्वरूप वेगळं आहे, शेतीची शैलीच वेगळी आहे आणि दुसरा, शेतीचा भूगोल वेगळा आहे. शेतकरी सगळे खेडेगावांत असतात आणि नागरी संस्कृतीचे लोक, मग ते वेशीच्या आतले असोत बाहेरचे असोत, ते वेगळे असतात.

हिंदुस्थानात, दुर्दैवाने, आणखी एक तिसरा फार मोठा फरक आहे. तो फरक आहे जातीचा. शेती करणारांची जात वेगळी आहे आणि त्यामुळे शेतकरी समाजाविषयी शहरातील बहुतेक लोकांनी आपली मनं बधिर करून घेतलेली आहेत. मी जेव्हा शेतकरी

संघटनेचं काम सुरू केलं तेव्हा माझ्या कुटुंबातील सर्वांनी, मी कामातून गेलो असंच म्हटलं. माझ्या बायकोनं तिच्या बहिणीला मी काय करतो आहे, कसं चांगलं काम करतो आहे हे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ती बहीण म्हणाली, ''हे शेतकरी दु:खी कष्टी वगैरे असतात हे काही खरं नाही. त्या लोकांना असं जगायची सवयच असते.'' 'आम्हाला ताट वाढून आलं नाही तर मोठं दु:ख होतं आणि त्यांना भाकरी मिळाली नाही तरी त्यांना दु:ख होत नाही कारण त्यांना उपासमारीची सवय असते.' ही भावना नागरी संस्कृतीची आहे.

आणि थोडं तथ्यही असावं त्यात ! भाकरी नाही मिळाली, कर्ज नाही मिळालं तर शेतकरी लोक आत्महत्या करतात आणि ज्यांना संध्याकाळची व्हिस्की मिळाली नाही, त्यांनी राज्यक्रांत्या केल्या, सरकारं उलथवून टाकली; मग आता कोणती गरज मोठी म्हणायची ? शेतकऱ्यांच्या जीवनात हे असं चालायचंच, त्यांनी धान्य काढायचंच असतं, ते आपल्याला पुरवायचंच असतं, त्याचा विचार अधिक करू नये, केला तर क्लेशदायकच असतो असा विचार करून म्हणा किंवा काही म्हणा, शेतकऱ्यांविषयी नागरी समाजानं आपली मनं बधिर करून घेतली आहेत; मग त्या समाजातलं ते कलाक्षेत्र असो, नाट्य असो, काव्य असो, संगीत असो का साहित्य असो. नागरी समाजाच्या ग्रामीण जनतेबद्दलच्या करुणेच्या सहभावनेच्या इंद्रियाला आलेली बधिरता दूर होणे, ही सगळ्यात महत्त्वाची आवश्यकता आहे.

ही बधिरता जर आपल्याला दूर करता आली तर ग्रामीण साहित्य हे प्रभावशाली होऊ शकतं. ते करण्याचा एकमेव मार्ग आहे- बापाकडून जर का त्यांना बऱ्यापैकी जमीन मिळणार असेल तर महाराष्ट्रातल्या देशमुखांघरची पोरं बापासमोर बसत नाहीत; पण जर का बापाकडनं काहीच मिळण्यासारखं नसेल तर ती बापाला विचारतसुद्धा नाहीत. शरयू दप्तरींनी एका ठिकाणी म्हटले आहे, ''आपली सारी संस्कृती शेतकऱ्याला गरजू ठेवण्यामुळे टिकून आहे.'' ज्या दिवशी शेतकरी म्हणू शकेल, की आमचं पीक व्यवस्थित आलं, पोती नीट भरली, कणगीला लावून ठेवली, जेव्हा चांगला बाजार येईल तेव्हा बघू. त्या दिवशी शेतकरी हा गरजू जनावर नाही, तो माणूस आहे अशी जाणीव तयार होईल आणि त्यादिवशी सहभावनेचे झरे पुन्हा वाहू लागतील.

(शेतकरी संघटक, ३ ऑगस्ट १९९८- इस्लामपूर येथे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात शरद जोशी यांनी केलेले भाषण. )

■■



## मी 'साहित्यिक' नाही !

मी औरंगाबाद येथे उसावरील झोनबंदी विरोधात उपोषणाला बसलो असतांना साहित्य संमेलनाचे संयोजक मला निमंत्रण देण्यास आले होते. तेव्हा पुढील घटना अनिश्चित असल्याने मी ते निमंत्रण स्वीकारण्याचा प्रश्नच उद्भत नव्हता; पण मंडळी मोठी चिकाटीची. उपोषण संपल्यानंतर मी जेव्हा मराठवाड्याच्या दौऱ्यावर निघालो तेव्हा बसमत मुक्कामी त्यांनी मला पुन्हा गाठलं. खरं तर हे निमंत्रण टाळायचा मी प्रयत्न करीत होतो. म्हणून मी विचारलं, ''तुमचं साहित्य संमेलन आहे म्हणजे थोर थोर नेतेगण, पुढारी, मुख्यमंत्री नाही तर निदान एखादे मंत्रिमहोदय येणार असतील? आसपासचा एखादा साखर कारखाना किंवा एखादी सहकारी संस्था शेतकऱ्यांकडून निधी वसूल करीत असणार! तेव्हा अशा संमेलनाला येणं मला थोडं अवघड जातं; कारण एरवी मी त्यांच्याविरुद्ध लढत असतो;'' पण माझा अपेक्षाभंग झाला. त्यांनी मला आश्वासन दिलं, की इथे असे कोणी नेते पुढारी येणार नाहीत आणि कुणाकडूनही सक्तीने पैसे वसूल करण्यात आलेले नाहीत. महाराष्ट्रामध्ये आजकाल दुर्मिळ झालेली गोष्ट म्हणजे ज्याला पुढाऱ्याचा डाग लागलेला नाही असा साहित्याचा मंच; तो इथं उभा राहतो आहे, हे पाहून मी या संमेलनाला यायचं कबूल केलं.

या संमेलनाच्या समारोप समारंभाच्या आधी श्री. शेषराव मोऱ्यांचे भाषण आणि इंद्रजित भालेरावांचं काव्यगायन आहे असं काल अकोल्याला वर्तमानपत्रात वाचलं आणि दोन तास आधी इथं येऊन बसलो आणि एरवी कधी शक्य नाही अशी संधी घेऊन या दोघांचेही कार्यक्रम ऐकण्याचा लाभ घेतला; कधी मिळत नाही इतका आनंद मिळवला. इंद्रजीत भालेराव तसे माझे मित्र झाले आहेत. बरेचदा ते आपल्या कविता ऐकवायला येतात आणि माझेच अर्थशास्त्र ऐकून परत जातात. म्हणून ही संधी घेण्याचा प्रयत्न केला; पण वेळेच्या आधीच्या माझ्या उपस्थितीमुळे संयोजकांची अडचणच झाली असे दिसते. कारण काव्यगायनाचा रंगलेला कार्यक्रम थांबवून समारोपाचा कार्यक्रम वेळेवर, दोन वाजता सुरू करावा का नाही असा त्यांच्यापुढे पेच पडला. निष्कर्ष एवढाच, की पुढारी राजकीय नसला तरी त्याने, सार्वजनिक जीवनातील माणसाने, रसिकांच्या मेळाव्यात आगाऊपणे जाण्याचा प्रयत्न करू नये.

इथे दोघांना साहित्यसेवेबद्दल पारितोषिके देण्याचा कार्यकम झाला. काय म्हणावं

त्यांच्याबद्दल? मी एवढंच म्हणेन की, "हे प्रतिभाशाली पारितोषिक विजेत्यांनो! हे पारितोषिक मिळूनसुद्धा तुमची प्रतिभा जिवंत राहो अशी मी आशा व्यक्त करतो." खरं म्हणजे एकदा पारितोषिक मिळालं, की नंतर काही त्या साहित्यिकाचं खरं नसतं ! किंबहुना, राजाश्रय लाभल्यानंतर साहित्यगुण किंवा प्रतिभा कितपत टिकते, हा मोठा वादाचा विषय आहे.

माझी अर्थशास्त्राचा विद्यार्थी म्हणून ओळख असली तरी मी चुकून अर्थशास्त्र घेतलेला मनुष्य आहे. मी मुळामध्ये संस्कृत भाषेचा अभ्यासक आहे. कालिदास हा माझा आवडीचा कवी आहे. आज जर वेळ असता आणि संधी मिळाली असती तर कालिदासाच्या कोणत्याही काव्याचं निरूपण येथे करू शकलो असतो; पण अशा या थोर कवी कालिदासामध्ये पुढे एक मोठा दोष निर्माण झाला. त्यांनी राजाश्रय स्वीकारला आणि त्यानंतर त्यांच्याकडून ठरावीक पठडीतील काव्यच निर्माण व्हायला लागलं. तसं आजच्या या पारितोषिक विजेत्यांचं न होवो! सुदैवाने, भाग्याने यांना लाभलेल्या सरस्वतीचा वरदहस्त शासनाच्या पारितोषिकाला तोंड देऊन अबाधित राहो एवढी शुभेच्छा दोघांसाठी व्यक्त करतो.

मी तर साहित्यिक नाही, म्हणजे साहित्यिक म्हणून मला मान्यता नाही. तसं कालपरवापर्यंत मला अर्थशास्त्रज्ञ म्हणूनही मान्यता नव्हती. मी कुठं अर्थशास्त्रावर बोलायला गेलो, की त्या त्या संस्थांचे प्रमुख आपल्या विद्यार्थ्यांना सांगायचे, "लक्षात ठेवा! आपण अभ्यासक आहोत आणि शरद जोशी आंदोलक आहेत. तेव्हा, ते काय म्हणतात त्यानं तुमची डोकी बिथरू देऊ नका!" गमतीची गोष्ट अशी, की आपल्या विद्यार्थ्यांना या तऱ्हेने बजावणारी काही माणसं, मी संयुक्त राष्ट्रसंघामध्ये काम करीत असताना त्यांना अर्थशास्त्रासंबंधी एखादी नोकरी मिळावी यासाठी माझा वशिला लावायचा प्रयत्न करायची; पण ते काम सोडून इथं आल्याबरोबर (त्यांच्या लेखी) मी एका दिवसात आंदोलक बनलो! डंकेलसाहेबाने मांडलेल्या प्रस्तावामुळे इतर काही परिणाम झाले त्याचा विचार सोडून देऊ; पण त्या प्रस्तावाच्या विरुद्ध सारा हिंदुस्थान आणि बाजूने मी एकटा अशी मोठी कुस्ती झाली. त्याचा निकाल माझ्या बाजूने लागला हे सगळ्यांनाच ठाऊक आहे. त्यानंतर आता ही मंडळी हळूहळू शरद जोशी 'अर्थशास्त्री' नाही; पण निदान कृषिअर्थशास्त्री आहेत असं लाजतकाजत का होईना, म्हणायला लागली आहेत.

साहित्याच्या बाबतीतही तेच आहे. मी आतापर्यंत अठरावीस पुस्तके लिहिली आहेत. मराठीबरोबर इंग्रजीतही लिहिली आहेत. माझ्या काही पुस्तकांची इतर भारतीय भाषांत



भाषांतरंही झाली आहेत आणि ही सगळीच पुस्तकं काही अर्थशास्त्रावरची नाहीत किंवा शेतीवरची नाहीत. स्त्रियांच्या प्रश्नांचं विश्लेषण करणारं 'चांदवडची शिदोरी', शिवाजी महाराजांच्या चरित्रात डोकावणारं 'शेतकऱ्यांचा राजा शिवाजी', जोतिबा फुल्यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूडा'ला केलेला 'शतकाचा मुजरा', जातीयवाद, धर्मवाद यांचं रसायनशास्त्र उलगडणारं 'जातीयवादाचा भस्मासुर' अशी अर्थशास्त्रापेक्षा वेगळ्या विषयांवरचीही पुस्तकं आहेत. ललित साहित्य मी काही फारसं लिहिलं नाही. मी लिहिलेल्या लेखांतले दोनचार लेख ललित आहेत असं काही लोकांचं म्हणणं आहे. इतकं लिहिलं तरी मी बहुधा साहित्यिक नसावा! कारण, आजकाल ज्यांनी काही पुस्तकं लिहिली आहेत आणि ज्यांना काही पारितोषिकं मिळालेली नाहीत असे लेखक मोठे प्रयत्नपूर्वक शोधावे लागतील. मी त्यांच्यातलाच एक आहे. माझ्या एकाही पुस्तकाला पारितोषिक मिळालेलं नाही. माझ्या 'शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती' या पुस्तकाच्या, जे ललित लेखन नसूनसुद्धा ४० हजार प्रती संपल्या आहेत. महात्मा फुले समग्र वाङमयाच्या नवीन आवृत्तीचा विक्रीचा विक्रम सोडल्यास हा मराठीतील उच्चांक आहे आणि तरीही मला साहित्यिक म्हणून मान्यता नाही. मी प्रचलित अर्थानं साहित्यिक असेन असे मलाही वाटत नाही.

मी साहित्यिक का नाही ते सांगतो. मला दुःख पाहवत नाही आणि ऐकवत नाही, ही अगदी खरी गोष्ट आहे. हे इंद्रजित भालेराव इथे इतक्या लोकांच्या समोर बसून त्यांच्या 'जन्माची कहाणी' कशी काय सांगतात याचं मला मोठं आश्चर्य वाटतं! मला नाही सांगता येणार, मी ओक्साबोक्शी रडायला लागेन. आजकाल भालेरावांवरही तसाच परिणाम होतो आहे असं वाटतं. पहिल्यांदा मला जेव्हा त्यांनी ही कविता म्हणून दाखवली तेव्हा शांतपणे एक एक ओळ म्हणत होते; आज भरभर म्हणून टाकत होते. त्यांची दुसरी एक कविता इथे ऐकायला मिळेल असं वाटत होतं. 'एक लहान पोर बापाकडे चिटाच्या कापडाचा सदरा हवा म्हणून हट्ट करतं. मग आई त्याला सल्ला देते, की तुझा तू सदरा कमव. गुरं राखताना जी काही 'बोंदरं' झाडाला लागली असतील ती गोळा कर, वेगळी वीक आणि तुझा चिटाचा सदरा घे.' ही कविता मला अत्यंत आवडली. मी आतापर्यंत तीनदा तीन वेगवेगळ्या माणसांना ती वाचून दाखवायचा प्रयत्न केला; पण जेव्हा कवितेत पोराचा बाप पोरानं जमवलेल्या कापसाला भाव न आल्याने पोराला पैसे देऊ शकत नाही म्हणून संतापून उठतो, मनगट चावत शिव्या घालू लागतो, पोराची पाठ बडवतो. त्या जागी मी तिन्ही वेळा अक्षरशः रडू लागलो. निर्विकारपणे दुःख पाहण्याचं, ऐकण्याचं मन

माझ्याकडे नाही, तशी ताकद नाही आणि तुम्हा साहित्यिकांच्या सहजतेने व्यक्त करण्याची ताकद नाही. मग, आम्ही काय करतो? आकडेवारीच्या आणि अर्थशास्त्राच्या आलेखांमागे लपतो. शेतकऱ्यांचं दु:ख आमच्या तब्येतीला काव्यात सांगणे झेपत नाही. मग, रडू येऊ नये म्हणून आम्ही आकडेवारी मांडतो अन् रडू येऊ म्हणून सिद्धांत मांडतो. स्वत:च्या घामाने मिळणे शक्य असलेल्या 'न मिळणाऱ्या सदऱ्या' बद्दल बोलू शकत नाही म्हणून आम्ही 'उणे सबसिडी'ची गोष्ट करतो. म्हणून, मी साहित्यिक नाही, असं मी म्हणतो.

तसं, मी काही थोड्या काठीण प्रसंगांना तोंड दिलं नाही; तरीसुद्धा लहान मुलाचं दु:ख मला सहन होत नाही. मोठ्या माणसांच्या, विशेषत: वयात आलेल्या पुरुषाच्या दु:खाचं मला काही फारसं वाटत नाही. वाटतं, त्यांनी तोंड दिलंच पाहिजे; पण, स्त्रिया व लहान मुलं यांचं दु:ख खरंच सहन होत नाही. म्हणून आम्ही आकडेवारी मांडतो.

साहित्यिकाचीही स्वत:ची एक ताकद असते. मगाशी मोरेसाहेबांनी सावरकरांवर चांगल भाषण केलं. त्यांनी म्हटलं ते खरं आहे. तुम्ही सावरकरांचं कवित्व विसराल तर सावरकरांचं विज्ञान समजणं अशक्य आहे. ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. साहित्यिक ताकद कशी काय उपयोगी पडते? मी एक उदाहरण सांगतो. मी संयुक्त राष्ट्रसंघाची नोकरी सोडून इकडे आलो आणि तिकडे जिनेव्हामधल्या संगमरवरी महालामध्ये भाषण करणारा मी, इकडे चार वर्षांच्या आत मला येरवड्यामध्ये फाशीच्या कोठडीत ठेवण्यात आलं. पहिल्याच आंदोलनात शासनानं मला तुरुंगात टाकलं आणि पोलिसांना भीती अशी, की तुरुंगात आजूबाजूला चारपाच हजार शेतकरी आहेत, त्यांच्यात या माणसाला ठेवलं तर तो भडकवून टाकील त्यांना. त्यामुळे त्यांनी मला वेगळ्या खोलीत ठेवायचं ठरवलं; पण येरवडा ही 'बॅरक जेल' आहे; तिथे वेगळ्या कोठीची सोय नाही. त्या जेलमध्ये एकाच ठिकाणी चारेक वेगळ्या खोल्या आहेत; दुसऱ्या दिवशी ज्यांना फाशी द्यायचं असतं त्यांना या खोल्यांत ठेवतात. मला ठाऊक नव्हतं. पोलिसांनी मला त्यातल्याच एका खोलीत ठेवलं होतं. मी आपला झोपून गेलो. दिवसभरच्या आंदोलनामुळे दमून गेलो होतो, झोप लागली. रात्री शेजारच्या खोलीतला सिंधी व्यापारी ओरडायला लागला. त्यामुळे झोपमोड झाली. शिपायांनी मला सांगितलं, की या खोल्या अशासाठी आहेत आणि त्या सिंधी व्यापाऱ्याला त्याच्या उद्याची भीती वाटायला लागली म्हणून तो ओरडायला लागला. संगमरवरी महाल ते फाशीची कोठी, किती मोठा बदल केला, किती त्याग केला हे लोकांना सांगणं सोपं असतं; पण प्रसंग आला म्हणजे काय बेततं, कशा टोचण्या लागतात ते प्रत्यक्ष अनुभवल्याखेरीज कळणार नाही. त्या वातावरणामुळे झालेल्या



मन:स्थितीतून सावरण्यासाठी माझ्या मदतीला अंदमानच्या तुरुंगातले सावरकर आले. सकाळ होईपर्यंत सावरकरांच्या -

*की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने*
*लब्धप्रकाश इतिहास निसर्गमाने*
*जे दिव्य दाहक म्हणोनि असावयाचे*
*बुद्ध्याचि वाण धरिले करी हे सतीचे*

आणि

*आले शिरावरी जरी घनघोर झाले*
*दारिद्र्य दु:ख अपमानही प्राप्त झाले*
*कारागृही जरी सतत वास करी मी*
*पूजिन मी सतत मन्मयमातृभूमि*

या दोन काव्यांनी मला फाशीच्या कोठीमध्ये वास्तवतेला सामोरं जाण्याचं धैर्य दिलं.

'साहित्यामध्ये जगणं' आणि 'साहित्यामध्ये व्यक्त करणं' या दोन गोष्टी वेगळ्या आहेत. साहित्यिक मंडळींनी रागावू नये; पण मला काही वेळा संशय येतो, की ज्यांची संवेदन क्षमता तीव्र असते त्यांना साहित्य तयार करता येत नसावं. थोडंसं आडूनआडून ज्याला दु:ख सोसता येतं, पाहता येतं तो त्याचं सुंदर काव्यामध्ये रूपांतर करू शकतो. कवी जळतो असं म्हणतात; पण ज्यांच्या मनामध्ये दु:ख सोसण्यासाठी संरक्षणाचं कवच नसतं अशी भस्म होणारी माणसंच काव्य बाजूला ठेवून काही काव्य जगायचा प्रयत्न करतात की काय असा मला संशय येतो.

या संमेलनाच्या निवेदकांनी आता म्हटलं, की हे तिसरं संमेलन झालं, पुढे चौथं व्हायचं आहे. ऐकून मला आनंद झाला. कारण पुढच्या वर्षापर्यंत तरी मराठी भाषा टिकणार आहे अशी आशा निर्माण झाली. या संमेलनाचे अध्यक्ष श्री. द.पं. जोशी यांच्या भाषणाचा वृत्तांत वर्तमानपत्रात वाचला. त्यांची चिंता, की 'चौथं, पाचवं, सहावं' अशी संमेलनं होतच राहतील. अर्थात साहित्य संमेलनं भरवायला साहित्य शिल्लक राहिलंच पाहिजे अशी काही आवश्यकता नाही. संमेलनं भरवायला काय हरकत आहे?' पण, काही मुद्द्यांवर माझा काही वेगळा विचार आहे. तो मी आपल्यापुढे नम्रपणे मांडू इच्छितो.

मी काही केवळ शेतकरी नेता नाही. किंबहुना, मी खरा शेतकरी नाहीच. मी नेहमीच सांगत असतो, की मी जोशी आडनावाचा म्हणजे माझा जन्म ब्राह्मण घरचा आहे; पण

शेतकरी मायबहिणींनी आतापर्यंत मला जितकं प्रेम दिलं, तितकं ते कुणालाही दिलेलं नाही. मी जरी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतीचा प्रश्न मांडत आलो असलो, तरी शेतीचा प्रश्न मी एका दरवाजाची किल्ली म्हणून वापरला आहे; शेतीमालाच्या भावाचं तत्त्वज्ञान हे प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र करण्याची गुरुकिल्ली म्हणून वापरलं आहे. मी मुळात स्वातंत्र्याचा भोक्ता आहे. गरिबीचं नाव घ्यायचं, गरिबी हटवायची म्हणायचं आणि गरिबी निर्मूलनाचे वेगवेगळे कार्यक्रम काढून आपलेच खिसे भरून घ्यायचे हे मला करता आलं नसतं असं नाही; पण मी एकोणीसशे ऐंशी सालापासून एक सिद्धांत मांडतो आहे. हा सिद्धांत माझा नाही, महात्मा गांधींचा आहे. गांधीजींनी म्हटलं होत, ''गरिबांकरिता आम्ही हे करू, ते करू असं सगळेच जण म्हणतात, फक्त गरिबांच्या छातीवरून उठायला कुणी तयार होत नाही.'' गरिबांना दुसऱ्या कोणत्याही मदतीची गरज नाही; आय.आर.डी.पी. नको की कोणती रोजगार हमी योजना नको. सरकार हाच गरिबीचा कारखाना आहे. जर एखाद्या भूकंपात दिल्ली आणि मुंबईची सरकारं खलास झाली असती तर देश आबादीआबाद आणि सुखसंपन्न झाला असता, या विचारांचा मी पुरस्कर्ता आहे. इतका व्यापक विचार मांडत असताना मला 'मराठी भाषा जगेल किंवा नाही' या प्रश्नावर काही बोलायचा मोह होतो आहे. तो मी टाळीत नाही. सगळेच तुम्ही साहित्यिक साहित्याच्या बाबतीत माझ्या दृष्टीने वडीलधारे आहात. भाषेसंबंधी माझे विचार मांडताना जर काही चुकलं तर तुम्ही मला माफ कराल अशी आशा आहे.

शेतकऱ्यांचा प्रश्न हाती घ्यायच्या आधी मी फ्रान्समध्ये होतो. पहिल्यांदा जेव्हा मी फ्रान्समध्ये गेलो तेव्हा एका ठिकाणी, तहान लागली होती म्हणून, इंग्रजीतून पाणी मागितलं. पाणी मागणं आणि तेदेखील इंग्रजीमध्ये हा त्यांच्या दृष्टीने दुहेरी गुन्हा झाला. पहिली गोष्ट फ्रेंच माणसं पाणी पीत नाहीत आणि दुसरी ते फ्रेंचच बोलत. त्यामुळे त्यांनी माझ्याकडे चक्क दुर्लक्ष केलं; पण नंतर, मी स्वित्झर्लंडमधून परत येईपर्यंत त्यांच्यात मोठा बदल घडून आला होता. फ्रान्समधील सगळी सुशिक्षित माणसं बऱ्यापैकी इंग्रजी बोलायला शिकली होती; पण इंग्रज माणसं फ्रेंच बोलताना ती मातृभाषा नाही असं दाखविण्याचा प्रयत्न करतात तसंच फ्रेंच माणसं करीत. मराठीत 'च'चे दोन उच्चार आहेत, एक कठोर आणि एक मृदु; पण फ्रेंच भाषेत सर्वच उच्चार मृदु तर इंग्रजीत फक्त कठोर आहेत; पण फ्रेंच माणसं इंग्रजी बोलताना मुद्दाम मृदु उच्चारच करायचे. कसं का होईना, फ्रेंच माणसं स्वभाषाभिमान सोडून इंग्रजी बोलायला लागले म्हटल्यावर मी विचारलं, ''तुम्ही तुमच्या भाषेचे इतके अभिमानी होता, मग आता इंग्रजी कसं काय बोलायला



लागलात?'' तेव्हा ते म्हणाले, ''आम्ही जे बोलतो ते इंग्लिश नाही, ती अमेरिकी भाषा आहे! आम्ही ही परकी भाषा शिकलो याचे कारण काय? अमेरिकेत आर्थिक वैभव आहे, सुखसंपन्नता आहे, साधनांची विपुलता आहे. त्यामुळे अमेरिकी भाषा खऱ्या अर्थाने संपन्न झाली आहे आणि ज्याला जगाच्या सरहद्दीवर, इतिहासाच्या सरहद्दीवर, संशोधनाच्या सरहद्दीवर जायचं आहे त्यांना अमेरिकी शिकण्याखेरीज गत्यंतर नाही.''

साहित्य समृद्ध करायचं तर काय करायला हवं? तुमच्या संमेलनाच्या अध्यक्षांनी आपल्या भाषणात म्हटलं, ''आजची जी काही शिक्षणपद्धती आहे, त्यांतील दोन भाषांचा, तीन भाषांचा 'फॉर्म्युला' आणि ज्या पद्धतीने भाषा शिकविली जाते हे सर्व पाहता मराठी भाषा लवकर मरेल असं दिसतं.'' त्याचं कारण एका वाक्यात सांगायचं झालं तर, गरीब लोकांची भाषा श्रीमंत असू शकत नाही. हा विचार तुम्हा साहित्यिकांना पटणार नाही, तरीही मी सांगतो. आज तुम्ही ज्या काळातल्या साहित्याची वाखाणणी करीत आहात, त्या काळातील मंडळींच्या जीवनाकडे पाहा. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वर घ्या. त्यांचा जन्म, मातापित्यांची आत्महत्या, समाजाने घातलेला बहिष्कार या सर्वांमुळे ज्ञानेश्वर सर्व आयुष्य जळत जळत जगले, समाजाने दिलेले सर्व हलाहल त्यांनी पचवले म्हणून त्यांच्या तोंडून अमृतमयी ओवी निघाली. सकाळी कॉलेजमध्ये जाऊन दोनतीन 'लेक्चर'च्या पाट्या टाकून, घरी आलेल्या माणसाच्या हातून, बालपणीच्या संस्कारातून लाभलेली जी काही साहित्याची आणि प्रतिभेची शिदोरी असेल ती संपेपर्यंत साहित्यनिर्मिती होईल; पण त्यानंतर पारितोषिकाच्या लिखाणापलीकडे काही होणार नाही.

मला संपन्नता म्हणजे काय म्हणायचं आहे ते थोडं स्पष्ट करतो. मला गरिबीचं कौतुक केलेलं आवडत नाही. प्रदेश गरीब असला तरी त्याचं साहित्य मोठं असतं ही गोष्ट खोटी आहे. संख्याशास्त्रीयदृष्ट्या, गरिबीतही एखादा कुणी प्रकांड प्रज्ञेचा मनुष्य निघू शकतो, नाही असं नाही. म्हणजे, तो गरीब असूनही In spite of poverty तसा असतो. पण संख्येनं पाहिले, साहित्याची एकूण निर्मिती पाहिली तर तो अपवाद ठरतो. साहित्य किंवा प्रतिभा कशातून जन्मते? वरून कुठूनतरी एकदम प्रतिभा शिरते, अंगात सरस्वतीचा संचार होतो आणि मग 'जे न देखे रवि, ते देखे कवी' असं म्हणून साहित्य तयार होतं अशी जर कुणाची कल्पना असेल तर मग जन्मांधसुद्धा निसर्गकविता लिहू शकेल! खरं तर तुमच्या शब्दांचा, प्रतिभेचा फुलोरा हा तुमच्या अनुभवाच्या संपन्न भूमीतून वाढत असतो. मग, ज्याचं आयुष्य दरिद्री, पैशानं नव्हे, तर अनुभवानं; ज्याचं आयुष्य अनुभवाच्या विविधतेनं नटलेलं नाही अशा माणसाचं साहित्य हे फक्त मुंबईच्या लोकल

गाडीतील प्रवासातच वाचायच्या लायकीचं होतं आणि आज वस्तुस्थिती अशी आहे, की मराठीतील 'मान्यवर' लेखकांचं साहित्य हे लोकल गाडीत जर का खारे दाणे विकत घ्यायला पैसे नसतील तर शेजाऱ्याकडून घेऊन वाचण्यालायक साहित्य झालं आहे.

माझे एक गुरु डॉ. सुमत मुरंजन. त्यांनी आंतरराष्ट्रीय नाणेव्यवस्थेमध्ये काम केलं आहे. कोरियाचं युद्ध झाल्यानंतर अमेरिकेनं त्यांना 'अमेरिकेतील चलनवाढ कशी थांबवावी' यावर चर्चा करण्यासाठी बोलावलं होतं. अशा या आंतरराष्ट्रीय मान्यतेच्या माणसाने 'आंतरराष्ट्रीय नाणेव्यवस्था' हे पुस्तक मराठीत लिहिलं. लोकांनी त्यांच्यावर फार टीका केली. लोकांनी म्हटलं, 'हे पुस्तक इंग्रजीत लिहायला हवं होतं. मराठीत लिहून काय उपयोग?' ही १९५५ ची गोष्ट आहे. टीकाकारांना डॉ. सुमंत मुरंजनांनी उत्तर दिलं, ''माझ्या अनुभवांच्या आधारे ज्यांना आंतरराष्ट्रीय नाणेव्यवस्थेचा अभ्यास करायचा असेल त्याने मराठी भाषा शिकावी अशी माझी इच्छा आहे.'' इतकी हिंमत दाखविण्यासाठी तुमचा अनुभव समृद्ध आहे का? कॉलेजच्या या मुलीनं कॉलेजच्या त्या मुलाकडे पाहिल्यानंतर त्या दोघांचे डोळे एकमेकांच्यात मिसळल्यानंतर जी काही किलबिल किलबिल होते त्याची काव्यं किती वेळ लिहिणार? या किलबिलीशिवाय तुम्हाला काही वेगळ्या पद्धतीने लिहायला नको का? का शंभर वर्षांपूर्वी तुमच्या आजीआजोबांच्या मनांत ज्या किलबिली होत होत्या, त्याच किलबिली अजून चालू आहेत? काही नवीन आणाल तर साहित्य होईल. तीच ती शिळी कढी किती वेळ तुम्ही पुन्हा पुन्हा उकळणार आहात?

सगळ्या देशातली गरिबी ही कच्च्या मालाचं जाणीवपूर्वक शोषण केल्यामुळे तयार झाली आहे हा माझा अनुभवावर आधारित सिद्धांत आहे आणि तो सत्य आहे यात काही वाद नाही. हा सिद्धांत, त्याचा अभ्यास, त्याची आकडेवारी महाराष्ट्रातल्या शेतकरी आंदोलनाने तयार केली आहे आणि हे सर्व मी मराठीत लिहून ठेवले आहे. माझ्याकडे, अगदी हार्वर्डपासून अनेक विद्यापीठांतले, शेतकरी संघटनेच्या अर्थशास्त्रावरील पीएच.डी.चे अनेक प्रबंध आहेत. ते लिहिणाऱ्यांतले निम्मे तरी लोक परदेशांतले आहेत. ते मला म्हणतात, ''तुम्ही हे सर्व लिखाण कधीतरी इंग्रजीतून करायला पाहिजे.'' त्यांना माझंही उत्तर माझ्या गुरूंनी दिलेलं, ''शेती अर्थव्यवस्थेचा अभ्यास ज्याला माझ्या मांडणीच्या अंगाने करायचा आहे, त्यांनी मराठी शिकलं पाहिजे.''

साहित्यवेलीला लागलेली कीड जर मारायची असेल तर आधी त्या वेलीवर वेगळी वेगळी पानं येतील असं काही तरी करा. त्यासाठी, काही वेगळे अनुभव येतील असं काही तरी करा. हे काही मी साहित्यिकांवर नुसती टीका करण्यासाठी बोलत नाही; मी



ज्या काही दोन गोष्टी मांडतो आहे त्याचा तुम्ही गंभीरपणे विचार करावा यासाठी मी बोलतो आहे.

मला राजकारणावर बोलायचं नाही; पण देशातील परिस्थिती इतकी गंभीर वाटते की ती सर्वसामान्य जनांपर्यंत पोहोचविण्यासाठी, संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळातील शाहिरांसारखे शाहीर असायला हवेत असे वाटते. आज जर का ते शाहीर जिवंत असते तर मुंबईचं कोणतंच सरकार टिकलं नसतं, पण आजचे आमचे सगळे शाहीर सरकारी मान्यताप्राप्त शाहीर! संमेलनांतून मंत्र्यांच्या आणि मुख्यमंत्र्यांच्या हातून फेटे, पारितोषके आणि बिदाग्या स्वीकारत कवनं अशा तऱ्हेची करतात, की त्यात शाहिरीचा जिवंतपणा राहत नाही. मग ते काव्य 'ब्राह्मणी' होतं. अगदी तुम्ही आता वानगीदाखल जी काव्यं म्हणून दाखवलीत त्यांबद्दलही माझं हेच मत आहे. तुमच्या या काव्याला मान्यता मिळाली त्याचं प्रमुख कारण त्याच्यातील प्रतिमा धूसर झाल्या हे आहे; शेतकऱ्याच्या दु:खाच्या प्रतिमा दाहक राहिल्या नाहीत. मी ज्वारी पिकवतो; पण माझ्या ज्वारीच्या कणसाला चांदणं लगडलेलं दिसलं आणि मला फार हर्ष झाला असं कधी घडलं नाही. ही ज्वारी निघाल्यानंतर त्याचं पुढं काय होतं हे साहित्यात कधी येतच नाही.

मला एक सहज प्रश्न पडतो. अर्थशास्त्री मूर्ख असतील. गेली पन्नास वर्षे, शेतकऱ्यांची जाणीवपूर्वक लूट होते हे त्यांना कळलं नाही, हे समजण्यासारखं आहे, कारण ते इंग्रजी पुस्तकं वाचतात आणि त्यावरूनच लिहितात; त्या पुस्तकांत लिहिलं नव्हतं म्हणून त्यांना कळलं नसावं. पण तुम्ही ग्रामीण साहित्यिक म्हणवणारे, मी शेतमजुराच्या घरी जन्मलो आहे म्हणून मला ग्रामीण साहित्यिकाचा वेगळा तंबू टाकण्याचा अधिकार आहे असं मोठ्या आग्रहानं सांगणारे, शेवटी शेतकऱ्यांच्या दु:खांचा बाजार मांडून नागरी साहित्यिकांच्या पेठेत आपलंही दुकान असावं म्हणूनच प्रयत्न करता की नाही? जर तुम्हाला शेतकऱ्याच्या दु:खाची खरी जाण झाली होती तर तुम्ही गावामधील झोपडं आणि गावामधील विटांचं घर यांच्यामधील भांडण का भांडलात? त्याचं कारण, तुमची ग्रामीण भागाची प्रतिमा खोटी होती, तुमचं शेतीअर्थव्यवस्थेचं ज्ञान हे डाव्यांच्या अर्थशास्त्राच्या पुस्तकातून आलं होतं. तुम्ही असं का नाही म्हटलं, की तुम्ही कितीही ज्वारी पिकवा, कितीही पीक येऊ द्या; कणसाला चांदणं लगडण्याचं सोडा, कर्जाचा बोजा थोडा कमी झाल्याच्या आनंदाची रेघसुद्धा तुमच्या चेहऱ्यावर उमटणार नाही? कितीही पीक आलं तरी शेतकऱ्याच्या डोक्यावरचं कर्ज, आजच्या व्यवस्थेत, फिटण्याची कुठलीही शक्यता नाही असं एकाही कवीला का वाटलं नाही? हे सत्य जर तुम्ही ग्रामीण

साहित्यिक मांडू शकला नाहीत तर तुमची अनुभूती किती खरी याबद्दल मला शंका आहे. तुमची अनुभूती जर इंग्रजी भाषेचं बोट धरून आलेली अनुभूती असेल तर तुमची मराठी भाषा का जगावी?

तुमची, तुमच्या भागातली आयुष्यं अनुभवसंपन्न होण्याकरिता काही अमेरिका तयार करावी लागत नाही. जे काही आयुष्य आहे त्या आयुष्यातले विविधतेचे अनुभव तुम्ही किती घेता हे खरे महत्त्वाचे आहे. इथे आम्ही कमी पडतो म्हणून साहित्याला हे 'ब्राह्मणी' स्वरूप येतं आहे. ज्ञानेश्वरांनी 'फाटलेल्या कांबळी'च्या जागी आता 'नवी कांबळ' मागावी हे ठीक आहे; पण तीच मागणी जर का १९९५ सालचा कवी करू लागला तर त्याचा अर्थ आपलं नपुंसकत्व, आपला भ्याडपणा, आपला भीरूपणा तो देवाच्या मागे लपवायचा प्रयत्न करतो आहे. जे जे सत्य आहे ते कवीनं सांगायला काय हरकत आहे? का सांगितलं गेलं नाही? कारण आम्ही आमची अनुभूतीची सगळी क्षेत्रं लहान करीत चाललो आहोत.

महाराष्ट्रातले साहित्यिक कोण? टीकाकार हे सगळे ब्राह्मण, देशस्थ ब्राह्मण, त्यात तीन चतुर्थांश कुलकर्णी आडनावाचे! लेखन कोण करतं? कविता कोण करतं? जे कॉलेजमध्ये मराठी विषय शिकवतात ते मराठी लिखाण करतात; अपवादानेच, इतर विषय शिकविणारेही मराठी लिखाण करतात. म्हणजे साधारणत: कॉलेजातील माणसं लिखाण करतात. आता, कॉलेजचं विश्व ते काय? मग त्यांनी लिहिलेलं, 'तिनं त्याच्याकडे पाहिलं, त्यानं तिच्याकडं पाहिलं; बापानं थोडा विरोध केला, शेवटी जमलं.'' असं तेच तेच लिखाण पुन्हा पुन्हा वाचावं लागलं तर तुमचं साहित्य जिवंत आहे असं म्हणताच कशाला? ते मेलंच आहे.

सॉमरसेट मॉम हा माझा फार आवडता लेखक आहे आणि मला असं वाटतं, की कुणीही लिहू इच्छिणाऱ्याने मॉमच्या निदान चार लघुकथा Short stories वाचल्याखेरीज लिहूच नये. या माणसाने आयुष्यभर फक्त प्रवास केला. पॅसिफिकमधील एकेक बेट तो हिंडला. त्यातून घेतलेल्या विलक्षण अनुभवाला त्यानं साहित्यात आणलं. त्याचं साहित्य वाचलं, की प्रत्येक वेळी मला वाटतं, की आता अनुभवाच्या दृष्टीनं आपण सॉमरसेट मॉमइतकंच प्रगल्भ झालो आहो. आता त्या साहित्यात आपल्याला धक्का देण्याची ताकद राहिली नाही; पण ती पुस्तकं पुन्हा वाचायला लागलो, की आधीच्या अनुभवापेक्षा वेगळाच अनुभव येऊन अचंबित होतो. मग लक्षात येतं, की त्याच्या मानानं अजून आम्ही लहान बालकं आहोत किंवा अपंग आहोत.

मराठी भाषा जिवंत ठेवायची असेल, मोठी व्हायची असेल तर, शिक्षणाची व्यवस्था



बदलली पाहिजे, त्याची मांडणी वेगळी झाली पाहिजे हे खरंच आहे; पण त्याचबरोबर व्याकरणाकडेही लक्ष दिलं पाहिजे. नवीन व्याकरणात माझा गोंधळ होतो. अर्थामध्ये फरक करणारे अनुस्वार निघून गेल्यामुळे ते नसताना वाक्याचा नेमका अर्थ कसा लावायचा याबद्दल माझा गोंधळ होतो. भाषा सोपी लिहिणं ही काही भाषा जगवण्याची पद्धत नाही. भाषा कधी जगते? पहिली गोष्ट, भाषेतील काही शब्द हरघडी मरत असतात. आजवर किती शब्द मेले! श्री.म. माटेंचं साहित्य वाचताना मला नेहमी जाणवतं, की जे शब्द माटे सहज वापरत असत ते आता मराठीचे राहिले नाहीत. मध्ये एकाला कुसुमाग्रजांची 'गर्जा जयजयकार' वाचून दाखवीत होतो, तर तो मनुष्य म्हणाला, ''यातील मराठी शब्द कुठे गेले हो?'' मी म्हटलं, ''मेले''. कोणत्याही भाषेतील शब्द असे मरतच असतात. मराठीतील शब्द असेच मरत राहिले; पण त्यांच्या जागी नवीन शब्द आलेच नाहीत. मराठी भाषा जर टिकायची असेल तर तिच्यातील जितके शब्द निघून जातात, त्यांच्यापेक्षा जास्त शब्द दररोज जन्माला आले पाहिजेत; कारण काही शब्दांचं मरण हे अपरिहार्य आहे.

पण, कुठून हो यावे तुमच्या माझ्या मराठीत शब्द? आम्ही सगळंच आडगिऱ्हाइकी जगतो. आमची यंत्रसामग्री, तंत्रज्ञान, आमचं विज्ञान, आमचे विषय हे सगळं आडगिऱ्हाइकी. असा आडगिऱ्हाइकी धंदा करून आम्ही पोट जाळण्याचं काम करतो; मग आमच्या अनुभवामध्ये विविधता यावी कुठून आणि वेगवेगळे नवीन शब्द यावे कुठून? शब्दांची भर नाही आणि त्यापलीकडे, जी काही साहित्य निर्मिती होते ती अनुभूतीची नाही. मग, मराठी भाषा कशी काय जगायची?

माझ्या पुस्तकांपैकी बहुतेक पुस्तकं मी मराठीत लिहिलीत हे वर सांगितलंच आहे. माझ्यावर, विशेषत: तत्त्वज्ञानावरच्या माझ्या पुस्तकासंदर्भात आक्षेप घेतला जातो. त्यातल्या त्यात 'स्वातंत्र्याच्या कक्षा' (Degrees of Freedom) ही जी कल्पना मांडली आहे, त्यासंबंधात मोठमोठ्या लोकांनी तक्रार केली आहे. त्यांचं म्हणणं, ''स्वातंत्र्याच्या कक्षा ही संकल्पना इतकी क्रांतिकारी आहे, की ती तुम्ही लिहिलीत का याबद्दल पुढे इतिहासात वाद होणार आहेत. तेव्हा लवकरात लवकर ती तुम्ही इंग्रजीत लिहून ठेवा, तरच तुम्हाला त्याच्यावरचा बौद्धिक संपदा हक्क (Intellectual Property Right) मिळेल. नाही तर तो जाईल.'' अजून मी मोह टाळला आहे; परंतु जसजशी आयुष्याची संध्याकाळ जवळ येत आहे तसतसं मला वाटू लागलं आहे, ''स्वातंत्र्याच्या कक्षा ही संकल्पना इंग्रजीत पुढे मांडावी का मराठीचा अभिमान बाळगावा?'' या दोन विचारांमध्ये जर का द्वंद्व सुरू झालं तर मला अशी भीती वाटते, की मराठी भाषेची घसरण पाहून मी मोहानं ते

पुस्तक इंग्रजीत लिहीन; मग काय करावं? शाहीर सगळे सरकारच्या नादी लागले आणि संपले. तुळशीदास जाधवानं आदिलशाहाच्या दरबारात जाऊन डफावर थाप मारली असं हे झालं. आज, शेतकऱ्यांच्या पोटी जन्मलेले म्हणवणारे शाहीर, ज्यांच्या हाती शेतकऱ्यांच्याच माना कापायच्या सुऱ्या आहेत, त्यांच्या आश्रयाने आपल्या संध्याकाळी मोठ्या आनंदात घालवीत आहेत आणि मग हे साहित्य क्रांतिकारी होऊ शकत नाही.

मग काय करावं? माझ्यासारखी सामान्य माणसं, जी साहित्यिक नाहीत ती काय विचार करतात? मागे पुण्याला आम्ही एक चर्चासत्र घेतलं होतं- शेतीवरील सबसिडीला मनमोहन सिंगांसह सर्व अर्थशास्त्रज्ञांची मान्यता घेण्यासाठी. त्यामध्ये दिल्लीच्या एक विदुषी आल्या होत्या. त्यांनी भाषणात वेगळीच भाषा वापरली. मी त्या भाषेला झिंदी (Zindi) असा शब्द वापरतो. 'झिंदी' म्हणजे झी टीव्हीवरून ऐकवली जाणारी हिंदी. मी मराठी बोलतांना एखाददुसरा अपवाद सोडल्यास किंवा जाणीवपूर्वक वापरायचा ठरविल्याशिवाय एकही इंग्रजी शब्द वापरीत नाही. इतरही भाषा वापरताना मी हेच करतो. इंग्रजी बोलताना फ्रेंच वापरत नाही आणि फ्रेंच बोलताना इंग्रजी वापरत नाही. कारण एक भाषा वापरत असताना तीत दुसऱ्या भाषेचा शब्द येऊ देणं हा मी माझ्या अभ्यासाचा अपमान आहे असं समजतो.

पण जर असा प्रश्न निर्माण झाला, की मला विचार मांडायचा आहे; पण माझ्या भाषेत मांडता येत नाही कारण माझ्या भाषेतले शब्द तोकडे पडतात; तर मग काय करावं? शब्दांशी तडजोड करावी का अर्थाशी? मराठी भाषा जगणं महत्त्वाचं मानावं का सत्याचा शोध ही गोष्ट महत्त्वाची मानावी? मी काही अशातला नाही, की जे परदेशात जातात, तीनचार महिने राहतात आणि मुंबईला उतरताच निम्मे शब्द इंग्रजी बोलतात आणि म्हणतात, ''आमची हॅबिटच गेली हो मराठी-स्पिकिंगची!'' वर्षानुवर्षे परदेशात राहून, परकीय भाषांमध्ये संपूर्ण काम करून मी शेतकऱ्यांसाठी उभा राहिलोय. कुणी मला साहित्यिक म्हणो न म्हणो, पण महाराष्ट्रातल्या आणि हिंदुस्थानातल्या शेतकऱ्यांना पदव्युत्तर पातळीवरचं अर्थशास्त्र मी 'ग्यानबा'च्या भाषेत नीट समजावून सांगितलं आहे. मराठीचं वैभव तुम्हाला पाहायचं असेल तर ते कुठं पाणचट कथांत शोधायला जाऊ नका. मराठी भाषेची ताकद काय आहे, अत्यंत क्लिष्ट विचारसुद्धा किती चांगल्या तऱ्हेनं मांडता येतो ते पाहायचं असेल तर महिलांच्या प्रश्नावर मी लिहिलेलं 'चांदवडची शिदोरी' हे पुस्तक वाचा. इंग्रजीमध्येसुद्धा महिलांच्या प्रश्नांवर लिहिलेलं या तोडीचं इतकं आटोपशीर आणि व्यवस्थित मांडणी करणारं पुस्तक सापडणार नाही!



माझ्यासारख्या माणसाला चिंता पडली आहे, की साहित्यसृष्टीचे ईश्वर, शब्दसृष्टीचे ईश्वर असे तुम्ही साहित्यिक, तेच ते शब्द पुन्हा पुन्हा घोळत आहात; नवीन शब्द येत नाहीत; नवीन अनुभूती नाही. कारण आमचं सगळ्यांचं आयुष्य दरिद्री झालं आहे. अमेरिकत एखादं पुस्तक प्रकाशित करायचं ठरलं तर प्रकाशक पहिली आवृत्ती म्हणून किमान दहा लाखाची काढावी असं म्हणतो. मराठीमध्ये एखादं पुस्तक प्रकाशित करायचं म्हटलं तर प्रकाशक म्हणतो, ''तीन हजाराची आवृत्ती काढायचं म्हणजे जरा धाडसाचंच होईल; दीड हजारातच जमलं तर बघा!'' म्हणजे, मराठीत पुस्तक लिहिलं तर ते जास्तीत जास्त दीड हजार लोकांपर्यंत जाईल अशी अपेक्षा ठेवायची. छापल्या छापल्या त्यातली सहाशेच पुस्तकं खपतील, नऊशे कदाचित कपाटातच पडून राहतील. गेलेल्या सहाशेतील शंभरएक पारितोषिकं देणाऱ्या संस्थांना देणगीदाखल गेलेली असतील. अशानं मी जे लिहिलं असेल त्याचं काय व्हायचं? आणि मराठी भाषेचं काय व्हायचं?

मुळात, गरिबीचा प्रश्न सुटला पाहिजे. जर का गरिबीचा प्रश्न सुटला नाही, आयुष्यं संपन्न झाली नाहीत तर काय होणार आहे? गरिबी असताना आम्ही गरिबीचं विदारक दृश्य दाखविण्याच्या कामात अपयशी झालो आहोत. संपन्नतेचा अनुभव नसल्यामुळे आमचे 'डोळे'च थिटे पडले आहेत. असे असताना तुम्ही कितीही प्रयत्न केलेत, कितीही अभ्यासक्रम बदललेत, कितीही पारितोषिके दिली आणि कितीही 'ग्रंथाली'सारख्या चळवळी चालवल्या तरी त्यांचा काय उपयोग? तुमची पुस्तकं खपायची असतील तर त्यांचा केवळ प्रचार करून भागत नाही. मीतर गरीब माणूस आहे. तरीही प्रयत्नपूर्वक मी साधारणपणे वर्षाला पाचदहा हजार रुपये पुस्तकांकरिता आणि मासिकांकरिता खर्च करतो. तुम्ही ग्रामीण साहित्य लिहिलं, 'ग्रंथाली'सारखी चळवळ चालवली; पण ज्या शेतकऱ्याला समोर ठेवून तुम्ही लिहीत आहात त्याचा कापूस खरेदी केंद्रावर विकला जात नाही, विकला गेला तर चेक मिळत नाही, चेक मिळाला तर तो वटून पैसे मिळत नाहीत अशी जर स्थिती असेल तर तुमचे ग्रामीण साहित्य वाचायचे कुणी? यासाठी तुम्ही काहीतरी केलं पाहिजे.

आजकाल मान्यवर साहित्यिक होणं सोपी गोष्ट आहे. राजदरबारी दाखल झालं, की पुरतं. त्यांची मग वेगळी जीवनशैली असते. संध्याकाळच्या मैफली होतात, त्यांमध्ये काही वेगळ्या प्रकारचा 'कैफ' चढू शकतो आणि तो 'कैफ' हाच मुळी 'प्रतिभेचा कैफ' आहे अशीही समजूत होऊ शकते.

या पलीकडे जाऊन आपल्या साहित्याशी इमान राखणारे साहित्यिक मराठीत आहेत

का? हे मोठं प्रश्नचिन्ह मी तुमच्यासमोर ठेवतो आहे. तुम्ही म्हणाल, 'आम्ही लेखक, प्राध्यापक; आमचं काम आम्ही सोडणार नाही. आम्ही काही आंदोलनं, समाजकारण करणार नाही.' मीही असं म्हणणार नाही, की तुम्ही आंदोलनात यावं; प्रत्येक लेखकानं एकदा तरी तुरुंगाचा अनुभव घ्यावा असं मला वाटतं; तरीसुद्धा नसलं जायचं तर तुम्ही तुरुंगात जाच असंही मी म्हणणार नाही; पण निदान तुमच्या लेखणीमधून सत्य विचारमंथन बाहेर पडावं का नाही?

अनिल बर्वे हा माझा फार चांगला मित्र. त्यानं काही काळ शेतकरी संघटनेचा बिल्ला लावला होता. त्यानं एक आत्मचरित्रात्मक कहाणी लिहिली आहे. मी त्याला म्हटलं, ''तुझं हे साहित्य खरं वाटत नाही. तू ऑर्थर रोड जेलमध्ये असतानातू 'थँक यू मिस्टर ग्लॅड'मध्ये लिहिलं आहे तसे बुटांनी मारत होते काय ?'' तर तो म्हणाला, ''नाही बाबा! उलट दररोज तिथं मला कोंबडी मिळत होती.'' अनुभूती आणि लिखाणामुळे अनिल बर्वे हा त्यातल्या त्यात प्रामाणिक साहित्यिक बनला. त्याचं म्हणणं समाजकारण, आंदोलनं करताना लागत नसेल; पण असं साहित्य, प्रतिभा दाखवायची म्हणजे 'कैफ' आणणारं काहीतरी लागतंच. हल्ली मराठी कवीच्या मोठेपणाचं मोजमाप या 'कैफा'वरच केलं जातं. मी म्हटलं, कदाचित आपल्याला या क्षेत्रात अनुभव नाही, त्याबद्दल अधिकारवाणीनं कशाला बोलावं? तरीही त्याला मी म्हटलंच, ''प्रतिभेकरिता किंवा काव्य स्फुरण्याकरिता घ्यावी लागत असेल; पण तू जे लिहितोस त्याकरिता काही घ्यावं लागेल असं मला वाटत नाही.''

मग अशा स्थितीत 'मराठी असे आमुचि मायबोली, जरी आज ती राजभाषा नसे,' असं म्हणून तिच्या भवितव्याविषयी तुम्हाला खरंच तळमळ असेल, ती जगवण्याच्या निमित्ताने एक वेगळी संस्था स्थापन करून, सरकारकडून वेगळे निधी उपलब्ध करून घ्यावे अशी योजना नसेल तर माझ्या मते, तुम्ही दोनच गोष्टी कराव्या. एक, तुमचं अनुभवाचं विश्व व्यापक होईल याचा प्रयत्न करावा आणि दुसरी, ग्राहकाला तुमचं पुस्तक किमान वाचण्याकरिता तरी हातात घेणं परवडेल हे पाहावं. या दोन गोष्टी न करता, आपल्या खोलीमध्ये बसून कागद चितारणे म्हणजे साहित्यनिर्मिती असं जर तुम्ही समजलात तर मला वाटतं, तुम्ही मराठी भाषेचा द्रोह कराल.

शेवटी दोन अनुभव सांगातो. महाराष्ट्रातल्या कविश्रेष्ठांनी शेतकऱ्यांवर कविता लिहिल्या, चांगल्या तळमळीने लिहिल्या. त्यांनी ते पुस्तक माझ्याकडे प्रस्तावना लिहिण्यासाठी पाठवलं. मी ते वाचलं आणि त्यांना विनंतीपत्र लिहिलं, ''मला फारसं



नवकाव्य वगैरे समजत नाही; पण मला असं वाटतं, की माझं 'शेतकरी संघटना- विचार आणि कार्यपद्धती' हे जे अर्थशास्त्रावरचं पुस्तक आहे त्याचीच जर आपण एका ओळीत दोन शब्द, दुसऱ्या ओळीत पाच शब्द, तिसऱ्या ओळीत तीन शब्द अशी फेरमांडणी केली तर तेही मुक्तकाव्यच म्हणून चालून जाईल! मला असं वाटतं, की आपण जे लिहिलं ते एकदा, दोनदा, तीनदा, चारदा, पाचदा, पुन्हापुन्हा लिहावं. टॉलस्टॉयनं 'वॉर आणि पीस' ऐंशी वेळा लिहिलं. मला जर कुणी म्हटलं, 'या आठ ओळी लिहायला मला पंधरा दिवस लागले.' तर मला फार आनंद वाटतो. कुणीतरी स्वत:च्या शिल्पावर मेहनत करतंय हे पाहून मला बरं वाटतं. नाही तर जे पहिलं लिहिलं जातं तेच सरळ छापखान्यात जातं अशी सर्वसाधारण रीत. अजून प्रतिभेचं महत्त्व संपलेलं नाही; पण प्रतिभेइतकंच महत्त्व परिश्रमालाही आहे आणि हे परिश्रम साहित्यामध्ये मोलाचे आहेत असं मला वाटतं. तेव्हा तुम्ही या कवितांचं पुनर्लेखन करा.' असं सांगून मी त्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्यास नकार दिला. माझा नकार गेल्यावर त्यांनी दुसऱ्या कुणाकडून तरी प्रस्तावना घेतली आणि तसंच पुस्तक प्रकाशित केलं. आता या पुस्तकाला पारितोषिक मिळालं आहे एवढंच नव्हे तर ते कविश्रेष्ठ एका कविसंमेलनामध्ये अध्यक्षही होणार आहेत असं कळतं. त्यांचं भलं असो. मला काव्यातलं फारसं काही समजतंय असं नाही; पण सर्वसामान्य माणसांच्या दृष्टीने या कवितांबद्दल त्यांना आपलेपणा वाटावा असं काही असावं की नाही?

दुसरं उदाहरण माझ्या मित्राचं. शेषराव मोहित्यांच्या 'असं जगणं तोलाचं' मध्ये काय आशय आहे? हा शेषराव आमचा कार्यकर्ता असताना त्याची एक कविता 'आमचा पंदरा आगस्ट कवा हाय?' माझ्या पाहण्यात आली. अगदी जिवंत काव्याचं उदाहरण आहे. त्याचबरोबर त्यानं एक कथा लिहिली- 'पाणभांडवल' म्हणून. एक शेतकरी मोठ्या कष्टानं विहीर खणायला घेतो. पाणी येईल, ऊस होईल म्हणून स्वप्न पाहतो. अपार कष्ट करतो, पाणी येतं, ऊस होतो याचं चित्र त्यांन तपशीलवारपणे रेखाटलं आहे. आणि गुऱ्हाळ लावून गूळ विकायला गेल्यानंतर काय स्थिती होते त्याचंही वर्णन विदारकतेनं केलं आहे. त्याचं ते लहानसं साहित्य माझ्या दृष्टीनं 'ओल्ड मॅन अँड द सी'च्या दर्जाचं होतं; बारकाईनं तपशील लिहिणारं.

एकेक दिवस, बी पेरल्यानंतर हाती पीक येईपर्यंत किंवा न येईपर्यंत सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतकऱ्याच्या मनाला ज्या सहस्र इंगळ्या डसतात त्याचं चित्र साहित्यात मला कुठंही दिसत नाही. साहित्यात नाही आणि सिनेमातही नाही. सिनेमात तर काय?

शेतकरी दाखवायचा म्हणजे एकदाच नांगर घालताना दाखवायचा. आणि लगेच सगळी पिकं लहलहरती. मग पुढे, दहा मुली इकडं तिकडं नाचत जाणार! शेतकऱ्याच्या आयुष्याचं चित्रण हे असं होऊन गेलंय. तुम्ही शेतकऱ्याच्या आयुष्यामध्ये बारकाईनं का पाहत नाही?

मी शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्मलेला नाही; व्यवसायानं मुळात मी शेतकरी नाही आणि तरीदेखील गावामध्ये मी गेलो, की शेतकरी मोठ्या संख्येनं जमतात. कारण मी काय बोलतो ते शेतकऱ्यांना समजतं. मी साहित्यात अडाणी असेन; पण ग्रामीण भागातल्या जनतेच्या, विशेषत: मायबहिणींच्या वेदना मला समजतात. कारण मी माझ्या अनुभवाचं विश्व व्यापक करण्याचा सतत प्रयत्न केला, करतो. मी तुम्हाला प्रेमानं आणि कळकळीनं सांगतो, मराठीतलं जे ग्रामीण म्हणून साहित्य आहे, ते खेड्यांशी संबंधित आहे असं मला खरंच वाटत नाही. तुम्ही संमेलनं घालाल, डेरे घालाल, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य आणि आता आणखी काही 'साहित्य' निघालीत, त्यांची संमेलनं घालाल, त्यांचे मंच उभे कराल, निधी जमवाल; पण तुम्हाला असं वाटत असेल, की यातून मराठी भाषा जगणार आहे तर तो तुमचा भ्रम आहे. याने मराठी भाषा जगणार नाही. मराठी भाषा मोठी करायची असेल तर मराठी माणूस मोठा झाला पाहिजे. लहान माणसाची भाषा-मातृभाषा मोठी असूच शकत नाही एवढंच मला सांगायचं आहे.

समारोपाच्या या भाषणात मी थोडा कुचेष्टेचा स्वर काढला असला तरी ते वेदनेनं बोललो आहे. मला दु:ख पाहवत नाही, हे मी आधीच सांगितले. मराठी भाषेवर माझं अपरंपार प्रेम आहे. काही मोजके लोक सोडले तर, एकाच अर्थाच्या किंवा एकाच वृत्ताच्या कविता म्हणण्याची स्पर्धा लावली तर मी इथल्या सगळ्यांना हरवीन. अशा सहअनुभूतीच्या माणसाच्या मनामध्ये ज्या काही शंका आहेत, वेदना आहेत त्याच मी इथे मांडल्या आहेत.

(शेतकरी संघटक, २१ ऑक्टोबर १९९६; चौथे परभणी जिल्हा मराठी साहित्य संमेलन जवळा बाजार १९९५, येथील भाषण)

■■



# बस करा हे समाजसेवेचे ढोंग !

'अंतर्नाद'च्या १९९९ च्या दिवाळी अंकासाठी 'स्वयंस्फूर्त कार्याचे समाजजीवनातील स्थान' या विषयावर मी लिहावे अशी विनंती भानू काळे यांनी मला तीन-एक महिन्यांपूर्वी केली होती. माझी प्रकृती, निवडणुकीची धामधूम, वेगवेगळे दौरे यांमुळे हे लेखन मागे पडत गेले. आता अंक छपाईला द्यायची वेळ आली असल्याने हे काम मला हाती घ्यावेच लागले.

खरे सांगायचे तर, हे काम मागे पडायचे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. ते म्हणजे या विषयावरील माझी मते इतकी धक्कादायक आहेत, की अंतर्नादच्या संपादकांना, तसेच अंकाच्या वाचकांनाही ती कितपत भावतील याविषयी मी साशंक आहे. असो.

''स्वयंस्फूर्त कार्य याचा अर्थ या अंकापुरता सामाजिक कार्य किंवा सेवाकार्य असा घ्यावा, इंग्रजीतील Voluntary work या अर्थाने येथे स्वयंस्फूर्त कार्य हा शब्दप्रयोग योजलेला आहे.''असा खुलासा संपादकांनी केलेला आहे. अशा अर्थाने केल्या जाणाऱ्या स्वयंस्फूर्त कार्याची समाजाला काहीही आवश्यकता नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. याच्या स्पष्टीकरणार्थ मी यापुढे जे लिहिणार आहे, त्यातील काही विचार मी अन्य संदर्भात इतरत्रही अधूनमधून व्यक्त केलेले आहेत, तर काही विचार मी या ठिकाणी प्रथमच मांडत आहे. मुळात या विषयावर एकत्रितरीत्या माझे विचार मी प्रथमच मांडत आहे. तरीही हा विषय तसा माझ्या अभ्यासाचा आणि चिंतनाचाही आहे.

ज्याला आपण स्वयंस्फूर्त कार्य म्हणतो अशा प्रकारच्या सर्व कार्यांमागील दृष्टिकोन महाभारतातील पुढील श्लोकात व्यक्त केला गेला आहे.

न त्वहं कामये राज्यम् न स्वर्गम् नापुनर्भवम्
कामये दु:खतप्तानां प्राणिनाम आर्तिनाशनम् ।।

(मला राज्य, स्वर्ग, मोक्ष हे काही नको. दु:खाने तप्त अशा प्राणिमात्रांचे आर्ति म्हणजे संकट वा दु:ख दूर करणे एवढीच माझी कामना आहे.)

या दृष्टिकोनातून काही कार्य करणे हे मला अजिबात न पटणारे आहे. त्यामुळे या सर्व स्वयंस्फूर्त कार्याला माझा तत्त्वश:च विरोध आहे, परंतु त्यापूर्वी समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये चालू असलेल्या स्वयंस्फूर्त कार्याचा आपण जरा थोडक्यात आढावा घेऊ.

बरेच स्वयंस्फूर्त कार्य आज पर्यावरणाच्या क्षेत्रात चालू आहे. सामान्यत: या मंडळींचा मोठी धरणं बांधायला विरोध असतो. अनेक बडी बडी मंडळी या प्रश्नावर आपला आवाज

उठवताना दिसतात. त्यांची मूळ भूमिकाच मला चुकीची वाटते. या देशातील शेतीचे प्रश्न मिटायचे असतील, अगदी प्यायच्या पाण्याचा प्रश्नही मिटायचा असेल, तर त्यासाठी अशी मोठी धरणे बांधणे अपरिहार्य आहे. असे असतानासुद्धा दोन-चार व्यक्ती केवळ आपले नाव दुमदुमत राहावे, आपला लौकिक वाढावा, या एकमेव भूमिकेतून या आंदोलनांमध्ये अग्रभागी असलेल्या दिसतात. सर्व प्रसारमध्यमांमधून या मंडळींना, त्यांच्यामागे फारसा जनाधार नसतानाही, अवास्तव प्रसिद्धी दिली जाते. मी नुकताच तीन आठवडे गुजरातेत राहून आलो. आठ-दहा दिवसांनी परत मी तिकडेच जाणार आहे. तिथल्या, विशेषत: सौराष्ट्रातील, जनतेचे पाण्याविना चाललेले हाल मी स्वत: पाहिले आहेत. राज्यातल्या तमाम जनतेकडे दुर्लक्ष करून काही संधिसाधू समाजकार्यकर्ते धरणविरोधी भूमिका घेत आहेत. मूठभर माणसांनी सगळ्या समाजाला वेठीस धरण्यातला हा प्रकार आहे. या मंडळींच्या हुशारीचे तसे कौतुक करावेसे वाटते! स्वत:ला महत्त्वाचे स्थान मिळावे म्हणून आंदोलन छेडताना, आपल्याला केवळ देशातच नव्हे तर देशाबाहेरही भरपूर प्रसिद्धी मिळेल, असेच क्षेत्र यांनी आंदोलनासाठी निवडले. धरणांना विरोध करणारी एक मोठी लॉबी आज जगभर कार्यरत आहे. या आंदोलकांना या लॉबीचा पुरेपूर फायदा मिळालेला आहे.

स्वयंस्फूर्त कार्याचे दुसरे क्षेत्र म्हणजे अंधश्रद्धानिर्मूलन. अंधश्रद्धा ही नेहमीच भोवतालच्या वास्तवाशी निगडित असते. अनिश्चितता आणि अज्ञान यांतून ती जन्माला येते. हे वास्तव बदलल्याशिवाय, केवळ आंदोलन करून ती दूर होईल असे समजणे, हीच मोठी अंधश्रद्धा आहे. नुसत्या शिक्षणाचा प्रसारही यासाठी पुरेसा नाही. तसे असते तर देशातील असंख्य बाबा-महाराजांसमोर आज जी उद्योजकांची, शास्त्रज्ञांची, पदवीधरांची गर्दी दिसते ती दिसली नसती.

देशातील बहुसंख्य समाज हा शेतकरी आहे आणि त्या शेतकऱ्याच्या सर्व श्रद्धा शेतीच्या परिस्थितीवर अवलंबून आहेत. पावसाच्या अनिश्चिततेमुळे विज्ञाननिष्ठा शेतकऱ्यांच्या अंगी बाणूच शकत नाही. शेतातले पीक आणि परिणामत: कच्च्याबच्च्यांचे जीवनच पावसाच्या पडण्यावर वा न पडण्यावर अवलंबून आहे. या जाणिवेमुळे विज्ञाननिष्ठा त्याच्या बुद्धीला पटली तरी मनाला पटू शकणार नाही. आधुनिक औषधोपचार जवळपास उपलब्ध नाहीत, असले तरी परवडत नाहीत, म्हणून तर त्याला जवळ असेल त्या वैदू-भोंदूचे औषधपाणी करावे लागते. आपल्या प्रियजनांना यातले उत्तमातले उत्तम औषधपाणी करणे आपल्याला जमले नाही, ही मनाला घरे पाडणारी जाणीव विसरण्यासाठी



वैदू-भोंदूच्या प्रभावाच्या कथा रचाव्या लागतात आणि स्वत:लाहीं त्यावर विश्वास ठेवावा लागतो. निसर्गाच्या लहरीपणामुळे होणाऱ्या पीकबुडीपासून शेतकऱ्याला संरक्षण मिळेल, म्हणजे वास्तविक उत्पादनखर्च भरून निघण्याची शाश्वती मिळेल, त्या दिवशी या शेतकऱ्याला विज्ञाननिष्ठा शिकण्याची गरजच राहणार नाही.

बरेच स्वयंस्फूर्त कार्यकर्ते हिंदुत्ववादी वा राष्ट्रवादी चळवळीत काम करताना दिसतात. आपला देश हे एक राष्ट्र आहे ही भावना जोपासण्याचा त्यांचा प्रयत्न असतो, तरीही अनेक विघटनवादी शक्ती देशात आढळतात.

देशात अशी फुटाफूट का झाली? ज्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रत्येक जातीजमातीतल्या भर उमेदीतल्या तरुणांनी हसत हसत मरणालादेखील कवटाळले त्या देशातल्या तरुणांच्या मनातील देशभक्ती एकदम आटून गेली कशी? पाकिस्तानबरोबरच्या लढायांत चारचार वेळा इतर जवानांच्या बरोबरीने लढणारा शीख तरुण सगळ्या 'हिंदुस्थान' बद्दल एकदम एवढ्या चिडीने का बोलू लागला? भारतीय लष्करात परम शौर्य गाजवणारे गुरखे एकदम एवढे नाराज का झाले? मुस्लिम जमातीचा प्रश्न आणि दलितांचा प्रश्न पेटतच का राहिला?

हिंदू आणि मुसलमान यांच्यातील प्रश्न सोडवणे खरोखरच बिकट आहे. मुसलमान जमातीचे काही मूठभर नेते शहरात राहतात, व्यापार-धंदा करतात आणि त्यांतील काही चांगले धनाढ्यही आहेत; पण सर्वसाधारण मुसलमान दलितांपेक्षाही दलित आहेत. खरे सांगायचे तर त्यांच्यातील अनेकांचे पूर्वज भणंग दारिद्र्यामुळेच धर्मांतराकडे वळले. धर्म बदलल्याने आर्थिक हलाखी संपली नाही; पण इस्लामने थोड्या प्रमाणात 'माणूस' म्हणून मान आणि अभिमान दिला. गावातला मुलाणी, छोटा शेतकरी, कारागीर, विणकर, रिक्षावाले आणि छोट्यामोठ्या कारखान्यांत काम करणारा असंघटित मजूर हे भारतातल्या मुसलमानांचे प्रातिनिधिक चित्र आहे. दलितांना मिळणाऱ्या सोयीसवलतीही त्यांना नाहीत. बहुसंख्यक समाज त्यांच्याकडे संशयाने पाहतो. संशयातून दुरावा तयार होतो आणि त्यातून पुन्हा संशय- अशा दुष्टचक्रामुळे दोन समाजांत एक अक्राळविक्राळ दरी सतत रुंदावते आहे.

भूमिहीन शेतकऱ्यांचे आणि छोट्या कारागिरांचे प्रश्न सुटल्याखेरीज सर्वसामान्य मुसलमानाच्या मनातील असुरक्षिततेची आणि कोंडले गेल्याची भावना दूर होणे कठीण आहे. मग तो सहजपणे विकासापेक्षा 'आखिरात' जास्त महत्त्वाची आहे असे निकराने सांगू लागतो. या वातावरणाचा फायदा त्यांचे शहरी पुढारी घेतात. परिणामत:,

स्वातंत्र्याच्या एखाद्या तरी प्रकाशकिरणाकरिता मनात आक्रंदणाऱ्या मुसलमान मायबहिणीसुद्धा 'शरियत'चे समर्थन करू लागतात. मुस्लिम समाजाचे अर्थकारण करणारा नेता जन्मलाच नाही, हे मोठे दुर्दैव आहे.

दलितांची परिस्थितीही काही फार वेगळी नाही. हिंदू समाजापासूनची त्यांची फारकत काही बाबतीत थोडी कमी, तर काही बाबतीत पुष्कळ जास्त. गावच्या वतनदार महाराला चावडीसमोर कमरेत वाकून जावे लागे; पण तोच मुसलमान बनला तर जोडे घालून थेट चावडीपर्यंत जाऊ शके. मीनाक्षीपुरमचा हाच धडा आहे. इस्लामने त्याच्या आश्रयाला आलेल्यांना काही प्रमाणात सन्मान दिला. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशाप्रमाणे बुद्धाला शरण गेलेल्यांना तशा सन्मानाचे भाग्यही मिळाले नाही. दलितांत फारसे कुणी मोठे व्यापारी, कारखानदारही नाही. समाजाचे नेतृत्व राजकीय सत्तेच्या काही दलालांकडे आणि राखीव जागेच्या धोरणाचा फायदा मिळालेल्या काही भाग्यवानांकडे. मुस्लिम नेतृत्वाप्रमाणेच दलित नेतृत्वालासुद्धा चिंता आहे ती दलितत्व संपवण्याची नाही, तर आपले नेतृत्व टिकवण्याची.

आजपर्यंत शेतकरी संघटनेमध्ये मला जो अनुभव आला, त्यावरून मी स्पष्टपणे सांगू इच्छितो, की या देशातील सामान्य माणसाच्या मनामध्ये कुठेही जातीयवाद नाही, भाषावाद नाही, धर्मवाद नाही. हे सर्व क्षुद्रवाद स्वार्थी राजकारण्यांनी केवळ जोपासून ठेवले आहेत. सर्वसामान्य माणसे अर्थवादाच्या पायावर आवाज उठवू लागली, की ही मंडळी क्षुद्रवादाची भुतावळ उठवून त्यांना अर्थवादापासून दूर नेतात.

देशातली गरिबी हटली, देशाचा विकास होत राहिला तर यांपैकी एकही भांडण झाले नसते. आपल्या देशातले एखादे राज्य म्हणते, की आम्हाला फुटून जायचे आहे. अमेरिकेतले एखादे संस्थान असे म्हणते का? मुळीच नाही. तिथेसुद्धा अनेक धर्मांची, पंथांची माणसे आहेत; अनेक राज्यांची आहेत; पण तिथे असे कुणी म्हणत नाही. उलट, अमेरिकेतील संस्थान असणे ही प्रतिष्ठेची, सन्मानाची गोष्ट समजली जाते. अशी भावना आपल्याकडे निर्माणच होऊ शकली नाही, कारण आम्ही गरिबी हटवू शकलो नाही.

मी हिंदू घरात जन्मलो, ब्राह्मण घरात जन्मलो. आयुष्यातील पहिली १८-२० वर्षे सगळे धर्माचार केले, स्नानसंध्यादी विधी केले, पाठांतरही केले. आज मी यांतले काहीही करत नाही. विश्वाच्या उत्पत्तीसाठी, जीवमात्राच्या उत्क्रांतीसाठी आणि मनुष्यसमाजाच्या विकासासाठी कोणी परमेश्वरी शक्ती असण्याची मला शक्यताही दिसत नाही आणि आवश्यकताही दिसत नाही. काही समजले असे आज वाटते, उद्या कदाचित आज



समजलेले सारेच चूक आहे असे ध्यानात येईल तर तेही मानायची माझी तयारी आहे. प्रत्यक्ष अनुभवाने, क्षणाक्षणाने आणि कणाकणाने जग समजण्याची पराकाष्ठा करणारा मी एक यात्रिक आहे.

माझ्यासारखा माणूस कोणत्याही धर्मात चालण्यासारखा नाही. प्रत्येक धर्माची एक पोथी असते, एक प्रेषित असतो आणि त्याने मांडलेली आचारविचारांची एक नैतिकता असते. ज्या काळात पोथी लिहिली गेली, तो काळ सगळा बदलला तरी प्रेषितांचे उत्तराधिकारी त्याच आचरणनियमांचा आग्रह धरतात. यहुदी, खिस्ती, मुसलमान हे असे बांधीव धर्म आहेत. त्यांच्यात माझ्यासारख्या यात्रिकाला जागा नाही.

पण माझ्यासारखा यात्रिक हिंदू राहू शकतो. नरबलींनी चामुंडा मातेला प्रसन्न करू पाहणाऱ्या अघोर भक्तापासून, श्वासोच्छ्वासात जंतू तर मरत नाहीत ना अशी चिंता बाळगणाऱ्या साधूंपर्यंत कोणीही हिंदू असू शकतो. कारण, हजारो वर्षे हिंदू हा शब्द एका खुल्या प्रयोगशाळेचे नाव आहे. हिंदू हा बंधने घालणारा बांधीव धर्म नाही. हिंदू ही एक संस्कृती आहे.

मुसलमानी आक्रमण यशस्वी झाले, इंग्रजांचे राज्य हिंदुस्थानात प्रस्थापित झाले याची एक प्रतिक्रिया आत्मपरीक्षणाची होती. हिंदू समाजातील दोष काय, त्यातील अन्याय कोणते यांचा विचार करून असे सारे अनाचार दूर करावे अशी मांडणी जोतिबा फुले, लोकहितवादी गोपाळराव देशमुख, गोपाळ गणेश आगरकर इत्यादींनी समाजावर आसूड उडवून, लोकनिंदेची कदर न करता केली. दुसरी एक प्रतिक्रिया अगदी वेगळ्या टोकाची. हिंदू धर्मात आणि संस्कृतीत दोष असे काहीच नाहीत, चक्रनेमिक्रमाने आपले गाडगे सध्या खाली आले आहे, ते यथावकाश वर जाईल; इतिहासातून धडा घ्यायचा असला तर तो एवढाच, की पिंड आणि ब्रह्मांड यांचे अद्वैत मानून आराधनेचे मार्ग व्यक्तिनिष्ठ न ठेवता सामूहिक करावेत आणि ब्रह्म आणि जीवात्मा यांच्यामध्ये एक 'राष्ट्र' नावाची जाणीव तयार करावी अशी मांडणी विवेकानंदांपासून ते गोळवलकर गुरुजी, सावरकर ते थेट आजचे विश्व हिंदू परिषदेचे नेते यांनी केली.

तरी हिंदू समाज अविचलित राहिला. जातीय दंगली झाल्या, पाकिस्तान झाले, अनुनयाचे राजकारण झाले, हिंदू प्रतिशोधाचेही राजकारण झाले तरीही हिंदुबहुसंख्य देशात मुसलमान राष्ट्राध्यक्ष, शीख पंतप्रधान आणि रोमन कॅथॉलिक महिला राज्यकर्त्यापक्षाची अध्यक्षा हे फक्त हिंदू बहुसंख्य देशातच संभवते. असे उदाहरण जगात इतरत्र कोठेही दिसणार नाही.

आज हिंदुत्वाचा झेंडा घेऊन नाचणारे खरे म्हटले तर हिंदुत्वाला छोटे करू पाहत आहेत, निव्वळ धर्माचे स्वरूप देऊ पाहत आहेत.

बरेच हिंदुत्वावादी स्वदेशीच्या प्रचारासाठी काम करीत असतात. वस्तुस्थिती अशी आहे, की आपण जर परदेशी मालावर बंदी घातली तर जगातील इतर देश हिंदुस्थानशी एकतर्फी व्यापार थोडाच चालू देणार आहेत? आपण बंधने लादली तर तेही लादतील आणि थोड्याच काळात हिंदुस्थानचा आंतरराष्ट्रीय व्यापार संपुष्टात येईल. मग प्रश्न असा उभा राहतो, की जगाला आपली गरज जास्त की आपल्याला जगाची गरज जास्त? हिंदुस्थानकडून एक पैशाचाही माल न घेतल्याने जगाचे काहीही बिघडणार नाही; पण परदेशांशी संबंध तोडल्यास तीन महिनेदेखील रेटणे हिंदुस्थानी उद्योगधंद्यांना अशक्य होईल.

कोणी म्हणते, पूर्वी ईस्ट इंडिया कंपनी आली आणि देशावर अंमल बसवून गेली; नव्या बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच करतील. डॉन क्विक्झोटप्रमाणे मनाने मध्य युगात वावरणारी ही माणसे; आपले स्वातंत्र्य नकली आहे, तकलादू आहे; विलायती सत्तांचे सामर्थ्य इतके मोठे आहे, की लष्करी सत्ता मिळवण्याचे त्यांनी मनात आणले तर २४ तसात लाल किल्ल्यावर त्यांचा झेंडा फडकू शकतो; 'पाश्चिमात्यांना वसाहती नकोशा झाल्या म्हणून केवळ आपण स्वतंत्र आहोत,' ही दु:खद जाणीव स्वदेशीवाल्यांना नाही. ते आपले त्यांच्याच गुर्मीत राहतात. आजच्या अवस्थेतील हिंदुस्थान चालवण्यासाठी टेंडर काढले तर तर ते भरण्यासाठी साऱ्या जगात कोणीही पुढे येणार नाही; पैसा आणि रक्त खर्चून हिंदुस्थानावर सत्ता गाजवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

इतिहासाचे सार काढताना मग अशा बांधिलकीच्या विचारवंतांची त्रेधातिरपीट उडू लागते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांना 'सर्वश्रेष्ठ भारतीय-संस्कृती निव्वळ अधम अशा इंग्रजी व्यवस्थेपुढे का नमली' याचे उत्तर देण्यासाठी चक्रनेमीक्रमाने रहाटगाडग्याप्रमाणे इतिहासात वर गेलेले खाली येतात, खाली गेलेले यथाक्रम वर जातात, त्यासाठी कोणत्याही प्रकारे भारतीय व्यवस्थेत ढवळाढवळ करण्याचे काहीच कारण नाही, असे खास पुणेरी निदान मांडावे लागले.

मी स्वत:ला महात्मा फुल्यांचा पाईक समजतो. इतिहासाचा अर्थ सलगपणे, सुसूत्रपणे लावण्याचे पहिले काम महात्मा फुल्यांनी केले. अगदी विष्णूच्या मत्स्यावतारापासून ते वासुदेव बळवंत फडक्यांच्या बंडापर्यंत, 'शूद्रांची गुलामगिरी' या एकसूत्रात त्यांनी सर्व घटना गुंफून दाखवल्या. राष्ट्रवादी आघाडीची पर्वा न करता त्यांनी मोगालांना शूद्रांच्या



मुक्तीचे श्रेय दिले आणि राष्ट्रवाद्यांच्या महापुरुषांवर कडाकड आसूड ओढले.

महात्मा जोतिबा फुल्यांच्या इतिहासमांडणीला संशोधनाचा वा कागदोपत्री साधनांचा आधार नव्हता. अशा तऱ्हेचा पुरावा पाच हजार वर्षांचा इतिहास लिहिणाऱ्याला मिळवणे शक्यही नव्हते. शूद्रांच्या गुलामगिरीच्या सूत्रावर प्रचंड प्रतिभेने इतिहासाचा एक प्रपंच त्यांनी उभा केला; पण विद्वन्मान्य इतिहासकारांत आज जोतिबांना काहीच मान्यता नाही.

स्वयंस्फूर्त कार्यातील बरीच मंडळी महिला आंदोलनात सहभागी आहेत. त्या महिला आंदोलनाची परिस्थिती काय आहे? जागोजागी भगिनीमंडळे, वनिता-समाज, स्त्री-संघर्ष समित्या उगवतात आणि स्त्री-साहाय्याची काही जुजबी कामे करीत राहतात. स्वधर्मीयांकरिता, स्वजातीयांकरिता काही उपयोगी कामे करणे आवश्यक आणि अपरिहार्य आहे असे समजून लोक संस्था उभ्या करतात. जन्माच्या अपघाताने ज्या जातीत किंवा धर्मात आपण जन्मलो, त्याचा अभिमान तो काय बाळगायचा आणि आपल्या बुद्धीचा, कर्तबगारीचा आणि त्यागाचा लाभ एका मर्यादित समाजापुरताच संकुचित का ठेवायचा, हा प्रश्न अनेकांना पडतही नाही. निसर्गधर्माने ते आपल्या जन्मदात्या समाजाचा अभिमान बाळगतात आणि त्यासाठी यथाशक्ती, यथाबुद्धी काहीतरी किडमीड कामे करत राहतात. बहुतेक स्त्रीसंस्था आणि स्त्रीनेत्या यांची परिस्थिती अशीच आहे. स्त्रीपुररुष संमिश्र समाजात आपल्या कर्तबगारीला पुरेसा वाव नाही अशी जाणीव झाली, की स्त्रिया महिला-चळवळीकडे वळतात; एखादा समाज, मंडळ किंवा समिती स्थापतात.

मोठमोठ्या मान्यवर महिला संघटनांत लब्धप्रतिष्ठित स्त्रियांनी महत्त्वाची सारी पदे अडवलेली असतात. कोणत्याही कार्यक्रमात मिरवायला त्यांनाच मिळते. नाव त्यांचेच होते. त्यामुळे अशा संस्थांत नव्या उमेदीच्या कायकर्त्यांना आत शिरायला फारसा वाव नसतो. अनेकदा होते असे, की महिला संघटनांतील स्त्रीचे स्थान तिच्या नवऱ्याच्या समाजातील प्रतिष्ठेवर आणि आर्थिक सुसंपन्नतेवर अवलंबून असते. म्हणजे तर, कर्तृत्वाने नाव मिळविण्याचा, काही करून दाखविण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. तेव्हा जी ती स्त्री एक नवी पाटी लावून आपली एक संस्था उभी करू पाहते. एकेका शहरात दीडशे-दोनशे महिला संस्था आपल्या नावांच्या पाट्या आणि नोंदणी क्रमांक मिरवीत उभ्या असतात.

अनेक घरांत नवराबायकोंचे, सासूसुनांचे, नणंदाभावजयांचे पटत नाही; काही ठिकाणी

या वितुष्टांना मोठे विक्राळ स्वरूप येते. अशी अनेक प्रकरणे प्रत्येक समाजात, हर वस्तीत, दररोज घडतच असतात. असे काही घडले, की जवळपासच्या महिला संघटनांतील काही बाया असल्या प्रकरणांत लक्ष घालतात; नवविवाहित सुनेची बाजू न्याय्य आहे असे गृहीत धरून कामाला लागतात. पोलिसांत तक्रार नोंदवतात, मोर्चे काढतात, निदर्शने करतात. काही वेळा थोडेफार यश मिळते, बहुधा हाती फारसे काही लागतच नाही. अशा प्रकरणांचा पाठपुरावा करायचा म्हणजे मोठी ताकद, साधने, संयम आणि धैर्य लागते. एक प्रकरण निकालात निघण्याआधी दहा नवी प्रकरणे उभी राहतात. अगदी उत्साही, तळमळीच्या कार्यकर्त्यांचीही दमछाक होऊन जाते.

कौटुंबिक वितुष्टांची ही प्रकरणे स्त्रीचळवळीच्या विषयपत्रिकेवर असणे कितपत योग्य आहे? आत्महत्या असो, खून असो, शारीरिक छळाचा प्रश्न असो; ही सारी कृत्ये गुन्हेगारी स्वरूपाची आहेत. दंडविधानात त्यासंबंधी यथायोग्य तरतुदी आहेत. असल्या प्रकरणांत जाणकार तज्ज्ञांनी बारकाईने तपास करणे महत्त्वाचे असते. असले तपास हे काही हौशागवशा कार्यकर्त्यांचे काम नव्हे.

खरे म्हणजे, असल्या प्रकरणांत महिला आंदोलनांचा काही संबंध नाही. स्त्रीवर जुलूम, अन्याय करणारे केवळ पुरुषच असतात असे नाही; बहुसंख्य प्रकरणी एका बाजूस सून तर दुसऱ्या बाजूस सासू आणि नणंद इत्यादी उभे ठाकलेले असतात. सून ही स्त्री खरी; पण सासू आणि नणंद याही स्त्रियाच.

असली प्रकरणे म्हणजे स्त्रीजातीवर इतरेजनांनी केलेला अत्याचार असे निखळपणे नसतेच आणि तरीही असल्या घरगुती प्रकरणांत महिला संघटना उत्साहाने लक्ष घालतात आणि आपली ताकद खर्ची करून घेतात.

यापलीकडे, काही मुखंडी स्त्रियांना आपल्या हाती मोठे शस्त्र आले असे वाटते आणि वॉशिंग्टनप्रमाणे ती कुऱ्हाड त्या चौफेर चालवू लागतात. यातून प्रकरणे वाढवण्यासाठी किंवा दबवण्यासाठी लाचलुचपतीची शक्यता तयार होते आणि अनेक वेळा स्त्री-कार्यकर्त्या आणि सबंध महिला चळवळच बदनाम होऊन जाते.

याखेरीज, स्त्रियांची वेगळी महिला बँक, स्त्रियांची वेगळी पतपेढी, स्त्रियांचा वेगळा साखर कारखाना असे अनेक क्षेत्रांत 'जनाना डब्बे' करण्यात अनेक संस्था गुंतल्या आहेत.

नवऱ्याने टाकून दिलेल्या, विधवा, कुमारी माता, अपंग स्त्रिया यांच्याकरिता शिक्षणाची सोय करणे, त्यांना काही आरोग्यसेवा देणे, त्यांच्या चरितार्थासाठी काही उद्योगधंद्यांची



सोय करणे, त्यांना स्वावलंबी बनविणे अशा तऱ्हेची कामे करता येतात; पण गुजराथेतील ईला भट यांच्या सेवासंस्थेसारखे काही अपवाद सोडले तर इतरांना त्यांत फारसे यश मिळत नाही. अशा कामांना प्रचंड मेहनत, चिकाटी, व्यवस्थापन-कौशल्य आणि व्यवसायबुद्धी यांची गरज असते.

स्त्रियांचा प्रश्न हा अनेक संस्थांत, विश्वविद्यालयांत अभ्यासाचा स्वतंत्र विषय म्हणून मान्यताप्राप्त झाला आहे. त्यामुळे स्त्रियांच्या परिषदा भरवणे, परिसंवाद घडवून आणणे हे काम गल्लीपासून दिल्लीपर्यंतच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही प्रचंड जोमाने चालू आहे. महिला कार्यकर्त्या राज्यपातळीवरील परिसंवादांत आधी मान्यता पावतात, मग हळूहळू राष्ट्रीय पातळीवर त्या परिसंवाद करू लागतात आणि शेवटची पायरी म्हणजे, वर्षातून दोनचार वेळा वेगवेगळ्या देशांत घडणाऱ्या परिसंवादांतील जागाही भूषवू लागतात. महिला-चळवळीतील कार्यकर्त्यांचे या दृष्टीने तीन संच बनतात; आगगाडीसंच, विमानसंच आणि जेटसंच! यातून स्त्रीप्रश्नाविषयीची खरी कळकळ ओसरू लागली, ती एक 'करिअर' बनली.

वेगवेगळ्या क्षेत्रांत आपापली कर्तबगारी दाखविणाऱ्या स्त्रिया होत्या. कोणी वकील होत्या, कोणी डॉक्टर; कोणी लष्करात जात होत्या तर कोणी वैमानिक बनत होत्या; कोणी साहसाची कामे करीत होत्या, तर कोणी कलाक्षेत्रात चमकत होत्या. अनेक उद्योजक महिलांनी कारखानदारी, व्यापार, विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांतही आपल्या स्त्रीपणाचा कोणाताही आधार न घेता मोठी कामगिरी करून दाखवली. साऱ्या स्त्रीजातीस ललामभूत असलेल्या या दुर्गा स्त्री-चळवळीपासून दूर झाल्या आणि स्त्री-चळवळ वावदूक मुखंडींच्या हाती गेली.

खरे बघायला गेले तर स्त्रियांचे अनेक महत्त्वाचे प्रश्न स्त्री-मुक्तीच्या चळवळीमुळे नव्हे तर इतर अनेक कारणांमुळे सुटलेले आहेत. उदाहरणार्थ, स्त्री-शिक्षणाला महर्षी कर्वे यांच्या कार्यामुळे जेवढी प्रेरणा मिळाली त्याहून जास्त प्रेरणा दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी आलेल्या रेशनिंगमुळे मिळाली. रेशनिंग खात्यात शिकलेल्या बायकांना नोकऱ्या मिळू लागल्या, या नोकऱ्यांमुळे आर्थिक उत्पन्नाचे साधन बायांना प्रथमच उपलब्ध झाले आणि यामुळे मोठ्या प्रमाणावर बायकांनी शिकायला सुरवात केली.

स्त्रियांचे जीवन सुखकर करण्यामध्ये सगळ्या चळवळींपेक्षा कितीतरी जास्त वाटा हा आधुनिक तंत्रज्ञानाने उचलला आहे. शिवण्याच्या यंत्रामुळे किंवा मिक्सरमुळे किंवा वॉशिंग मशीनमुळे सर्वसामान्य स्त्रीचे जीवन जितके सुकर झाले, तितके कुठल्याही

चळवळीमुळे कधीच झाले नसते.

तंत्रज्ञानाने एकूणच कुठल्याही चळवळीपेक्षा मानवी जीवनावर जास्त प्रभाव टाकलेला आहे; जास्त आनंद निर्माण केलेला आहे. आज महाराष्ट्रातील द्राक्षे लंडन-पॅरिसमधील डायनिंग टेबलवर पोचली आहेत व त्यामुळे काही शेतकऱ्यांच्या घराततरी समृद्धी यायची शक्यता निर्माण झाली आहे, याचे एक कारण मालाची वाहतूक विमानाने करण्याची तंत्रज्ञानाचे केलेली सोय आणि याचे दुसरे कारण म्हणजे ही द्राक्षे खरेदी करणारे, 'मार्क्स ॲण्ड स्पेन्सर' यांसारखी सुपर मार्केटस्. ''गरिबांसाठी मार्क्स आणि एंगल्स यांच्यापेक्षा कितीतरी जास्त कामगिरी मार्क्स ॲण्ड स्पेन्सर या दुकलीने केली,'' अशी टिप्पणी प्रख्यात व्यंगचित्रकार जॉर्ज निकत्से यांनी केली आहे.

साहित्यक्षेत्रातही थोडेफार स्वयंस्फूर्त कार्य सुरू असते. या क्षेत्राकडे बघितले तरी एकूण परिस्थिती केविलवाणीच असल्याचे दिसते. आमच्या शेतकरी संघटनेच्या कामामध्ये अक्षरश: लाखो शेतकरी रस्त्यावर उतरतात. शेतकरी आंदोलनात जितकी माणसे तुरुंगात गेली तितकी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य आंदोलनातही गेली नव्हती. असे असूनही मराठी साहित्यामध्ये शेतकरी आंदेलनाला काही स्थान मिळालेले नाही.

डाव्यांच्या चळवळीमध्ये त्यांच्यामागे शेपाचशे माणसेसुद्धा नसली तरी, त्यांची कवने गाणाऱ्यांचा सुंदर ताफा त्यांच्यापुढे असतो. ज्यांच्या आंदोलनात आंदोलकांची संख्या कमी, पोलिसांची जास्त त्या आंदोलनात प्रतिभेचा हा झरा खळाळून वाहताना दिसतो आणि प्रचंड आंदोलने करणाऱ्या शेतकरी संघटनेत, काही अपवाद वगळल्यास, साहित्य, कला, संगीत, शाहिरी, पोवाडे अशा मार्गांनी प्रतिभा दाखविणारे निपजले नाहीत. असे का झाले? एकदा एका कार्यकर्त्याने नानासाहेब गोऱ्यांना प्रश्न विचारला, ''शेतकरी संघटना ही अशी रूक्ष, काव्य नसलेली का झाली?'' ते म्हणाले, ''शरद जोशी हा माणूसच गद्य आहे. त्यांनी जो अर्थशास्त्रीय विषय मांडला तोच रूक्ष आणि गद्य आहे. आंदोलनाचे साहित्य हे कधी अशा गद्य भाषेत तयार होत नाही. आंदोलनात काहीतरी डोक्यात मस्ती चढणारी, झिंग आणणारी गोष्ट असावी लागते. रामाच्या देवळाचे नाव घ्यावे लागते, नसलेल्या गोष्टी तयार कराव्या लागतात, सामान्य माणसांचेसुद्धा पुतळे जागोजागी उभे करून त्यांना देवता बनवावे लागते. समाजाच्या हितसंबंधांबरोबरच काही एक पागलपणा केल्याखेरीज आजकाल खरे आंदोलन बनतच नाही आणि शरद जोशींना पागलपणा दाखवता येता नाही.''



थोडेसे विषयांतर होते आहे, पण एका नामवंत समाजसेवकाचा एक अनुभव याठिकाणी मला सांगावासा वाटतो. यांच्या 'आदर्श गावाला' मी गेलो. ''गावात कोणीही चित्रहार बघत नाही.'' गावकरी मला सांगू लागले. ''का बरे?'' मी विचारले. ''नटनट्यांचे ते घाणेरडे चाळे काय बघायचे!'' ''पण एखाद्याला चित्रहार बघायची इच्छा असेल तर?'' ''तसा काही प्रश्नच उद्भवत नाही. चित्रहार पाहायचा नाही असा आदेशच आहे आम्हाला.'' हे सांगताना त्या गावकऱ्यांना मोठा अभिमान वाटत होता. हा आदेश कोणाचा? तर या तथाकथित समाजसेवकाचा. असली ही त्यांची हुकूमशाही! आणि हे 'आदर्श गावे' तयार करण्याचे कॉन्ट्रॅक्ट घेणार!

आदर्श गाव ही कल्पनाच absurd आहे. असा कधी कुठे समाज बदलतो का? आज एक गाव आदर्श बनले, उद्या दहा गावे अदर्श बनतील, परवा १०० गावे आदर्श बनतील, असा गुणाकार या लोकांनी गृहीतच धरलेला असतो. प्रत्यक्षात असले गुणाकार कधीच होत नाहीत; पण अशी खोटी स्वप्ने विकण्यात आमचे महापुरुष वस्ताद!

काही स्वयंस्फूर्त चळवळी समाजामध्ये नैतिकता वाढावी म्हणून काम करीत असतात. यात अनेक गांधीवादी संस्था आहेत. त्यांच्या मते, आपल्या समस्यांचे कारण नैतिक मूल्यांचा ऱ्हास किंवा भ्रष्टाचार हे आहे.

या नैतिक प्रश्नाचा जरा खोलात जाऊन विचार करायला हवा, कारण आपल्या मुख्य विषयाशी हा थेट निगडित आहे.

नैतिकता ही काय चीज आहे? नैतिकतेचा मार्ग कोणता? महात्माजींना एकदा एकाने विचारले, ''शांतीचा मार्ग कोणता?'' बापूजींनी उत्तर दिले, ''शांतीचा मार्ग नाही, शांती हाच मार्ग आहे.'' तसेच नैतिकता ही काही विवक्षित अवस्था नाही. नैतिकतेचा काही मार्ग नाही, नैतिकता हाच मार्ग आहे.

नीतिमत्तेच्या कल्पना वेगवेगळ्या काळांत, वेगवेगळ्या समाजांत बदलताना दिसतात. स्त्रीसत्तेपासून स्त्रीदास्यापर्यंत, ब्रह्मचर्यापासून ते प्रौढसंमतीच्या स्वैराचारापर्यंत सर्व प्रकारचे नीतिनियम इतिहासात सापडतात. अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबर नीतिव्यवस्थाही बदलताना दिसते. शेतीप्रधान समाजाची धारणा औद्योगिक समाजासारखी नसते. खासगी मालमत्तेवर आधारलेले समाज, आपली वेगळी नैतिकता तयार करतात, स्थिर समाजाचे नियम लढाया, उत्पात इत्यादींनी वारंवार हादरे खाणाऱ्या समाजापेक्षा साहजिकच निराळे असतात. अर्थव्यवस्था बदलली की नीतिमत्ताही बदलते.

तरीही बहुतांश समाजांनी मानलेल्या नियमांत एक सूत्र सापडते. स्वार्थाचा त्याग

करून दुसऱ्याचे भले करण्यात काही एक मोठेपण आहे असे बहुतेक काळात मानले गेले आहे. दुसऱ्यासाठी जगलास तर अमर झालास, स्वत:करिता जगलास तर मेलास, अशा अर्थाची अनेक बोधवचने सतत वापरली जात असतात.

'संसार करावा नेटका' किंवा 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे' यांसारखी अपवादात्मक वचने सोडल्यास संतवाणी ही वैराग्याची, नि:संगत्वाची आणि गरिबीचे गुणगान करण्याकरिताच राबली आहे.

जे दुर्मिळ त्याची किंमत जास्त या मागणी-पुरवठ्याच्या अर्थशास्त्रीय सिद्धांतानुसार परहितरत वर्तणुकीला अलोट महत्त्व मिळाले असावे. परार्थाच्या महत्त्वाचे दुसरेही एक कारण असू शकेल. व्यावहारिक जगातील प्रत्यक्ष जगणे आणि व्यक्तीची जाहीर केली गेलेली तथाकथित तत्त्वे यांमध्ये प्रचंड दरी असते. उदाहरणार्थ, विश्वाची स्वयंभू उत्क्रांती मानणारे मार्क्सवादी अर्थव्यवस्थेलामात्र नियोजनाची आवश्यकता प्रतिपादतात, तर विश्वकर्त्यावर श्रद्धा सांगणारे अर्थव्यवस्थेच्या खुल्या विकासाची महती सांगतात. व्यवहारात स्वार्थाने वागल्यानंतर शब्दांत तरी परार्थाचे गुणगान गायिले तर मन:शांती सुलभ होते म्हणूनही परार्थाचे हे कौतुक असावे. बलाढ्यांनी ताकदीच्या बळावर प्रभुत्व गाजवायच्या दिवसांत दीनदुबळ्यांच्या साहाय्याला क्वचित यातील काही संतवचने आली असतीलही; पण सत्तेच्या भर सद्दीत कोणा सुलतानाला संतांच्या शिकवणीमुळे बंधने पडल्याचे मात्र इतिहास क्वचितच सांगतो.

एकेकाळी मुंबईतील माणसे बसच्या रांगेची शिस्त कटाक्षाने पाळत. एका बसमध्ये जागा मिळाली नाही तर शांतपणे दुसरी येण्याची वाट पाहत थांबत. त्या काळी दिल्लीकर बस पकडताना पराकोटीची बेशिस्त आणि हुल्लड दाखवत असत. याचा अर्थ दिल्लीवाले कमी नीतिमान आहेत असा नाही. मुंबईच्या व्यवस्थेत एक बस गेली तरी दुसरी; नाही तरी त्यापुढची मिळण्याची जवळ जवळ खात्री वाटत असे. दिल्लीत तर तशी आशाही नसे. यामुळे दोघांच्या वर्तणुकीत फरक पडत असे.

भविष्यात जितके दूर पाहण्याची शक्यता, तितका मनुष्य नागड्या स्वार्थापासून दूर जातो. डोंगराच्या शिखरावरून पाहिले, विश्वाच्या व्यापकतेच्या तुलनेने स्वत:ची, स्वत:च्या इच्छा-आकांक्षांची क्षुद्रता जाणवली की काही काळ विचार बदलतात, तसाच हा प्रकार आहे.

आजची भ्रांत आहे, उद्याची आशा नाही, कोण काय म्हणेल याची चिंता करण्याचे कारण नाही अशा अवस्थेत नागड्या तात्कालिक स्वार्थाची उपज सहज होते. आजचा



प्रश्न सुटला आहे, उद्याचा विचार करण्यची फुरसत आहे तेव्हा मनुष्य थोडा दूरचा विचार करून, दूरच्या फायद्यासाठी आजच्या स्वार्थाला मुरड घालू शकतो. सर्व व्यवस्थित असले तर अगदी जन्मांतराचीसुद्धा चिंता वाहता येते. आर्थिक स्थैर्याची भावना व परार्थाची नीतिमत्ता यांच्यात संख्याशास्त्रीय संबंध आहे.

आर्थिक विपन्नतेतही परार्थाची आवड आणि संपन्नतेतही दुष्टता या अनेक व्यक्तींत सापडतातही; पण संख्याशास्त्रीय संबंध त्यामुळे नाकारता येणार नाही. परार्थ हा व्यापक स्वार्थच असतो.

परार्थाचा हा अर्थ समजून घेऊन अवघ्या मानवजातीला एका मानसिक गुलामगिरीतून सोडवणे आवश्यक आहे. खावे, प्यावे, उपभोगावे या नैसर्गिक प्रेरणा. त्यांचे यथायोग्य पोषण झाले तर सहभोगाचीही गोडी वाटू लागते, गावाबरोबर जगण्यात आनंद वाटू शकतो, राष्ट्राकरिता प्राण देण्याची ऊर्मीही तयार होऊ शकते. त्यातही एका अलोट आनंदाचा अनुभव घेता येऊ लागतो.

प्रचंड दु:ख आणि यातना सोसून केवळ दुसऱ्याच्या भल्याकरिता मी हे दिव्य करीत आहे असे कोणी म्हटले, की माझ्या मनात भीतीच्या घंटा वाजू लागतात. असे म्हणणारा निरोगी मनाचा नाही, याने काही लपवलेले आहे, या बोकेसंन्याशाच्या मनात काही क्षुद्र स्वार्थ आहे, असे मला वाटू लागते. मी हे माझ्या आनंदाकरिता करतो आहे, स्वार्थाकरिता करतो आहे, हे सांगण्यात कोणालाही शरम का वाटावी? परार्थाची साखर पेरणारा क्षुद्र स्वार्थ साधतो. त्यापेक्षा स्वार्थी बना, जितक्या व्यापक अर्थांनी, जितक्या मार्गांनी आयुष्य परिपूर्ण करता येईल तितके करा. दुसऱ्यचे हक्क लाथाडू नका. परार्थ म्हणून नव्हे, निव्वळ स्वत:च्या आयुष्याची परिपूर्णता कमी होऊ नये म्हणून-अशी शिकवण ठीक. हीच खरीखुरी नैतिकता होईल.

मी भविष्यातील आदर्श समाजाचे काहीच स्वप्न देत नाही; स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणे हा मार्ग सांगतो; पण या कक्षा रुंदावत पोचायचे कोठे हे मात्र सांगत नाही. नैतिकता ही कोणत्याही एका विवक्षित व्यवस्थेत नाही, ती मार्गक्रमणात आहे असे मानल्यानंतर आदर्शभूत समाज ही कल्पनाच अर्थहीन होते. आदर्शाची चित्रणे करणाऱ्या विचारपद्धतीपैकी मार्क्स व गांधी यांच्या स्वप्नसृष्टीचे काय झाले हे पाहण्यासारखे आहे.

मार्क्सवादाच्या समग्र विचारपद्धतीवर विसाव्या शतकातील कामगार चळवळ उभी राहिलेली आहे. जडवाद, विरोध विकासवाद, विपरीत उत्पादनसंबंध, खासगी मालमत्ता, अतिरिक्त मूल्य, मजुरांचे शोषण, वर्गसंघर्ष यांतून भांडवलशाहीचा अटळ विनाश, यांतून

वर्गरहित, शोषणरहित, समाजवादी समाजाची निर्मिती व त्यांतून मानवी मनाची मुक्ती एवढ्या सगळ्या, सर्व विश्वाला व्यापून दशांगुळे उरणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या पायावर मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादाची उभारणी झाली. जगातील सर्व कामगारांना एक करण्याचे स्वप्न पाहत कामगार चळवळ जगभर उभी राहिली. आपल्या देशात अनेकांनी या चळवळीत स्वत:ला झोकून दिले, बलिदान केले. मजुरीच्या रूपात, बोनसच्या रूपात, नोकरीच्या अटी, शर्तीबाबत सुधारणा असे अनेक फायदे मजुरांनी पदरात पाडूनही घेतले; पण मार्क्सवादी दर्शनाची बांधिलकी काही तयार झाली नाही.

कामगारनेतेपण हा व्यवसाय होऊ लागला. जो पाच-दहा रुपये जास्त मिळवून देईल, त्याच्यामागे कामगार जाऊ लागले, कामगारक्रांतीच्या मार्गाने मानवजातीच्या मुक्तीचे स्वप्न पाहणाऱ्या कार्यकर्त्यांना सोडून. ही हकिकत आहे. ज्या देशात तथाकथित मार्क्सवादी राजवट आली तेथे घडून आलेले बदलही किरकोळ, भांडवलशाही व्यवस्थेचा हा नवा अवतार असे वाटावे अशा धर्तीचे. हे असे का झाले? मार्क्सने नैतिक प्रश्नावर मौन पाळले होते. कामगारांचे शोषण थांबवा, उपयोगमूल्य व विनिमयमूल्य यांतील तफावत रद्द करा अशी निव्वळ मागणीबहाद्दर भूमिका त्याने घेतली नव्हती. तरी त्याच्या आंदोलनाची नैतिक परिणती त्याला पाहिजे तशी झाली नाही. अर्थव्यवस्थेच्या बदलांतून अपेक्षित परिवर्तन घडून आले नाही.

नैतिकतेवर अर्थव्यवस्था आधारू पाहणाऱ्या महात्मा गाधींची शोकांतिका मार्क्सहूनही भयानक आहे. जगाच्या इतिहासात म. गांधींइतका कोणत्याही युगपुरुषाशी त्याच्याच शिष्यांनी द्रोह केला नसेल. गांधीवादाला अपेक्षित आर्थिक व्यवस्थेच्या नेमकी उलटी व्यवस्था त्यांच्या परमशिष्यांनी उभारू घातली. गांधीवादी नैतिकता त्यांच्या शिष्योत्तमांनीची उलथवली. महात्मा गांधींनी त्यांच्या -विचारात नैतिक बाजू कोठेही लंगडी ठेवली नव्हती; पण प्रत्यक्षात तिचा समाजजीवनावर काहीच परिणाम झाला नव्हता.

मार्क्सवाद्यांच्या क्रांतितत्त्वज्ञानात एक मोठी चूक वारंवार आढळते. शोषित शोषकांविरुद्ध लढा उभारतात, कमालीचे शोषण झाले की शोषित उफाळून क्रांती करतात, प्रस्थापित व्यवस्था उधळून देण्यास कंबर बांधतात असा काहीतरी विचार त्यांच्या मनात खोलवर रुजलेला असतो.

अगदी शरीरशास्त्राच्या दृष्टीनेसुद्धा ही कल्पना अवास्तव आहे. अतिशोषितांमध्ये उठण्याची ताकदच नसते. शोषणाच्या अगदी सुरवातीच्या पायरीत त्यांची प्रतिकारक्षमता खलास होते. प्रत्यक्षात शोषक क्रमांक एकविरुद्ध शोषक क्रमांक दोन आघाडी उघडतात



असे दिसते. शोषितांचे नाव घेऊन ते ही आघाडी उघडतात. उदाहरणार्थ, परदेशी भांडवलदाराविरुद्ध आघाडी स्थानिक भांडवलदार उघडतात- वरकरणी नाव मात्र गांधींच्या तत्त्वज्ञानाचे किंवा स्वदेशीचे किंवा शिवशाहीचे असते.

जनन्मान्य थोर विचारवंत, लोकधुरीणांच्या दर्शनाची ही शोकांतिका विचार करावयास लावणारी आहे.

पहिला प्रश्न निर्माण होतो तो हा, की या प्रेषितांनी आदर्श समाजाची पाहिलेली स्वप्ने योग्य होती का? तत्कालीन समाजातील समस्यांचे अचूक विश्लेषण त्यानी केले. ते दोष दूर केल्यानंतर ज्या आदर्श समाजाची निर्मिती होईल त्याचे मोठे मनोहारी चित्रण हर 'पैगंबराने' उभे केले. ॲरिस्टॉटल, प्लेटोपासून मार्क्स-गांधींपर्यंत प्रत्येकाने एक आदर्श समाजाचे लोभस चित्र लोकांसमोर ठेवले.

अतिरिक्त मूल्यांचे विश्लेषण मार्क्सने केले.तेवढ्या आधारावर कामगारक्रांतीची आणि वर्गहीन समाजाची स्वप्ने रंगवणे हे मार्क्ससारख्या प्रकांड बुद्धिवाद्याला कसे काय योग्य वाटले? अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या आदर्शांवर समग्र समाज उभा राहिल्याची कल्पना गांधींनी करणे कितपत वास्तववादी होते?

प्रत्येक छायाचित्राचा एक केंद्रबिंदू असतो. त्या बिंदूत प्रतिमा स्वच्छ आणि स्पष्ट दिसते. त्या बिंदूपासून जितके दूर जावे तितकी प्रतिमेची गुणवत्ता कमी होत जाते. प्रत्येक छोट्या-मोठ्या विचारवंतांच्या विचारपद्धतीचेही असेच असते. काही केंद्रबिंदूत त्यांना त्यांच्या काळाला व परिस्थितीला अनुरूप असा साक्षत्कार होतो. बुद्धिनिष्ठ सचोटी राखून आपला विचार तेवढ्यापुरताच मर्यादित ठेवावा हे आजपर्यंत थोराथोरांना जमलेले नाही. आपल्याला गवसलेल्या सत्यकणांच्या आधारे विश्वव्यापी पसाऱ्याला गवसणी घालण्याच्या मोहाला मोठमोठे बळी पडले आहेत. विश्वाला गवसणी घालण्याच्या प्रयत्नात त्यांनी स्वत:च्या पराभवाचा पाया घातला.

आपल्या विचाराचा भविष्यावर परिणाम काय होईल, याचे चित्रण करताना बुद्धिनिष्ठ कठोर तर्कशास्त्राला सोडून देण्याचा मोह त्यांना का पडला? अनुयायांना एक विशाल दर्शन देऊन, सर्वसंग परित्यागाला तयार करण्यासाठी? स्वप्ने विकण्याच्या धंद्यात ते का पडले हे सांगणे कठीण आहे.

मुळात आदर्श, सुखी, शांतिपूर्ण समाज ही कल्पनाच हास्यास्पद आहे. मनुष्यप्राणी संपूर्ण सुखी होऊच शकत नाही. कधी काळी तो असा सुखी झाला तर त्या कारणानेच तो दु:खी होईल. विरोधविकासवादाच्या जनकालासुद्धा परिपूर्ण समाजाचे स्वप्न रंगवावेसे

वाटले याचे आश्चर्य वाटते. समाज एका दोषास्पद अवस्थेतून दुसऱ्या दोषास्पद अवस्थेकडे जातो. जुने दोष समाजविकासाच्या आड येतात तेव्हा त्यांना दूर केले जाते. प्रयत्नांना वाचा हवी असते, ती वाचा पुरवण्याचे काम तत्कालीन पैगंबराकडे जाते.

मग प्रश्न निर्माण होतो तो हा, की परिवर्तनात थोर व्यक्तींनी नेमकी काय भूमिका बजावली? पैगंबराच्या विचारांच्या आधारे समाजपरिवर्तन घडून येते ही कल्पना पूर्णपणे भ्रामक आहे. रुसो, वॉल्टेअर यांच्या विचारांनी फ्रेंच राज्यक्रांती घडली नाही, मार्क्समुळे रशियन क्रांती घडली नाही, गांधीवादामुळे भारतातील स्वातंत्र्यचळवळ उभी राहिली नाही. समाज स्वत:च परिवर्तनाची दिशा ठरवत असतो, मार्गक्रमण करीत असतो. मार्गक्रमांचे समर्थन करणारा सोयीस्कर विचार आसपासच्या विचार-मंडीत शोधला जातो, आवश्यक तर उत्खनन करून काढला जातो. वाळवंटातील भटक्या टोळ्यांना इस्लाम-प्रसाराचे तत्त्वज्ञान सोयीस्कर होते. सर्व युरोप खंडात एकेकाळी प्रभुत्व असलेल्या; पण औद्योगिक विकासात मागे पडलेल्या रशियाला समाजवादी औद्योगिकीरणाचा विचार रुजणारा होता. इंग्रजांना हटवून त्यांची जागा पटकावू पाहणाऱ्या हिंदुस्थानातील नव्या व्यापारी, कारखानदारवर्गाला गांधी तत्त्वज्ञान सोयीस्कर होते. त्या त्या वेळच्या आर्थिक गरजांनी स्वत:साठी तत्त्वज्ञान निवडले. तत्त्वज्ञान्यांनी आर्थिक व्यवस्थेला गती दिली नाही.

रशियात मार्क्सवादाचा पराभव झाला, हे म्हणजे चूक आहे. गांधीवादही भारतात हरला नाही. मुळात या विचारांचा प्रयोग रशियात, भारतात झाला हे म्हणणे चूक आहे. या देशांत जे घडले त्याला मार्क्सवाद वा गांधीवाद अशी एक सोयीस्कर पाटी लावण्यात आली आहे. 'सुभाष केशकर्तनालया'चा सुभाषचंद्र बोसांशी जितका संबंध तितकाच या देशांतील घटनांचा मार्क्सशी व गांधींशी संबंध.

मार्क्सला सापडलेले सत्यकण हे स्थलकालसापेक्ष होते. अतिरिक्त मूल्याचा प्रमुख स्रोत कामगारांच्या शोषणात नाही, तिसऱ्या जगाच्या शोषणात आहे हे मार्क्सला समजले नव्हते असे नाही. साम्राज्यवादाच्या आर्थिक परिणामांचे तपशीलवार वर्णन त्याने दिले आहे. रोझा लुक्झेंबुर्गला तिसऱ्या जगातील लुटीचे भांडवलनिर्मितीच्या प्रक्रियेतील महत्त्व उमगले होते. मार्क्सला ते स्वच्छ दिसत असले पाहिजे; पण १९४८ च्या उठावाच्या अनुभवाने केवळ कामगारच क्रांती करू शकेल ही कल्पना मनात दृढ झालेली. त्या कामगारवर्गाला क्रांतीसाठी उद्युक्त करावयाचे तर त्यांच्याच शोषणातून अर्थशास्त्र उभारावयास पाहिजे. वर्गजाणिवेसारखी, तादात्म्यासारखी मार्क्सच्या जडवादात अजिबात



न सामावणारी कल्पनाही तयार करावी लागली. कोणत्याही व्यवस्थेच्या उत्पत्ति-स्थिती-लयाची मीमांसा करणाऱ्या मार्क्सलाच वर्गविहीन परिपूर्ण समाजाच्या स्वप्नांची भाकडकथा तयार करावी लागली. ती प्रत्यक्षात येण्याचा काहीच संभव नव्हता. इतिहासाला मार्क्सवर इतकी मेहेरनजर करण्याची काहीच आवश्यकता नव्हती.

भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे महात्माजी सरसेनापती होते. आर्थिकदृष्ट्या दुबळ्या, नि:शस्त्र, असंघटित जनांना बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध उभे करण्याचे प्रचंड काम त्यांनी घेतले. चंपारण्याच्या, बारडोलीच्या अनुभवांनंतर अस्पृश्य शेतमजुरांना, खेडुतांना चळवळीत गोवून घेतले पाहिजे हे ओळखणारा, चौरीचुरापासून 'करेंगे या मरेंगे' पर्यंत झेप घेणारा हा रणधुरंधर आंदोलनासाठी नवनव्या आघाड्या व फौजा तयार करण्याकरिता पारंपरिक नीतिकल्पना वापरत होता. त्यांतून पारंपरिक नैतिकतेवर आधारित असा समाज निर्माण होईल अशी महात्माजींची अपेक्षा असली तर शासनाचे नेतृत्व त्यांनी आधुनिकीकरणवादी पंडितजींकडे सोपवले असते किंवा नाही, याबद्दल जबरदस्त शंका घेण्यास जागा आहे.

विचारवंतांनी केलेल्या स्वप्नरंजनाची परिपूर्ती न झाल्यामुळे आरामखुर्चीत बसलेल्या विद्वानांना कितीही वेदना झाल्या तरीही काळपुरुषाला त्याची काही पर्वा वाटताना दिसत नाही.

''आपला तो बबड्या आणि लोकांचं ते कारटं'' या वृत्तीने महाराष्ट्राच्या इतिहासात काही आत्मकौतुकाचा भाग यावा हे समजण्यासारखे आहे. पुण्यातील पेशव्यांचा विश्रामबागवाडा पाहिला आणि त्याच्या दीडदोनशे वर्षे आधी दिल्लीश्वरांनी केलेली बांधकामे पाहिली म्हणजे सर्व देशाच्या इतिहासात पेशव्यांचे स्थान काय होते याबद्दलची वर्णने अवास्तव असावीत हे स्पष्टच होते. छत्रसाल, सूरजमल, जाट, हैदर, टिपू यांसारख्या इतर प्रदेशांतील पुरुषांच्या कार्यासंदर्भात मराठ्यांचा इतिहास लिहिला पाहिजे याची जाणीव होते. महाराष्ट्राचा इतिहास आत्मकौतुकाने भरलेला आहे आणि अवाजवीपणे आत्मकेंद्रीही आहे.

पण याहीपेक्षा एक फार मोठे कोडे इतिहास वाचताना मला पडते. देवगिरीचे एवढे बलाढ्य राज्य; पण मुसलमानी फौजा अगदी बिनधास्त गडाच्या पायथ्यापर्यंत येऊन पोचल्या कशा? महाराष्ट्राच्या मध्यकेंद्रापर्यंत पोचण्याच्या आधी या परकी सैन्याला वाटेवरच्या शेतकऱ्यांनी, जनसामान्यांनी काहीच विरोध केला नाही? त्यांना नेतृत्व नसले मिळाले तरी काय झाले? राजारामाच्या वेळी कोठे होते नेतृत्व? तरी उभा महाराष्ट्र जागोजाग

लढला. मग रामदेवरायाच्या वेळी का नाही तो उभा राहिला? बरे, शत्रूच्या फौजा किल्ल्यापाशी येऊन पोहोचल्यानंतर तरी वेढ्याच्या बाहेरच्या लोकांनी वेढ्याची कुतरओढ का नाही केली?

इतिहासात जागोजागी वाचावे लागते की रजपूत, मराठा सैन्य शिकस्तीने लढले, पण अखेरीस शत्रूच्या प्रचंड संख्याबळापुढे त्यांचे काही चालले नाही. मोगल हजारो मैलांवरून येथे आलेले. त्यांची संख्येची ताकद स्थानिक राजांच्या त्यांच्या स्वत:च्या प्रदेशातील ताकदीपेक्षा जास्त कशी राहिली?

हे कोडे अनेकांनी मांडले आहे. अगदी १८५३ मध्ये मार्क्सने एंगल्सला लिहिलेल्या पत्रात मांडले आहे. भारतातील गावगाड्याबद्दल तो लिहितो,

''खेड्यात राहणाऱ्यांना राज्ये फुटली-मोडली याचे काहीच सुखदु:ख नाही. खेड्याला धक्का लागला नाही, तर ते कोणत्या राजाकडे जाते, कोणत्या सुलतानाची त्यावर अधिसत्ता चालते याची त्यांना काहीच चिंता नसते, गावगाडा अबाधित चालत राहतो.''

'राधामाधवविलासचंपू'च्या प्रस्तावनेत हे कोडे वेगळ्या पद्धतीने राजवाड्यांनी मांडले आहे. हिंदू राजवटीतील महाराष्ट्राच्या संस्कृतीची व्याप्ती अत्यल्प ब्राह्मणांपुरती व उत्तरेकडील क्षत्रियांपुरती होती. बहुसंख्य नागवंशादी मराठे अत्यंत मागासलेले असून, त्यांत राष्ट्रभावनेचा उदय झालेला नसल्यामुळे ते अभिमानाने लढण्यास पुढे येऊ शकले नाहीत आणि त्यामुळे अल्पसंख्य आर्यक्षत्रियांचा पराभव होताच महाराष्ट्रात मुसलमानी राजवट आली. सेनापती पडताच सैरावैरा पळत सुटण्याच्या प्रवृत्तीची पानिपतच्या तिसऱ्या लढाईच्या संदर्भात राजवाड्यांनी मीमांसा केली आहे. त्यात 'अधम', 'पशुतुल्य', 'द्विपाद' इत्यादी विशेषणे वापरून राजवाडे म्हणतात, एक अन्नदाता गेला म्हणजे दुसऱ्याच्या शोधात हे पोटभरू ताबडतोब सुटत. 'महिकावतीची बखर' पुस्तकाच्या प्रस्तावनेत हा विचार त्यांनी अधिक स्पष्ट केला आहे.

''गेल्या तीन हजार वर्षांत हिंदुस्थानात जी देशी व परदेशी सरकारे होऊन गेली, ती सर्व एक प्रकारच्या पोटभरू चोरांची झाली व सरकार म्हणजे एक उपटसुंभ चोरांची टोळी आहे अशी हिंदू गावकऱ्यांची अंत:स्थ प्रामाणिक समजूत आहे.''

राष्ट्रवादी इतिहासकारांनी उदोउदो केलेल्या १८५७ च्या स्वातंत्र्यसमरातील बंडखोरांची सर्वसामान्य जनतेला किती धास्ती वाटत होती, याचे वर्णन इतिहासकाराचा अभिनिवेश नसलेल्या गोडसे भटजींनी आपल्या प्रवासवर्णनात सविस्तर केले आहे.

शूद्रातिशूद्रांचा राणा जोतिबा फुले यांनी मुसलमानी आक्रमणाला सरळ 'विमोचन'



असा शब्द वापरून गावातील सर्वसामान्यांची भावना व्यक्त केली आहे. इंग्रजांची राजवट आल्यानंतरही, ''सामाजिक प्रगतीला नि क्रांतीला प्रतिकूल ठरलेल्या ब्राह्मणी राज्यापेक्षा इंग्रज राज्य परवडले. नानासाहेब पेशवे यशस्वी झाले असते तर ब्रह्मणांचे जातिश्रेष्ठत्व मानणारे, अन्यायी नि प्रतिगामी ब्राह्मणी राज्य पुन्हा महाराष्ट्रात आले असते अशी त्यांना भीती वाटत होती.''

जोतिबांची भावना हीच देवगिरीच्या आसपासच्या कुणब्याशूद्रांची भावना असली पाहिजे. हीच भावना सर्वसाधारण प्रजेची त्यांच्या जवळच्या गढीत किंवा किल्ल्यावर राहणाऱ्या तथाकथित देशबांधव स्वधर्मीय सरदार-राजांबद्दल असली पाहिजे. रामदेवराय आणि अल्लाउद्दीन यांत फरक एवढाच की पहिला दरवर्षी उभी पिके हक्काने कापून नेई, तर दुसरा कधी तरी एकदा येणार. रामदेवरायाच्या पराभवात प्रजेला थोडे तरी सूडाचे समाधान मिळत असले पाहिजे. रामदेवरायाकडून लुटले जायचे का अल्लाउद्दिनाकडून असा आणि एवढाच पर्याय रयतेपुढे असेल तर परकीय लुटारूच्या रूपाने मोचकच आला अशी प्रजेची भावना का होऊ नये? शिवाय, दोन लुटारूंच्या लढाईत स्वत: मरण्यात त्याला का स्वारस्य वाटावे? बंदा बहादुराच्या व त्यानंतरच्या पंजाबमधील लढायांसंबंधी खुशवंतसिंग म्हणतात, ''शिखांकडून किंवा मराठ्यांकडून लुटून घ्यायचे का अब्दालीकडून एवढाच पर्याय पंजाबी शेतकऱ्यांसमोर असे आणि त्यातल्या त्यात मुसलमानांकडून लुटले जाणे हा सौम्य पर्याय वाटे.''

राष्ट्रवादी इतिहासकारांनी मध्ययुगातही राष्ट्र ही संकल्पना अस्तित्वात होती असे गृहीत धरले आहे; पण असे राष्ट्र त्यावेळी अस्तित्वात नव्हते. जोतिबांच्या वेळीही नव्हते. ''अठरा धान्यांची एकी होऊन त्याचे चरचरीत कडबोळे म्हणजे एकमय लोक (Nation) कसे होऊ शकेल?'' (*सार्वजनिक सत्यधर्म* - 'महात्मा फुले : समग्र वाङ्मय', संपादक धनंजय कीर व स.गं. मालशे, सुधारित तृतीयावृत्ती १९८८, पृ. ४२३)

आजपर्यंतच्या इतिहासाची खरी प्रेरणा ही शेतीमध्ये दरवर्षी एका दाण्याचे हजार दाणे होण्याचा जो गुणाकार होतो, तो लुटण्याची आहे. लुटण्याची वेगवेगळी साधने वापरली गेली. दरोडेखोरी, सैन्याची लूट, राजांचा महसूल, गुलामगिरी, वेठबिगारी, सावकारी, जमीनदारी. सर्व समाजाचा इतिहास हा शेतीला लुटण्याच्या साधनांच्या विकासाचा इतिहास असतो.

अशा प्रकारे आपण भिन्न क्षेत्रांतील स्वयंस्फूर्त कार्याचा एकूण आढावा घेतला तर त्या सर्वच क्षेत्रांमध्ये स्वयंस्फूर्त कार्याचा प्रयोग फसलेला आहे हे आपल्या लक्षात

येईल. असे असूनसुद्धा या क्षेत्रामध्ये अनेक लोक का शिरत असावेत? खूपदा ज्या स्वरूपाचे काम तथाकथित लाभार्थ्यांनाही नकोच असते, ज्या प्रकारच्या कार्यामध्ये स्वत:चेच व्यक्तिमत्त्व खुरटले जाते, त्या प्रकारच्या कार्यात ही मंडळी स्वत: का सामील होतात? खूपदा स्वयंस्फूर्त कार्य हा एक कधीही न संपणारा बोगदा असतो. अशा बोगद्यात ही मंडळी का उतरतात? आपण हे सगळे करतो आहोत हे कशासाठी, यातून काय निष्पन्न होणार आहे, हा विचारसुद्धा त्यांच्या डोक्यात का येत नाही? मुळात समाजसेवेचा हा विंचू त्यांना डसतोच का?

गेल्या वीस वर्षांत मी शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने सतत प्रवास करीत आहे. ठिकठिकाणी लोकांना भेटत आहे, चर्चा करत आहे. या सर्व प्रवासात स्वयंस्फूर्त क्षेत्रांतील असंख्य लहान-थोर नेत्यांना मी खूप जवळून पाहिले आहे. एखाद-दुसरा अपवाद वगळता, त्यांतल्या बहुतेकांविषयी माझ्या मनात कौतुकाची भावना उरलेली नाही.

यांतली बहुतेक मंडळी ही आपल्या शैक्षणिक, आर्थिक, व्यावसायिक जीवनात फारशी यशस्वी ठरलेली नाहीत, तरीही त्यांना असे वाटत असते, की आपण कोणीतरी खूप महान आहोत, आपली लायकी समाजाला पुरती कळलेली नाही. कसेही करून त्यांना प्रकाशात यायचे असते. (अशा प्रकारच्या सर्व विधानांना अपवाद नि:संशय असतात व यासंदर्भातही असे अपवाद निश्चितच आहेत, परंतु असे अपवाद वगळता, सर्वसाधारणत: माझी निरीक्षणे बरोबर आहेत असे मला वाटते.) अशा प्रकारचे स्वयंस्फूर्त कार्य करीत राहणे ही अशा मुळात सर्वसाधारण (Mediocre) असलेल्या काही मंडळींची गरजच असते. यामागे काही जैविक कारणेही आहेत. अशा कार्याद्वारे इतरांचे लक्ष स्वत:कडे वेधून घ्यायचा त्यांचा प्रयत्न असतो. दुबळे मूल किरकीर करून इतरांचे लक्ष स्वत:कडे वेधून घेत असते, तर गुटगुटीत मूल स्वभावत:च शांत, आत्ममग्न असते, ते स्वत:शीच खेळत असते, इतरांचे लक्ष वेधून घ्यायची त्याला फारशी गरज वाटत नाही.

अशा स्वयंसेवी कार्यकर्त्यांची नम्रता ही वरकरणी असते. आतून ही मंडळी अतिशय अहंकारी व महत्त्वाकांक्षी असतात. आपले कार्यक्षेत्र निवडतानासुद्धा स्वत:ला जास्तीत जास्त प्रसिद्धी व लोकमान्यता मिळेल असेच क्षेत्र ते निवडतात. आपल्या लौकिक जीवनात ही मंडळी फारशी यशस्वी नसतात. नोकरीधंद्यात अयशस्वी ठरलेली असतात. खूपदा आपल्या कौटुंबिक जीवनातही ती दु:खी असतात. नियतीची यांना कुठे ना कुठे जोरदार ठोकर बसलेली असते आणि सामान्यत: अशीच मंडळी आपल्याला समाजकार्याकडे वळताना आढळतील. एकेकाळी कविता करणे वा कथा लिहिणे हे



लोकमान्यता मिळवण्याचे सोपे माध्यम होते. आजकाल स्वयंस्फूर्त क्षेत्र हे असे माध्यम बनले आहे.

परोपकार ही एक चटकन चढणारी दारू आहे. सॉमरसेट मॉम हा माझा एक अतिशय आवडता लेखक. त्याने लिहिलेली एक छोटीशी कथा गंमतीदार आहे. एकदा येशू ख्रिस्ताला सैतान भेटतो. ख्रिस्ताने मोहाला बळी पडावे यासाठी तो अनेक लोभ दाखवतो. सोने-नाणे, पैसा-अडका, जमीन-जुमला इत्यादी; पण येशू ख्रिस्त कशालाच बळी पडत नाही. शेवटी सैतान त्याला म्हणतो, की पृथ्वीवर जाऊन सर्व मानवजातीचा उद्धार करण्याची संधी मी तुला देतो. हे प्रलोभन काही ख्रिस्ताला टाळता येत नाही!

दुसऱ्याचा उद्धार करण्यातली झिंग ही काही और असते. बऱ्याच स्वयंस्फूर्त कार्यकर्त्यांमध्ये मला एक आत्मकौतुकी Narcisist भावना आढळते, स्वत:वरच ते कमालीचे खूष असतात. वरवर जरी त्यांनी आपण हे सर्व इतरांसाठी करतो असा आव आणला, तरी प्रत्यक्षातमात्र आपल्या तेजोवलयात इतरांना सामील करून घ्यायची त्यांची अजिबात तयारी नसते. समाजहितापेक्षा आपल्या संस्थेची महती, प्रॉपर्टी व एकूण स्थान कसे उंचावेल याच्यावरतीच त्यांचे जास्त लक्ष असते. तुम्ही यांच्या विविध संस्थांची Trust deeds एकवार बघा. यातल्या बहुतेक जणांनी Trustee म्हणून आपणच तहहयात राहू याची तजवीज करून ठेवलेली असते. बाहेर यांनी लोकशाही मूल्यांचा कितीही गवगवा केला तरी स्वत:च्या संस्थामात्र ते 'हम करे सो कायदा' याच भूमिकेतून चालवीत असतात.

या मंडळीमध्ये एक गुणमात्र असतो. ही मंडळी बोलण्यात मोठी चतुर असतात. इकडी तिकडली वाचलेली दोनचार Quotations फेकून विद्वत्तेचा आभास निर्माण करण्याची कला त्यांना चांगली अवगत झालेली असते. यांच्या संस्था म्हणजे यांचे व्यक्तिगत साम्राज्यच असते. यांच्या वागण्यातल्या विसंगतीला तर काही सीमाच नसते. वरवर गरिबांचा कळवळा दाखवणारी ही मंडळी स्वत:मात्र चैनीत जगत असतात. अन्य जीवनक्षेत्रांत त्यांना मिळू शकले असते त्यापेक्षा जास्त उत्पन्न ही मंडळी या तथाकथित स्वयंस्फूर्त क्षेत्रातून स्वत:साठी काढीत असतात. चर्चेत परकीयांना, विशेषत: अमेरिकेला, सतत दोष देणारी ही मंडळी आपल्या संस्थेला मदत मिळावी म्हणूनमात्र सतत अमेरिकेपुढे झोळी पसरत असतात. वरकरणी ज्या उच्चभ्रूंना ते नावे ठेवतात त्यांच्यासारखेच जगायचा आतून ते प्रयत्न करत असतात. ही कार्यकर्ती मंडळी कमालीची मत्सरग्रस्त असतात. सर्व यशस्वी माणसांना 'लब्धप्रतिष्ठित' म्हणून हिणवायला त्यांना आवडते. आपण तेवढे

तत्त्वनिष्ठ आणि बाकीचे सारे भ्रष्ट अशी त्यांची ठाम धारणा असते. दुर्दैवाने- समाजही अशा लोकांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देत असतो.

या सर्व समाजकार्यकर्त्यांची एक प्रतिमा, एक ढाचा तयार होतो व या क्षेत्रात नव्याने येणारी सर्व मंडळी आपापली मॉडेल्स ठरवून त्यांचे अनुकरण करीत असतात. आज दुपारीच मी सहज टी.व्ही. लावला तेव्हा टी.व्ही.वर एक हिंदी चित्रपट चालला होता. गंमत म्हणून मी तो थोडावेळ बघत होतो. त्यात एक अशीच कार्यकर्ती तरुणी दाखवली होती. तिचे नाव होते मेधा दीक्षित. मेधा पाटकर व राजीव दीक्षित या आजकाल प्रकाशझोतात असणाऱ्या दोन कार्यकर्त्यांवरून घेतलेले !

अशा या कार्यकर्त्यांचा व्यासंग अजिबात नसतो. त्यांचे सगळे ज्ञान हे एक प्रकारचे पॅचवर्क असते- थोडे इकडून घेतलेले, थोडे तिकडून घेतलेले. मला आश्चर्य वाटते, की समाजातील जे प्रश्न सोडण्यासाठी ते झटत असतात, निदान त्यांचा वरकरणी तसा दावा तरी असतो, ते प्रश्न मुळात कसे निर्माण होतात याचा त्यांनी फारसा अभ्यास केलेलाच नसतो. तसे पाहायला गेले तर या बहुतेक सर्व समस्यांचे मूळ गरिबीत आहे व गरिबीचे मूळ आहे शेतीच्या दुर्दशेत.

जगातील पहिला व्यवसाय शेती हा आहे. प्रकृती आणि मनुष्य एकत्र आल्यानंतर तो निर्माण झाला. उपभोग्य वस्तूंचा गुणाकार करणारा, एका दाण्याचे हजार दाणे करणारा, हा एकमेव व्यवसाय. व्यापार, वाहतूक, कारखानदारी यांसारख्या अन्य कुठल्याही व्यवसायात हे घडत नाही. तिथे फक्त वस्तूंची देवाण-घेवाण होते, देवघेवीच्या मूल्याची (Exchange Value) वृद्धी होते. समाजाचा इतिहास हा या शेतीतील गुणाकाराच्या वाटपाचा-बहुतेकदा लुटीचाच- इतिहास आहे. शेतीमालाला जोपर्यंत योग्य भाव मिळत नाही तोपर्यंत आपल्यापुढचे कुठलेही प्रश्न सुटणे शक्य नाही, अशी माझी धारणा आहे. उदाहरणार्थ, आपल्या शहरांतील भीषण बकालपणा, झोपडपट्टी, प्रदूषण, गलीच्छपणा हे प्रश्न घ्या. शहरांची इतकी अफाट वाढ का होते? फुटपाथवरसुद्धा पथारी पसरायला जागा नाही, अपुरा वीजपुरवठा, पाण्याचे हाल, सगळीकडे पसरलेली घाण असे सगळे वास्तव असूनसुद्धा लाखो माणसे शहरांमध्ये एकएक दिवस रेटत राहतात; एवढेच नव्हे तर दरोज त्यांत हजारोंची भर पडत असते. असे का? याचे एकमेव कारण म्हणजे शहरांतले हे गलीच्छ जीवन कितीही हालांचे असले तरी शेतीवरच्या उपासमारीपेक्षा ते परवडले असा शास्त्रशुद्ध विचार करूनच रोज हजारो नवे लोक ते शहरी जिणे पत्करतात. शेतीतील उत्पन्न वाढविल्याशिवाय शहरांकडे येणारा त्यांचा लोंढा थांबवताच येणार नाही.



शेतीमालाला योग्य भाव मिळाल्याशिवाय नागरी जीवनाचे कुठलेच प्रश्न सुटणे शक्य नाही.

स्वयंस्फूर्त कार्य करणाऱ्यांमध्ये ही व्यापक जाणीव मला कधीच आढळलेली नाही. प्रत्येकजण आपापल्या वीतभर क्षितिजात बुडलेला.

बरेचसे स्वयंस्फूर्त कार्य हे राष्ट्रावर कारगिलसारखी एखादी आपत्ती ओढवली की सुरू होते; परंतु अशा कार्यातला उत्साह व त्यातील पावित्र्य हे अल्पजीवी असते हे इतिहासाची पाने चाळली की लक्षात येते.

१९६२ मध्ये चीनशी युद्धाचा प्रसंग आला. गाठ बलाढ्य शत्रूशी होती. सर्वच बाबतीत आपण कमी पडत होतो. तरीदेखील हिमालयाच्या रक्षणासाठी सारा देश एकत्र झाला. बायाबापड्यांनीदेखील सैन्यातील जवानांच्या मदतीसाठी अंगावरचे दागदागिने उतरवून देऊन ढीग घातले. सुदैवाने, ती सारी लढाई २१ दिवसच चालली. चीनने आपले सैन्य एकतर्फी काढून घेतले नसते, चिनी सैन्य हिमालयातून खाली उतरून गंगायमुनेच्या खोऱ्यात उतरले असते आणि साऱ्या सीमा खरोखरच इंचाइंचाने लढवण्याची वेळ आली असती तर भारतीयांचा उत्साह किती दिवस टिकून राहिला असता याबद्दल मोठी शंका आहे.

किल्लारी भूकंप झाला. मृत्यूच्या तांडवाने थैमान घातले.साऱ्या देशातून आणि जगभरातून मदतीचे पूर लोटले. साऱ्या लोकांनी ज्या तत्परतेने मदतीसाठी धाव घेतली आणि जिवाची बाजी लावली त्याचे सर्वत्र मोठे कौतुक होऊ लागले; पण कौतुकाच्या शब्दांचे ध्वनिप्रतिध्वनी विरतात न विरतात तोच दगडामातीच्या ढिगाऱ्यात पडलेल्या प्रेतांच्या अंगावरचे दागिने काढून नेण्यासाठी भुरटे चोरटे हल्ले करू लागल्याच्या आणि त्यांत पोलिसही सामील झाल्याच्या बातम्या येऊ लागल्या. परदेशांतून मदतीच्या रूपाने आलेले कपडे, अन्नधान्याचे डबे मान्यवर पुढाऱ्यांच्या कुटुंबियांची आणि दोस्त मंडळींची शरीरे आणि घरे सजवू लागले. नेते मंडळींनी कोट्यवधींची माया जमा केल्याची खुलेआम चर्चा होऊ लागली.

अलिकडे येऊन गेलेल्या सुनामीच्या लाटेने सर्वदूर विध्वंस झाला. स्वयंसेवी संघटनांचे आयतेच फावले. मुंबईत आलेल्या अलीकडच्या पुरातही हाच अनुभव. प्रत्येक मृतामागे काही ठोक रक्कम नुकसानभरपाई म्हणून मिळते म्हटल्यावर, आपत्तीच्या आधी मृत झालेल्यांचीही नावे नुकसानभरपाईच्या यादीत घातली गेली.

सुनामीच्या बाबतीत तर एक प्रकरण सांगण्यासारखे आहे. सुनामीची लाट आली त्याआधी तमीळनाडूच्या समुद्रकिनाऱ्यावरील मच्छीमारांची हालत मोठी दयनीय झाली होती. मच्छीमारीच्या यांत्रिक बोटींशी स्पर्धा करता येत नसल्याने छोट्या होड्यांचे कोळी मच्छीमारीच्या धंद्यातून दूर कसे होता येईल याची चिंता करीत होते. त्यांना सुनामी ही इष्टापत्तीच वाटली. आता नवीन व्यवसाय करता येईल, नुकसानभरपाईदाखल काही रक्कम मिळाली तर त्याचा नवीन व्यवसायात प्राथमिक भांडवल म्हणून उपयोग होईल, असा विचार ते करीत होते. पण, सुनामीनंतर प्रेतांची वासलात लावल्यावर, हवा श्वसनीय झाल्यावर स्वयंसेवी संघटनांची लाट येऊन आदळली. जी ती संघटना कोळ्यांना मच्छीमारीच्या नव्या बोटी देण्याच्या धांदलीत. परदेशातील नावा बांधणाऱ्यांचा धंदा बुडीत आला होता, त्यांचा जुना साठा साफ झाला आणि तामीळनाडू व केरळ येथील मच्छीमार पुन्हा एकदा बोटी आहेत; पण पकडायला मासे नाहीत, म्हणून समुद्रात खोलवर जाऊन शेजारी राष्ट्रांचे कैदी बनू लागले. स्वयंसेवी संस्थांचे सुनामीपूर्व आणि सुनाम्योत्तर ताळेबंद पाहिले तर स्वयंसेवी संघटनांच्या उदात्त आणि निःस्वार्थ कार्याचा बुरखा टरटरा फाटून जातो.

कुटुंबावर, गावावर, समाजावर, जातीवर, धर्मावर, देशावर संकट कोसळताच माणसांमध्ये एका चैतन्याचा संचार होतो. 'Wealth of Nation' प्रसिद्ध ॲडम स्मिथने तुलनेने अप्रसिद्ध 'Theory of Moral Sentiments' मध्ये या चेतनेचे विश्लेषण केले आहे. त्या चैतन्याच्या भरात माणसे अद्भुत कामे करून जातात; पण हे चैतन्य आणि त्यासाठी करायच्या कष्टांची आणि बलिदानाची तिरीमिरी अल्पजीवी असते.

आपत्ती ओढवली असता वाटेल त्या त्यागास, बलिदानास तयार करणारे चैतन्य ही एक प्रकारची उन्मादावस्था असते; मनुष्यप्राणी आणि समाज यांच्या जीवनाचा तो स्थायीभाव असू शकत नाही. सर्वसामान्य माणसांना जगायचे असते, आयुष्याचा अनुभव घ्यायचा असतो, सुखांचा उपभोग घ्यायचा असतो. अशा सुफल आयुष्याची शक्यता जिवंत राहावी यासाठी, आवश्यक पडल्यास, संकटकाळी तो सर्व हिशेब बाजूला ठेवून स्वत:ला झोकून देण्यास तयार होतो. बेफाम उन्मत्त चैतन्याचा हा अनुभव मोठा स्फूर्तीचा स्रोत असतो. पण, असे चैतन्य आणि बलिदान ही जीवनशैली होऊ शकत नाही.

दुर्दैवाची गोष्ट अशी, की बहुतेक हुकुमशहांना आणि अनेक क्षुद्रवादी नेत्यांना आपत्कालीन चैतन्य हाच माणसांचा आणि समाजाचा सतत टिकणारा स्थायीभाव असावा असे वाटते. ज्या देशांत लोकांना आपल्या राष्ट्राविषयी प्रेम अधिक, राष्ट्रासाठी



त्याग करण्याची जेथे तयारी अधिक, ते देश प्रगती करतात असा त्यांचा विश्वास असतो. राष्ट्रप्रेमाची निर्मिती हा अशा मंडळींच्या मते, देशाच्या थोरवीचा एकमेव मार्ग असतो. राष्ट्र, धर्म, जाती, इतिहास, पूर्वजांची थोरवी आणि त्याहीपेक्षा दुसऱ्या एखाद्या जाती-जमात-राष्ट्राचा विद्वेष अशा गोष्टींच्या आधारे माणसाच्या आणि समाजाच्या अस्मितेला गोंजारले, त्यांच्या अहंकाराला जोपासले की त्यातून निर्माण होणारे चैतन्य हीच विकासाची खरी ऊर्जा अशा भावनेपोटीच इतिहासभर अनेक प्रसिद्ध पुरुषांनी राष्ट्रभावनांना हाक घातली. प्रचंड युद्धे घडवून आणली, लक्षावधींच्या कत्तली केल्या, मुलूखच्या मुलूख बेचिराख केले; पण एकालाही सतत, धीमेपणे, पावलापावलाने का होईना, प्रगती करणारे समाज तयार करता आले नाहीत.

मी जरी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतीचा प्रश्न मांडत आलो असलो, तरी शेतीचा प्रश्न मी एका दरवाज्याची किल्ली म्हणून वापरला आहे; शेतीमालाच्या भावाचे तत्त्वज्ञान हे प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र करण्याची गुरुकिल्ली म्हणून मी वापरले आहे. मी मुळात स्वातंत्र्याचा भोक्ता आहे. गरिबीचे नाव घ्यायचे, गरिबी हटवायची म्हणायचे आणि गरिबी-निर्मूलनाचे वेगवेगळे कार्यक्रम काढून आपलेच खिसे भरून घ्यायचे हे मी केले नाही.

मी माझा विचार मांडत असताना माझी निळी जीन सोडायला तयार नाही. सुरुवातीच्या काळात शेतकरी संघटनेच्या सभेत प्रास्ताविक करणारे सांगत, "शरद जोशी परदेशात होते. इतका पगार मिळत होता. ते सगळं सोडून शेतकऱ्यांची कीव आली म्हणून ते हिंदुस्थानात परत आले." पहिल्या सभेपासून मी भाषणाच्या आरंभीच सांगत होतो, "मी करुणेच्या पोटी आलेलो नाही. मी सत्यशोधनाकरिता आलेलो आहे आणि या कामात आनंद मिळतो म्हणून काम करतो आहे. हा आनंद जोपर्यंत वाटणार आहे तोपर्यंत मी काम करणार आहे."

एका माणसाने दुसऱ्याकरिता करुणेपोटी काम करावे हे दोघांनाही घातक आहे, असे मी मानतो. मी जर का सुरुवातीलाच डोळ्यांतून पाण्याचे चार थेंब गाळीत मांडणी केली असती तर, माझी खात्री आहे, मी आतापर्यंत 'महात्मा' पदवीला पोहोचलो असतो; पण हे मी जाणीवपूर्वक टाळत आलो. एवढेच नव्हे तर, शेतकरी समाजाचे पूज्य संत ज्ञानेश्वर, तुकाराम या दोघांच्या विरुद्धची शिकवण आम्ही आमच्या शिबिरांत देतो. कारण, समाजाला एका विवेकाच्या पायरीवर आणून ठेवायचे आहे. त्यामुळे, कोणतीही तडजोड आम्ही स्वीकारत नाही.

अशी आम्ही गद्य माणसे असल्यामुळे, नानासाहेब गोरे म्हणाले त्याप्रमाणे, आमच्याकडे कवि माणसे वळत नाहीत, तयार होत नाहीत.

मी शेतकरी जीवनाचे उदात्तीकरण करण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. काय ते खेड्यातले जीवन, काय ती हिरवी झाडे, काय ती स्वच्छ हवा, कसे ते झुळझुळ झुळझुळ वाहणारे पाणी, शेतावर असणे म्हणजेच परमेश्वराच्या सान्निध्यात असणे वगैरे सांगण्याचा वाह्यातपणा मी काही केला नाही.

शेतकरी असणे ही एक जीवनपद्धती आहे. इतिहासाच्या एका ठरावीक काळामध्ये तिचे महत्त्व होते; पण पुढे, जितकी माणसे शेतीतून निघून बिगरशेती व्यवसायाकडे वळतील तितका त्या समाजाचा विकास आहे. फक्त, शेतकऱ्यांनी उत्पन्न केलेले बरकड मूल्य लुटून नेणारे, शेतकऱ्यांची संपदा लुटून नेतात आणि शेतकऱ्याला मागे ठेवतात. स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांतील महत्त्वाची आकडेवारी कोणती? शेतीवरील लोकसंख्या जवळजवळ कायम - ७४ ऐवजी ७० %- आहे; आणि शेतीचा राष्ट्रीय उत्पादनातील हिस्सा मात्र ६४ % वरून आज २३ % वर आला आहे. शेतीतील मालमत्ता बाहेर घेऊन जायची आणि माणसे तिथेच ठेवायची, हे होऊ नये, हे इतिहासाच्या विरुद्ध आहे, हे निसर्गाच्या विकासाच्या सिद्धांताच्या विरुद्ध आहे अशी मांडणी आम्ही करत आलो.

सर्व सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये एक Don Quixote लपलेला असतो, एक स्वप्नरंजन असते, प्रत्यक्षात न जमलेले भव्य दिव्य असे काही तरी आपण करत असतो. अशी छुपी आत्मवंचना असते. वेळोवेळी असे अनेक Don Quixote माझ्या स्वत:च्या मनामध्येही निर्माण झालेले आहेत. कधी कधी मी स्वत:ला सॉमरसेट मॉमच्या The moon and six pence या कांदबरीतील Stock broker नायकाच्या जागी कल्पिलेले आहे. तर कधीकधी मी शरदबाबूंच्या *सव्यसाची* मधील डॉक्टर बनलो आहे. कधी कधी मी स्वत:ला एखाद्या आध्यात्मिक प्रेषिताच्या जागी कल्पिलेले आहे. या सगळ्या अनुभवांतून मी स्वत: गेलेलो असल्या कारणाने स्वयंस्फूर्त क्षेत्रातील कार्यकर्त्यांमधला Don Quixote मला लगेच ओळखू येतो.

मला वाटते, माणसाची खरी प्रगती अगदी वेगळ्या कारणांतून होत असते. इतिहासाचा प्रवाह ही भिंत पाडण्याकडे आहे; परंतु समाज मान्यता देतो ती मात्र भिंती उभारणाऱ्यांना. मग ती भिंत राष्ट्राची असो, धर्माची असो, जातीची असो की भाषेची. तैमूरलंग, चेंगीझखान, औरंगजेब, नादीर शाह यांना आपण क्रूरकर्मा ठरवले आहे; पण त्यांनी जगभर केलेल्या स्वाऱ्यांमुळे भिंती पाडण्याच्या या ऐतिहासिक विकासप्रक्रियेला [illegible]



मोठी चालना मिळाली. कोलंबसने अमेरिका शोधली तीदेखील तिथल्या लोकांचा उद्धार करण्यासाठी नव्हे. तर व्यापारातून होणारा फायदा वाढावा म्हणून. Cupidity often brings greater benefits than greatness (महानतेपेक्षा खूपदा स्वार्थातून माणसाचा जास्त फायदा होतो.)

आपण सर्व 'युद्ध नको, युद्ध नको' असे म्हणत असतो; पण या युद्धामुळेच विकासाला सर्वांत जास्त चालना मिळाली आहे असे समाज सांगतो. सगळे जग जवळ आणणारे आजचे Computers, Internet किंवा अन्य सेटेलाईट कम्युनिकेशन किंवा अगदी विमाने हीसुद्धा युद्धासाठी केलेल्या प्रयत्नांतूनच झालेली निर्मिती आहे. तुमच्यातील जे सर्वोत्कृष्ट असते ते युद्धप्रसंगी नेहमीच उफाळून येते. War brings out the best in men.

खूपदा माझ्याकडे अनेक तरुण मंडळी, 'आम्हाला शेतकऱ्यांची सेवा करायची आहे,' असे म्हणत येतात. शेतीमालावर प्रक्रिया करण्याचे वगैरे उद्योगधंदे त्यांना सुरू करायचे असतात. "आम्हांला स्वत:ला याच्यातून काही नकोय," असा त्यांचा दावा असतो. पुन्हा एकदा तीच 'आर्तिनाशनम्'ची भाषा !

मला अशा लोकांची खूप भीती वाटते. मी त्यांना म्हणतो, "तुम्ही शेतकऱ्यांच्या भल्यासाठी म्हणून काही करू नका. तुम्हांला जे काही करायचे असेल ते स्वत:च्या भल्यासाठी करा.' दुसऱ्याचे भले करायला निघालेली मंडळी जवळ आली, की माझी आवडती लेखिका आयन रॅन्ड हिच्या शब्दांत सांगायचे तर, "Laper's bells start ringing"

मी 'युनायटेड नेशन्स' मधली नोकरी सोडून येथे आलो त्याचे कारण माझी बुद्धिनिष्ठा हे आहे. गरिबीचा उगम नेमका कुठे आहे, याचा मला शोध घ्यायचा होता. स्वत:च्या शेतात राबता राबता मला त्याचा शोध लागला. शेतावरून उठलो ते थेट कांद्याच्या आंदोलनाला बसलो. अंगावरची जीन्स काढून खादीचा कुडता-पायजमा चढवण्याइतकी फुरसतही मला तेव्हा नव्हती. मागे परतायचे सगळे रस्ते, सगळे बंध मी तोडून टाकले, 'शेतीमालाला रास्त भाव मिळायला हवा' या एकमेव कामासाठी स्वत:ला झोकून दिले.

Nothing is sweeter than the smell of the burnt bridges असे म्हणत त्याचा मी गेली वीस वर्षे अनुभव घेतो आहे.

ॲडम स्मिथचे The wealth of nations हे माझे आवडते पुस्तक आहे. भांडवलशाहीचा पाया या पुस्तकाने घातला; पण याच लेखकाने नंतर Theory of

moral snetiments ही देखील मांडली. तिच्यावरही माझा विश्वास आहे. इतरांसाठी काहीतरी करावे, हीदेखील स्वार्थाप्रमाणेच एक मूलभूत मानवी प्रेरणा आहे, असे मी मानतो. आपल्या भोवतालच्या दु:खी माणसाच्या जागी स्वत:ला कल्पणे, त्यातून त्याच्या दु:खांची अनुभूती घेणे आणि ते दु:ख दूर करण्याचा प्रयत्न करणे हीदेखील एक मानवी प्रेरणा आहे हे मला मान्य आहे. ॲडम स्मिथच्या enlightened self-interest मुळे जगात हाहाकार उडणार नाही याचे कारण moral sentiments या मध्ये आहे. परंतु याचा आणि आजच्या स्वयंस्फूर्त कार्याचा काहीही संबंध नाही.

आजवरच्या सामाजिक इतिहासाचा आपण जर आढावा घेतला तर आपल्या लक्षात येईल, की ज्या प्रकारचा विकास या कार्यातून घडायला हवा, त्या प्रकारचा विकास या कार्यातून कधीही साधला जाणे शक्य नाही. विकासामागच्या प्रेरणा या अगदी वेगळ्या असतात. या देशातील जे स्वयंस्फूर्त कार्य गेल्या वीस-पंचवीस वर्षांत मी बघितले, त्यावरून माझे अशा कार्याविषयीचे मत प्रतिकूल बनले आहे. कार्यकर्त्यांचा छुपा पण प्रखर अहंकार, त्यांची ढोंगबाजी, त्यांची नाटके, सेवेच्या बुरख्याखाली स्वत:ची सोय पाहत राहणे, त्यांच्यातले हेवेदावे, त्यांच्यातील व्यासंगाचा अभाव, मूळ प्रश्न टाळून उगाचच काहीतरी छोटेसे पॅच वर्क स्वरूपाचे काम करीत राहण्याची आत्ममग्न प्रवृत्ती हे सगळे विचारात घेता, अशा स्वरूपाच्या कामाची समाजाला काहीही आवश्यकता नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. मी एक पराकोटीचा व्यक्तिवादी, individualist माणूस आहे. व्यक्ती हेच विचाराचे केंद्र आहे, समाजाचे केंद्र आहे, निर्मितीचे केंद्र आहे. व्यक्तीची काळजी घेतली तर समाजाची काळजी घ्यायची काहीही आवश्यकता नाही.

समाजसेवेच्या प्रेरणा कितपत विशुद्ध आहेत, याचा कस लावण्यासाठी एक साधी कसोटी आहे. जो एक विशेष प्रश्न सोडवण्याचा आविर्भाव असतो, त्या प्रश्नाच्या मुळावर घाव घातला आणि तो प्रश्नच संपवून टाकला, तर त्या कामातल्या कार्यकर्त्यांची प्रतिक्रिया काय असेल? कामगारचळवळींनी वारंवार पगार वाढले, बोनस वाढले, सवलती वाढल्या तरी कामगारांची 'नाही रे' ही परिस्थिती कायमच राहणार. समाजवाद्यांनी कामगारांच्या शोषणाचा प्रश्न हाताळण्याची पद्धत अशी काढली, की कामगारांचे शोषण चालूच राहावे. गरीबीच राहणार नाही असे म्हटले तर समाजवादी अशी शक्यताच नाकारतील. फार तर, क्रांतीनंतर 'नाही रे'च्या हुकूमशाहीतच मालमत्तेच्या हक्काचे संबंध उलथेपालथे झाल्यानंतर गरिबी संपू शकेल, असा ते वितंडवाद घालतील; पण, 'नाही रे'च्या हुकूमशाहीपेक्षा त्यांना 'आहे रे' बनवून 'आहे रे'ची लोकशाही तयार होण्याची शक्यता ते मुळात फेटाळून



लावतील.

गावागावांत आरोग्यसेवा नाहीत, त्यासाठी गावोगावी दाईसुईणींचे जाळे तयार करण्याच्या व्यापक योजना मांडणारे अनेक महाभाग मला भेटले आहेत. या पंचवीस वर्षांत, अगदी बाजाराच्या गावीसुद्धा, दहावीस एमडी/एमएस डॉक्टर, दंतवैद्य, नेत्रतज्ज्ञ, पॅथलॉजिस्ट यांची गर्दी उसळली आहे. गंमत अशी, की अजूनही हे महाभाग आपापल्या संस्थांचे देशीपरदेशी परिसंवाद भरवीत असतात. आपण हाती घेतलेला प्रश्न व्यावहारिक भविष्यकाळात तरी सुटणे शक्य नाही, अशा गृहीत तत्त्वावर बहुतेक स्वयंसेवी संघटना चालतात. तो प्रश्न नाहीसा झाला, तरी त्यांच्या सेवांची गरज संपलेली नाही, उलट त्यांच्या सेवेला एक नवीन परिमीती लाभली आहे, असे ते आग्रहाने मांडतात.

एके काळी कुष्ठरोग ही एक महाभयंकर समस्या होती. महात्मा गांधींनी कुष्टरोग्यांची सेवा करण्याचे काम सुरू केले, त्यातून अनेकांनी स्फूर्ती घेतली; आपापले आश्रम, नगरे, वने स्थापली. उदंड सरकारी आणि खाजगी निधी मिळवले; पण, कुष्ठरोग मुळातूनच नष्ट करण्यासाठी लागणारे संशोधनाचे कार्य कोणी हाती घेतले नाही. कोण्या अनामिक संशोधकाने ते केले. त्यामुळे कुष्ठरोग आता साध्य बनला. त्याची किळसही फारशी राहिली नाही; पण, तरी त्यांच्या सेवेचे व्रत घेतलेल्या महात्म्यांच्या धुपारत्याशेजारत्या चालूच आहेत. कुष्ठरोग संपला तर दुसऱ्या कोणाच्या सेवेचे काम घेऊ! कोणा दुष्टाने हा कुष्ठरोग संपवला कोण जाणे! पण, त्यामुळे आमच्या विभूतीतील ज्वाला आणि फुले संपली नाहीत, असा त्यांचा निर्धार आहे.

अलीकडे स्वयंसेवी संस्थांना एक नवे कुरण सापडले आहे, ते एड्स रोगाशी सामना करण्याचे. सरकार या कामासाठी करोडोंनी रुपये वाटत आहे. भंडारा जिल्ह्यातील एक जुना कार्यकर्ता अलीकडे मला भेटला होता. तो आता स्वयंसेवी संस्थांच्या बरकतीच्या धंद्यात बस्तान मांडून आहे. अलीकडेच त्याला एड्ससंबंधी एक मोठा सरकारी प्रकल्प मिळाल्याचे त्याने मला मोठ्या आनंदाने सांगितले, मी त्याचे कौतुकही केले. परंतु माझ्या मनातील शंकाही मी त्याला सांगितली. लोकसंख्या आटोक्यात राहावी यासाठी कुटुंबनियोजनाच्या झेंड्याखाली गर्भांचा आईच्या पोटातच नाश केला जातो. याउलट, म्हाताऱ्यांना मात्र अत्याधुनिक लाईफ सपोर्ट सिस्टिम वापरूनही जिवंत ठेवण्याचा आटापिटा चालतो. वृद्धांना समाजात आदराचे स्थान दिले गेले पाहिजे, त्यांना पूर्वीच्या काळाप्रमाणे 'काशीमरणा'साठी सोडून चालणार नाही हे मान्य आहे. पण लोकसंख्यानियंत्रणासाठी जो जन्माला येईल, त्याला अखेरपर्यंत समाजाने खाऊ घालावे,

शिकवावे, कामधंद्यास लावावे आणि शेवटपर्यंत वैद्यकीय सेवा पुरवावी, याचे ओझे समाजासच पेलणार नाही.

एड्सची लागण झालेल्यात अनेक शुद्ध चारित्र्याचे लोकही आहेत. रक्तपेढ्यांच्या, दंतवैद्याच्या किंवा डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे HIV पॉझिटिव्ह झालेल्यांची संख्याही कमी नाही. पण तरीही, एका बाजूने अंकुरत्या गर्भाची सरसहा कत्तल करावी आणि दुसऱ्या बाजूला स्वत:च्या बदचलनाने रोग ओढवून घेण्याऱ्या लोकांना कोट्यवधी रुपये खर्चून आटापिटीने जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करावा, हे तर्कशास्त्र मला काही समजेना. मी त्या कार्यकर्त्याला जुन्या ओळखीचा फायदा घेऊन याबद्दल सरळ प्रश्न विचारला. त्यानेही तितक्याच खुलेपणाने उत्तर दिले,

''काय बरे, काय वाईट, सरकार ठरवेल. सध्या आमच्या संस्थेला निधी मिळतो आहे आणि त्यातून दहावीस लोकांना पोटाला लावता येईल ना?''

स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांनी खरेच आत्मचिंतन केले आणि त्यांच्या तोंडून एवढा जरी कबुलीजबाब मिळाला, तरी 'वाल्या'चा 'वाल्मीकी' बनण्याच्या दिशेने प्रवास सुरू होईल.

(अंतर्नाद, दिवाळी १९९९)

■■



# शांत व मृदू स्वभावाचे चौधरी

चौधरी चरणसिंग दि. २९ मे रोजी सकाळी शेवटी कालवश झाले. तसे गेले कित्येक महिने त्यांची गणना नसल्यातच होती. शेवटी शेवटी दोन वेळा मी भेटीला गेलो तेव्हा फक्त बेशुद्धीत असलेल्या देहाचेच दर्शन घेऊन आलो होतो.

मृत्युसुद्धा चौधरींच्या बाबतीत निर्दय ठरला. इंदिराजींची लोकप्रियता झपाट्याने ढासळत होती. पण त्यांच्या मृत्यूची घटनाच इतकी विलक्षण की त्यामुळे त्यांच्या आयुष्यातील सगळे हिणकस ते जळून खाक झाले. आणि लक्षावधींच्या मनात शिल्लक राहिली ती फक्त एक उज्ज्वल देदीप्यमान मूर्ती. चरणसिंगाचा मृत्यू इतका गद्यमय झाला की हा माणूस एकेकाळी काय देश हलवून गेला याची कुणाला आठवणसुद्धा येऊ नये.

चौधरी चालते बोलते असताना त्यांचे आणि संघटनेचे घनिष्ठ संबंध होते. दिल्लीतली काही कामे चौधरींच्या सहकार्याने आम्ही बिनधास्त सोडून देत असू. आमच्यातल्या मतभेदांची दरी खूप मोठी. पण चौधरींना व्यक्तिश: माझ्याविषयी अतोनात प्रेम. आपल्या सगळ्या सहकाऱ्यांना अर्धवट कौतुकाने, अर्धवट उद्वेगाने म्हणायचे, ''जरा देखो तो यह महाराष्ट्रका लडका कैसे काम बना रहा है.'' मी राजकारणात यावे, लोकदलात नाही तरी कोणत्यातरी पक्षात यावे अशी त्यांची फार इच्छा होती. निवडणुका लढवल्याखेरीज आणि सत्ता हाती घेतल्याखेरीज शेतकऱ्यांचा प्रश्न धसाला लागू शकत नाही अशी त्यांची बालंबाल खात्री होती.

चौधरींचे व्यक्तिमत्त्व मोठे शांत आणि मृदू होते. हस्तांदोलन करताना त्यांचा हातसुद्धा इतका मऊ लागे की आपण एका म्हाताऱ्यासमोर आहोत याचा विसर पडावा. राजकारणातील अनेक वादळे, मंत्रिमंडळांच्या उलथापालथी, सत्तावीस हजार तलाठ्यांना एका हुकुमात नोकरीवरून काढून टाकण्याची जिद्द हे सगळे या माणसाने केले असेल हे खरे वाटणेच कठीण.

चौधरीजींना श्रद्धांजली वाहताना सगळ्यांचा एकच सूर, चौधरी शेतकऱ्यांचे कैवारी, ग्रामीण कष्टकऱ्यांचे दैवत आणि सहकारीकरणाचे कट्टर विरोधक. अनेकांनी मृत्यूप्रसंगाच्या गांभीर्याची जाणीवही न ठेवता त्यातल्या त्यात 'केवळ' शेतकऱ्यांचे, 'केवळ' जाटांचे, 'केवळ' उत्तर हिंदुस्थानातील शेतकऱ्यांचे अशी चिखलफेक करण्याचा प्रयत्न केलाच.

आचार्य अत्र्यांच्या एका व्यंग कवितेत सिंह मरून पडल्यानंतर त्याची कुचेष्टा

करणाऱ्या आलतू फालतू जनावरांचे सुंदर वर्णन केले आहे. पण एक काळ असा होता की चौधरींच्या एका इशाऱ्यावर लक्षावधी शेतकरी जमत होते. स्वातंत्र्यानंतरच्या काळात शेतकरी म्हणून जाणीव निर्माण करणारा हा पहिला नेता. ग्रामीण भागाच्या दु:खाची आणि यातनांची आर्थिक परिभाषेत सविस्तर मांडणी करण्याचे श्रेय त्यांच्याकडेच जाते. चोवीस मे रोजी म्हणजे चौधरींच्या मृत्यूच्या आधी पाच दिवस उत्तर प्रदेशातील शुक्रताल येथे मी कार्यकर्त्यांचं प्रशिक्षण शिबीर घेत होतो. प्रश्नोत्तराच्या काळात कार्यकर्त्यांना मी एक प्रश्न विचारला. ''चौधरी चरणसिंगांचे मत आहे की, स्वातंत्र्यानंतर पंतप्रधानपदी जवाहरलाल नेहरू आले आणि शेतकऱ्यांची आणि ग्रामीण भागाची ही धूळधाण झाली. चौधरींच्या या म्हणण्याबद्दल तुमचे काय मत आहे?'' दोघा तिघा कार्यकर्त्यांनी चौधरींवर थोडी टिका करायचा प्रयत्न केला. त्याबरोबर बाकीचे कार्यकर्ते इतके कांही चवताळून उठले की मलासुद्धा चौधरींबद्दलच्या लोकांच्या मनांतील प्रचंड आदराची साक्षात जाणीव झाली.

चौधरींच्या आयुष्याच्या शोकांतिकेचे कारण काय? एका आडवाटेच्या खेड्यातील शेतकऱ्याच्या झोपडीत जन्मलेला हा पोरगा, औटघटकेचा का होईना, पंतप्रधान झाला. इतिहास घडवण्याची चालून आलेली संधी त्याच्या हातून निसटून गेली. एवढेच नव्हे तर आयुष्याच्या अखेरीस ते स्वत: आणि त्यांची मते हास्यास्पद मानली जाऊ लागली.

हे का घडले?

मला वाटते याची दोनतीन महत्त्वाची कारणे आहेत. चौधरींचा पिंडच राजकारणी नेत्याचा होता. हे राजकारण चालवण्यातील सोय म्हणून त्यांनी शेतकऱ्यंचा कैवार घेतला. शेतकऱ्यांचे अर्थशास्त्र अभ्यासून, विचक्षणा करून ते शेतकऱ्याच्या मागे उभे राहिले नाहीत. ज्या ज्या वेळी जसजसे सोयीस्कर वाटले त्या त्या वेळी तसतशी त्यांनी शेतकऱ्यांची बाजू घेतली. त्यामुळे शेवटपर्यंत त्यांच्या विचारात प्रचंड गोंधळ होता.

दुसरे एक महत्त्वाचे कारण, चौधरीजींचा पिंडच आंदोलकाचा नव्हता. या बाबतीत त्यांची स्थिती जुन्या काळातील थोर शेतकरी नेते सर छोटूराम यांच्या सारखीच. शेतकऱ्यांचा प्रश्न मांडण्याची आणि सोडवण्याची त्यांना माहीती असलेली एकमेव पद्धत म्हणजे भाषणे करणे, निवेदने तयार करणे, अहवाल लिहिणे, इत्यादी. त्यांच्या कार्यक्रमात शेतकऱ्यांवरील अन्याय राजकीय सूडबुद्धीने होत आहेत याची जाणीव नव्हती. योग्य अधिकारी पुरुषांच्या ध्यानात त्यांची दु:खे आणून दिली म्हणजे तो प्रश्न आपोआप सुटेल अशी त्यांची कल्पना.



सर छोटूरामाप्रमाणेच चौधरी चरणसिंग उत्तरेत-त्यातल्या त्यात जाट प्रदेशांतच अडकून राहिले. हे दोघेही दक्षिणेत कधीच का आले नाहीत?

चार वर्षांपूर्वी मी चौधरीजींना म्हटले होते, ''चौधरीजी, हा निवडणुकांचा नाद सोडा. निवडणुकांचे राजकारण म्हणजे चेटकिणीबरोबर पट खेळणे आहे. पट तिचा, मोहरा तिच्या, सोंगट्या तिच्या, फासे तिचे, एवढेच नाही तर दिवाही तिचा आणि काळे मांजरही तिचे. राजकारणात जे जे काही करायचे ते सर्व तुम्ही करून पाहिले. निवडणुकीचा एक अखेरचा जुगार तुम्ही आता झोकून देऊन खेळू पाहता. यातून काही निघायचे नाही. त्या पेक्षा बाहेर पडा. आम्ही तुम्हाला गावोगाव घेऊन जातो. तुम्ही पंतप्रधान पुन्हा व्हाल किंवा नाही हे मी सांगू शकणार नाही. पण शेतकऱ्यांचा 'प्रेषित' म्हणून तूमचे नांव कायमचे इतिहासांत राहिल एवढी खात्री देतो.''

पण चौधरींना हे पटण्यासारखे काहीच नव्हते. ते जुगार खेळले, हरले. पंतप्रधानपद तर सोडा पण आख्खे मिळून दोन खासदार सुद्धा लोकदलाचे काही निवडून आले नाही. शेतकऱ्यांचे दैवत हे स्थानही डळमळीत झाले. अगदी शेवटच्या दिवसांत चौधरींचा बालेकिल्ला असणाऱ्या बागपतपासून तीस कि.मी. अंतरावर लाखालाखांनी शेतकरी जमले आणि त्यांनी आंदोलन केले. पण चौधरींचे नाव कुठे निघाले नाही. आणि चौधरींच्या मुलाला प्रयत्न करूनही आंदोलनात प्रवेश मिळाला नाही.

चौधरींची राजकीय कारकीर्द अलीकडच्या काळातील मोठी शोकांतिकाच मानायला हवी.

(साप्ताहिक ग्यानबा, १४ जून १९८७)

■■

# 'अनिल' जादूच्या दिव्यातील राक्षस

संघटनेचे अनेक कार्यकर्ते अनिलविषयी बोलतांना त्याला राक्षस किंवा महाराक्षस म्हणतात. त्याच्याबरोबर काम करतांना तहान नाही, भूक नाही, तीन तीन, चार चार रात्री झोप नाही, अफाट धावपळ याचा अनुभव त्यांनी सगळ्यांनी घेतलेला आहे. बाकी सगळे कार्यकर्ते थकून गळून पडायला आले तरी अनिल आत्ताच कामाला लागल्यासारखा टवटवीत दिसत असतो. आणि बाकीच्या कर्यकर्त्यांचा त्याच्या रांगड्या भाषेत उद्धार करीत असतो. अनिलची कामाची पद्धत जशी राक्षसी तशीच विश्रांतीचीही पद्धत राक्षसी. सगळं काम आटोपलं म्हणजे सगळ्या दिवसांच्या झोपेची भरपाई तो एका दमात करून टाकतो.

संघटनेच्या दृष्टीने मात्र अनिल अरबी सुरस कथातील दिव्यातील राक्षसाप्रमाणे आहे. अरबी कथात दिवा घासला गेला म्हणजे एक राक्षस प्रकट होतो आणि दिव्याच्या मालकाची कोणतीही इच्छा तो क्षणार्धात पुरी करून टाकतो. राक्षसाला सांगितलेले काम भर वाळवंटात मनसोक्त मेजवानीची सोय करण्याचे असो कां कोण्या बेटावर हिऱ्या मोत्या पाचूंनी मढवलेला राजवाडा अर्ध्या रात्रीत उभा करण्याचे असो. दिव्याच्या राक्षसाला अशक्य असे काहीच नाही. संघटनेचे काम म्हटले की अनिलला अशक्य असे काहीच नाही.

गेल्या पाच वर्षात या राक्षसाने इतके प्रचंड महाल उभारून दाखवले आहेत की, आज नुसती आठवण करायला गेलो तरी कुणीही आश्चर्याने चकीत होऊन जाईल. पंढरपूरचा साकडे मेळावा जाहीर झाला. महाराष्ट्र राज्य शासन त्यावेळी शेतकरी संघटनेला झोडपूनच काढायला उठले होते. संघटनेचा कोणताही कार्यक्रम म्हटला की त्यावर बंदी यायचीच. एकदा कोणत्या का निमित्ताने होईना शेतकऱ्यांना निर्भयपणे एखाद्या मेळाव्यात येता येईल असे करणे आवश्यक झाले होते. विठोबासमोर साकडे घालण्याची कल्पना या आवश्यकतेतून निघाली. विठोबापुढे जायचे म्हटल्यावर शासन बंदी घालणार नाही अशी कल्पना होती. ती खोटी ठरली. शासनाने बंदी घातली. मला सोलापूर जिल्ह्यात जायचीच बंदी घालण्यात आली आणि आता हा कार्यक्रम होऊ शकणार नाही, जास्तीत जास्त जिल्हा बंदी मोडून स्वत:ला अटक करून घेता येईल असे दिसू लागले. उलट्या बाजूने डाव्या चळवळीतील लोकांनी



मोठे काहूर उठवले. माझ्या ब्राह्मण जन्मावर बोट ठेवून मी छुपा आरएसएसचा मनुष्य आहे असा प्रचार त्यांनी बऱ्याच दिवस चालवला होता. विठोबापुढे जाण्याच्या कल्पनेने त्यांचे चांगलेच फावले आणि त्यांनीही संघटनेविरुद्ध विष पेरायला सुरूवात केली. सरकारी बंदी विरूद्ध हायकोर्टात जाणे, ती बंदी उठवून घेणे त्या करितां जिल्हाधिकाऱ्याशी बोलणी करणे ही सगळी कामं अनिलने पार पाडली. गावोगाव खेड्यात जाऊन प्रचार करण्याचे काम अनिल जितक्या सहजतेने पार पाडतो तितक्याच सहजपणे तो हायकोर्टातील दालने, वकील मंडळी, कायद्याची कलमे यातून भ्रमण करतो.

सोलापूर जिल्ह्यात जायची त्यावेळी त्याच्यावरही बंदी होती. पण एखाद्या बहिर्जी नाईकाप्रमाणे तो वेगळ्या नावाखाली खुद्द जिल्हाधिकाऱ्यांनासुद्धा भेटून आला. बंदी उठली ती मेळाव्याआधी आठ दिवस. आठ दिवसात अनिलने आकाशपाताळ एक केले. पंढरपूरकडे जाणाऱ्या साऱ्या रस्त्यांच्या बाजूच्या भिंती रंगवून घेणे हे काही काम साधे नाही. खुद्द पंढरपुरातील प्रचंड वाड्यांच्या भिंती त्याने अशा रंगवून घेतल्या की कार्तिकी यात्रेचे सगळे वारकरी पाहातच राहिले. त्यावेळी पंढरपुरात संघटनेचे काम असे काहीच नव्हते. सगळे बाहेरून नेऊन कामे करवून घ्यावी लागत होती. कोपरगावचा बद्री देवकर याच वेळी पंढरपुरला जाऊन बसला. जतचे महाराज बादलीभर खळ घेऊन भित्तीपत्रक चिकटवायच्या कामाला लागले. या काळांत जीपमधील उकळते पाणी पडून अनिलची सगळी पाठ भाजून निघाली. दुसरा कुणीही मनुष्य सरळ इस्पितळांत दाखल झाला असता इतका तो भाजला होता. अनिलच्या मनात असा विचारही आला नसावा. साकडे मेळाव्याचा कार्यक्रम पार पडल्यानंतर त्याने शर्ट काढून बँडेजने भरलेली पाठ मला दाखवली. साकडे मेळाव्याच्या प्रचंड यशाने आम्ही त्यावेळेस काहीसे ढगात होतो. अनिलची भाजलेली पाठ पाहिल्यावर या यशामागे काय वेदना आणि परिश्रम होते याची मोठी विदारकपणे जाणीव झाली. पंढरपुरचा साकडे मेळावा म्हणजे संघटनेच्या या राक्षसाने आठ दिवसात उभा केलेला अप्रतिम महालच होता.

हे असे चमत्कार एका माणसाने किती वेळा करून दाखवावे? काहीही कठीण काम दिसले किंवा समोर आले म्हणजे अनिलवर ते टाकून मी मोकळा होतो. आणि अनिलच्या शब्दकोशात अशक्य हा शब्द नाही. कोणतीही कल्पना समोर मांडली की त्यातल्या अडचणी काढून ते कसे व्हायचे असे रडगाणे अनिलच्या तोंडून मी

कधीच ऐकले नाही. मलाच वाटणाऱ्या धास्तीपोटी काहीवेळा मी त्याचे कष्ट थोडे कमी व्हावे याकरितां काही सूट देऊ करतो. अमुक गोष्ट नाही केली तरी चालेल, तमुक एक गोष्ट जमण्यासारखी नसल्यास सोडून दे. अनिल अशा सूचना त्याच्या आडदांड पद्धतीने धुडकावून लावतो. कार्यक्रम पार पडला पाहिजे, जास्तीत जास्त चांगल्या पद्धतीने पार पडला पाहिजे, संघटनेच्या यशात दैदिप्यमान भर पडेल अशा तऱ्हेने पार पडला पाहिजे. याच्याबद्दल त्याचा विशेष आग्रह असतो आणि अनेक वेळा मी मांडलेल्या मुळच्या प्रस्तावापेक्षा पुष्कळ वेगळा, अधिक व्यापक, अधिक महत्त्वाकांक्षी आणि म्हणून तो अधिक जिकीरीचा आणि त्रासाचा कार्यक्रम तो स्वत:च पुढे मांडतो, हे सगळे कसे काय व्हायचे? तर त्याचे उत्तर ठरलेले, 'त्याची काळजी तुम्ही करू नका.' आणि अनिलने असे आश्वासन दिले की मीही निर्धास्त होऊन माझ्यावर जी कामगिरी सोपवली ती पार पाडण्याच्या मागे लागतो.

साकडे मेळाव्यानंतर परभणी अधिवेशन झाले. त्यानंतर चंदीगड आंदोलन, पश्चिम महाराष्ट्र मोटरसायकल प्रचारफेरी. सर्व महाराष्ट्रातील महिन्याभराची प्रचार यात्रा. या सगळ्या कार्यक्रमांचा सेनापती अनिल गोटे. प्रचार यात्रेच्या शेवटच्या दिवशीच इंदिरा गांधींची हत्या झाली. सगळे राजकीय चित्र क्षणार्धात पालटले. गावबंदी कार्यक्रमाच्या आधाराने उभी केलेली रणनीती भुईसपाट झाली. शेतमालाच्या भावसबंधी शेतकऱ्यांच्या मनांत जळत असलेल्या प्रश्नांपैकी एकाही प्रश्नाला तोंड न देता इंदिरा काँग्रेसचे एक सोडून सगळे उमेदवार लोकसभेच्या निवडणुकीत विजयी झाले. निदान विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस आयला थोडा फार लगाम घातलानाही तर पाच वर्षांपर्यंत तरी संघटनेची सगळी आंदोलने, कार्यक्रम बंद ठेवायला लागतील, एवढेच नव्हे, तर संघटनेला काम करणेसुद्धा अशक्य होईल असे दारुण चित्र दिसू लागले. या परिस्थितीत विचार करण्यासाठी अधिवेशन घ्यायचे ठरले. शेतकरी संघटनेचे अधिवेशन म्हणजे काही थोडी जबाबदारी नाही. सटाण्याच्या अधिवेशनाची तयारी किती तरी महिने आधी चालू होती. परभणी अधिवेशनाचीही तीच स्थिती. खर्चाकरिता पैसा उपलब्ध झाला तरी सगळी कामे व्यवस्थित व वेळेत उरकून घेणे म्हणजे उरफोड काम. अनिलने धुळ्याला अधिवेशन भरवण्याची जबाबदारी स्वीकारली आणि पार पाडून दाखवली.

सहा जून एकोणीसशे पंच्याऐंशी रोजी राजीव शासनाचे नवे वस्त्रोद्योग धोरण जाहीर झाले आणि शेतकरी संघटनेच्या इतिहासातील कापूस पर्वाला सुरूवात झाली.



हुतात्मा बाबू गेनू स्मृती दिन १२ डिसेंबर १९८५ रोजी डॉ. दत्ता सामंत यांच्या सहकार्याने मुंबईच्या शिवाजी पार्कवर घेण्याचे ठरले. अनिलने पुन्हा एकदा वाळवंटात राजवाडा उभा करून दाखवला. सगळी मुंबई रंगवून काढली. छगन भुजबळांना व दत्ता सामंतांना एका व्यासपीठावर एकत्र आणण्याचा चमत्कार करून दाखवला. विदर्भ मराठवाड्यातून आलेल्या हजारो स्त्री पुरूषांची मुंबईत राहण्याची सोय केली. प्रत्यक्ष शिवतीर्थावर उभे केलेले व्यासपीठ अनेकांच्या स्मरणात असेल.

१९८७ च्या ठिय्या आंदोलनाची जबाबदारी पार पाडली ती पुन्हा अनिल गोटेनेच. कार्यकारीणीने त्याची अध्यक्ष म्हणून नेमणूक केली. अध्यक्षपदाच्या काळात तर सटाणा, धुळे, नागपूर आणि शेवटी सांगली येथे भरलेले मेळावे म्हणजे त्याच्या कर्तबगारीच्या चढत्या पताकाच होत्या.

सांगलीचा मेळावा म्हणजे खरोखरच अनिलच्या सर्व कामगिरीवर चढलेला सोन्याचा कळस होता. यापुढे आणखी मोठे मोठे कळस तो चढवील, याहूनही उत्तुंग शिखरे पादाक्रांत करील याबद्दल माझ्या मनात काही शंका नाही. पण तरीही सांगलीच्या यशाचे असे एक खास स्थान कायमचे राहील.

वसंतदादा पाटलांनी मुख्यमंत्री पदाच्या वादात शेतकरी संघटनेला विनाकारण ओढले. माझ्यावर आणि व्ही.पी. सिंगांवर विनाकारण चिखलफेक केली आणि राष्ट्रीय नावाची शेतकरी संघटना काढून एक मोठा यक्षप्रश्न उभा केला. दादांच्या संघटनेला भवितव्य असे नाही हे उघड. शेतकरी संघटना ही काही आडमाप घोषणांनी उभी राहणारी गोष्ट नव्हे. संघटना उभी करण्याकरितां शेकडो हजारो कार्यकर्त्यांचे अश्रू, घाम आणि रक्त लागत असते. पण वसंतदादांबद्दल पुष्कळ शेतकऱ्यांच्या मनात ओलावा आहे. स्वातंत्र्यसैनिक म्हणूनही त्यांच्याविषयी आदर आहे. राष्ट्रीय शेतकरी संघटनेची जखम चिघळत ठेवणे त्रासाचे ठरण्याचा धोका होताच.

सांगली, कोल्हापूर भागात शेतकरी संघटनेचे काम कमकुवतच, जवळ जवळ नसल्यासारखेच. याही परिस्थितीतच अनिलने महाचमत्कार घडवून दाखवला. अनिल सांगलीला गेला. तालुक्यातालुक्यात गेला. संभाजीराव पवारासारखे कार्यकर्ते जमा केले आणि वसंतदादांचो मेळावा झाल्यानंतर दोन महिन्याच्या आत सांगलीमध्येच महाप्रचंड मेळावा भरवून एक मुंहतोड जबाब देऊन टाकला. बस, त्या दिवसापासून राष्ट्रीय शेतकरी संघटनेचे नावसुद्धा कुठे येईनासे झाले. सांगलीतील मेळाव्याची

कामगिरी एखाद्या लष्करी कारवाईसारखी होती आणि ती अनिलने शंभर टक्के यशस्वी करून दाखवली. संघटनेच्या सगळ्या मोठ्या लढायात अनिल एकटाच एका सबंध रणगाड्याच्या दळाचे काम बजावत आला आहे.

पण अनिल म्हणजे नुसता कामाचा राक्षस नव्हे. त्याच्या अंगी प्रचंड धाडसही आहे. जीवावर धोका येण्याची तयारीही आहे. संघटनेत येण्यापूर्वी अनिलवर सात बसेस जाळल्याचा आरोप होता. मंत्रीमहाशय वर्तक यांच्या श्रीमुखात ठेवून दिल्याबद्दल त्याला शिक्षा झाली होती. भर सभेत मंत्र्याच्या गळ्यात जोड्यांचा हार घालण्याचा आपला निर्धार त्याने पुरा करून दाखवला होता. संघटनेच्या कामात त्याच्या जेम्सबाँड प्रवृत्तीचा अनुभव अनेकदा आला आहे. विदर्भात कापूस आंदोलन सुरू झाले होते. मला रासुकाखाली अटक झाली होती. अनिलच्या धुळ्याच्या राहत्या घरी पोलिसांनी पहारा बसवला होता. या पहाऱ्यातून सुटण्याकरिता त्याने जी युक्ती वापरली ती कोणत्याही रहस्यकथेत शोभून दिसण्यासारखी आहे. पण त्याच्या या सगळ्या धाडसाच्या गोष्टी आजच प्रकाशात आणणे शक्य होणार नाही. अनिलच्या धाडसाच्या रम्य आणि सुरस कथा प्रकाशित करण्यापूर्वी दहा-पंधरा वर्षांचा काळ जाऊ द्यावा लागेल.

सगळ्या आडदांडपणाबरोबर अनिलमध्ये एक छुपा बहिर्जी नाईक आहे. नाव बदलून सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना भेटून आल्याचा उल्लेख मी केलाच आहे. अगदी कडक बंदोबस्तात तुरुंगात असतांना ॲडव्होकेट म्हणून अनिल मला भेटायला आला आहे. सल्लामसलत करून गेला आहे. सूचना देऊन आणि घेऊन गेला आहे.

या सगळ्या कथा खरे म्हटले तर अनिलच्या तोंडूनच ऐकायला पाहिजेत. तासन्‌तास चाललेल्या गाडीच्या प्रवासात अनिल स्वत:च्या या करामती मोठ्या रोमहर्षकपणे सांगतो. स्वत:च्याच गोष्टी असे नव्हे. त्याच्या आसपासच्या अनेक व्यक्तींच्या गोष्टी तितक्याच खुमारीने सांगतो. या अफाट माणसाभोवती आयुष्यात वेळोवेळी आणि जागोजागी तितकीच भन्नाट माणसे येऊन गेली. अनिलचे ह्या सगळ्या गोष्टी सांगण्याचे कसब काही विलक्षण आहे. मला अनेकदा असे वाटायचे की हा कल्पनारंजीत कथा सांगतो. पण दोनतीन वेळा तपास करून पाहिल्यानंतर त्यात अतिशयोक्तीचा काही प्रकार नाही असे माझ्या लक्षात आले. शेवटी अनिल हा व्यवसायाने पत्रकार आहे. साधासुधा पत्रकार नाही. एका एका वर्षात तीन तीन पुरस्कार मिळवलेला पत्रकार आहे. इंग्रजीमध्ये अनेक मोठ्या लेखकांचा उल्लेख



'गुड स्टोरी टेलर' म्हणून करतात. अनिलच्या या सगळ्या धावपळीत वेळ मिळेल तेव्हा त्याच्याच आसपासच्या लोकांनी ही शब्दचित्रं कधी तरी शब्दांकित करायला पाहिजे. मराठी साहित्यक्षेत्रातही त्यामुळे खळबळ उडेल.

मागच्या आठवणी सांगताना अनिलच्या संघाचा पूर्णवेळ कार्यकर्ता असतांनाच्या आठवणी मन हेलावून सोडणाऱ्या असतात. खिशात पैसा नाही, जेवणा राहण्याची सोय नाही. राहण्याची सोय दुसऱ्या कोणत्यातरी कार्यकर्त्याच्या घरी केलेली. पोटात भुकेचा डोंब उसळलेला. पण ज्या घरी अकस्मात जायचे त्या घरी जेवायला थांबायचे आमंत्रण मिळेल की नाही याची खात्री नाही. अशा परिस्थितीत जेवणाचे आमंत्रण लावून घेण्याकरिता काय काय युक्त्या कराव्या लागतात याचे प्रत्यक्ष वर्णन अनिलच्या तोंडूनच ऐकायला पाहिजे.

थोड्या लोकांना माहित असलेला अनिलचा एक छंद म्हणजे कोर्टात केस लढवणे. धुळ्याच्या कोर्टात पुढाऱ्यांची लफडी काढण्याकरिता त्याच्या काही ना काही केसेस चालूच असतात. मुंबई हायकोर्टातही त्याचे अनेक रिट पिटीशन चालू असायचे. संघटनेच्या कामाला लागल्यापासून हे खटला प्रकरण थोडे कमी झाले आहे. कमी झाले म्हणण्यापेक्षा त्याचे स्वरूप बदलले आहे. आता त्याचे लक्ष असते संघटनेच्या खटल्यांकडे. प्रसिद्ध कायदेपंडित राम जेठमलानी यांच्याबरोबर काम करणे सोपे नाही. पण अनिल म्हणजे त्यांच्या गळ्यातला अगदी ताईत. तसे म्हटले तर अनिलला इंग्रजी अगदी जुजबी येते. पण राम जेठमलानी आणि अनिल एकमेकांशी गप्पा मारत असले म्हणजे फार जुन्या काळचे दोस्त भेटत असावे असे वाटते. मोठमोठ्या माणसांबरोबर स्नेह संबंध जोडणे ही त्याची एक हातोटी आहे. छगन भुजबळ असोत की बाळ ठाकरे, दत्ता सामंत असोत की व्ही.पी. सिंग आणि शंकरराव चव्हाण असोत की शरद पवार या सगळ्या मंडळींना अनिलविषयी आपुलकी आहे. यांचे सर्वांचे दरवाजे अनिलकरता कायमचे खुले असतात.

पण बाहेरचा असा अफाट, रांगडा, राक्षस अनिल घरी परतला म्हणजे अगदीच वेगळा दिसतो. यात खरे कौशल्य हेमावहिनींचे आहे. अगदी अगत्यशील गृहीणीची जबाबदारी हेमावहिनी सतत हसतमुख राहून सांभाळतात. त्यांच्या सतत आनंदी स्वभावाचे रहस्य काय असावे ? मला वाटते बाहेरून काळ्या कभिन्न पत्थरासारख्या भासणाऱ्या अनिलच्या मनात आत कुठेतरी भावनेचा आणि प्रेमाचा झरा वहात असला पाहिजे. वहिनींना त्याची जाणीव सगळ्यात जास्त असली पाहिजे. अनिलच्या

या आतल्या स्वरूपाचे दर्शन फक्त एकदा घडले. चांदवड अधिवेशनाच्या आधी शेतकरी संघटनेच्या एका कार्यकर्त्याने संघटना सोडून दिली. एवढेच नव्हे तर बायकोने अधिवेशनात भाग घेऊ नये म्हणून तिला भयानक मारहाण केली. शिव्या दिल्या, अगदी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसमोर. या प्रसंगाची माहिती सांगताना अनिल माझ्या खांद्यावर डोके ठेवून अक्षरशः ढसाढसा रडला. त्या बाईंना मारले म्हणून नाही, तर हा सगळा प्रसंग संघटनेचे कार्यकर्ते काही न करता थंडपणे पहात राहिले म्हणून.

(साप्ताहिक आठवड्याचा ग्यानबा दि. २१ मार्च १९८८)

■■



# वारकरीची जन्मकथा

शेतकरी संघटना हे नांव आणि कल्पना आम्ही बरेच दिवस मनांत बाळगत होतो आणि त्याविषयी बोलत होतो. आम्ही म्हणजे बाबूलाल परदेशी, शंकरराव वाघ, बाबासाहेब मांडेकर अशी चाकणच्या परिसरातील पाच-सहा माणसं. १९७८ मध्ये कांद्याचे भाव पहिल्यांदा पडले तेव्हापासून ते १९८० पर्यंत चाकणच्या बाजारावर कांद्याच्या प्रत्येक हंगामात घारीच्या नजरेने देखरेख ठेवायची. १९८० मध्ये कांद्याचे पिक तर मोठं आलं आणि यंदा पुन्हा निर्यातीला परवानगी नसल्याने भाव घसरणार हे स्पष्ट झाले. तेव्हा संघटनेला काहीतरी मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न करू लागलो. चाकण गावाच्या मध्यभागी एका खोलीवर पाटी लावली आणि त्या जागी बाजाराच्या दिवशी कार्यकर्त्यांनी तासभर तरी येऊन जावे, अशी जाहीरात केली. माझ्या आठवणीप्रमाणे पहिली बैठक झाली २७ ऑक्टोबर १९७९ रोजी. विशेष सांगायची गोष्ट म्हणजे त्या दिवशी झालेला सगळ्यात महत्त्वाचा निर्णय म्हणजे तातडीने साप्ताहिक चालू करायचे. साप्ताहिकाचे बाळंतपण काही लहान नाही. त्याचं नाव आधी ठरवावं लागतं, ते नाव दिल्लीहून मंजूर करावून आणावं लागतं, लेख, छपाई, पैशांची व्यवस्था, अनेक सव्यापसव्य उरकावी लागतात. अनियतकालीक काढले तर पुष्कळ अडचणी दूर होतात. अनियतकालीक म्हणजे ज्याचा निघण्याचा काही निश्चित कार्यक्रम नाही असे पत्रक. कधी दोन दिवसांनी तर कधी महिनाभरही निघणार नाही. त्याचं नाव काहीही असू शकतं. वर्गणीदार वगैरेची कटकट नाही. आवश्यकतेप्रमाणे किंवा सोयीप्रमाणे जेव्हा जमेल तेव्हा पत्रकाची प्रसिद्धी करायची. आज मागे वळून पाहिले म्हणजे असे वाटते की त्यावेळी अनितकालीक काढले असते तर जास्त योग्य झाले असते. निदान जास्त पेलवले असते; पण शेतकरी संघटनेच्या ताकदीविषयी व भविष्याविषयी जमलेल्या सर्वांच्याच मनात जबरदस्त आत्मविश्वास होता. अनियतकालिक काढणे म्हणजे पोरकटपणा वाटला. त्याऐवजी छोटे का होईना नियमित चालणारे साप्ताहिक काढावे. हे संघटनेच्या प्रतिष्ठेला व स्वरूपाला जास्त साजेसे वाटले. बाजारच्या दिवशी सगळ्यांनी एकत्र जमायचे. हेच त्यावेळच्या संघटनेचे मूळ स्वरूप. त्याच दिवशी जमणाऱ्या प्रत्येकाला साप्ताहिक देता आले तर सामुदायिक वाचन व चर्चा होऊ शकेल अशीही कल्पना. गावोगांव अंक गेला पाहिजे म्हणजे

चाकणच्या परिसरातील शंभर दिडशे गावात अंक पोचला पाहिजे. तिथे नुसता अंक पोचून उपयोगी नाही, तो वाचला गेला पाहिजे. चाकणच्या पश्चिमेकडील मावळ खोऱ्यामध्ये साक्षर माणसांचा दुष्काळच, मग गावोगावी तो अंक वाचून दाखविणाऱ्या माणसांची योजना पाहिजे. अशा सगळ्या कल्पनांनी साप्ताहिक काढायचे ठरले. ऑक्टोबर संपत आलेला. दोन एक महिन्यात कांद्याचा हंगाम सुरू होणार. एवढ्या काळांत सर्वकाही खटाटोप आटोपून अंक चालू करणे आणि तो गावागावात उभा करणे हे अशक्यच होते. दिल्लीहून नावाची मंजूरी यायलाच कितीतरी महिने लागतात. मग काय करावे? बाबूलाल परदेशी हा पट्टीचा वक्ता तर आहेच, पण चाकण आळंदी परिसरात बरीच वर्षे नट आणि किर्तनकार म्हणूनही गाजत आहे. चाकणला झालेल्या 'संत तुकाराम' या नाटकाच्या प्रयोगाने खूपच उत्साह तयार केला होता. बाबूलालच्या वडीलांनीसुद्धा कीर्तनकार मुलाला साष्टांग नमस्कार घातला. देहू आळंदीच्या या परिसरात बाबूलालचा चांगला मान होता. कधीतरी पुढे मागे एक भक्तीमार्गी साप्ताहिक काढावे अशी त्यांची कल्पना होती. हे साप्ताहिक प्रामुख्याने आजीव सदस्यांनी दिलेल्या देणगींच्या व्याजातून चालेल असा आडाखा होता. या दृष्टीने 'साप्ताहिक वारकरी' या नावाला त्याने दिल्लीहून मान्यता आणून ठेवली होती. तशी मान्यता येऊन दोनतीन वर्ष होऊन गेली होती. पण साप्ताहिक चालू करायला बाबूलालला काही फुरसत नव्हती. त्याने साप्ताहिकाचे नाव आम्हाला देऊ केलं. शेतकरी संघटनेकरिता काढलेले साप्ताहिक आणि त्याचं नाव 'वारकरी' हे थोडं खटकलं आणि माझ्यासारख्या नास्तिकाला तर विशेष खटकलं. पण साप्ताहिक तातडीने चालू करण्याची इतकी निकड होती की काही काळ का होईना याच नावाखाली साप्ताहिक काढायचं ठरलं. निर्णय झाला. ३ नोव्हेंबर १९७९ रोजी पहिला अंक निघाला. २७ ऑक्टोबरला साप्ताहिक काढायचा विचार मनात आल्यापासून सात दिवसाच्या आत पहिला अंक प्रकाशित होतो हे अगदी मराठी पत्रकारितेतसुद्धा मोठे दुर्मिळ असले पाहिजे. अंक निघायचा डेमी फुलसाईज या आकाराचा चारपानी. बाबूलाल परदेशींचा छापखाना. त्यांच्या छपाई यंत्राच्या सोयी प्रमाणे आकार वगैरे. पैशांची अडचण पहिल्यापासून असल्याने चाकणच्या बाजारपेठेतील आडते, तेल गिरण्या अगदी किराणामालाचे दुकानदार यांच्यासुद्धा जाहिराती घेतल्यावाचून गत्यंतर नव्हते. पण या 'साप्ताहिक वारकरी'ची भूमिका फार काटेकोरपणे ठरविण्यात आली होती. पहिल्या अंकापासून ते शेतकरी संघटनेचे मुखपत्र आहे हे अगदी स्पष्ट करण्यात आले. मुद्रक प्रकाशक



आणि संपादक शरद जोशी आणि कार्यकारी संपादक बाबूलाल परदेशी. पहिल्या अंकाचा प्रकाशन समारंभ करायचा ठरला. आज त्या प्रसंगाची आठवण आली तरी करमणूक झाल्याखेरीज राहात नाही. चाकण बाजारात एका ठिकाणी लहानसा मांडव घातला. कार्यकर्त्यांच्या पैकी कुणाच्या तरी ओळखीने एक लाऊड स्पिकरपण लावला. उद्घाटन समारंभाच्या वेळी संघटनेच्या सगळ्या कार्यकर्त्यांनी संघटनेचे असे काही चिन्ह लावावे, म्हणजे नंतर कांद्याचा बाजार चालू झाला की संघटनेचे कार्यकर्ते वेगळे दिसून यावेत अशी सोयही होऊन जाईल. कल्पना तर निघाली. एका बाजूला अंक तयार होत होता. दुसऱ्या बाजूला जाहिराती गोळा करणे चालले होते. आणि आम्ही शेतकरी संघटनेच्या चिन्हाचा काही नकाशा, आराखडा न बनवता चोवीस तासांत शंभर दोनशे बिल्ले मिळवायला निघालो. बाबूलाल परदेशीचे सगळे संपर्क जुन्या समाजवाद्यातले. चाकणच्या मामा शिंद्यांपासून ते पुण्याच्या डॉ. रमेशचंद्र ते मोहन धारियापर्यंत. डॉ. रमेशचंद्र समाजवादी पक्षातले मोठे संघटक मानले जायचे. त्यांच्याकडे आम्ही विचारायला गेलो बिल्ले कसे व कोठे तयार करायचे. डॉ. साहेब भेटलेच नाहीत. मला वाटते त्यांच्या धाकट्या भावाचा प्लॅस्टिक मोल्डींगचा छोटासा उद्योगधंदा होता. तो बाहेर पडता पडता भेटला. त्याला आमचं काम समजावून सांगितल्यावर, तो म्हणाला की प्लॅस्टिकचे बिल्ले तो दोन तीन दिवसांत बनवून देऊ शकेल. बिल्ला कसा असावा? त्यावर शेतकरी संघटना हे शब्द असावेत आणि रंग फक्त तांबडा आणि पांढरा असावा एवढंच काय ते आमच्या डोक्यात स्पष्ट होतं. अक्षरांची बांधणी किंवा मांडणी कुणाकडून तरी करून घेऊन मंजूर नामंजूर करायला वेळच नव्हता. आम्ही हे काम रमेशभाईंच्या भावाकडं सोपवलं व निघालो. त्या वेळी तयार झालेल्या प्लॅस्टिकच्या बिल्ल्याचे काही नमुने आजही उपलब्ध आहेत. पण शेतकरी संघटनेचे ते तांबडे गोलाकार प्रतिक आज जगभर प्रसिद्ध झाले आहे. आणि लक्ष्यावधींना स्फुर्ति देत आहे. संघटनेच्या मुखपत्राच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला कोण येणार? खासदार आमदार तर सोडाच अगदी पंचायत समितीचा सभापतीसुद्धा या कार्यक्रमाला यायला तयार झाले नसते. शेवटी आंबेठाण जवळच्या एका गावातील पंचायत समितीच्या एका सदस्याच्या हस्ते उद्घाटनाचा कार्यक्रम झाला. दुसरे कुणी आले नसते हेही खरेच, पण त्याबरोबर पंचायत समितीचा हा मेंबर भामनेरच्या सडकेच्या आंदोलनात उपयोगी पडेल अशी थोडीफार आशा असावी. बाबूलाल परदेशीच्या कल्पना जास्त व्यवहारी, हे पुढारी निदान शंभर रू. देऊन आजीव

वर्गणीदार होतील असा त्यांचा आडाखा. पुढाऱ्यांनी ते कबूलही केले आणि पन्नास रू. रोख दिले. उरलेले पन्नास रू. अजून द्यायचे आहेत. पहिला अंक तर प्रसिद्ध झाला. प्रसिद्धीच्या वेळापर्यंत अंक कसाबसा छापून झाला. बाबूलाल सिद्धहस्त लेखक आहे. अगदी नवे अगदी मूलगामी बोलणारे लिहिणारे मला जे लोक पाच दहा वर्षांत भेटले त्यांच्यात त्याचा अगदी वर क्रमांक लागेल. एका बाजूला जुळवणाऱ्याला हजर करायचे, त्याला एक पाच दहा ओळींचा मजकूर देऊन कामाला लावायचे, तेवढा मजकूर जुळवून होईपर्यंत आणखी पंधरा वीस ओळी लिहून द्यायच्या असे त्याने अनेकवेळा केले आहे. पण त्याचा छापखाना हा व्यंकटेश माडगुळकरांच्या ग्रामीण कथांत शोभून दिसण्यासारखा. सगळे जुळारी हे अर्धवेळ शेती करणारे. आणि त्यापेक्षा जास्त वेळ इतर अनेक भानगडीत अडकलेले. त्यांना बाबापुता करून शोधून बोलावून आणावे लागे तरी ते सारखे निसटून जात. तारीख आणि वेळ यांची जाणीव बाबूलालच्या छापखान्यांत फारशी नाही. लग्नाची तारीख उद्यावर येऊन पडली, आता तरी लग्न पत्रिका द्या म्हणून ग्राहकच त्यांच्याकडे काकुळतीला येऊन बसलेले दिसायचे. चाकणमधला एकुलता एक छापखाना म्हणून त्याच्या सोयीने लग्नाच्या तारखा मागेपुढे कराव्या लागत. गुरुवार सकाळपर्यंत संपादक म्हणून मी मजकूर हजर करायचा असं ठरलं होतं. सगळ्या कामाच्या धांदलीत बुधवारी रात्रभर बसून सत्तावीस अठ्ठावीस पानं मजकूर लिहून काढायचा आणि उजाडता उजाडता बाबूलालच्या घर कम छापखान्यासमोर जाऊन उभा राहायचो. बाबूलालची आणखी एक सवय म्हणजे मारूतीच्या देवळात रात्री तीन साडेतीनपर्यंत गप्पा मारायच्या आणि नंतर सकाळी दहावाजेपर्यंत ताणून द्यायची. त्यांच्या बायकोलाही माझ्या येण्याची कटकट वाटत असावी. ती बाबूलालला गदगदा उठवायची, "अहो तुमचा सासरा आलाय बघा." मग दुपारपर्यंत वेळ जुळारी शोधण्यात जायचा. कधी जुळारी मिळायचे कधी मिळायचे नाहीत.

दुसऱ्या दिवशी सकाळी काम हमखास सुरू होईल असे आश्वासन बाबूलाल द्यायचा आणि एकदा काम चालू झालं की काय हो, दोन तीन तासात अंक तयार असं सांगून माझी चिंता दूर करायचा प्रयत्न करायचा. शुक्रवारी सकाळी पुन्हा मी हजर आणि पुन्हा परिस्थिती तीच. शनिवारी दुपारपर्यंत का होईना अंक कसाबसा तयार करावा ही माझी धावपळ असायची. बाबूलाल घड्याळ काय पण कॅलेंडरकडे सुद्धा लक्ष देणे म्हणजे विलायतेतून आलेल्या लोकांचे फॅड समजायचा. साप्ताहिक वारकरीचा प्रत्येक



अंक म्हणजे जुळारी, छापखाना, बाबूलाल आणि वेळ यांच्याशी घेतलेली निकराची झुंज व्हायची. छपाई कामाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे प्रचंड संख्येने मुद्रण दोष. मला स्वत:ला मीच लिहीलेला मजकूर छापलेला तपासता येत नाही. लिहीलेली वाक्य मनात इतकी पक्की बसलेली असतात की मुद्रणातल्या चुका लक्षातच येत नाहीत. आणि बाबुलालला कोणत्याच चुका चुका वाटत नाहीत. असा सगळा आनंद. भावी काळातील राजवाडे वारकरीचे अंक घेऊन बसतील तेव्हा मुद्रणदोष ओलांडता ओलांडता वाचताना त्यांच्या डोक्याला मुंग्या आल्याखेरीज राहणार नाहीत. त्यावेळी लिहिलेल्या लेखांपैकी अनेक लेख हे केवळ स्थानिक महत्त्वाचे पण त्याबरोबर 'इंदिरा इंडिया झाली भारताचे वाली कोण', 'इंदिरा गांधींची पहिली गाडी चुकली', 'विचारवंतांचे बुद्धिदारिद्र्य', 'एकोणपन्नास कोटींची कर्जमाफी' इत्यादी आजही अनेकांना आवडणारे लेख त्या वेळी प्रसिद्ध झाले. साप्ताहिक वारकरीने संघटनेच्या कामात काय हातभार लावला व काय भूमिका बजावली याबद्दल वेगळे सविस्तरपणे लिहायला पाहिजे. साप्ताहिक 'वारकरी' नंतर 'शेतकरी संघटक' त्यानंतर 'ग्यानबा' हा प्रवाससुद्धा मोठा सूचक आहे. साप्ताहिक वारकरी संघटनेचे मुखपत्र होते. शेतकरी संघटकच्या पहिल्या अंकात 'शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारीत रास्त भाव' मिळू लागले तर या देशाचे दारिद्र्य नष्ट होण्यास वेळ लागणार नाही या विचारांशी फक्त बांधीलकी सांगितली. ग्यानबा त्याहीपेक्षा आणखी स्वायत्त आणि स्वतंत्र रहावा असा आग्रह आहे.

पहिल्या महिन्यात दोन महिन्यातच साप्ताहिकाच्या आठवडी बाळांतपणाचा मोठा त्रास वाटायला लागला आणि एवढे करून कुणी वाचतं की नाही ही शंका कायमच. २३ जानेवारी १९८० रोजी भामनेरच्या मोर्च्याकरिता मी वांद्र्याला मुक्कामाला जाऊन पोचलो. झोपायच्या आधी तिथली बरीच तरुण मंडळी कुतूहलाने गप्पा मारायला जमली होती. त्यावेळी 'शेतकऱ्यांची संघटना अडचणी आणि मार्ग' ही लेखमाला वारकरीमध्ये प्रसिद्ध झाली होती. यात संघटनेच्या विचाराचा सर्व तथ्यांश येऊन गेला होता. पण ती लेखमाला कोणी वाचते आहे अशी मलाही आशा नव्हती. वांद्र्याचा भोसले नावाचा एक कार्यकर्ता आहे. त्याने बोलता बोलता एकदम वाक्य फेकले. 'ज्या समाजाची प्रगती खुंटली आहे त्याची स्थिती साचलेल्या डबक्याप्रमाणे होते.' मी एकदम चमकलो. या लेखमालेतले हे वाक्य मी चटकन ओळखले व त्याला विचारले, 'हे वाक्य तू कुठे वाचलेस?' तो म्हणाला 'साहेब हे तुमच्या लेखातले वाक्य आहे.'

'तुम्ही हे लेख वाचता?', 'म्हणजे काय? आम्ही गावात सार्वजनिक वाचन करतो आणि माझी तर वाक्येच्या वाक्ये पाठ आहेत.' असे सांगून त्याने कितीतरी वाक्ये म्हणून दाखवली. मला खूप बरं वाटलं. इतक्या उपद्व्यापाने फेकलेले बियाणे, मावळातील सगळ्या डोंगरमाथ्यावर एका ठिकाणी तरी रुजत असेल तरी सगळ्या कष्टांचे चीज झाले.

(साप्ताहिक आठवड्याचा ग्यानबा, १ मार्च १९८८)

■■



# बापू नावाचे मोहोळ

रामचंद्र बापू पाटील यांनी शेतकरी संघटनेच्या अध्यक्षपदाची धुरा २६ मार्च १९८५ रोजी भास्करराव बोरावके यांच्याकडे सोपवली. संघटना आणि प्रचार या माझ्याकडे असलेल्या कामाची जबाबदारी आता त्यांच्यावर आलेली आहे.

संघटनेचा गेल्या पाच वर्षे आणि काही महिन्यांचा इतिहास अनेक घटनांनी आणि घडामोडींनी भरलेला आहे. पण बापूंच्या अध्यक्षपदाचा काळा हा त्यांतील सर्वात ऐतिहासिक. बापू शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यवर्षाचे कर्णधार राहिले.

फेब्रुवारी १९८४ च्या परभणीच्या अधिवेशनांत बापूंची अध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड झाली. संघटनेचे अध्यक्षपद म्हणजे सुळावरची खुर्ची आहे. त्यांत माधवराव खंडेराव मोरे यांचा वारसा सांभाळणे म्हणजे काही तोंडची गोष्ट नव्हे. माधवराव म्हणजे गावागावातील तरुणांच्या हृदयाचे अनभिषिक्त सम्राट. आयुष्याचा अथांग अनुभव, प्रखर बुद्धिमत्ता, खणखणित वैराग्य, अगदी सुलतानी पुढाऱ्यालासुद्धा भिडण्याचा बेडरपणा, सतत नवीन कल्पना, उपमा, शब्दप्रयोग प्रसवणारी प्रतिभा आणि महाराष्ट्राने फार वर्षांत ऐकले नव्हते असे वक्तृत्व. माधवराव नुसते उभे राहिले तरी लाखांच्या सभा स्तब्ध होऊन जात. त्यांच्या वाक्यांच्या एकेका फेकीबरोबर शेतकऱ्यांच्या तरुण पोरांच्या छातीत घालमेल व्हायची.

बापू जवळ जवळ त्यांच्या अगदी उलट. सभेत बोलणे हेच त्यांना फारसे आवडत नसे. आता बापू फार प्रभावीपणे बोलतात पण पाच वर्षांपूर्वी ते लाउडस्पीकरसमोर यायलासुद्धा टाळायचे. बापूंनी नानांचा वारसा सांभाळायला घ्यायचा म्हणजे कोवळ्या रामचंद्राने शिवधनुष्य उचलायला निघण्याचाच प्रकार.

बापूंच्या अध्यक्षतेखाली संघटनेने पार पाडलेले कार्यक्रम पहावे; संघटना काय होती आणि कुठे आहे याकडे नजर टाकावी म्हणजे बापूंच्या कर्तबगारीची खरी साक्ष पटते.

परभणी अधिवेशनांत शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यवर्षाची घोषणा झाली. कृषि मूल्य आयोग बरखास्त करा, कृषि उत्पादनखर्च आयोग स्थापन करा हे उद्दिष्ट ठरले. त्यासाठी आंदोलनाचा सर्वंकष कार्यक्रम ठरला. त्याची प्रमुख सूत्री: धान्यबंदी, कर्जबंदी, गावबंदी.

परभणीचे अधिवेशन संपते न संपते तो आंबेठाण येथे पूर्णवेळ कार्यकर्त्यांचे शिबीर आटपून चंडीगढ येथील ऐतिहासिक आंदोलनांकरिता मराठी शेतकऱ्यांनी कूच केले.

सगळा देश हिंदू-शीख दंगलींनी पेटला आहे असा समज होता तेव्हा सत्तर हजार शीख शेतकरी बांधवांबरोबर महाराष्ट्रातील दीड हजार शेतकरी उभे ठाकले. १२ ते १८ मार्च या सातच दिवसांत शेतकरी संघटनेने अगदी अटकेपार झेंडा नेला. शेतकरी चळवळ आता देशभर पसरली. शेतीमालाचा भाव ही शेतकऱ्यांच्याच नव्हे तर देशाच्या विकासाची गुरूकिल्ली आहे हे राज्याराज्यांतल्या शेतकरी कार्यकर्त्यांच्या मनोमनी पोंचले. भगतसिंग-राजगुरूंच्या मिलापानंतर पुन्हा एकदा पंजाब-महाराष्ट्र आघाडीने उभा राहिला. धान्य बंदी कार्यक्रम पंजाबात राबवायचा होता. १ ते ८ मे पंजाबमध्ये भल्या प्रचंड गव्हाच्या मंड्यांवर बहिष्कार घालण्याचा कार्यक्रम पार पडला. १० जूनपासून गव्हाची वाहतूक रोकण्याचा कार्यक्रम जाहीर झाला. शेतकरी झेंडा झपाट्याने पुढे सरकत होता आणि तेवढ्यांत...

अटकेपार झेंडा नेणाऱ्यांवर पानिपतच्या पराभवाचा प्रसंग ओढवण्याची वेळ आली. पंजाबांतील शेतकऱ्यांच्या असंतोषाचा फायदा उडवण्याचा प्रयत्न अकाली करत होते आणि अकाली आंदोलनाच्या ज्वालेचा फायदा अतिरेकी उठवू पहात होते. महिने महिने जेलभरो आंदोलन करूनही शासन बधत नाही या अनुभवाने मति कुंठित झालेल्या अकाली नेतृत्वाला संघटनेने परभणीत दिलेल्या कार्यक्रमांतील प्रतिभा जाणवली आणि त्यांनीही तीन जूनपासूनच गव्हाची वाहतूक रोकण्याचा कार्यक्रम जाहीर केला.

त्यानंतर लष्कराचा प्रवेश, सुवर्णमंदिरांतील रणकन्दन हा इतिहास सर्वांच्या परिचयाचा आहे. पण पंजाबमधील प्रत्येक गावात काय घडले हे कुठे छापून आले नाही.

अतिरेक्यांच्या बंदोबस्ताकरता आलेल्या लष्कराचा आणि पंजाबमधील तंग वातावरणाचा फायदा घेऊन शेतकरी आंदोलन खच्ची करण्याचे कारस्थान सुरू झाले. गावोगाव घुसून वीजेच्या बिलाच्या आणि कर्जाच्या वसुलीसाठी हाणमार, पोलिसी छळ, धरपकड चालू झाली. एवीतेवी शेतकऱ्यांना पकडून नेले जातच आहे. मग मेंढ्यांसारखे तुरुंगात कां जावे? वाघासारखे जावे या हेतूने १ जूलैपासून जेलभरो आंदोलन सुरू झाले. महाराष्ट्रातून एक छोटासा जथा पंजाबमधल्या शेतकऱ्यांची दोस्ती दाखवून देण्याकरिता गेला. २० जुलै रोजी त्यांना अटक झाली.

महाराष्ट्रभर या अटकेविरुद्ध निदर्शने झाली. शेकडो हजारोंनी शेतकरी तुरुंगात गेले. फार मोठ्या प्रमाणावर स्त्रिया या निदर्शनात सामील झाल्या. या निदर्शनांची सूत्रे बापूंनी स्वत: सांभाळली होती.

१० सप्टेंबर १९८४ रोजी चंदीगड येथे शेतकरी मेळावा होता. त्यावर बंदी घालण्यांत



आली. चंदीगडला येणाऱ्या आगगाड्या, बस बंद करण्यांत आल्या. शेतकऱ्यांच्या नव्या ताकदीला राजकीय मान्यता मिळाली.

शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यवर्षाची रणभूमी आता महाराष्ट्रांत आली. वर्षाअखेर शासनाला निवडणुकीच्या खिंडीत गाठून परभणीच्या मागण्या मिळवून घेता येतील हा आडाखा ठरला. महाराष्ट्रभर प्रचार मोहीमेचा धडाका चालू झाला.

सप्टेंबर १९८४ मध्ये दक्षिण महाराष्ट्र मोटर सायकल प्रचार फेरीचा अभूतपूर्व कार्यक्रम झाला. हजारो मोटारसायकली एका मागोमाग एक लष्कराच्या शिस्तीने पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नगर जिल्हे जागवून आल्या. कोपरगांवच्या डोळे फाडून टाकण्याच्या मेळाव्याने समारोप झाला. २ ऑक्टोबरला गुजरातमधील बार्डोलीतून दोन प्रचार यात्रा निघाल्या एक बारडोली ते साबरमती आणि दुसरी बारडोली ते धुळे, जळगांव, विदर्भ, मराठवाडा मार्गे टेहरे. प्रचार यात्रेंत उत्साहाला उधाण आले होते. ३१ ऑक्टोबर रोजी टेहरे येथील मेळाव्यांत संघटना काय आदेश देते याकडे सगळे लक्ष लागले होते. हिंगणघाट येथे या प्रचार यात्रे दरम्यान १८ ऑक्टोबर रोजी कापूस उत्पादक शेतकऱ्यांची राष्ट्रीय परिषद झाली.

एवढ्या रणधुमाळीत बापू आणखी एक मोठे किचकट आणि बापूंच्या भाषेत 'घाणेरडे' काम सांभाळत होते. नाशिक जिल्ह्यांतील पाचही साखर कारखाने आणि ठेंगोड्याच्या सूत गिरणीच्या निवडणूका याच वेळी जाहीर झाल्या. निवडणूकांसाठी पॅनेल तयार करणे, प्रचाराची मोहीम सांभाळणे ही कामे कोणीतरी करायला पाहिजे होती. या कामावर बापू फार नाराज असायचे. मला कितीदा म्हणाले, 'निवडणुकांच्या घाणीपासून दूर रहावे म्हणून संघटनेत आलो आणि पुन्हा त्याच घाणीच्या आसपास फिरावे लागते आहे.'' निवडणुका म्हटल्या की भल्याभल्यांची डोकी फिरून जातात. अगदी बापूंवर आणि भास्करभाऊंवरही लोक जिभा सोडू लागले. शत्रूशी सामना करतांना कधी न डगमगलेले बापू जिवलगांच्या शब्दांनी कासावीस होऊन जायचे.

३१ ऑक्टोबर १९८४ उगवला. प्रचारयात्रेला आता मुसळधार वृष्टीने तुडुंब भरून चाललेल्या महानदीचे रूप आले होते. गावागावांत यात्रेचे स्वागत करतांना शेतकरी अबालवृद्ध स्त्री पुरूष येणाऱ्या स्वातंत्र्याचेच जणू दर्शन घेत होते. शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य ओठाशी आले असे क्षणमात्र वाटले.

पण नियतीच्या मनांत काही वेगळाच खेळ होता. यात्रा टेहऱ्याला पोंचण्याआधी पंतप्रधान इंदिरा गांधींवरील हल्ल्याची आणि त्या जखमी झाल्याची बातमी आली.

आंदोलनाची सर्व परिस्थितीच पालटली. निवडणुकीच्या आधी उभारायच्या प्रचंड आंदोलनाच्या योजना बांधून बाजूला ठेवाव्या लागल्या. देशभर शीख बांधवांविरुद्ध दंगली घडवून आणण्यांत आल्या.

स्व. इंदिराजींच्या मृत्यूचे दु:ख, नवीन पंतप्रधानांबद्दल वाटणारी चिंता यांनी देश भारून गेला. त्यांचा फायदा घेण्याकरितां निवडणुका जाहीर झाल्या. ज्या खिंडीत शासनाला गाठायचे ठरले होते ती खिंड एकदम भूकंप होऊन राजमार्ग बनला.

बापूंच्या नेतृत्वाची आता खरी कसोटी सगळ्या खेळींचे आडाखे उधळून गेल्यावर लागली. एका पाठोपाठ एक कार्यकारिणीच्या बैठका घेतल्या गेल्या. खचून गेलेल्या विरोधी पक्षांच्या फळीला उचलून धरण्याचा निर्णय झाला. गावबंदीच्या कार्यक्रमाने महाराष्ट्र झपाटून गेला. अडाणी शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देता देता पुढाऱ्यांच्या नाकी दम आला. सगळ्या देशात इंदिरा पक्षाची मते दहा टक्क्यांनी वाढली. फक्त महाराष्ट्र एकच राज्य असे की जेथे राज्यकर्त्या पक्षाची मते घटली. पण लोकसभेतील जागांच्या हिशेबांत अक्षरश: पानिपत झाले.

या उलट संघटनेच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास प्रचंड वाढलेला. भुईसपाट झालेल्या विरोधकांना एकत्र आणले. त्याकरिता धुळ्याच्या अधिवेशनाचा प्रचंड संसार उभारावा लागला. त्यातून पुलोद आघाडी तयार झाली आणि विरोध बचावला. एकहाती सत्तेचा धोका टळला. शेतकरी आंदोलनाच्या मार्गांत आलेली धोंड दूर झाली.

२३ फेब्रूवारी १९८५ रोजी पंतप्रधान राजीव गांधींनी घोषणा केली 'कृषि मूल्य आयोगाचे नाव बदलून आता ते कृषि मूल्य आणि उत्पादनखर्च आयोग करण्यांत आले आहे' अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत बापूंनी स्वातंत्र्यवर्षाचा कार्यक्रम जवळ जवळ ठरवलेल्या अवधींत पुरा केला.

खरं पाहिले तर बापू ही व्यक्ति नाहीच, बागलाण तालुक्यांत कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे. या मोहोळाला आपण सगळे बापूंच्या नावाने ओळखतो एवढेच. सप्टेंबर १९८० मध्ये सटाण्याच्या नगरपालिका सभागृहांत एक सहकारी क्षेत्रातील कार्यकर्त्यांची बैठक होती. अनायासे माधवराव खंडेराव, प्रल्हादराव व मी आसपास मालेगांवला होतो. आम्हाला सटाण्याला नेण्यात आले. दोनचारशे कार्यकर्त्यांसमोर त्या दिवशी झालेली भाषणे अविस्मरणीय झाली. बस, त्यानंतर बागलाणमध्ये प्रचार करण्याची, पटवून देण्याची गरजच पडली नाही. ते काम सगळे या कार्यकर्त्यांच्या मोहोळानेच थेंबाथेंबाने केले, पण एका रात्रीत केले. बागलाणमध्ये आम्ही फिरतो ते प्रचाराकरिता नाही, आमच्याही



मनातली मरगळ झटकून टाकण्यासाठी.

बापूरूपी मोहोळाची कितीतरी रूपे स्वरूपे गेल्या पांच वर्षात मी पाहिली आहेत. गिरणा कारखान्याने उसाच्या आंदोलनाची उपेक्षा करून २३ ऑक्टोबर १९८० रोजी गळीत चालू करायचे ठरवले. उसाच्या मोळ्या गव्हाणींत पडण्याच्या आधी तरुण कार्यकर्ते त्यांत उड्या टाकतील अशी घोषणा झाली. २३ ऑक्टोबरला कारखान्यावर हजारो शेतकरी जमले,कारखाना बंद राहिला. आज तो कारखाना सभासदांनी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या हाती सुपूर्त केला आहे.

१९८० च्या रास्ता रोकोत बागलाणची कामगिरी खरी वाघाची. मंगरूळ पीर फाटा, सौंदाणे, उमराणे, झोडगे शेतकऱ्यांनी प्रचंड संख्येने लढवले आणि मारही तसाच अफाट सोसला. १३ नोव्हेंबर मंगरूळ पीर फाट्यावर सैरभैर झालेले शेतकरी सांभाळणारे बापू, जानेवारी १९८० मध्ये सटाण्यांतील ऐतिहासिक मेळाव्याचे कर्णधार बापू, १० नोव्हेंबर १९८१ च्या टेहऱ्यांतील गोळीबाराला तोंड देणारे बापू, जानेवारी १९८२ च्या सटाण्याच्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष बापू.

सटाण्याच्या अधिवेशनाचे सगळेच स्वरूप म्हणजे बापूंच्या आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या स्वभावाचे आणि वक्तिमत्वाचे प्रतिबिंबच. काम प्रचंड पण कुठे गोंधळ नाही, गडबड नाही सर्व अगदी शिस्तीने आणि वेळच्यावेळी चाललेले. सगळ्या विश्वाचा संसार तर दिसावा पण त्याचा नियंता मात्र कुठेच दिसू नये त्याप्रमाणे सटाण्याच्या अधिवेशनाची सूत्रे हलविणारी मंडळी कोण हे शेवटपर्यंत आम्हा पाहुण्यांना कळलेच नाही.

तसे बागलाण भागांत अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेले, महर्षि आणि नेते यांचा काही तोटा नाही. बापू या सगळ्यांचे उलटे टोक. बोलणार फार थोडे, अहंकाराचा अगदी स्पर्श नाही. याउलट स्वत:कडे कमीपणाच घेण्याची प्रवृत्ती. तनमनधनाने स्वत:ला झीज लावून घेण्याची तयारी, तरीही सतत हसरा चेहरा आणि विनोद समजण्याची करण्याची ताकद.

गेल्या तीन-चार वर्षांत संघटनेच्या कामाबरोबर मला व्यक्ति म्हणून अनेक कठीण, अगदी अंत:करण फोडून टाकण्याच्या परिस्थितीचा सामना करावा लागाल. बापू माझ्यापेक्षा वयाने खूपच लहान. पण या काळांत त्यांनी जो आधार दिला त्याचे ऋण सांगण्याचा प्रसंग कधी नंतर येईल. आज फक्त बापू नावाच्या मोहोळाचा संघटनेचे अध्यक्ष म्हणून केलेल्या कामगिरीचा हा आढावा आहे.

मनमाडच्या बैठकीनंतर मी बापूंच्या घरी गेलो होतो. त्यांच्या गृहीणींना म्हणालो, ''वर्षभर बापूंना तुम्ही संघटनेच्या कामाकरिता मोकळे केले तुमचे आभार कसे मानू?'' उत्तर साधे सरळ, ''साहेब मुलं लहान आहेत म्हणून, नाहीतर आम्हीपण संघटनेकरिता बाहेर पडलो असतो. ''

(शेतकरी संघटक, १९ एप्रिल १९८५)

■■



सभा–भाषणांतून मी केलेल्या त्यागाचा आता उल्लेख केला म्हणजे मला हसू येतं. संघटनेच्या कामात मी काही करुणेच्या प्रेरणेने पडलेलो नाही. कोणा तळागाळातील जनसामान्यांचा उद्धार करण्याची मनिषा ठेवण्याचा उद्धटपणा माझ्याकडे नाही. या कामात मला अपरंपार आनंद मिळतो म्हणून मी हे काम करतो. आजपर्यंत हजारो शेतकरी आंदोलनांत तुरुंगात गेले. कित्येकांनी लाठ्या खाल्ल्या. निपाणी भागात गेलो तर डझनभर शेतकरी लाठ्या–गोळ्यांनी हातपाय गेलेले, कुबड्या खाड्खाड् वाजवीत भेटायला येतात. बावीस घरांतली तरुण कर्ती माणसं पोलिसांच्या गोळीबाराला बळी पडली आहेत. एवढं होऊनसुद्धा या कामात मला आनंद वाटतो. मग त्याग कसला? उलट माझ्याइतकं भाग्यवान कोण? त्याग काय आजपर्यंत थोड्यांनी केला? अनेकांची बलिदानं व्यर्थ गेली. त्यांच्या नजरेला काहीसुद्धा फळ पडलं नाही. मी शेतकऱ्यांच्या ना जातीचा, ना पातीचा, ना पेशाचा.

देशभरातील शेतकऱ्यांनी मला जे प्रेम दिले त्याला तोड नाही.

जनशक्ती वाचक चळवळ
₹ १५०